म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. क्र. ५५२

REFBK-0005526

अभिनव–ग्रंथमाला पुष्प ११ वें.

# चुकलेला इतिहास

लेखक

पांडुरंग कृष्ण सावळापुरकर, बी. ए. (टिळक)

वाङ्मयाध्यापक, कार्यदे हायस्कूल, नागपूर शहर.

——:o:——

(संपादक व प्रकाशक

श्रीधर नारायण हुद्दार, बी. ए. [टिळक]

REFBK-0005526

——:o:——

आवृत्ति १ ली
प्रती १५००

किंमत १। रुपया

पौष १८५१
जानेवारी १९३०

प्रकाशक:--
श्रीधर नारायण हुद्दार,
संपादक, अभिनव ग्रंथमाला,
नागपूर शहर.

## प्रस्तुत पुस्तक--लेखकाचीं प्रसिद्ध होणारीं पुस्तकें

१ आनंद-वन-भुवन
( काव्य विषयक टीकाग्रंथ )
२ मराठी भाषेचें अध्यापन.
३ अज्ञात इतिहास.
४ नारद चरित्र.

मुद्रक:--
श्रीधर नारायण हुद्दार,
चालक, अभिनव मुद्रणालय,
नवी शुक्रवारी, नागपूर शहर.

# संपादकीय.

प्रस्तुत पुस्तक--प्रकाशनास झालेल्या विलंबाबद्दल 'क्षमस्व' म्हणून ग्राहकांची क्षमायाचना करण्यापलीकडे अन्य उपाय नाहीं ! ग्राहकांचा गैरसमज होऊं नये म्हणून इतकें मात्र येथें नमूद करावेसें वाटतें कीं, प्रस्तुत विलंबास अनेक कारणें असलीं तरी सर्वांत प्रमुख व प्रभावी कारण म्हटलें म्हणजे मालेची आर्थिक असहाय परिस्थिती हेंच होय. मालेचीं पुष्पें नियमितपणें काढण्याचा आम्हीं नेहमीच प्रयत्न करीत असतो पण वरील कारणामुळेंच आमचा दरवेळीं नाइलाज होतो. 'माला' आपल्या पायावर सर्वस्वीं उभी राहीपर्यंत हा नियमितपणा राखणें बरेच कठिण आहे; करितां अशाही परिस्थितींत मालेकडून वेळोवेळीं होणारी सेवा–विलंबामुळे तिजवर रुष्ट न होतां–ग्राहकांनीं आपल्या गुणग्राही वृत्तीनुसार गोड करून घ्यावी अशी त्यांस विनंति आहे.

दुःखांत समाधानाची गोष्ट ही कीं, इतक्या उशीरां कां होईना पण जें पुस्तक आतां ग्राहकांस देण्यांत येत आहे तें आजवरच्या सर्व पुस्तकांहून आकारानें मोठें असून त्याची बांधणीहि सर्व पुस्तकांहून सरस करण्यांत आलेली आहे. कागद टिटाघरचा अँटिक वापरण्यास घेतला होता पण सुमारें $\frac{2}{3}$ पुस्तक छापून झाल्यावर नागपूरला सदर कागद उपलब्ध न झाल्यामुळें व परगांवहून तो आणविणें शक्य न झाल्यामुळें बाकी पुस्तकाकरितां सामान्य ग्लेज कागदच उपयोगांत आणला आहे. या बाह्य सजावटीपेक्षां पुस्तकाचें अंतरंग वाचकांना विशेषच चित्तवेधक होईल अशी आम्हांस उमेद आहे. लेखकाला पुस्तकलेखनार्थ किती ग्रंथांचें आलोडन करावें लागलें हें निरनिराळ्या ग्रंथांतील जे उतारे पुस्तकांत जागोजागीं दिले आहेत त्यावरून स्पष्ट होणार आहे. पुस्तकाचा विषय निवडून काढण्यांतहि लेखकाची स्वतंत्र कल्पकबुद्धी दिसून येते. पुस्तकांतील साधार, सोपपत्तिक, निर्भीड तशीच सविवेचक मांडणी यावरून लेखकाच्या प्रस्तुत विषयाचा व्यासंग,

शोधक बुद्धि, आणि लेखनपटुता इत्यादि गुणांचा चांगला परिचय होतो. 'आदर्श-शिक्षण' पुस्तकाच्या परिचयांत प्रस्तुत पुस्तकाचे लेखक **रा. सावळापुरकर** यांची ग्राहकांस ओळख करून देण्यांत आली होती. त्यांत त्यांचे बाबतींत प्रदर्शित केलेली आशा प्रस्तुत पुस्तकाचें प्रकाशनानें सफल होत असल्याचें पाहून आमच्याप्रमाणेंच ग्राहकांसहि साभिमान आनंद होईल असें आम्हांस वाटतें. ब्रिटिश आंमदानीवरील इतिहास विषयक ग्रंथ लिहिण्याचे बाबतींत आजपर्यंत न अवलंबिलेली चाकोरी अर्थात दृष्टि, विचारसर्णी, अनुमानपद्धति व भाषापद्धति प्रस्तुत लेखकानें निर्भीडपणें अनुसरून मराठी वाचकांना नवीन दृष्टीचें दालन खुलें करून दिलें आहे याबद्दल अखिल महाराष्ट्र लेखकाला धन्यवाद देईल यांत शंका नाहीं. इतक्या लहान वयांत इतक्या थोर योग्यतेचा ग्रंथ लिहून ग्रंथमालेस प्रकाशनार्थ दिल्याबद्दल लेखकाचें आम्हीं मनःपूर्वक आभार मानतो व लेखकांनीं आपला लेखन-व्यासंग असाच वाढत्या स्वरुपांत चालवून आपल्या लेखनकुसरीच्या ग्रंथांनीं महाराष्ट्रसाहित्य अधिक समृद्ध करण्यास झटावें अशी त्यांस निकटचे स्नेही या नात्यानें आह्मीं प्रेमाची विनंति करतों.

प्रस्तुत वर्षांत ग्राहकांस यावयाच्या पुष्पांपैकीं प्रस्तुतचें पाहिलेंच पुस्तक आहे. याबरोबरच ज्याच्या विक्र्याचे सर्व हक्क आम्हीं घेतले आहेत तें **'चातुवर्ण्य व वर्णव्यवस्था'** हें कै. **ज. वि. ओक** यांच्या निबंधाचें पुनर्मुद्रित वाचनीय पुस्तकहि ग्राहकांस देऊन या वर्षाच्या निम्मे ऋणांतून आम्हीं मुक्त होत आहोंत. याच वर्षात आणखी दोन पुस्तकें दिलीं म्हणजे या वर्षाची आमची जबाबदारी पार पडली असें होईल.

पुस्तक प्रकाशनाचे बाबतींतील विलंबाचा विचार क्षणभर बाजूस ठेऊन मालेच्या कार्यासंबंधीं विचार केल्यास अल्पकालांत मालेनें पुष्कळच प्रगति केली आहे हें स्पष्टपणें दिसून येणार आहे. मागिल पुष्प प्रसिद्ध झाल्यावरच सर्वस्वी मालेच्या मालकीचें **अभिनव-मुद्रणालय** (क्राऊन फोलियो साइजचें ट्रेडल मशिन, ड. फु. साइजचा हँडप्रेस, मराठी पायका ग्रटप्रायर टाइप, इंग्रजी टाइप व इतर किरकोळ सामान एकूण किं. सुमारें २२०० रु.) अस्तित्वांत आलें असून गेल्या जुलै महिन्यांत ग्रंथमाला व

मुद्रणालयाच्या जोडीला '**अभिनव ग्रंथशाळा**' या विक्रय-शाखेची जोड देण्यांत आली आहे व आनंदाची व समाधानाची गोष्ट ही कीं, सुरुवातीस या कामासाठीं जवळ कांहीं भांडवल नसतांहि कांहीं स्नेहीमंडळाच्या प्रोत्साहनानें सुरू केलेल्या या शाखेनें गेल्या ६-७ महिन्यांत बराच व्यवहार केलेला आहे. अर्थात या त्रिविध विकासामुळें ग्रंथमालेच्या आजवरच्या 'एकमेवाद्वितीयत्वा' चा लोप झाला असून तिन्हीं कार्यांना केंद्रीभूत अशी '**अभिनव-कार्यालय**' ही संस्था स्वाभाविकपणेंच उदित झाली आहे. उद्बोधक व तेजस्वी वाङ्मयाचें प्रकाशन हें 'ग्रंथमाले' चें कार्य असून मालेचें व बाहेरचें छपाईचें काम शुद्ध व सुबकपणें छापण्याचा यथाशक्ति यत्न करून पुस्तक छपाईचे दृष्टीनें नागपूर शहरांत इष्ट सुधारणा घडवून आणणें हें 'मुद्रणालया' चें कार्य ठरविलें आहे; तद्वतच ग्रंथमालेच्या पुस्तकांची प्रसिद्धी व विक्रय व त्याबरोबरच महाराष्ट्रांतील उत्तमोत्तम वाचनीय पुस्तकांचाहि विक्रय द्वारां प्रसार करणें, व्यवहार दृष्टीनें शालोपयोगी पुस्तकें व साहित्य यांचाहि व्यवहार करणें हें 'ग्रंथशाळे' चें आजचें कार्य ठरविण्यांत आलें आहे. ग्रंथमाला स्वावलंबी बनून तिचे हातून सुवाङ्मयनिर्मितीचें कार्य उत्तम प्रकारें व्हावे म्हणून अशाप्रकारें तिला आणखी दोन संस्थांची जोड दिली गेली आहे. पण संस्थेचें स्वरूप इतकें व्यापक करीत असतां त्याबरोबरच विशेष व आमच्या वैयक्तिक परिस्थितीस न झेंपण्यासारखें आर्थिक उत्तरदायित्व आम्हांस पत्करावें लागलें आहे. संस्थेचें कार्य पटल्यावर महाराष्ट्रीय रसिकांकडून त्यांच्या गुणग्राहकतेमुळें संस्थेस मिळणाऱ्या उदारआश्रयावर आमची सर्व भिस्त आहे व या आशेवरच वरील दायित्व आम्हीं पार पाडूं शकूं असा आम्हास भरंवसा वाटतो.

संस्थेचे ६ टक्क्याचे ५० रु. किं. चे ५ वर्षें मुदतीचे **डिबेंचर्स** विकत घेऊन, २० रु. किंवा त्याहून अधिक इच्छेनुरूप रकम देऊन संस्थेचे **आश्रयदाते** होऊन, मुद्रणालयाकडे आपले कडील **छपाईचें** काम पाठवून व ग्रंथशाळेंतून आपणांस हवीं असलेलीं **पुस्तकें विकत घेऊन** संस्थेच्या कार्यास हातभार लावता येण्यासारखा आहे. अतएव ज्यांना ज्या मार्गानें शक्य होईल त्या मार्गानीं त्यांनीं संस्थेस अवश्य साहाय्य करावे अशी रसिकवृंदांस आमची प्रार्थना आहे.

ग्रंथमालेच्या प्रसारानिमित्त गेल्या दोन वर्षांत कसा प्रयत्न झाला या-संबंधांत दोन शब्द लिहून हें निवेदन संपवूं. आदर्श-शिक्षणाचे प्रसिद्धीनंतर आम्हीं दमोह, सागर, झांशी, ग्वाल्हेर, आग्रा, उज्जैन, इंदूर, खांडवा, अमळनेर, रत्नागिरी कोल्हापूर, सोलापूर, नगर, संगमनेर इत्यादि ठिकाणीं जाऊन आलों. हा प्रवास कांहीं अंशीं स्नेहीमंडळीच्या भेटी घेण्याकरितां तर कांहीं अंशीं मालेची माहिती तत्रस्थ लोकांना समक्ष करून द्यावी या हेतुनें झाला. दुसऱ्या प्रवासांत वाशिम, पुसद, धुळे, अमळनेर याठिकाणीं जाणें झालें. हे दोन्ही प्रवास डिसेंबर १९२७ ते जून १९२८ च्या कालांत घडून आले. त्यानंतर आम्हीं 'स्वातंत्र्य प्रेस' मक्तयानें चालविण्यास घेतल्यामुळें धाकटे बंधु रा. दत्तात्रय यांस मालेच्या प्रसार-कार्यावर पाठविण्यांत आलें होतें. त्यांनीं मध्यप्रांत वऱ्हाडांतील बहुतेक जिल्ह्यांत संचार करून मालेचें बरेंच कार्य केलें आहे. आमचे पुण्याचे स्नेही रा. रा. मो. गो. काळे यांनीं पुणें, मुंबई, ठाणें, कोलाबा या भागांत मालेच्या प्रचाराची विशेष खटपट केली. त्यांनीं दिल्लीकडे केलेल्या सफरींतहि मालेची बरीच सेवा केली आहे. रा. रा. सावळापुरकर यांस जळगांव येथें भरलेल्या साहित्य संमेलनाकरितां माले-कडून पाठविण्यांत आलें होतें तेथें त्यांनीं संमेलनांत भाग घेऊन पूर्व खानदेश जिल्ह्यांत व शिंदी जि. वर्धा येथें मालेच्या प्रचाराचें काम केलें. रा. काळे व सावळापुरकर यांनीं केलेल्या या प्रचारकार्याबद्दल त्यांचे व त्यांस व आम्हां बंधुद्वयांसहि ज्यांनीं ज्यांनीं प्रचार कार्यांत मदत केली त्यांचे आम्हीं अत्यंत आभारी आहोंत.

या पुस्तकाच्या प्रकाशनानें ग्रंथमाला चतुर्थ वर्षांत पदक्रमण करीत आहे. हा दिवस जगचालकाच्या कृपेविना प्राप्त होणें केवळ अशक्य असल्यानें त्याचें स्मरण करून हें निवेदन संपवितों.

अभिनव-कार्यालय,<br>नागपूर शहर.<br>तिळसंक्रांत, ता. १०-१-३०

श्रीधर नारायण हुद्दार.

# प्रस्तावना.

जाहिर केल्यापासून फार दिवसानंतर प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध होत आहे. परंतु तें बाहेर येण्याचें सर्व श्रेय माझे परम मित्र व अभिनव-ग्रंथमालेचे चालक श्रीधरराव हुद्दार यांनाच आहे. 'चुकलेला इतिहास' कल्पनास्थितींत असतांनाच त्याच्या मुद्रण व प्रकाशनाची कठिण जबाबदारी जर त्यांनीं घेतली नसती व पुढें वेळोंवेळीं आग्रह करून माझ्याकडून मजकूर लिहून घेतला नसता तर प्रस्तुत पुस्तक बाहेर येणें अशक्यच होतें. ह्या त्याच्या उपकाराबद्दल व पुस्तकाची छपाईही झीज सोसून सुबक केल्याद्दल त्यांचे कितीही शाब्दिक आभार मानले तरी ते अपुरेच होत.

प्रस्तुत पुस्तक मी लिहिलें असलें तरी त्यांतलि ज्ञान इतर अनेक ग्रंथकर्त्यांपासूनच प्राप्त झालें असल्याकारणानें माझें असें ह्मणावयास ह्यांत फारच थोडें उरतें. पुराव्याकरितां ह्मणून ठिकाठिकाणीं भरपूर उतारे व टीपा जोडल्या आहेत त्या वाचकांस उपयुक्त वाटतील अशी आशा आहे. प्रथमतः शेवटचीं तीन चार प्रकरणें बरींच विस्तृत लिहिण्याचा विचार होता. परंतु पुस्तक अगोदरच अदमासाबाहेर.फुगल्यामुळें तीं त्रुटित लिहलीं आहेत.

इतिहास विषयाचीं पुस्तकें वाचावयास मिळालीं नसतीं तर मला कांहींही लिहितां आलें नसतें. तरी स्वतः जवळील अमूल्य इतिहास ग्रंथसंग्रहाचा मला यथेच्छ लाभ घेऊं दिल्याबद्दल माझे मित्र श्री. गो. रा. चांदे बी. ए.बी. टी. विशारद यांचा व नागपुरांतील कालेज, युनिव्हर्सिटी व इतर वाचनालयांतून उत्तमोत्तम पुस्तकें पुरविल्याबद्दल प्रिय सुहृद श्री. ना. तु. गोसावी 'विशारद' यांचा मी अत्यंत ऋणी आहे. शेवटीं कित्येक निकटच्या मित्रांनीं पुस्तक लिहावयास थोडा निवांतपणा मिळूं दिला त्याबद्दल त्यांचे आभार न मानणेंही कृतघ्नपणाचें होईल! तरुण विद्यार्थ्यांस प्रस्तुत पुस्तकांचा कांहीं उपयोग झाल्यास मी माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें समजेन.

कायंदे हायस्कूल, नागपूर
ता. २ जानेवारी १९३०

**पांडुरंग कृष्ण सावळापूरकर.**

—×—

**महत्वाची दुरुस्ती**:-पृ. १९५ ओळ शेवटून दुसरी, येथें 'ख्रिस्तायन' ह्या शब्दाऐवजीं 'ख्रिस्तपुराण' असें वाचावें.

*How British Rule in India was established :—*

Hindus were played off against the Mohamedans, and *viceverca*, states and principalities against states and principalities, Jats against Rajputs, and Rajputs against Jats, Mahrattas against both, Rohillas against Bundelas, and Bundelas against Pathans, and so on. Treaties were made and broken without the least scruple, sides were taken and changed and again changed without the least consideration of honour or faith. Thrones were purchased and sold to the highest bidder. Military support was purchased and given like merchandise. Servants were induced to betray their masters, soldiers to desert flags, without any regard to the morality of the steps taken. Pretences were invented and occasions sought for involving states and principalities in wars and trouble. Laws of all kinds, national and international, moral or religious, were all for the time thrown to the dogs. Neither minors nor widows received any consideration; the young and the old were treated alike. The one object in view was to loot, to plunder, and to make an *empire*. Every thing was subordinated to that end.

—Young India by Lajpat Rai
P. 103-104

कै० ती० मातापित्यांच्या

प्रियतम व पूज्य स्मृतीस,

सादर समर्पण

—पां. कृ. सावळापूरकर.

शोधक बुद्धि, आणि लेखनपटुता इत्यादि गुणांचा चांगला परिचय होतो. 'आदर्श-शिक्षण' पुस्तकाच्या परिचयांत प्रस्तुत पुस्तकाचे लेखक **रा. सावळापुरकर** यांची ग्राहकांस ओळख करून देण्यांत आली होती. त्यांत त्यांचे बाबतींत प्रदर्शित केलेली आशा प्रस्तुत पुस्तकाचें प्रकाशनानें सफल होत असल्याचे पाहून आमच्याप्रमाणेच ग्राहकांसहि साभिमान आनंद होईल असें आम्हांस वाटतें. ब्रिटिश अंमदानीवरील इतिहास विषयक ग्रंथ लिहिण्याचे बाबतींत आजपर्यंत न अवलंबिलेली चाकोरी अर्थात दृष्टि, विचारसरणी, अनुमानपद्धति व भाषापद्धति प्रस्तुत लेखकानें निर्भीडपणें अनुसरून मराठी वाचकांना नवीन दृष्टीचें दालन खुलें करून दिलें आहे याबद्दल अखिल महाराष्ट्र लेखकाला धन्यवाद देईल यांत शंका नाहीं. इतक्या लहान वयांत इतक्या थोर योग्यतेचा ग्रंथ लिहून ग्रंथमालेस प्रकाशनार्थ दिल्याबद्दल लेखकाचें आम्ही मनःपूर्वक आभार मानतो व लेखकांनीं आपला लेखन-व्यासंग असाच वाढत्या स्वरुपांत चालवून आपल्या लेखनकुसरीच्या ग्रंथांनीं महाराष्ट्रसाहित्य अधिक समृद्ध करण्यास झटावे अशी त्यांस निकटचे स्नेही या नात्यानें आह्मी प्रेमाची विनंति करतों.

प्रस्तुत वर्षांत ग्राहकांस द्यावयाच्या पुष्पांपैकीं प्रस्तुतचें पाहिलेंच पुस्तक आहे. याबरोबरच ज्याच्या विक्रयाचे सर्व हक्क आम्ही घेतले आहेत तें **'चातुर्वर्ण्य व वर्णव्यवस्था'** हे कै. **ज. वि. ओक** यांच्या निबंधाचें पुनर्मुद्रित वाचनीय पुस्तकहि ग्राहकांस देऊन या वर्षाच्या निम्मे ऋणांतून आम्हीं मुक्त होत आहोंत. याच वर्षांत आणखी दोन पुस्तकें दिलीं म्हणजे या वर्षाची आमची जबाबदारी पार पडली असें होईल.

पुस्तक प्रकाशनाचे बाबतींतील विलंबाचा विचार क्षणभर बाजूस ठेऊन मालेच्या कार्यासंबंधीं विचार केल्यास अल्पकालांत मालेनें पुष्कळच प्रगति केली आहे हें स्पष्टपणें दिसून येणार आहे. मागील पुष्प प्रसिद्ध झाल्यावरच सर्वस्वी मालेच्या मालकीचें **अभिनव-मुद्रणालय** (क्राऊन फोलियो साइजचें ट्रेडल मशिन, ड. फु. साइजचा हँडप्रेस, मराठी पायका ग्रेटप्रायर टाइप, इंग्रजी टाइप व इतर किरकोळ सामान एकूण किं. सुमारें २२०० रु.) अस्तित्वांत आलें असून गेल्या जुलै महिन्यांत ग्रंथमाला व

मुद्रणालयाच्या जोडीला ‘ **अभिनव-ग्रंथशाळा** ’ या विक्रय–शाखेची जोड देण्यांत आली आहे व आनंदाची व समाधानाची गोष्ट ही कीं, सुरुवातीस या कामासाठीं जवळ कांहीं भांडवल नसतांहि कांहीं स्नेहीमंडळाच्या प्रोत्साहनानें सुरू केलेल्या या शाखेनें गेल्या ६-७ महिन्यांत बराच व्यवहार केलेला आहे. अर्थात या त्रिविध विकासामुळें ग्रंथमालेच्या आजवरच्या ‘ एकमेवाद्वितीयत्वा ’ चा लोप झाला असून तिन्हीं कार्यांना केंद्रीभूत अशी ‘**अभिनव-कार्यालय** ’ ही संस्था स्वाभाविकपणेंच उदित झाली आहे. उद्बोधक व तेजस्वी वाङ्मयाचें प्रकाशन हें ‘ ग्रंथमाले ’ चें कार्य असून मालेचें व बाहेरचें छपाईचें काम शुद्ध व सुबकपणें छापण्याचा यथाशक्ति यत्न करून पुस्तक छपाईचे दृष्टीनें नागपूर शहरांत इष्ट सुधारणा घडवून आणणें हें ‘ मुद्रणालया ’ चें कार्य ठरविलें आहे; तद्वतच ग्रंथमालेच्या पुस्तकांची प्रसिद्धी व विक्रय व त्याबरोबरच महाराष्ट्रांतील उत्तमोत्तम वाचनीय पुस्तकांचाहि विक्रय द्वारां प्रसार करणें, व्यवहार दृष्टीनें शालोपयोगी पुस्तकें व साहित्य यांचाहि व्यवहार करणें हें ‘ ग्रंथशाळे’ चें आजचें कार्य ठरविण्यांत आलें आहे. ग्रंथमाला स्वावलंबी बनून तिचे हातून सुवाङ्मयनिर्मितीचें कार्य उत्तम प्रकारें व्हावे म्हणून अशाप्रकारें तिला आणखी दोन संस्थांची जोड दिली गेली आहे. पण संस्थेचें स्वरूप इतकें व्यापक करीत असतां त्याबरोबरच विशेष व आमच्या वैयक्तिक परिस्थितीस न झेंपण्यासारखें आर्थिक उत्तरदायित्व आम्हांस पत्करावें लागलें आहे. संस्थेचें कार्य पटल्यावर महाराष्ट्रीय रसिकांकडून त्यांच्या गुणग्राहकतेमुळें संस्थेस मिळणाऱ्या उदारआश्रयावर आमची सर्व भिस्त आहे व या आशेवरच वरील दायित्व आम्हीं पार पाडूं शकूं असा आम्हास भरवंसा वाटतो.

संस्थेच ६ टक्कयाचे ५० रु. किं. चे ५ वर्षे मुदतीचे **डिबेंचर्स** विकत घेऊन, २० रु. किंवा त्याहून अधिक इच्छेनुरूप रकम देऊन संस्थेचे **आश्रयदाते** होऊन, मुद्रणालयाकडे आपले कडील **छपाईचें** काम पाठवून व ग्रंथशाळेंतून आपणांस हवीं असलेलीं **पुस्तकें विकत घेऊन** संस्थेच्या कार्यास हातभार लावता येण्यासारखा आहे. अतएव ज्यांना ज्या मार्गानें शक्य होईल त्या मार्गांनीं त्यांनीं संस्थेस अवश्य साहाय्य करावे अशी रसिकवृंदांस आमची प्रार्थना आहे.

# * अनुक्रमणिका *

| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | भूमिका | १ |
| २ | इंग्रजांचें हिंदुस्थानांत आगमन | ६ |
| ३ | प्लासीचें युद्ध व त्याचीं कारणें | १५ |
| ४ | क्लाइव्हची कारकीर्द | ३० |
| ५ | वॉरन हेस्टिंग्सचा जुलमी कारभार | ३८ |
| ६ | मराठेशाहींत कलिप्रवेश | ५३ |
| ७ | तैनाती फौजेचें स्वरूप व कार्य | ६६ |
| ८ | तैनाती फौजेस मराठ्यांचा बळी | ७३ |
| ९ | हैदर, टिपू व इंग्रज | ८९ |
| १० | इंग्रजांच्या जबड्यांत—! | ९९ |
| ११ | मराठेशाहीचा अंत | ११३ |
| १२ | मधलीं तीस वर्षे | १२८ |
| १३ | वादळापूर्वीच्या घडामोडी | १३९ |
| १४ | कागदी घोड्यांचा पराक्रम | १४७ |
| १५ | भयंकर स्फोट | १६४ |
| १६ | शस्त्रसंन्यास व दीर्घकालीन शांतता | १८५ |
| १७ | ख्रिस्ती मिशनरी व हिंदुस्थान | १९५ |
| १८ | परतंत्र हिंदुस्थानांतील शिक्षण | २०८ |
| १९ | हिंदुस्थान व इंडिया | २२० |
| २० | उपसंहार | २३१ |

# भूमिका

दोन वर्षांपूर्वी Sanderson चे Outlines of the World's History हें पुस्तक वाचीत असतां त्यांत हिंदुस्थानासंबंधीं पुढील मजकूर आढळला—" However we pass in India to a region where fancy, and sensibility have held sway, though **the absence of energy and of true human dignity and freedom,** has prevented the people from exibiting historical progress of the highest order. They are a people of dreams, not of deeds." ( Sanderson-out lines of the world's History P. 16. )

आम्हा भारतवर्षियांवर कोणत्याही परकीय लेखकानें वाटेल तसे अभिप्राय आपल्या अधिकाराच्या झोकांत ठोकून द्यावे आणि आमच्या विद्यार्थ्यांनीं त्यांना शिरसावंद्य मानून नसतां नापसंती देखील व्यक्त करूं नये, ह्याबद्दल अत्यंत वाईट वाटलें. वर्गांत इतिहास विषयाच्या अध्यापनाकरितां मला लहान मोठीं अनेक पुस्तकें वाचावीं लागलीं, त्यांतही अनेक स्वदेशी लेखकांनींही स्वदेशाभिमान शून्यतेचीं अनेक विधानें केलेलीं वाचलीं, तेव्हां तर आमच्या अध:पाताबद्दल कींव वाटावयास लागून महाराष्ट्रीय तरुणांच्या हातांत सत्य पण स्फुरणदायी असें इतिहासाचें एखादें छोटें पुस्तक द्यावें असें मनांत फार घोळूं लागलें. माझे पूज्य मित्र, श्री. ज. मा. कायंदे ह्यांनींही असलें एखादें पुस्तक लिहण्यास मला प्रोत्साहन दिलें, व त्याचाच परिपाक म्हणजे हें पुस्तक होय.

युरोपियन लेखकांच्या हिंदुस्थानविषयक पुस्तकांतून प्रायः सत्याचा अंश बराच कमी रहात असून कांहीं तरी भरमसाट विधानें ठोकून देण्याची त्यांची पद्धत असते, आणि परदेशस्थ लेखकांनीं केलेल्या विधानांची व सत्यासत्यतेची चर्चाही न करितां आमचे लोक त्याला वेदतुल्य समजतात. आमचें इतिहासाचें ज्ञान हें असें असतें ! आम्हाला भगवद्गीता वाचावयाची असली तरी देखील ती आम्हीं इंग्रजी भाषांतरावरून वाचतों, इतकी आपली अधोगती झालेली आहे. +

उपरोक्त इतिहास लेखकानें हिंदुस्थानच्या लोकांसंबंधी एकदम, 'हिंदुस्थानच्या लोकांनीं केवळ मनोराज्यें करावी, प्रत्यक्ष काय त्यांच्या हातून होणें शक्य नाहीं.' असल्या अर्थाचें विधान ठोकूनच दिलें ! आणि केवळ ह्या एका वाक्यानें हिंदुस्थानच्या सर्व गतेतिहासावर निष्क्रियतेचा शिक्का मारला ! हिंदुस्थानच्या लोकांना मनोराज्यें करण्याची हौस होती व आहे व ती कोणासही राहणार, कारण व्यक्तिमात्र मनोराज्याप्रिय आहे. पण त्यांनीं आपली मनोराज्यें वरीं करून दाखविली नाहींत काय ! निदान तसें करण्याचा प्रयत्न तरी केला नाहीं काय ? श्री. **समर्थांनीं** 'आनंद--वन--भुवनाचें'

---

+ 'आमच्या देशाच्या व भरतवर्षाख्य महाद्वीपाच्या संबंधानें जी कांहीं हरएक माहिती आम्हास पाहिजे ती सर्व इंग्रजींतून मिळूं शकेल त्याचप्रमाणें स्मृती घ्या, कायदे घ्या, नाटकें घ्या, सर्व कांहीं इंग्रजींत मोठमोठ्या विद्वानांनीं प्रतिबिंबविलेलें आहे. एक इंग्रजी भाषा चांगली आली म्हणजे सर्व प्रकारच्या सत्तदिष्ट ज्ञानवृद्धीचा रस्ता खुला झाला'.

—रा. रा. भागवत--मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार १८८३. पृ. १६७, १६८.

मनोराज्य केलें आणि तें पुढें शक्य झालें. पण ह्या साऱ्या गोष्टी बुद्धि निर्विकार असेल तेव्हांच सुचावयाच्या ! * इतिहास लिहावयाचा तो सत्यान्वेषणाच्या बुद्धीनें लिहावयाचा असतो. पण परतंत्र माणसांना शिकविण्यांत येणाऱ्या इतिहासांत ही दृष्टी कायम ठेवण्यांत आली तरच आश्चर्य ! हिंदुस्थानचे लोक जर केवळ मनोराज्यें करणारे स्वप्न सृष्टीचे ईश्वरच असते, तर त्या बिचाऱ्यांचा इतिहास तरी लिहण्याची काय आवश्यकता होती ? इतिहास विषयाचीं नव्हे तर इतरही विषयांचीं असलीं घाणेरडीं पुस्तकें आमच्या विद्यार्थ्यांच्या हातांमध्यें देण्यांत येतात, आणि तीं वाचून आमच्या विद्यार्थ्यांना 'सुशिक्षित' व्हावयाचें असतें ! कित्येक शालोपयोगी पुस्तकांतून गोंडस स्वरुपांत असें एखादें शल्य मारलें असतें कीं, ते सहृदय पुरुषांच्या अंतःकरणांत खोलवर जाऊन रुजावें !

---

* मराठ्यांच्या कर्तृत्वासंबंधांचे खालील उद्गार पहा :—

'The highlands which border on the Western sea-coast of India pourcd forth a yet more formidable race, a race which was long the terror of every power, **and which after many desperate and doubtful struggles, yielded only to the fortune and genins of England.** ..................**and** soon after his (Aurangazeb's) death every corner of his wide empire learned to tremble at the mighty name of the Mahrattas.'

—Lord Macaulay.

Historical essays Vol. 11 P. 156-

प्रस्तुत पुस्तकाचें 'चुकलेला इतिहास' हें नांव वाचकांना चमत्कारिक वाटेल व कदाचित् एकदम त्याचा उलगडाही होणार नाहीं. आम्हीं लिहलेला इतिहास चुकीचा कीं, इतरत्र चुकलेल्या इतिहासाचें ह्यांत खंडन केलें आहे! असा प्रश्न सहाजिक उत्पन्न होईल, पण हें नांव कांहीं अंशीं व्याजोक्तीनें दिलें आहे. व ह्यांत इंग्रजांचें हिंदुस्थानांत पदार्पण झाल्यापासून आजपर्यंतच्या त्यांच्या कारभाराचा, चळवळींचा, कारस्थानांचा आणि युक्तिबाजपणाचा संक्षिप्त पण सत्य इतिहास देण्याचा प्रयत्न केला आहे! इंग्रजांच्या राज्यानंतर अगदी अलीकडेपर्यंत ज्यांच्यामागील 'दयाळू' हें विशेषण सुटलें नाहीं, व ज्यांच्या वेळोवेळींच्या जाहीरनाम्यांबद्दल आमच्या लोकांनीं अगणित उत्सव करून जेवणाआधीं तृप्तीच्या ढेकरा देण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या संबंधीं आम्ही उगीच एखाद दुसरा बरावाईट शब्द लिहिला, तर तो 'चुकला' असण्याचाच शिक्का बसणार नाहीं काय? आजपर्यंत बहुधा वृद्ध आणि 'माथेधरू' लोकांच्या दृष्टीनें सतत तरुण लोक 'माथेफिरू' पणाच्या कृत्यांनां चुकतच आले आहेत. अशा स्थितींत त्या स्थितींतील लोकांच्या दृष्टीनें हा प्रयत्न 'चुकीचाच' ठरेल!

इंग्रजांनीं हिंदुस्थानचें राज्य घेतलें. येथील लोक कांहीं कालानंतर मुक्या जनावराप्रमाणें सर्वथैव त्यांच्या अंकित झाले. व एखादी सच्छील पतिव्रता पतीच्या बऱ्यावाईट गुणाकडे न पाहतां त्याच्याशीं एकनिष्टपणें संसार करते त्याप्रमाणें येथील लोकांनीं एकनिष्टपणें वागण्याचा निश्चयच केल्यासारखा झाला! इंग्रजांनीं येथील लोकांचे शस्त्रास्त्र काढून घेतलेंच पण त्यापेक्षांही अत्यंत श्रेष्ट अस-

णाऱ्या 'प्रज्ञे'ची हत्या करण्याचा प्रयत्न करण्यांत आला व अजून-ही करण्यांत येत आहे. ! त्याकरितां त्यांनीं स्वविरुद्ध असणारे सत्य ऐतिहासिक पुरावे दडपून टाकले, खोटे पुरावे उपलब्ध केले, खोटीं पुस्तकं लिहिलीं, आणि खोटा मोठेपणाचा आणि उदारपणाचा आव आणला! व जणूं कांहीं आम्हाला जगाच्या कल्याणाकरितांच ईश्वरांनीं उत्पन्न केलें आहे, अशा तऱ्हेची बतावणी केली!! ह्यावेळीं बहुजन समाज यद्यपि भाबडेपणानें राजनिष्ट होता तरी कांहीं गुप्त आणि प्रगट राष्ट्रप्रणेते प्रत्याघाताचा प्रयत्न करीतच होते! त्यांनाही लोकांच्या दृष्टीआड करण्याकरितां इंग्रजसरकारला भगीरथ प्रयत्न करावे लागले. व ह्या साऱ्या गोष्टी करतांना कायद्याच्या एका अक्षराचाही अतिक्रम होत नसल्याबद्दल जगाची खात्री पटविण्या-करितां लंगडे कोटीक्रम लढवावे लागले! हा सर्वच इतिहास अत्यंत स्फुरणदायी आणि संतापजनक आहे. व तो लिहिण्यास आधारही भरपूर पण विखुरलेले आहेत! तरी असा सांगोपांग इतिहास लिहिण्याचा प्रयत्न एखादा अधिकारी लेखक करील. आम्ही त्या इतिहासापैकीं कांहीं प्रसंगांचेंच वर्णन करणार आहों. आमचा प्रयत्न महाराष्ट्र जनतेस पसंत पडला तर आम्हांस आणखी दोन पावेंल पुढें टाकावयास धीर येईल. जनता जनार्दनाचे चरणीं आमची ही सेवा रुजूं होवो हीच ईश्वरचरणीं प्रार्थना आहे.

---:o:---

# इंग्रजांचें हिंदुस्थानांत आगमन.

इंग्रज लोक हिंदुस्थानांत प्रथमतः व्यापारी म्हणून आले ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. तागडी घेऊन आलेले हे लोक हातांत तरवार मुख्यत्वेंकरून न धरतांही हिंदुस्थानच्या तक्तावर आरूढ झाले! तेव्हां 'तागडी, तरवार व तक्त' ह्यांचा हा सामन्वयिक संबंध हिंदुस्थानच्याच नव्हे तर जगाच्याही इतिहासांत अत्यंत अपूर्व आणि आश्चर्यकारक असाच होय ह्यांत शंका नाहीं. सुमारें पंधराव्या शतकाच्या शेवटीं यूरोपांतील मंडळीस आपण जलपर्यटणास निघून हिंदुस्थानचा नवा समुद्रमार्ग शोधून काढावा अशी इच्छा झाली. तत्पूर्वी भूमध्यसमुद्र व मध्यआशिया इत्यादिमधून येथें येण्यास मार्ग नव्हते असें नाहीं, पण तुर्क आदि लोकांनीं त्यांच्या व्यापार मार्गास बराच अडथळा केला असल्यामुळें त्यांना ही गरज भासली. व १४९७ मध्यें मेच्या २२ व्या तारखेस वास्को-डि-गामा हा प्रथमतः कालिकत येथें उतरला. तो पोर्तुगीज होता. यूरोपांतील समुद्र किनाऱ्यावर असणारे इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल इत्यादि देश नितांत दरिद्री अतएव बुभुक्षित होते! त्यांच्या पोटाला कांहीं तरी हवें होतें. मासे आणि बटाटे ह्या खाद्यांनीं त्यांची भूक ह्यापुढें जाईनाशी झाली! तेव्हां 'बुभुक्षितः किं न करोति पापम्' ह्या न्यायानें वरील सर्वदेशस्थ भिकाऱ्यांच्या टोळ्या एकामागून एक हिंदुस्थानच्या सुवर्णभूमीस येऊन पोंचल्या. यद्यपि हिंदुस्थानच्या लोकांनीं परदेशगमन केलेलें नव्हते तरी त्यांच्या औदार्याची कीर्ति

एखाद्या पुष्पपरिमलाप्रमाणें त्यावेळीं जगभर पसरली होती. येथील लोक शूर, उदार, दिलदार आणि संभावित होते. हिंदुस्थानांत त्यावेळीं व पुढेंही मराठ्यांच्या वेळेपर्यंत एकछत्री साम्राज्य नव्हते ही गोष्ट खरी आहे, पण सुगंधी द्रव्य विखुरलेलें असलें म्हणून त्याचा सुगंध थोडाच कमी होणार आहे? उलट तो जास्तच दरवळतो! येथें सर्व तऱ्हेनें सुबत्ता होती. खाण्यापिण्यास भरपूर होतें. लोक शांततेंत रहात असत. ह्या सर्व गोष्टी खऱ्या पण येथील लोक बिचारे व्यावहारिक ज्ञानांत अगदींच अज्ञानी होते. त्यांना काय माहीत कीं, संभावितपणा, दिलदारपणा आणि इमानीपणा हे जगांत गुण नसून दुर्गुण ठरतात! पोपटाची गोड वाणीच त्याच्या बंधनास कारणीभूत होत असते! हिंदुस्थानच्या लोकांचा हा गोड-पणाच त्यांना नडला! वास्को–डि–गामा येथें आला त्यावेळीं कालिकत येथें झामोरीन नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यानें ह्या नव्या पाहुण्यास येथें येण्याचें कारण विचारलें असतां गामानें अशी थाप ठोकून दिली कीं, “आमच्या बरोबर सफरीस निघालेल्या गलबताची व आमची चुकामूक झाली आहे, व ती शोधण्यास आम्ही आलों आहो. हिंदुस्थानकडे येण्याचा आमचा मनोदय नव्हता” ( केळकर–लेख संग्रह ). बिचारा झामोरीन! त्याला काय माहीत कीं, गामाच्या ह्या गोड उत्तराखालीं कांहीं कपट भरलें आहे म्हणून! शेवटीं झामोरीननें पोर्तुगीजांना व्यापाराची परवानगी दिली व अशा तऱ्हेनें हें दळणवळण सुरू झालें.

एकदां एका ठिकाणीं एका भिकाऱ्यास भिक्षा मिळाली कीं, क्रमशः इतरही भिकारी त्याच घराकडे आपला मोर्चा वळवीत

असतात. पोर्तुगीज, डच फ्रेंच आणि इंग्रज हे चार लोक मुख्यतः इकडे आले. पैकीं डच फारसे महत्वाचे नाहींत. पोर्तुगीजांनीं ख्रिस्तीधर्मप्रसाराचे बळजबरीचे कांहीं प्रयत्न केले व त्यांच्याशीं येथील राजांच्या कांहीं झटापटी झाल्या. पण त्यांना यश आलें नाहीं व आजमितीस त्यांच्या ताब्यांत फक्त तीनच ठिकाणें आहेत. उरलेले फ्रेंच आणि इंग्रज या दोन जाति अतिशय महत्वाच्या आहेत. व 'याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते।' अशी स्थिति बहुधा ह्या दोघांतच झाली. दोन्हीही जाति सारख्याच कर्तबगार, पण फ्रेंच लोकांच्या अंतस्थ भांडणांनीं त्यांना यश मिळालें नाहीं व इंग्रजांचें दैव अनुकूल त्यामुळें ते यशस्वी होऊं शकले! व्यापार हा यूरोपियन राष्ट्राचा प्राण होय. किंबहुना इंग्रज लोक हिंदुस्थानवर राज्य करितात ते देखील आपला व्यापार सुरळीत चालावा म्हणूनच होय. 'यूरोपियनांच्या काळजाला जाऊन भिडण्याचा मार्ग त्यांच्या शरीरांतून नसतो तर त्यांच्या खिशांतून असतो' अशा अर्थाची एक म्हण रूढ झाली आहे ती तरी ह्याच अर्थानें! हा व्यापार सुरळित चालावा म्हणून त्यांनीं १६०० सालीं ईस्ट इंडिया कंपनी स्थापन केली. असल्या तऱ्हेच्या कंपन्या काढून सामायिक व सामुदायिक पद्धतीवर व्यापार करण्याची कला आपल्याकडील लोकांत अतिशय दुर्मिळ होती. त्यांना हा नवा प्रकार पाहून आश्चर्य वाटलें! त्यावेळीं इंग्लंडांत इलिझाबेथ राणीचें राज्य होतें. ही सर्व व्यापारी मंडळी हिंदुस्थानांत याचक म्हणून जेव्हां प्रथम उतरली त्यावेळीं आपला प्रतिष्ठितपणा वाढावा एतदर्थ त्यांनीं इलिझाबेथकडून इकडील राजांना दाखविण्याकरितां एक पत्र आणलें होतें.

त्या पत्राची भाषा गोड असून विधानें मोहक होती. आजपर्यंत-च्या इंग्रजांच्या राज्यपद्धतींत जाहीरनामे, फर्मानें व वचनें ह्यांच्या इतकी गोड भाषा दुसऱ्या कशांतच नसेल! गोडभाषा बोलणें व लिहिणें, खायचे दांत वेगळे असतां पहावयाचे मात्र वेगळेच असणें हा तर इंग्रजांचा मोठा गुण आहे. सदरील पत्रांत राणीनें अनियंत्रित व्यापार ईश्वरास देखील मंजूर आहे अशा तऱ्हेची गोड विधानें केलेलीं आहेत. प्रस्तुत पत्र जरी थोडें लांब असलें तरी त्याचा महत्वाचा भाग येथें उतरून दिल्याशिवाय रहावत नाहीं. राणी पुढें म्हणते, 'महाराज, वर सांगितलेल्या हेतूशिवाय आणखी आम्हांस असें समजले आहे कीं, कोणीही परराष्ट्राचे लोक व्यापाराचा उद्देश मनांत धरून स्नेहभावानें व सौम्य वृत्तीनें आपल्या देशांत गेले असतां, आपण त्यांचा उत्तम प्रकारें आदर करीत असतां, ह्यावरून आमच्या कित्येक व्यापाऱ्यांस आपल्या देशांत जाण्याची परवानगी देण्यास आम्हास उमेद आली आहे. आपल्या देशांत व्यापारी मालाचा सौदा फार उत्तम होतो. असें इकडे खात्रीलायक कळल्यावरून जलमार्गाचीं इतर अनेक दुर्धर संकटें सहन करूनही हे व्यापारी तिकडे जात आहेत. तेथें आपल्या लोकांशी व्यापारी धोरणानें सौदा करावा म्हणजे इकडचे जिन्नस त्यास विकून तिकडचे इकडे विकत आणावे, असा त्यांचा उद्देश आहे. एवढी संकटें सोसून आपल्या देशांत प्रवेश करण्याची ज्या अर्थी त्यांस स्फूर्ति झाली आहे, त्या अर्थी आपणही त्यांचा योग्य परामर्ष घेतला असतां बोलण्याचालण्यांत व व्यवहारांत ते चोख व सभ्य आहेत, असें आपणांस दिसून येईल व ते आपल्या देशांत

आल्याबद्दल आपणांस वाइट वाटण्याचें कारण रहाणार नाहीं. तसेंच त्यांनीं आपल्या गलबतांतून नेलेला इकडचा माल आपणांस देण्यांत व आपल्याइकडचा माल इकडे आणण्यांत एकमेकाचा.......... निकट सहवास व व्यवहार घडल्यावर त्यांनीं पुनरपि असाच माल घेऊन आपल्या देशांत यावें असें आपणांस वाटेल................ आजपर्यंत फक्त स्पॅनिश व पोर्तुगीज व्यापारीच काय ते इकडचा माल आपल्या देशांत नेत होते पण ते लोक व्यापाराच्या कामांत आमच्या व्यापाऱ्यास व इतर लोकांस नाहक जाच करतात. वास्तविक पाहिलें तर ते आपल्या देशांत व्यापाराच्यां उद्देशानें गेले आहेत असें नाहीं. तिकडच्या सर्व देशाचे मालक व बादशहा आपणच आहोंत असें ते लोक समजतात; व तिकडचे सर्व लोक आपल्या केवळ प्रजा आहेत असे ते इकडे लोकांस सांगत सुटले आहेत. व लिहिण्यांतही ते तसाच व्यवहार उघडपणें करीत आहेत.................आपली आज्ञा असेल तर आमचे कांहीं व्यापारी इकडे परत येऊन पुनः इकडचा माल भरून तिकडे नेत तोपर्यंत बाकीची मंडळी आपल्या कृपाछत्राखालीं तेथेंच राहून तेथली भाषा वगैरे शिकतील—कीं जेणेंकरून एकमेकांचे विचार व रीतिरिवाज एकमेकांस कळण्यानें स्नेह वृद्धिंगत होऊन दळणवळण वाढावें ह्यासाठीं उभयतांमध्यें कांहीं ठराव किंवा करार होण्याची जरूरी आहे. त्यासाठीं हें पत्र आपणांकडे घेऊन जाणाऱ्या इसमास आमच्यातर्फे बोलणें व ठराव करण्यास आम्ही संपूर्ण अधिकार दिला आहे. ते गृहस्थ आपणांशीं जे ठराव करतील ते आम्ही इमानानें पाळूं व आपण आमच्या ह्या लोकांवर जी मेहेरबानी किंवा

उपकार कराल त्याची फेड आम्ही मोठ्या आनंदानें करूं. अखेरीस आमचें एवढेंच मागणें आहे कीं, आमचा हा उद्देश आपणास पसंत पडल्याचें निदर्शक म्हणून आपण ह्या पत्राचा जबाब गेलेल्या मंडळीजवळ द्यावा. आपण जबाब पाठविल्यानें आपली मोठी मेहेरबानी होईल व आम्हांस अतिशय संतोष वाटेल." ( केळकर लेखसंग्रह ). काय ही अजीजीची आणि फसवणुकीची भाषा! स्वतःचें बस्तान नीट बसावें म्हणून आपल्या समव्यवसायांबद्दल निंदास्पद लिहावयासही त्यांत कमी केलेलें नाहीं! व स्पॅनिश पोर्तुगीज व्यापाऱ्यांची म्हणून जी मनोवृत्ति त्यांत सांगितली आहे, त्या मनोवृतीचें प्रत्यक्ष दर्शकच स्वतः इंग्रज बनले!

कंपनी हिंदुस्थानांत स्थायिक झाल्यानंतर बरींच वर्षेपर्यंत त्यांनीं शुद्ध व्यापाराशिवाय इतर गोष्टीकडे फारसें लक्ष दिलें नाहीं व येथील राज्यकर्त्यांनाही त्यांच्या पोटांत कांहीं काळेंबेरें असेल ह्याचा वास आला नाहीं! इंग्रजांच्या मनांत त्यावेळीं हिंदुस्थानांत राज्य स्थापण्याची इच्छा उत्पन्न झाली नव्हती ही सत्य गोष्ट आहे तरी आपला व्यापार चिरायु व कायमचा व्हावा ह्याकरितां त्यांनीं पक्क्या वखारी मात्र घातल्या आणि त्या घालतांना त्यांना आपल्या मालकीची जागा हवी होती. ती जागा घेतांना त्यांनीं जी दूरदृष्टी स्वीकारली ती त्यांच्या दृष्टीनें खरोखरच प्रशंसनीय होता! त्यांचा संबंध मुख्यतः समुद्राशीं असावयाचा. वायव्य देशांत त्यांचें कांहीं चालत नव्हते व पुढें मागें सर्वत्र समुद्र काबीज करावयाचा ही इच्छा, आणि तेवढ्याकरितांच त्यांनीं प्रथमतः मद्रास ( १६३९ ) मुंबई ( १६६३) आणि कलकत्ता [ १६६९ ] हीं तीन शहरें किंवा बंदरें घेतलीं.

हिंदु लोकांच्या यात्रेचीं चार धामें ह्या देशाच्या चार दिशेस असून तीं सर्वच केल्यास जीवित सफळ होतें ह्मणतात. हें कसेंही असलें तरी इंग्रजांनीं मात्र हिंदुस्थानच्या तीनही दिशांस आपलीं ठाणीं बसवून अपलें जीवित अक्षरशः सफळ करून घेतलें. हीं ठाणीं वसवितांना व शहरें घेतांना त्यांच्या डोळ्यापुढें हिंदुस्थानची भौगोलिक परिस्थिति होती. व ती लक्षांत घेऊन त्यांनीं हा वेढा घातला. तो आज तागाइत कायम असून उत्तरोत्तर जास्त दृढ होत आहे. 'खालीं, वरती, मागें, पुढती, आजुबाजुनीही' जागा व्यापण्यांत इंग्रजांचा विशेष हेतू असावा, ह्याची आमच्या येथील प्रामाणिक आणि दयाशील लोकांना कल्पना कोठची?

इंग्रज हिंदुस्थानांत प्रथमतः आले त्यावेळीं हिंदुस्थानांत मोंगल लोकांचें राज्य होतें. सर टॉमस रो हा जहांगिराकडेच आला होता. एखाद्या पुराणपुरुषाप्रमाणें इंग्रजांनीं मोंगलांच्या वैभवाचा परमोच्च बिंदू आणि लय दोन्हीही पाहिलीं. त्यांनीं ताजमहाल बांधलेला पाहिला, आणि पुढें तो ताब्यांतही घेतला. त्यांनीं मराठ्यांचा देखील उदयास्त पाहिला पण ह्या सर्व वेळीं सामान्य तटस्थ प्रेक्षकापेक्षां इंग्रजांचें स्थान महत्वाचें नव्हतें! इंग्रजांच्या मनांत डुप्लेच्या उदाहरणावरून येथें राज्य स्थापन करण्याची इच्छा झाली आणि त्यांनीं त्या कामास सामान्यतः १७४४ त सुरुवात केली. ह्या वर्षीं दिल्लीस महंमदशहा राज्य करीत असून त्याच्या ताब्यांत त्याच्या भोंवतालच्या प्रदेशाहून जास्त प्रदेश नव्हता. बादशहातीचीं शकलें झालीं होतीं. नबाब, निझाम, सुभेदार इत्यादि अधिकारी आपापल्यापरी स्वतंत्र झाले होते. बंगाल,

संयुक्तप्रांत, कर्नाटक इत्यादि ठिकाणीं अशाच अमीर—नबाबांचीं राज्यें होतीं. ह्याशिवाय त्यावेळीं सार्वभौमत्व ज्यांच्याकडे होतें त्या मराठ्यांचें राज्य अखंडपणें संपूर्ण महाराष्ट्रांत आणि सत्तेच्या दृष्टीनें आसेतुहिमाचल पसरलें होतें! दक्षिणेंत निझाम होता. तरी तो मराठ्यांचा अंकित असल्यासारखा होता. हीच गोष्ट इतर राजांची. दिल्लीचें राजकारण त्यावेळीं पुण्याहून चालत असे. त्यावेळीं पेशव्यांच्या गादीवर बाळाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे ह्या भाग्य-शाली पुरुषाची सत्ता होती. तत्कालीन राज्यकर्त्यांत मराठे सर्वांत प्रबल होते. पण त्यांनीं हे परकीय मुसलमानी लहानलहान राजे नामशेष करून टाकले नाहींत हें एकादृष्टीनें अतिशय वाईट झालें. कपड्यांतील ढेकणाप्रमाणें हेच पुढें अत्यंत त्रासदायक झाले. तेव्हां मोंगल, निझाम, नबाब, लहान राजे, मराठे व शिवाय फ्रेंचासारखे परदेशस्थ लोक इतके भोंवतीं असतांना इंग्रजांनीं हिंदु-स्थानांत राज्य स्थापनेस सुरुवात केली! असा हा बुद्धिबळाचा पट होता. त्यांत इंग्रजांनीं आपल्या बुद्धिबळानें ह्या सर्वांस शह देऊन खालीं पाडलें!

त्यावेळीं राज्य वाढविण्याची इच्छा मराठ्याशिवाय कोणासच नव्हती. पण आपापलें घर टिकविण्याची मात्र काळजी बहुतेक सर्वच घेत असत. त्यांतल्या त्यांत उत्तरेकडील मुसलमानांच्या मनांत मराठ्यांचें हें वैभव अतिशय सलत असे. म्हणून त्यांचा मोड करण्याच्या सघंटित प्रयत्नांत ते गुंतले होते व म्हणूनच १७६१ सालीं पानपताचा घनघोर प्रसंग ओढवला. पण ह्या शिवायही नबाबा नबाबांतही लहान लहान तंटे होतेच! ह्या

तंट्यांचा फायदा इंग्रजांनीं भरपूर करून घेतला. येथील लोक इमानी आहेत व पैसे मिळाल्यास ते कोणाकडूनही लढतील ही मख्खी डुप्लेनें ओळखली पण त्याचा फायदा इंग्रजांनीं करून घेतला. तेव्हां कांहीं शास्त्रबंदीचा कायदा नव्हता अर्थात् व्यापार संरक्षणाच्या नांवाखालीं इंग्रजांनीं आपली फौज उभारली. अर्थात ती बहुतांशीं देशी शिपायांचीच होती, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. इंग्रज आणि फ्रेंच हे दोघेही झाले तरी एकाच प्रदेशांतील, तेव्हां त्यांचें वागण्याचे प्रकार एकसारखेच असावयाचे! त्यावेळीं त्या दोघांचें वैर होतेंच! तेव्हां त्या दोघांतही प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणें लहान मोठीं युद्धें झालीं. इंग्रज लोक येथील लोकांच्या भांडणाकडे विशेष लक्ष देत, किंबहुना भांडणें लावून देण्याचा प्रयत्न करीत! व आपणच तीं तोडण्याचा मोठा प्रतिष्ठितपणाचा आव आणून आपला डाव साधून घेत! कंपनीवर देखरेख ठेवण्याकरितां विलायतेहून अधिकारी नेमण्यांत येत असत ह्या अधिकाऱ्यांपैकीं पहिला महत्वाचा मनुष्य लार्ड क्लाइव्ह होय. ह्यानें १७५७ त प्लासीची लढाई जिंकली. व ह्या लढाईपासूनच इंग्रजांच्या राज्याचा पाया घातला गेला असें म्हणतात. तेव्हां ती लढाई कशी काय झाली तें आंता पाहूं.

——:०:——

# प्लासीचें युद्ध व त्याचीं कारणें.

प्लासीच्या लढाईपासून इंग्रजांच्या राज्याचा पाया हिंदुस्थानांत घातल्या गेला असें म्हणतात व ही सत्य गोष्ट आहे हें आम्ही मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. पण मोठमोठे इतिहासकार ज्यास 'युद्ध' 'युद्ध' व 'लढाई' 'लढाई' म्हणून संबोधतात तें हें प्रकरण आहे तरी काय, त्याला खरोखर 'युद्ध' किंवा 'लढाई' ही संज्ञा देतां येईल काय व त्याला तशी जबरदस्त कारणें तरी कोणतीं झालीं तें पाहिलें पाहिजे. प्लासीच्या लढाईपूर्वी सुमारें १००-१५० वर्षें इंग्रजांनीं हिंदुस्थानांत इमानें इतबारें व्यापार केला. पण पुढें त्यांच्या मनांत राज्यतृष्णा उद्भवली. व प्लासीचें प्रकरण उपस्थित होईपर्यंत त्यांनीं कर्नाटकांतून व निझामच्या राज्यांतून फ्रेंचाचें वजन आणि वर्चस्व अजिबात नाहींसें करण्याचा प्रयत्न केला. आणि तो बऱ्याच अंशानें सिद्धीस गेला. हें फ्रेंचाचें वर्चस्व काढून टाकण्यांत मुख्यतः 'अर्काटचा वेढा' कारणीभूत झाला आणि तो यशस्वी रितीनें पार पाडण्याची कामगिरी करून दाखविल्यामुळें क्लाईव्ह पहिल्यानें प्रसिद्धीस आला. अर्काटचा वेढा हें भेदनीतीचें एक उत्कृष्ट उदाहरण होय. हा वेढा मुख्यतः हिंदी शिपायांच्या भरंवशावर लढविण्यांत आला ही महत्वाची गोष्ट होय. त्याचें यश मात्र इंग्रजांस मिळालें. ह्या प्रसंगीं हिंदी शिपायांची वागणूक अत्यंत दिलदारपणाची होती. त्या बिचाऱ्यांनीं इंग्रज शिपायांना तांदूळ देऊन आपण केवळ त्यांच्या पेजेवर दिवस काढले! × ह्या इंग्रज-फ्रेंचांच्या

× ह्या प्रसंगासंबंधीं लार्ड मेकालें आपल्या 'Lord Clive' नांवाच्या

प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष झटापटी होत असतांना तिकडे बंगालचें प्रकरण उद्भवलें.

प्लासी हें गांव बंगाळांत आहे. व इंग्रजांच्या भक्ष्यस्थानीं सर्वांच्या पूर्वी हिंदुस्थानांतील कोणता प्रांत पडला असेल तर तो बंगालच होय. ह्याचा बंगाळला स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याचा प्रसंग मुसलमानांच्या राज्यापासून कधींच आला नाहीं. मोंगलांचें राज्य आसेतुहिमाचळ असतांना बंगाल हा मुसलमानाच्या ताब्यांत असे. औरंगजेबानें मरण्यापूर्वी पांच वर्षे १७०२ मध्यें बंगाल प्रांतावर मुर्शिदकुळाखान नांवाच्या माणसास सुभेदार नेमलें होतें. तो मेल्यावर सुजाउद्दीन आणि अलिवर्दीखान ह्यांना अनुक्रमें सुभेदार नेमण्यांत आलें. अलिवर्दीखान हुशार होता. ह्यानें १७५६ पर्यंत हुशारीनें कारभार केला पण ह्याच्या कारभाराचें वेळींच नागपूरच्या रघूजी भोसल्यानें बंगालवर स्वाऱ्या केल्या आणि तेथून खंडणी वसूल करण्यास सुरुवात केली. अशा रितीनें मराठे व मुसलमान ह्यांचें फाटलेलें पाहिल्यावरोबर इंग्रजांना स्वस्थ बसणें शक्यच नव्हतें; आपसांत तंटेबखेडे किंवा लढाया सुरू असल्या म्हणजे हिंदुस्थानांतील इंग्रजांना मोठी पर्वणा प्राप्त झाल्याप्रमाणें वाटतें. बंगाली लोक बुद्धीनें तीव्र, भावनेनें काव्यमय, पण शिपायीगिरींत अत्यंत मागासलेले किंबहुना त्या कामांत असमर्थ * आहेत, हें

---

निबंधांत म्हणतोः—

'History Contains no more touching instance of Military fidelity',

Historical Essays, Vol II P. 508.

* The Castilians have a proverb, that in

इंग्रजांनीं ओळखलें होतें तशी मराठ्यांची स्थिति नव्हती. 'धकाधकीच्या मामल्यांत 'त केवळ बुद्धीची तीव्रताच मुळींच कामास येत नाहीं, त्याला शक्ति हवी असते. अर्थातच तिच्या अभावीं इंग्रजांना बंगाल्याशींच स्नेह करणें पुढील कारस्थानाच्या दृष्टीनेंही अवश्यच वाटलें. व त्यांनीं अलिवर्दीखानाशीं स्नेह जोडला. ह्या वेळीं कंपनीचा जम बंगाल्यांत बरा बसला होता. व दुर्बलांच्या दरबारीं फुकटचा शिष्टपणाही त्यांना बराच मिरवावयास मिळाला. म्हाताऱ्या अलिवर्दीखानास मुलगा नव्हता पण तीन मुली होत्या. व त्याच्या भावास तीन मुलगे होते, तेव्हां मुसलमानी रिवाजाप्रमाणें त्यांनीं आपल्या तीनही मुलींचीं लग्नें आपल्या तीनही पुतण्यांशीं घरच्या घरींच लावून टाकलीं पण त्यांचें नशीब चांगलें नसल्यामुळें लवकरच वेगवेगळ्या कारणांनीं ह्या तिन्हीं पोरी विधवा झाल्या ! सर्वांत धाकट्या मुलीस मात्र कांहीं अपत्यें झालीं होतीं. तेव्हां म्हाताऱ्या अलिवर्दीखानानें आपल्या वडील नातवास गादीचा वारस

---

Valencia the earth is water and the men women; and the description is at least equally applicable to the vast plain of the Lower Ganges ...............Bengalees scarcely ever enlist as a soldier. We doubt whether there be a hundred genuine Bengalees in the whole army of the East India Company. There never, perhaps, existed a people so thoroughly fitted by nature and by habit for a foreign yoke.

—Macaulay (Essy on 'Lord Clive').
P. 512.

म्हणून आपल्या हातांखालीं तयार केलें. ह्या नातवाचें नांव सिराजउद्दौला होतें हा सिराजउद्दौला एकंदर प्लासीच्या लढाईंत अत्यंत महत्वाचा आहे.

पुढें अलिवर्दीखान १७५६ मध्यें ८० वर्षांचा होऊन मरण पावला. व आजाच्या मरणानंतर नातवानें राज्यकारभार हातीं घेतला. पण नातू त्यावेळीं अल्पवयस्क असून त्या वेळच्या मुसलमान राजांप्रमाणें संवयीनेंही अत्यंत वाईट होता. दुसऱ्याला क्रूरपणें मारणें हा त्याचा रोजचा खेळ असे. तें कसेंही असलं तरी तो बंगालचा सुभेदार झाला ही गोष्ट खरी! सिराज आपल्या आजाप्रमाणें थंड्या प्रकृतीचा नसल्यामुळें त्याला आपल्या प्रांतांतलि इंग्रजांचें महत्व आवडलें नाहीं. इंग्रजांनीं ही जी संपत्ति मिळविली आहे, ही सर्व बंगालच्या गरीब लोकांस लुटून मिळविली आहे अशी त्याची भावना असावी. ही सर्व संपत्ति आपण लुटावी अशी त्याला इच्छा उत्पन्न झाली. त्याचवेळीं सुभेदाराची राजधानी मुर्शिदाबाद येथील किसनदास नांवाचा श्रीमंत व्यापारी कलकत्त्यास जाऊन राहिला व इंग्रजांनीं किल्ल्याच्या भोंवतीं तटबंदी केली. ह्या दोन गोष्टीमुळें इंग्रजांविषयीं सुभेदाराचें मन बरेंच साशंक झालें. आणि म्हणून व्यापाऱ्यास परत पाठवून तटबंदी पाडून टाकावी असें सुभेदारानें इंग्रजांस लिहिलें पण त्याचें उत्तर सरळ न देतां इंग्रजांनीं छद्मी पण तेढ्या भाषेंत दिलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, सुभेदारानें कलकत्त्यावर स्वारी केली! ह्या आकस्मिक प्रकारानें इंग्रज लोक घाबरून जहाजांतून गेले. किल्ला सुभेदाराच्या हातांत आला! ह्या पुढील हकीकत पुष्कळ इतिहासकार अशी देतात कीं,

किल्ल्यांत राहिलेले १४६ लोक सुभेदारास सांपडले आणि त्याच्या अंमलदारानें त्या रात्रीं त्यांना २० चौरस फूट खोलींत कोंडून ठेवलें. तेव्हां हवा येण्यास मार्ग नव्हता. त्यामुळें सकाळीं दार उघडून पाहतात तों सारे २३ आसामी अर्धमेले जिवंत सांपडले. (१७५६) ह्या प्रसंगाचें हृदयद्रावक वर्णन अनेक इंग्रज इतिहासकारांनीं केलेलें आहे. पण हा प्रकार खरोखरच कसा झाला असेल ह्याबद्दल जबरदस्त संशय वाटतो. ज्यावेळीं हा प्रकार घडला असें ह्मणतात त्या वेळेपासून सहा महिनेपर्यंत कंपनीच्या दप्तरांत देखील त्याचा कोठें मागमूसही नाहीं. व ज्या गोष्टीबद्दल अनेक इतिहासकारांनीं बोंबा मारून सुभेदाराच्या काल्पनिक क्रूरपणाबद्दल त्यास दोष दिला, अशा महत्वाच्या गोष्टीचा उल्लेखही ती घडल्यापासून सहा महिनेपर्यंत कोणी करूं नये, ही अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट होय. ह्या वरून स्पष्ट अनुमान असेंच निघतें कीं, आपलीं कृत्यें, किंचित सौम्यतर करण्याकरितांच हा प्रकार मागाहून कोणाच्या तरी कल्पक डोक्यांतून निघाला असावा.

हा प्रकार खरा नसावा हें स्पष्ट आहे, पण ही गोष्ट प्रत्यक्ष घडली असें गृहीत धरून चाललें तरी, त्याविरुद्ध आमच्या लोकांनींही बोंबा माराव्या असें त्यांत काय आहे! इंग्रजांनीं आजपर्यंत किंवा त्या पूर्वीही लोकांशीं कांहींच क्रूरपणा केला नव्हता काय? दुसऱ्याच्या घरांत जाऊन शिष्टपणाची लुडबुड करून व दुसऱ्याच्या भांडणांत लुब्धपणानें तोंड घालून दुसऱ्याच्या राज्याचा अपहार करण्याचें पातक सुभेदाराच्या पातकापेक्षां कमी हिणकस खास नाहीं! सुभेदारांनीं दिलेला दंड सकृद्दर्शनीं जरी माणुसकीच्या विरुद्ध दिसतो

तरी तो योग्य नव्हता असें ह्मणवत नाहीं. कारण 'जशास तसें' हा जगाचा न्यायच आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, सुभेदारानें जाणून बूजून त्या खोलींत शिपायांना कोंडलें नाहीं. खरें पाहिलें तर आतांपर्यंत किल्ल्यांतील वहिवाट इंग्रजांची असल्यामुळें सुभेदार किंवा त्यांचे अंमलदार ह्यांना तेथील फारशी माहिती नव्हती. इंग्रज लोक ज्या खोलीचा तुरुंग ह्मणून उपयोग करीत असत त्याच खोलीचा सुभेदारानेंही उपयोग केला. ह्यांत इंग्रजांना त्यांच्या पापानेंच खाल्लें नाहीं काय ? + वर्णनच करावयाचें झालें तर इंग्रजांच्या कारकिर्दीत

---

\+ (i) The Subhadar, though humanity was no part of his character, *appears not on the present occasion to have intended cruelty.*

P. 149.

(ii) Some search was made for a convenient apartment; but none was found; upon which information was obtained of a place which the English themselves had employed as a prison.

P. 149.

(iii) The truth is that the Hindoostanes wanting only to secure them ( captives ) for the night, as they were presented the next morning to the prince, shut them up in what they heard was the prison of the fort, without having any idea of the capacity of the room; and indeed the English themselves had none of it. *This much is certain*, that this event, which cuts so

खुद त्यांच्याकडूनच आणि त्याही न्यायाच्या नांवाखालीं घडलेल्या अनेक गोष्टी सांगतां येण्यासारख्या आहेत.

प्लासीच्या लढाईचें झालेलें तात्कालिक कारण, म्हणून हें दाखविण्यांत येतें. व प्लासीची लढाई 'अनर्थाचा सूड' म्हणून करण्यांत आली असेंही म्हणतात. पण जेथें मुळीं 'अनर्थ'च झाला नाहीं तेथें 'सूड' तरी कसला घ्यावयाचा? ह्यावेळीं क्लाइव्ह विलायतेहून नुक्ताच मद्रासेस आला होता. सुभेदारानें आपलीं कलकत्त्याचीं ठिकाणें घेतलीं ही गोष्ट क्लाइव्हला आवडणें शक्य नव्हतें. त्यानें सुभेदारावर स्वारी करण्याचें ठरविलें व

---

Capital a figure in Mr. Watt's performance, is not known in Bengal; and even in Calcutta it is unknown to every man out of the 400,000 that inhabit that city; at least it is difficult to meet a single native that knows anything of it..................Were we therefore to accuse the Indians of cruelty, for such a thoughtless action, we would of course accuse the English, who intending to embark 400 Gentoo Sepoys, destined for Madras, put them in boats, without one single necessary, and at last left them to be overset by the bore, when they all perished after a three days fast.

( Foot note P. 150. )

Mill's History of the British India.

The italics are mine–The author.

वॅटसनच्या व स्वतःच्या हाताखालीं कांहीं फौजा घेऊन अनुक्रमें जल व स्थलमार्गें तें कलकत्त्यास गेलें. बंगालमध्यें आतांप्रमाणेंच फ्रेंचांच्या ताब्यांत चंद्रनगर हें ठिकाण होतें. इंग्रजांना सुभेदारा-बरोबरच फ्रेंचांचेंही महत्व कमी करावयाचें होतें. प्रथमतः इंग्रजांनीं सुभेदाराकडून आपलीं ठिकाणें तर परत घेतलीं. ह्यावेळीं अनेक गोष्टीमुळें सिराज पेंचांत सांपडला होता. त्याचा फायदा घेऊन क्लाइव्हनें त्याच्यांशीं ९ फेब्रुवारी १७५७ रोजीं तह करून घेतला. त्या तहांत सुभेदारानें हार खाल्ली आणि मागील लढाईत इंग्रजांच्या हिशेबाप्रमाणें त्यांना आलेला सर्व खर्च भरून देण्याचें त्यानें कबूल केलें. त्याचप्रमाणें असेंही ठरलें कीं, ह्यापुढें बंगालांत सर्वांनीं तटस्थ रहावें! अशा तऱ्हेनें तटस्थ रहाण्याचा तह एकीकडे होत आहे, आणि क्लाइव्ह स्वतः आपल्या हातांनीं त्यावर सही करीत आहे; त्याचक्षणीं फ्रेंचांच्या चंद्रनगरावर हल्ला करण्याची परवानगी क्लाइव्हनें सुभेदारास मागितली! कारण यूरोपांत इंग्रज व फ्रेंच ह्यांचें युद्ध सुरू झालें होतें!! एकदां केलेला निश्चय अगदीं त्याच क्षणांत मोडणें व दिलेल्या वचनाच्या अगदीं विरुद्ध वर्तन त्याच्या पुढल्याच क्षणीं करणें हेंच इंग्रजाच्या यशाचें बीज आहे! आपलें वचन जो पाळील त्याला ह्या जगांत मोठें होतां येईल काय? प्रामाणिकपणा आणि शब्दाची किंमत ह्या गोष्टीची भीति आम्हां हिंदुस्थानच्या लोकांस, त्याची भीति इंग्रजास काय म्हणून असावी? प्रामाणिकपणाची सारीं भुतें, पापपुण्याच्या संमंधाची सारी प्रभावळ ही आमच्याच मानगुटीवर बसलेली आहे! क्लाइव्ह साहेबाला त्याचें काय होय? त्यांनीं परवानगी मागितली. सुभेदाराला अर्थातच

ह्या धरसोडीच्या वर्तनाचा राग आला. तरीं स्पष्ट उत्तर न देतां त्यानें संदिग्ध आणि उडवाउडवीचें उत्तर दिलें. सुभेदारानें आपल्याला स्पष्ट इनकार केला नाहीं, अर्थात् आपल्या बेतास सुभेदार अनुकूलच असला पाहिजे असा क्लाइव्हनें अर्थ घेतला आणि चंद्रनगरावर हल्ला करून तें ठिकाण घेतलें. पण येवढ्यानें इंग्रजांचें समाधान झालें नाहीं. तृष्णेला खाद्य मिळालें कीं, ती वाढतच जाते. फ्रेंचांची बंगालांतील संपूर्ण सत्ता नाहींशी करून टाकावी असा त्यांचा बेत होता. व त्याकरितां त्यांनीं सिराजचीच मदत मागितली! क्लाइव्ह साहेबाच्या निर्लज्जपणाची ही कमाल पाहून सिराजला फार राग आला आणि ह्या वचनभ्रष्टांना चांगलचि शिक्षा करावी असें त्याला वाटलें. परके लोक येतात आणि येथें धिंगाणा घालतात हें योग्य नव्हे असें वाटून सिराजनें इंग्रजाशीं लढाई करण्याचा निश्चय केला! व त्याच्या करितां फ्रेंचांची मदत मागितली. पण ती वेळेवर येऊं शकली नाहीं. त्यांना थोडीशी लाज लज्जा होती आणि त्यामुळेंच त्यांचें नुकसान झालें! ह्या होणाऱ्या लढाईंत क्लाइव्हला जय मिळविणें अपरिहार्य होतें. ह्या लढाईवरच त्यांचें बंगालांतील व सर्व हिंदुस्थानांतील भवितव्य अवलंबून होतें. ह्मणून त्यानें जयाचा निराळाच पण अत्यंत रामबाण असा मार्ग काढला !

केवळ शौर्यावर ही लढाई जिंकतां येणें अशक्य होतें तेव्हां क्लाइव्ह साहेबांनीं आपल्या कुटिल भेद नीतीचा डाव टाकला. अलिवर्दीखानाची बहीण जाफरअलीखान नांवाच्या इसमास दिलीं असून तो यावेळीं सिराज उद्दौलाचा सेनापती होता. त्याचें आणि सुभेदाराचें बरें नव्हतें. ह्याचा फायदा क्लाइव्हनें घ्यावयाचें ठरविलें.

त्यानें जाफरअलीशीं मैत्री जोडली. सुभेदाराचें सारें सैन्य अर्थातच जाफरअलीच्या ताब्यांत होतें. क्लाइव्हनें मिरजाफरला राज्यपदाचें आमिष दाखविलें. सुभेदार पदच्युत होऊन त्या जागेवर आपली स्थापना होणार ही कल्पनाच जाफरला अत्यंत सुखद वाटली. आणि अशा तऱ्हेनें सुभेदाराच्या विरुद्ध मोठा कट सुरू झाला औपचारिक बोलणींचालणीं सुभेदार आणि कलकत्त्याची कमिटी ह्यांच्यांत होत असत. कलकत्त्याच्या कमिटीनें कट केला किंवा कटास उत्तेजन दिलें ह्याचें फारसें वाईट वाटत नाहीं. कारण ते जाणून बुजून परके होते. पण हा कट ज्या मध्यस्थांच्या तर्फे सिद्धीस गेला आणि ज्यांनीं आपल्या गोड आणि नटव्या वाणीनें सुभेदारास फसविलें ते लोक हिंदी होते!— त्यांतही उमीचंद नांवाचा अत्यंत श्रीमंत बंगाली व्यापारी तर हिंदु होता!! हा उमीचंद अत्यंत श्रीमंत, फार वजनदार, वाणीनें अत्यंत गोड आणि दलालीच्या कार्यांत अत्यंत कुशल असा होता. शेवटीं असें ठरलें कीं, मिरजाफरानें सुभेदारास लढाई करावयास प्रोत्साहन द्यावयाचें आणि त्याच्या भरंवशावर सुभेदारानें सैन्य घेऊन रणमैदानावर तयार रहावयाचें आणि लढाई सुरुवात होण्याचें ऐनवेळीं मिरजाफरानें सुभेदाराची—अर्थात् त्याच्या ताब्यांत असलेली—बहुतेक फौज घेऊन क्लाइव्हला जाऊन मिळावयाचें! अर्थातच ह्या युक्तीनें सुभेदार असहाय होणार होता. आपला प्रत्यक्ष सेनापती, आणि आपल्या राजधानींतील उमीचंद जगत्सेठ ह्यांच्या सारखे व्यापारी आपणाला फितुर झालेले आहेत ह्याची बिचाऱ्या सुभेदारास कल्पना तरी कोठून असणार? मिरजाफर फितुर झाला तो राज्यपदाचें लोभानें, पण उमीचंदासारख्यास फितुर होण्यास कांहीं कारण

नव्हते. पण ह्या कटाचें गौप्य कायम ठेवणें सर्वस्वीं त्याच्याच हातीं असल्यामुळें इंग्रज लोक त्याच्याच आधीन होते. आणि ह्या कामगिरीबद्दल मात्र त्यानें तीनलक्ष पौंड आणि इंग्रजांना मिळणाऱ्या सर्व संपत्तीवर शेंकडा पांच टक्के कमिशन इतकी रकम मागितली. जाफरअलीस यःकश्चित् राज्याकरितां स्वामीचा नाश करणें——व त्यापेक्षांही परक्यास आपल्या घरांत घेणें बरें वाटलें ! आणि उमीचंदास तर केवळ तीन लक्ष पौंडाकरितां आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचा आणि इमानाचा खून करण्यास लाज वाटली नाहीं !! फितुरी ! फितुरी !! यःकश्चित् स्वरूपाच्या वैयक्तिक स्वार्थाकरितां देशाची राखरांगोळी करणें, म्हणजे आमच्या हातचा मळ आहे ! आमच्या देशांत स्वार्थत्यागी योद्ध्याबरोबरच परक्यांना सहायभूत असें कांहीं फितुरीही निघत आलेले आहेत ! आम्ही तोफांच्या गोळ्याबरोबरच इमानही सोडतो ! एक कुलांगार विश्वासघातकी निघतो आणि साऱ्या देशाची राखरांगोळी करून जातो ! त्याची फळें शतकानुशतकें लोकांना भोगावी लागतात, आणि इतिहासकार अशा लोकांना शिव्याशाप देत असतात.

अशा तऱ्हेनें फितुरीच्या पायावर उभारलेला हा कट बराचसा शिजत आला. कटवाल्यांनीं आपल्याकडून गौप्याची भरपूर काळजी घेतली. पण एकंदर प्रकारावरून सुभेदाराला मात्र असें कांहीं असेल, असा संशय आल्यावांचून राहिला नाहीं. त्यानें मिरजाफरला बोलावलें. आणि कळकळीनें इंग्रजास हांकून लावण्यास सांगितलें आणि स्वतःशीं इमानी रहण्याबद्दल पुढे कुराण ठेवून त्याच्याकडून शपथ घेवविली. हा शपथविधी झाल्यानंतर सुभेदाराचा संशय दूर

झाला. उमीचंदानेंही आपल्या गोड वाणीनें पुनः साखर पेरली. कुराणाची शपथ मोडणें मिरजाफरला जरा जड गेलें. आणि त्याप्रमाणें त्यानें इंग्रजांना तसें कळविलेंही. पण राज्यपदाचा लोभ भयंकर होता. त्या लोभापुढें ही कुराणाचीही शपथ लटपटली ! इंग्रज आपली फौज घेऊन मुर्शिदाबादेवर चाल करून गेले, शिराज किंचित घाबरून आपली फौज घेऊन प्लासी येथें गेला. ( १३ जून १७५७) इंग्रजांची फौज त्यावेळीं १००० यूरोपियन आणि २१०० हिंदी लोक होते. उलट सुभेदाराजवळ ५०००० पायदळ, १०००० घोडेस्वार, आणि ५० तोफा होत्या. ठरल्याप्रमाणें लढाई सुरू झाली. पण त्याचवेळीं ठरल्याप्रमाणें मिरजाफर बहुतेक सर्व फौज घेऊन इंग्रजास मिळाला. ह्या आकस्मिक आपत्तीनें सुभेदार घाबरला आणि असहाय होत्साता थोड्याशा इमानी लोकांबरोबर राजवाड्यांत पळून गेला. पण तेथेंही जाफर व इंग्रज ह्यांचा पाठलाग झाल्यामुळें ह्या दुर्दैवी सुभेदारास गरीब फकिराच्या दीन वेषांत आपली एक रखेली आणि एक इमानी कंचुकी येवढ्यानांच बरोबर घेऊन राजवाड्याच्या एका खिडकींतून रात्रीं दहाचे सुमारास गुप्तपणें पळून जावें लागलें. पुढें त्याच रात्रीं तो एका बगीचांत लपून राहिला असतां दुसऱ्याच एका फितुरी माणसानें पूर्वीचा दावा साधून ही बातमी मिरजाफरला कळविली ! शेवटीं सुभेदाराला पकडण्यांत आलें आणि जाफराचा मुलगा मीरन ह्यानें त्यास ठार मारलें ! ह्या येवढ्या मोठ्या युद्धांत (?) जखमी आणि मेलेले मिळून गोऱ्या-शिपायांची संख्या केवळ १६ असून देशी शिपायांपैकीं सोळा मेले आणि फक्त ३६ जखमी झाले ! ! ही लढाई एकतासावर टिकली

नाहीं; म्हणजे नागपूरच्या किंवा मुंबईच्या दंग्यांहून फारशी मोठी मुळींच नव्हती. असें असूनही ह्या युद्धानें इतिहासाचा क्रम बदलवून टाकला. फितुरीचा प्रभाव हा असा असतो ! !

नंतर क्लाइव्हनें मिरजाफरला मुर्शिदाबादेस नेलें व सुभेदाराच्या गादीवर बसविलें. जाफरलाही कृतकृत्य झाल्याप्रमाणें वाटलें. क्लाइव्ह साहेबांनीं ही जी मेहनत घेतली तीबद्दल स्वतः त्यांनीं ३० लक्ष रुपये घेतले. इतर लहान मोठ्या गोऱ्या नोकरांनाही भयंकर बक्षिसें वाटण्यांत आलीं. अर्थात् हें सारें सुभेदाराच्या तिजोरींतूनच ! दुसरें असें कीं, ह्या केवळ बक्षिसाच्या रकमेशिवाय अटीप्रमाणें जाफरअलीनें एक कोट रुपये इंग्रजास द्यावयाचें होतें तें वेगळेंच ! बक्षिसाच्या पायींच बहुतेक खजिना खलास झाला असल्यामुळें ह्या एक कोटीकरितां नव्या सुभेदारास दागिने विकावे लागले ! तरी पांच लाख रुपये देणें राहिलेंच; शिवाय हुबळी नजिकचा दहालाख रुपये उत्पन्नाचा प्रदेशही कंपनीस मिळाला !

उमीचंदाचा प्रश्न अजून शिल्लक होता. त्याच्या हातांत सर्वांचीं जीवितें होतीं. म्हणून त्यानें मागितलेली रकम केवळ त्याला चूप बसविण्याकरितांच म्हणून क्लाइव्हनें कबूल केली— देण्याच्या इराद्यानें नव्हे ! परंतु उमीचंद कायदेबाज असल्यामुळें प्रत्यक्ष अटीच्या कागदांत हें कलम नमूद झालेलें पाहिल्याशिवाय त्याला समाधान वाटणारें नव्हतें. म्हणून क्लाइव्हनें तहाचे एक खरा व एक खोटा असे दोन कागद तयार केले. खऱ्या कागदाचा रंग पांढरा असून खोट्याचा तांबडा होता. पांढऱ्या कागदांत उमीचंदाचें नांवही नव्हतें. अर्थात् तो त्याला दाखविण्यांत आला

नाहीं. कमिटीतील सर्व सभासदांच्या त्यावर सह्या असल्याशिवाय कागदाला खरेपणाचें स्वरूप येण्यासारखें नव्हतें. म्हणून सर्वांनीं त्यावर सह्या केल्या. पण अॅडमिरल वॅटसन नांवांचा एक सभासद होता. त्याचें इमान शाबूत असल्यामुळें त्यानें खोट्या कागदावर सही करण्याचें नाकारलें. पण क्लाइव्ह खोटेपणांत निष्णात असल्यामुळें त्या बहाद्दरानें वॅटसन साहेबांची खोटीच सही त्याच्या पश्चात् करून दिली ( forged ). दरबारच्या दिवशीं क्लाइव्हनें उमीचंदास सांगितलें कीं, 'ज्या अर्थी तूं आपल्या राजाशीं फितुरी केली आहेस त्या अर्थी ह्या अपराधाची शिक्षा म्हणून तुला कांहीं एक मिळणार नाहीं'! पुढील प्राप्तीच्या भरंवशावर ह्या कार्यांत उमीचंदानें स्वतः-चीही पुष्कळ रकम खर्च केली होती. पण स्वतः खूप गबर झालेल्या कंपनीच्या नोकरांना उमीचंदाची खर्च झालेली ही रकम देतां आली नाहीं! आपण सर्वस्वीं नागविल्या गेलों आहोंत असें पाहून उमीचंद तेथेंच घेरी येऊन पडला. त्याला बुद्धिभ्रंश झाला व कांहीं दिवसांनीं त्याचें प्राणोत्क्रमण झालें! फितुरी माणसास त्याच्या कृतकर्माचें प्रायश्चित मिळालें.

एकंदर युद्धाची ही थोडक्यांत हकीकत आहे. ह्या युद्धामुळें इंग्रजांचा पाय हिंदुस्थानांत पक्का झाला, बंगाल त्यांच्या ताब्यांत आला, त्यांना हिंदुस्थानचें अधिराज्य मिळावयास सुरुवात झाली, आणि ते तरी कशाच्या भरंवशावर? तर येथील लोकांच्या सैन्यांच्या आणि फितुरीच्या बळावर! लढाई लहानशीच पण परिणाम अतिशय दूरवर पोंचले. ह्या लढाईत अव्वलपासून अखेरपर्यंत क्लाइव्हसाहेबांनीं लबाड्या केल्या, नीतिशास्त्राला भ्रष्ट केलें आणि

मनुष्य जातीला काळोखी फासली ! त्यानें केलेलें सर्व काम हें सर्वथैव निरपेक्षपणें केलें असेंही म्हणवत नाहीं, कारण स्वार्थ त्यालाही सुटला नाहीं. स्वदेशाच्या कल्याणाचा मात्र त्याचा हेतू होता ही निर्विवाद गोष्ट आहे. इंग्रजांनीं हिंदुस्थानचें राज्य तरवारीच्या बळावर मिळविलें असें जे म्हणतात त्यांना प्लासीचीं लढाई हें रामबाण उत्तर आहे. प्लासीच्या लढाईनें इंग्रजांच्या राज्याचा पाया घातल्या गेला आणि प्लासीची लढाई शूरत्वाच्या नव्ह, तर पूर्णपणें फितुरीच्या पायावर उभारली गेली असल्यामुळें इंग्रजांच्या राज्याचा पायाही फितुरीवरच उभारला गेला आहे हें स्पष्ट होतें. प्लासीच्या लढाईच्या बाबतींत क्लाइव्हनें जें वर्तन केलें, त्याबद्दल कांहीं इंग्रज इतिहासकारांनीहि त्याला दोष दिला आहे. ÷ ज्या मिरझाफरनें आपल्या मालकाशीं ही बेईमानी केली त्यालाही सुभेदार होऊन फारसा फायदा झाला नाहीं. कारण त्याच्या मागें इंग्रजांच्या जळवा लागल्या व त्याचेंही मन इंग्रजांविरुद्ध विटलें.

---

÷ (i) In this negotiation Clive was guilty of the deceit, which is the blackest stain on the record of his public service ..............Clive's trick was not simply a moral offence: It was also a political blunder.

Thompson—History of India P. 274.

(ii) Although Clive refused to repent of his action, which certain writers have tried to justity, the trick unquestionably was *indefensible*, both morally and politically.

—The oxford History of India
by Vincent A. Simth P. 505.

# क्लाइव्हची कारकीर्द.*

प्रस्तुत प्रकरणांत क्लाइव्ह साहेबांच्या एकंदर कारकिर्दीचें समालोचनात्मक परीक्षण करावयाचें आहे. मागें सिराजउद्दौल्यास गादीवरून काढून मिरजाफरला क्लाइव्हनें गादीवर बसविलें, हें आपण पाहिलें. पण मिरजाफर झाला तरी हिंदुस्थानचाच रहिवाशी होता. त्यानें पूर्वी थोडें फार स्वातंत्र्य उपभोगलें होतें अर्थातच त्याला आपल्या स्वातंत्र्याचें मोल देऊन सुभेदार होणें आवडलें नाहीं. बंगालांत परदेशस्थ व्यापारी एकटे इंग्रजच होते असें नसून तेथें डच आणि फ्रेंचही होते. आणि राज्यकर्ता ह्या नात्यानें ह्या सर्व परदेशस्थांना समानधर्मानें वागविणेंच इष्ट होतें. परंतु इंग्रजांचें धोरण डच आणि फ्रेंच नाहींसें व्हावे हें असल्यामुळें तें मिरजाफरला काय ह्मणून पसंत पडावे ! पुढें डच लोकांचीं कांहीं जहाजें बटेव्हियाहून चिनसुऱ्यास आलीं, त्याला अर्थातच मिरजाफरची सहानुभूति होती. त्याच वेळीं दिल्लीच्या शहाअलम बादशहाची बंगालवर स्वारी

---

* क्लाइव्ह साहेबांचें अंतरंग व राज्यकारभाराचें धोरण समजून घ्यावयाचें असल्यास त्यानें १७६५ त विलायतेहून आल्यावर आपल्या Mr. Rous नांवाच्या मित्रास जें खाजगी पत्र लिहिलें त्यातील पुढील वाक्य वाचावें:—

"We must indeed become Nabobs ourselves, *in fact*, if not in name;—perhaps totally so without disguise."

Mill. B. IV P. 332.

झाली ( १७५९ ) असतां, त्याला क्लाइव्ह साहेबानें मिरजाफराच्याच खजिन्यांतून पुष्कळशी रकम देऊन परत पाठविलें आणि बादशहाकडून फुकटाफाकट स्वतःच्या खिशांतला एक पैसाही खर्च न करितां, ११ हजारांची मनसब आणि अमीर हा किताब मिळवून दलालीच्या धंद्यावर लाटला ! पुढें क्लाइव्ह विलायतेंत गेला. बंगाल्यांत सरसकट इंग्रजी राज्य स्थापावें असें त्याचें मत होतें. पण तो मनाचा मुखत्यार नसल्यामुळें पार्लमेंटला ह्याची खात्री पटवून देण्याकरितांच त्याचें प्रयाण होतें. ( पण पार्लमेंटला त्यावेळीं तें मत मान्य झालें नाहीं. ) पुढें व्हॅन्सिटार्ट हा गव्हर्नर झाला.

व्हॅन्सिटार्ट गव्हर्नर झाला तरी तो क्लाइव्हचाच शिष्य. व बंगालचा सर्व कारभार क्लाइव्हच्याच मुत्सद्देगिरीनें व धोरणानें चालावयाचा, बंगाल प्रांतांत इंग्रजांना आपली सत्ता असावी पण वरकरणी तसें दिसूं तर नये, असें धोरण ठेवावयाचें होतें. म्हणूनच खेळांतल्याप्रमाणें त्यांना दुसऱ्यास राजा करण्याच्या खटपटी आणि सोंगें करावीं लागलीं. मिरजाफर त्यांच्या विरुद्ध जातांच त्यांनीं न्यायाचा आव आणला ! आणि चौकशीचा फार्स करून त्याला राज्य करतां येत नाहीं असा ठपका ठेवून त्यास कामावरून दूर केलें ! आणि त्याचा जावई मिरकासीम म्हणून होता त्याला नबाब नेमलें. इंग्रजांनीं जाफरअलीकडून इतकी रकम खाल्ली होती, तरी मिरकासीमास उलट असें आढळून आलें कीं, जाफरअलीवरच इंग्रजांचें खूप कर्ज झालें आहे ! अर्थात ते त्याला फेडणें भागच होतें. त्याबरोबरच त्यानें कांहीं मुलुखही दिला.

मिरकासीम झाला तरी मिरजाफराचाच जावई! कासीमनें नवाबगिरीचा लोभ धरला तो थोड्या फार अधिकाराच्या आणि स्वातंत्र्याच्याच आशेनें, पण एखाद्या पाळीव जनावराप्रमाणें त्याला तेथें बंधनांतच रहावें लागलें. त्याला यापुढें पुरा अनुभव आला कीं, उंदीर किंवा एखादें लहान सावज शिकारीनें मांडून ठेवलेल्या पिंजऱ्यांत कांहीं तरी गोड आमिषानें आणि भावी सुखाच्या आशेनें प्रवेश करते. पण निमिषार्धांत त्याला खरी स्थिति कळून अश्रू ढाळण्याचा प्रसंग येतो. तशीच हुबेहूब स्थिति इंग्रजांच्या ताब्यांत सांपडणाऱ्या देशी राज्यकर्त्यांची होई. येथील देशी राजकर्त्यांनीं इंग्रजांवर विश्वास ठेवूं नये. कारण हे लोक इसापनीतींतील उंटा-प्रमाणें घरांत शिरले कीं, कालांतरानें प्रत्यक्ष मालकालाच घरांतून काढून टाकल्याशिवाय रहावयाचे नाहींत! परंतु मिरकासीम हा जनावर नसून मनुष्य होता. त्यानें अंतस्थ रितीनें इंग्रजांशीं लढ-ण्याची तयारी चालविली, आपली राजधानी दूर मोंगीर येथें नेली, बंदुका तोफांचे कारखाने काढले, आणि सैन्यांतील बाजारबुणगेपणा काढून टाकून इंग्रजांच्या शिस्तपूर्ण सैन्याशीं सामना देण्यास सुयोग्य अशी फौज तयार करण्याच्या तो मार्गास लागला. ह्या शिवाय नव्या सुभेदाराच्या मनांत किल्मिष उत्पन्न होण्यास दुसरींही कारणें झालीं, ईस्ट इंडिया कंपनीची दृष्टी अर्धनारीनटेश्वराप्रमाणें आतांशा कांहीं व्यापार व कांहीं राज्यस्थापन व वर्धन अशा मिश्र स्वरुपाची होती. त्यांना आपला व्यापार बुडवून भागण्यासारखें नव्हतें. कंपनीच्या नशिबानें मागें फर्रुखसेयर बादशहाच्या काराकिर्दींत विला-यतेहून येणाऱ्या मालावर तिला कराची माफी मिळाली होती. तीच

प्रथा बंगाल्यांत अजून चालूं असल्यामुळें व बिचाऱ्या देशी व्यापाऱ्यास मात्र जकात पडत असल्यामुळें सहाजिकपणेंच कंपनीची भरभराट झाली आणि देशी व्यापारी ठार बुडाले! आपल्या देशी व्यापाऱ्यांच्या हिताहिताकडे लक्ष न देतां परकीयांचें हित पहाणारा राज्यकर्त्ता अजब खरा! कंपनीच्या ह्या सवलतीचा दुसरा परिणाम असा झाला कीं, चोरून मारून आणि खाजगी रीतीनें देखील कंपनी आणि तिचे नोकर देशी मालाचा व्यापार करीत. येथील व्यापाऱ्यांनीं मिरकासीमकडे अर्ज केले. त्यानें कंपनीस विनविलें पण ऐकतो कोण? आपल्या रयतेचा हा तळतळाट बिचाऱ्या सुभेदारास उघड्या डोळ्यांनीं पहावा लागे. कंपनीवर जकात लादण्याचें सामर्थ्य त्याच्यांत नव्हतें, म्हणून त्यानें आपल्याच व्यापाऱ्यांची जकात माफ केली. त्यामुळें पुनः व्यापाराचें पारडें फिरलें. ह्या सगळ्या वागणुकींत मिरकासीमनें जें जें केलें तें तें राज्यकर्ता ह्या नात्यानें योग्यच केलें हें कोणाही निःपक्षपाती माणसास कबूल करावेंच लागेल, पण इंग्रज व्यापाऱ्यांचें नुकसान होत आहे असें पाहून कलकत्त्याच्या कौन्सिलनें असा ठराव केला कीं, सुभेदारास जकात माफ करण्याचा मुळीं अधिकारच नाहीं! खासा न्याय! सुभेदार हा बंगालचा राज्यकर्त्ता. त्याच्या अधिकाराची चर्चा करणारी ही कलकत्त्याची उपरी कौन्सिल कोण? पुनः कौन्सिलचा हा निर्णय कायद्याच्या आधारावर केला होता! हे कायदे करणारे आणि अंमलांत आणणारे सारे लोक इंग्रजच! त्यांच्या त्या वेळच्या सर्व कायद्यांचा इत्यर्थ हाच कीं, इंग्रजांना फायदेशीर ते कायदेशीर आणि बेफायदेशीर ते बेकायदेशीर!

आपल्या अधिकाराची चर्चा, वहिवाटीचा अगर वंशपरंपरेचा अधिकार नसणारांनीं अशा वाईट स्वरुपांत करावी ह्याचा सुभेदाराला राग आला. व त्या भरांत त्यानें इंग्रजांची कांहीं पाटण्याचीं जहाजें पकडलीं व त्यांतील सुमारें १५० गोऱ्या लोकांस कैद करून ठेवलें. हें सगळें होत आहे तों कलकत्याच्या पांच सात माणसाच्या कौन्सिलला पुनः कायदा व अधिकाराची चर्चा ह्याची गरज वाटली आणि तिनें १७६३ च्या जूनमध्यें असा दुसरा ठराव केला कीं, 'मिरकासीम ह्यास पदच्युत करावे!' त्याप्रमाणें व्यवस्था होऊन त्या जागेवर पुनः पहिला दुर्दैवी सुभेदार वृद्ध मिरजाफर ह्याची स्थापना करण्यांत आली. हा अतिप्रसंग पाहून मिरकासीमनें अतिशय क्रोधानें पकडलेल्या सर्व गोऱ्या कैद्यांची वाल्टर रेन्हार्ट नांवाच्या एका इंग्रजाकरवींच कत्तल करविली. आणि इंग्रजांच्या विरुद्ध म्हणून अयोध्येचा वजीर आणि दिल्लीचा बादशहा ह्यास तो जाऊन मिळाला. पण ह्या मिश्र सैन्याचा बक्सार येथें १७६४ त पराभव झाला!

ह्यानंतर क्लाइव्ह साहेब विलायतेहून १७६५ मध्यें पुनः गव्हर्नर ह्मणून आले. तत्पूर्वीं इंग्रजांना अत्यंत उपकारक अशी एक गोष्ट घडून आली. ह्या वेळीं हिंदुस्थानांत मराठी सत्ता ही सार्वभौम सत्ता होती. इंग्रजांना मोठा अडथळा ह्यांच्याकडूनच होण्यासारखा होता. पण १७६१ च्या जानेवारी महिन्यांत पानपतावर मराठे आणि अबदाली ह्यांचा जो घनघोर संग्राम झाला त्यांत मराठ्यांचा मोड होऊन इंग्रजांचा एक प्रबळ शत्रू आपोआपच कमजोर झाला. अस्तु. क्लाइव्हनें येथें आल्याबरोबर, बंगालचा सुभेदार, अयोध्येचा वजीर आणि दिल्लीचा बादशहा ह्यांच्याशीं वेग-

वेगळे ठराव केले. त्यांतच त्याच्या दुहेरी राज्यव्यवस्थेचा उगम झाला ' दुहेरी राज्यवव्यस्था ' (The Double Government) हे नांव बहुतेकांच्या परिचयाचें आहे. त्याचें थोडक्यांत स्वरुप असें कीं, कर वगैरे वसूल करण्याच्या पैशाच्या बाबी कंपनीनें करावयाच्या असून न्याय वगैरे देण्याचीं कामें देशी लोकांकडे असावयाची. पैसे घेणारा एक आणि त्याबद्दल काम करणारा दुसराच अर्थात त्याचा परिणाम एकाकडून जुलुम व दुसऱ्याकडून अव्यवस्था व कामाची बेपर्वाई हाच झाला ! लोक फार त्रस्त झाले आणि पार्लमेंटच्या कानावर अनेक गोष्टी गेल्या. शेवटीं ' ब्रेक ' म्हणून ' रेग्युलेटिंग अॅक्ट ' पास करावा लागला. पुढें १७७० मध्यें बंगालांत भयंकर दुष्काळ पडला त्याचेंही पाप क्लाइव्हच्याच माथीं बसलें ! अशा स्थितींत तो विलायतेंत गेला. त्याच्या विरुद्ध तेथें लोकमत क्षुब्ध होतें. शेवटीं त्रासून जाऊन ह्या प्रसिद्ध पुरुषानें १७७४ त आत्महत्या करून घेतली ! त्याच्या संबंधींचे विलायतेंतील वाईट मत कालांतरानें बदललें.

क्लाइव्हची प्रसिद्ध कारकीर्द १७५१ पासून १७६७ पर्यंत १६ वर्षे झालीं. ( त्यांत मध्यें कांहीं वर्षे खंड पडला होता. ) तेवढ्या अवधींत त्यानें बंगाल इंग्रजांस मिळवून दिला ही गोष्ट खरी आहे व त्यायोगें त्यानें कदाचित् आपल्या देशबांधवांचें हित साधलें असेल, पण त्याचा आम्हां हिंदुस्थानच्या लोकांस काय उपयोग ? आमच्या दृष्टीला क्लाइव्ह विश्वासघातकी, खोटे कागद करणारा, देशी राजांची विटंबना करणारा आणि लबाड असाच दिसणार नाहीं काय ? त्यानें पुढें कंपनीच्या नोकरास लांच घेण्यास

बंदी केली खरी, पण म्हणून मिरजाफरपासून त्यानें खाल्लेल्या भरमसाट रकमा आम्हीं कसें विसरूं शकणार? इंग्रजांनीं कायदे तयार केले असले, तरी आमचे राज्यकर्ते त्यांना बळीं पडले हा आमच्यांतील दोष कबूल केलाच पाहिजे. क्लाइव्हनें केलेल्या गोष्टी जर आजच्या काळासारख्या सुव्यवस्थित राज्यांत त्यानें केल्या असत्या तर त्याला त्या आरोपाबद्दल जबर शिक्षा झाली नसती काय? पण जिंकलें तें 'युद्ध' आणि फसलें तें "बंड" असाच हा प्रकार आहे. क्लाइव्ह साहेबांनीं पूर्ण बंगाल ताब्यांत आणला ह्यावरून त्या पुरुषाची कर्तबगारी व्यक्त होतें हें निश्चित. पण बंगाल घशांत घालतांना ज्या गोष्टी करण्यांत आल्या त्याचीच पुनरावृत्ति इतरही प्रांत घेतांना प्रायः झाली आहे. सिराज उद्दौला, मिरजाफर आणि मिरकासीम इत्यादीच्या भानगडींत कोणाला कोणता आणि कितपत अधिकार आहे हें ठरविण्याला इंग्रजांना कांहीं आधार नव्हते. आपली सोय हाच आधार! ज्या पद्धतींनीं त्यांनीं नबाब सुभेदाराच्या अधिकाराची चर्चा केली त्याच पद्धतींनीं इंग्रजांच्याहि अधिकाराची चर्चा त्यांना करतां आली नसती किंवा येणार नाहीं काय? अशा चर्चेला किंवा कोणालाही अपराधी ठरवावयाला कारणाचा अभाव केव्हांच नसतो!*

---

* If it was Convenient to treat a Nabab as an independent prince, there was an excellent plea for doing so. He was independent in fact. If it was convenient to treat him as a mere deputy of the Court of Delhi, there was no difficulty; for he was so in theory. It was Convenient to Consider his Office as an hereditary dignity, or

दुहेरी राज्यव्यवस्था करण्यांतही हिंदुस्थानच्या लोकांचें कांहीं होवो आमचे आपले पैसे खरे, अशीच त्याची वृत्ति असें कां म्हणूं नये ? लहानपणीं अत्यंत हूड आणि उच्च शिक्षणाचा गंधही नसणारा माणूस स्वतंत्र राष्ट्रांत स्वकर्तबगारीवर केवढा मोठा होऊं शकतो हें मात्र त्याच्या चरित्रावरून शिकण्यासारखें आहे.

---

as a dignity held during life only, or as a dignity held only during the good pleasure of the Mogal, *arguments and precedents might be found for every one of those views.*

—*Macaulay 504.*

# वॉरन हेस्टिंग्सचा जुलमी कारभार!

## ( १७७४ ते १७८५. )

क्लाईव्ह विलायतेंत परत गेल्यानंतर त्याच्या जागीं वॉरन हेस्टिंग्स नांवाच्या एका हुशार पण कुटिल माणसाची नेमणूक झाली. ह्याचा जन्म ६ डिसेंबर १७३२ रोजीं झाला. ह्याचें कांहीं शिक्षण खेडेगांवांत व कांहीं शहरांत झालें. पण घरची स्थिति अत्यंत गरिबीची असल्यामुळें क्लाईव्हप्रमाणेंच ह्यानेंही लहान वयांतच हिंदुस्थानांत येऊन कंपनीच्या आफिसांत रायटरची नोकरी धरली. हिशेबाच्या कामांत ह्याचें डोकें बरें चालत असल्यामुळें त्याला उत्तरोत्तर बढती मिळत गेली. कलकत्त्याला ह्यानें सेक्रेटरीच्या आफिसांत काम केल्यावर ह्याची कासीमबझार येथें बदली झाली. त्याच वेळीं सिराजउद्दौल्यानें इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारलें होतें, त्या गडबडींत ह्याला कैदी म्हणून पकडण्यांत आलें, पण त्याची त्यांतून कशी तरी सुटका झाली. त्यानंतर क्लाईव्हनें सिराजउद्दौल्याविरुद्ध मोठा कट केला. त्यावेळीं हेस्टिंग्सनेंहि मध्यस्थ्याचें काम मोठ्या धूर्तपणें केलें. पण बिचाऱ्याची ही लबाडी त्यावेळीं उघडकीस आल्यामुळें त्याला आपला जीव बचावण्यास फुल्डा येथें पळून जावें लागलें. पुढें प्लासीच्या लढाईचें वेळीं ह्यानें शिपाई म्हणून काम केलें. त्यांत त्याची हुशारी दिसून आल्यावर १७५७ त मिरजाफरच्या दरबारीं वकील नेमण्यांत आलें. चार वर्षे तेथें काम केल्यानंतर तो कलकत्त्याच्या कौन्सिलचा

सभासद् झाला. त्यानंतर कांहीं वर्षे विलायतेंत काढल्यानंतर १७७२ त बंगालचा गव्हर्नर व १७७४ त गव्हर्नरजनरल म्हणून त्याची नेमणूक झाली.

वारन हेस्टिंग्सच्या वरील संक्षिप्त चरित्रावरून हें स्पष्ट होईल कीं, तो क्लाईव्हच्या तालमींत तयार झालेला होता. तरुणपणींच त्याला विश्वासघात व कट ह्यांचें शिक्षण मिळालें होतें. तेव्हां त्याची कारकीर्द कशी झाली असेल हें सहज समजून येण्यासारखें आहे. क्लाईव्हनें जसा ब्रिटिश राज्याचा पाया घातला त्याप्रमाणें हेस्टिंग्सनें त्याला मजबुती आणली असें म्हणतात. पण ज्या मार्गानें क्लाईव्ह गेला त्याच किंबहुना त्याहूनही वक्रतर मार्गानें हेस्टिंग्स गेला असल्याचें आढळून येतें. तशा मार्गानें तो गेला नसता तर कदाचित् ब्रिटिशांच्या राज्याला आजचें स्थायी स्वरुप प्राप्त झालें नसतें. अस्तु. क्लाईव्हच्या कारकीर्दीच्या शेवटीं 'रेग्युलेटिंग ॲक्ट' पास झाला होता, त्याअन्वयें बंगालच्या राज्यकारभारास नवें स्वरुप प्राप्त झालें. तेथील एकंदर कारभार चालविण्याकरितां चार जणांचें एक कौन्सिल स्थापन करण्यांत आलें फिलिफ फ्रॅन्सिस, मॉन्सन, क्लॅव्हरिंग आणि बार्वेल हे ते चार सभासद होत. पैकीं बॉर्वेल हा हिंदुस्थानांत बरीच वर्षे राहिलेला असून बाकीचे तिघे विलायतेंतून नवेच आलेले होते.

क्लाईव्हनें वृद्ध मिरजाफरला पुनः गादीवर बसविल्यापासून तो इंग्रजांच्या हातांतलें बाहुलें बनला होता. त्याची गादी मुर्शिदाबाद-ला असे, तो सुंदर श्रृंगारलेल्या राजवाड्यांत रहात असे. पण बिचाऱ्याला स्वतःची मुखत्यारी नव्हती. त्याला नेमणुकांप्रमाणें

दरवर्षी ४५ लाख रुपये मिळत असत. तेवढ्यांत त्यानें आपलें भागविलेंच पाहिजे ! त्याचा कारभार चालविण्याकरितां, एक नायबसुभा नांवाचा प्रधान असे. पण त्याची नेमणूक करणें मात्र सर्वस्वीं इंग्रजांच्या ताब्यांत आणि इच्छेवर असे. सारांश सध्यां ज्याप्रमाणें अव्यवस्थित मालकाची मालमत्ता 'कोर्ट ऑफ वार्डस्' च्या ताब्यांत जाऊन तेथील कारभाऱ्याची नेमणूक करणें सरकारकडे असते, त्याप्रमाणेंच ह्या सुभेदाराचें किंवा नबाबाचें होतें. नांव नबाबाचें आणि सत्ता इंग्रजाची असा हा गंगाजमनी प्रकार होता. वस्तुतः हीहि पद्धत हेस्टिंग्सला पसंत होती असें नव्हे. नामधारी नबाबाच्या नांवाचें मिळमिळित सौभाग्य पुसून टाकून ह्या जगांत ढळढळित विधवा म्हणून कां होईना, पण शहाजोग मुखत्यारीनें इंग्रजांनीं वागावें अशी त्याची इच्छा. तेव्हां हळुहळू तो त्या मार्गास लागला.

वर सांगितलेल्या 'नायबसुभा'च्या जागेकरितां क्लाईव्हच्या वेळीं महंमदरेझाखान आणि महाराजा नंदकुमार ह्या दोन वजनदार गृहस्थांचे अर्ज आले होते. दोघेही बंगाल्यांतील वजनदार पुरुष होते. क्लाइव्हनें ती जागा महंमद रेझाखान ह्यास दिली व हेस्टिंग्स येईपर्यंत सात वर्षे व्यवस्थित कारभार केला. ह्यावेळीं वृद्ध मिरजाफर मरण पावला तेव्हां त्याच्या अज्ञान मुलाचें पालकत्वही या नायब सुभ्याकडेच देण्यांत आलें. महंमद रेझाखानला ही जागा मिळाली ह्याचें नंदकुमारास अत्यंत वैषम्य वाटलें. त्यामुळें त्याला त्या जागेवरून काढून टाकण्याकरितां नंदकुमारानें अनेक प्रयत्न केले. नंदकुमार कारस्थानें करण्यांत मोठा हुशार होता. त्यानें महंमद-

रेझाखाना विरुद्ध हिंदुस्थानांतच नव्हे तर विलायतेंतही काहूर उठवि
परिणाम असा झाला कीं, महंमदरेझाखानाची चौकशी करावी अ
विलायतेंतून हुकूम सुटला. हेस्टिंग्सला ही नायब सुभ्याची जागा
मुळीं रद्द करावयाची होती. तेव्हां त्या जागेकरितां चाललेलीं
भांडणें त्याच्या फार पथ्यावर पडली. आणि त्यानें त्या वेळेंपुर
नंदकुमारास हातांशीं धरलें. वॉरन हेस्टिंग्स हिंदुस्थानांत पू
सामान्य नोकर म्हणून काम करीत असतां त्याचें व नंदकुमारा
चांगलें भांडण झालें होतें, पण तें भांडण तो ह्यावेळीं विसरून गेला
ह्यांतील मख्खी नंदकुमाराच्या लक्षांत आली नाहीं. विलाय
सरकारची ही पडत्या फळाची आज्ञा घेऊन महंमदरेझाखान आणि
बहारचा गव्हर्नर राजा सितापराय ह्या दोघांसही पकडण्यांत आलें.
व कैदी म्हणून ठेवलें त्या दोघांच्याही कचेऱ्या अजिबात बंद
करण्यांत आल्या व हेस्टिंग्सनें अज्ञान नबाबाचें पालकत्व मुन्नीबेगम
नांवाच्या एकाकाळीं नृत्यकलेचा धंदा करणाऱ्या मिरजाफराच्या एका
रखेलीकडे दिलें.

नंदकुमाराच्या मदतीनें सितापराय व विशेषतः महंमदरेझाखान ह्यांची चौकशी चालू झाली. पण दोघेही त्यांत निर्दोष ठरून सुटले. सितापतराय निर्दोष सुटला तरी त्याला ह्या अपकीर्तीचा कलंक सहन झाला नाहीं व ह्या धक्यानें तो लवकरच मेला. नंदकुमारानें ह्या सर्व उलाढालींत मदत केली खरी, पण त्यांत त्याला लवमात्र फायदा झाल्याचें आढळून आलें नाहीं. जी जागा मिळण्याच्या आशेनें एका हिंदुनें दुसऱ्या मुसलमानाविरुद्ध खटपट केली, ती जागाच मुळीं तिसऱ्या इंग्रजानें नाहींशीं करून टाकली आणि

खान व नंदकुमार ह्या दोघांनाही हात चोळींत बसावें लागलें ! नंदकुमाराच्या मदतीला मोबदला म्हणून त्याचा मुलगा गुरुदास ला नबाबाचा खाजगी कोषाध्यक्ष नेमण्यांत आलें इतकेंच. ‘ गरज रो आणि वैद्य मरो ’ अशा तऱ्हेची हेस्टिंग्सची वृत्ति पहातांच दकुमारानें त्याचा सूड घ्यावयाचा निश्चय केला.

वर सांगितल्याप्रमाणें चार जणांच्या कौन्सिलांत तीन सभासद स्टिंग्सच्या विरुद्ध असून एकटा बार्वेल मात्र त्याच्या बाजूनें होता. स्टिंग्सचीं हीं अन्यायाचीं कृत्यें त्या तिघांना पसंत पडेनात. ग्रामुळें ते त्याच्याशीं प्रतिकूल असत. नंदकुमारानें ही गोष्ट ओळखली आणि त्यानें हेस्टिंग्सनें लाच खाल्याची फिर्याद कौन्सि-लापुढें आणली. व बरेचसे अस्सल पुरावे दाखल केले, त्या पुराव्यांत त्यानें असें सिद्ध केलें कीं, महंमदरेझाखानाकडून स्वमुक्ते-करितां, त्याचप्रमाणें मुन्नीबेगम व गुरुदास आणि दुसरे अनेक ह्यांच्याकडून वेगवेगळ्या कारणाकरितां वेगवेगळ्या वेळीं मोठमोठ्या रकमा गुप्तपणें हेस्टिंग्सनें घेतल्या. हेस्टिंग्स आणि बार्वेल रागारागानें न्यायालयांतून उठून गेले. व बाकीच्या तिघांनीं हेस्टिंग्सविरुद्ध निकाल दिला. व त्या निकालांत सर्व रकम ( सुमारे ३० ते ४० हजार पौंड ) हेस्टिंग्सनें परत द्यावी असें ठरलें. हेस्टिंग्सला हा निकाल मान्य करावा लागला. आणि ह्याबद्दल नंदकुमारवर सूड घेण्याचा त्यानेंही निश्चय केला. ह्यावेळीं कलकत्याला वरिष्ठ कोर्ट स्थापन झालें होतें व त्याचा न्यायाधीश सर इलिझा इंपे हा हेस्टिं-ग्सचा शाळा सोबती होता. त्यामुळें त्याची अजूनही मैत्री होती. आतां न्याय देण्याचें काम कौन्सिलकडे राहिलें नसून न्यायाधीशाकडे

होतें. त्यामुळें हेस्टिंग्सचें काम सोपें झालें. इतक्यांत एका हिंदी गृहस्थानें, सहावर्षांपूर्वी खोटा दस्तैवज केल्याची फिर्याद नंदकुमारवर आणली. ह्या ठिकाणीं एक गोष्ट सांगणें अवश्य वाटतें. ती गोष्ट ही कीं, नंदकुमारनें जे पुरावे हेस्टिंग्सविरुद्ध पूर्वी आणले होते ते खोटे मुळींच नव्हते. कारण ते तसें असते तर हेस्टिंग्सच्याच जातभाईनीं तें मान्यच केले नसते. इतकेंच नव्हें तर हेस्टिंग्सला लाच खाण्याची संवय होती हें एका उदाहरणावरून आम्हीं पुढें दाखवून देणार आहों. पण नंदकुमार विरुद्ध हा जो आक्षेप आला होता तो खराच होता कीं काय ह्याबद्दल शंका आहे. किंबहुना तो खरा नसावाच असें मानण्यास भरपूर जागा आहे. वरवर दिसण्यांत जरी हा आरोप एका हिंदी गृहस्थानें आणला होता तरी त्याचा 'करता करविता आणि बोलविता धनी' हेस्टिंग्सच होता ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.* ह्यावरून नंदकुमार आणि हेंस्टिंग्स ह्या दोघांच्या कृत्यांतील फरक कळून येईल. अस्तु.

इंपेच्या पुढें हा खटला चालला. नंदकुमारला शिक्षा कोणती द्यावयाची हें हेस्टिंग्सच्या मतानें अगोदर ठरलें होतें. फक्त न्याय देण्याचा फार्स तेवढा शिल्लक होता. ह्याकाळीं इंग्लंडांत खोटे

---

* The Ostensible prosecutor was a native. But it was then, and still is, the openion of every body, idiots and biographers excepted, that *Hastings was the real mover in the businese*

—Historical Essays by Macaulay.
Vol. II P. 614.

दस्तैवज वगैरे करणारास फांशीची शिक्षा देण्याचा कायदा होता. तोच कायदा त्यानें इकडे लागू करून नंदकुमारास फांशीची शिक्षा सांगितली ! ही शिक्षा सांगतांना इंपेची न्यायदेवता कोठे गेली होती हें ईश्वरास माहीत!+ नंदकुमाराविरुद्ध असणारा आक्षेप खरा आहे असें एकपरी गृहीत धरून चाललें तरी इंपेनें दिलेली शिक्षा समर्थनीय ठरतें काय ? खोटी सही करणारास फांशीची शिक्षा होतें हें त्यावेळच्या आमच्या लोकांच्या स्वप्नींही नसेल. क्लाईव्हनेंही खोटी सही केली होती. पण त्याला कोणत्याही न्यायाधीशानें शिक्षा सांगितली नाहीं उलट दोषमुक्त करून सोडून देण्यांत आलें. निदान त्यावेळीं तरी इंपेनें आपल्या जागेचा बोज ठेवावयाचा होता. इंपेला हिंदुस्थानांत न्यायाधीशाची जागा मिळाली म्हणून हिंदुस्थान कांहीं एकदम इंग्लंड होऊन गेलें नाहीं ! आतांच नव्हे तर पुढें रोहिला प्रकरणांतही इंपेनें असाच लुत्रेपणा करून न्यायदेवतेस खालीं पहावयास लावलें. नंदकुमाराचें वजन फार मोठें होतें येवढ्या माणसाला फांशीची शिक्षा झालेली पाहून सर्वांना त्वेष आला. सर्वांचीं अंतःकरणें हादरलीं पण त्यायोगें हेस्टिंग्सचा मात्र दरारा बसला. नंदकुमाराला सर्वांसमक्ष फांशी देण्यांत आलें. त्याच्या ह्या वधाचा सूड घेण्याची मनोवृत्ति, किंवा ताकत बंगाली लोकांत नव्हती.

---

+ It is, therefore, our deliberate openion that Impey, sitting as a judge, put a man unjustly to death in order *to serve a political purpose.*

Macaulay. P. 616.

कौन्सिलांतील विरुद्ध बहुमतामुळें कांहीं दिवस हेस्टिंग्स नामशेष झाल्याप्रमाणेंच झाला होता. पण पुढें ती परिस्थिति बदलली. व हेस्टिंग्सला नवा उत्साह चढला. ह्यावेळीं तो पैशाच्या अतिशय अडचणींत होता. व्यापारावर फारसा फायदा झाला नाहीं. तेव्हां कोणत्यातरी उपायानें त्याला पैसे मिळवावेसें वाटलें. हेस्टिंग्सच्या एकंदर कारभारांत हा भाग अत्यंत संतापजनक आणि हृदयद्रावक असा आहे. बंगालप्रांत क्लाईव्ह साहेबांनीं गिळला तेव्हां दुर्दैवी सुभेदाराला साठलक्षांची नेमणूक करून देण्यांत आली होती. पण ती पुढें १७६६ मध्यें त्यानेंच ४५ लाख केली आणि अत्यंत साळसूदपणें 'पुढें मुळींच कमी करण्यांत येऊं नये' असा नियम केला. पुढें तीनच वर्षांनीं हा नियम तोडून व्हन्सिटार्टनें ती ३५ लाख केली आणि हेस्टिंग्सनें तर ह्या सर्वांवर ताण करून १७७३ त नेमणूक आणखी निम्मे करून टाकली !! सुभेदाराला एकापरी त्यांनीं प्रथम मारून टाकलें असतें तरी बरें झालें असतें. पण ही विटंबना त्याहूनही वाईट ! सुभेदाराची नेमणूक कमी करण्याचा वस्तुतः इंग्रजांना अधिकार नव्हता. तूट भरून काढण्यास कंपनीच्या अधिकाऱ्याचें वेतन थोडेसें कमी केलें असतें तरी भागण्यासारखें होतें. किंवा विलायतेंत दरवर्षी ठराविक रकमा पाठवाव्या लागत त्यांतीलही कांहीं कमी केल्या असत्या तरी चाललें असतें पण 'अजापुत्रं बलिं दद्यात्' हाच न्याय सगळीकडे लागू आहे.

हेस्टिंग्सनें एकट्या सुभेदाराचीच नेमणूक बंद केली असें नव्हे, तर इतरांनाही त्यानें असेंच नागविलें. बंगाल प्रांताचा खराखरा मालक दिल्लीचा बादशहा होता. क्लाईव्हनें मागें बंगाल

प्रांताची दिवाणी मिळविली तेव्हां ह्याबद्दल त्याला २६ लक्ष खंडणी देण्याचें कबूल केलें होतें. बादशहानेंही इंग्रज पुढें आपणांस मदत करतील ह्या आशेनेंच हा व्यवहार केला होता. पण एकदां सत्ता हातांत आल्यावर इंग्रज कसचे बधतात? त्यांनीं बादशहाला मुळींच मदत केली नाहीं अर्थात् आपलें वचन मोडलें. बादशहाला कोणाची तरी मदत हवी होती. ती त्यानें मराठ्यांची घेतली ह्यांत मनुष्य स्वभावाच्या विरुद्ध कांहीं घडून आलें नाहीं. पण 'ज्या अर्थीं तुम्ही मराठ्यांचें सहाय्य घेतलें त्या अर्थीं तुमचा आमचा मैत्रीचा संबंध तुटला' असा ठपका ठेवून बादशहाला देण्यांत येणारी २६ लक्षांची खंडणी हेस्टिंग्सनें अजिबात बंद करून टाकली! स्वतः मदत करावयाची नाहीं व दुसऱ्यांनीं तसें केल्यास तें सहन व्हावयाचें नाहीं ही श्वानतृणवृत्ति बादशहाला सहन झाली नाहीं पण दुर्बळाच्या क्रोधाला कोण विचारणार? क्लाईव्हनें बादशहा, वजीर व सुभेदार ह्या तिघांशीं वेगवेगळे ठराव केल्याचें मागें सांगितलेंच आहे. त्या ठरावान्वयें पूर्वीं वजिराच्या मालकीचें असलेलें कुरा व अलाहाबाद हे प्रांत बादशहाच्या उत्पन्नाकरितां म्हणून क्लाईव्हनें त्याला १७६५ त कायमचे देऊन टाकले होते. अर्थात त्या प्रांताच्या व्यवस्थे संबंधीं बादशहा मनाचा मुखत्यार असल्यामुळें तो त्याचें वाटेल तें करूं शकत होता. व ह्या मालकी हक्काच्या खात्रीनेंच त्यानें ते प्रांत मदतीचा मोबदला म्हणून मराठ्यांना दिले. हें पाहून हेस्टिंग्सचें पित्त खवळलें व त्या प्रांताची विल्हेवाट करण्याचा बादशहाला कांहीं एक अधिकार नाहीं असा ठराव (?) करून त्यानें पूर्वीचा मालक जो अयोध्येचा वजीर त्यालाच ४० लक्ष रुपये

घेऊन १७७४ त ते प्रांत विकून टाकले!! हें कृत्य एखाद्या सोमाजीनें गोमाजीच्या घराची त्यांच्या इच्छेविरुद्ध तिमाजीस विक्री करून देऊन रकम मात्र आपण खाण्याच्याच योग्यतेचें होतें. कुरा आणि अलाहाबाद प्रांताची विक्री करण्यांत आपलें काय शहाणपण आहे हें कोठें नमूद करून ठेवण्याची हेस्टिंग्सनें फारशी काळजी घेतल्याचें दिसत नाहीं. बादशहाकडे त्या प्रांताची नीट व्यवस्था लागत नव्हती असें म्हणावें तर वजीर म्हणजे कांहीं मोठा विलायतें-तून आलेला नव्हता! आणि वजिराकडेच व्यवस्था द्यावयाची तर त्याच्याकडून रकम कशाला घ्यावयाची? कारण प्रांत पूर्वी त्याचेच होते! पण खरी गोष्ट अशी कीं इंग्रजांना पैसे हवे होते आणि बादशहाची ब्याद कोणत्या तरी उपायांनीं काढून टाकावयाची होती. बादशहाचें इंग्रजाशीं वांकडें आलेंच पण ह्या कृत्यानें मराठ्यांशींही वांकडे येण्यासारखें होतें. व तसें झाल्यास इंग्रजांस ती परिस्थिति अत्यंत इष्ट अशीच होती.

चेतसिंगाचें प्रकरण तर याहून मजेदार आहे. महाराजा चेतसिंग हा काशीचा राजा व मोठा वजनदार मनुष्य होता. इंग्रजांच्या कोणत्याशा कायद्यान्वयें तो त्यांचा मांडलिक झाला असून दरवर्षी कांहीं तरी खंडणी इंग्रजांस देत असे. इतक्यांत इंग्रजांचें फ्रेंचांशीं त्याचप्रमाणें मराठे व हैदर ह्यांच्याशीं युद्ध प्रसंग झाले त्यामुळें ते पैशाच्या आणखी अडचणींत सांपडले. चेतसिंगजवळ पैसा भरपूर आहे अशी हेस्टिंग्सची समजूत होती. त्यामुळें हा ऐवज लुटण्याच्या मार्गास हेस्टिंग्स लागला. प्रथमतः १७७९ सालीं हेस्टिंग्सनें खंडणीशिवाय पांच लाख रुपये चेतसिंगास जास्त

मागितले—किंबहुना धाकदपटशा दाखवून ते द्यावयास भाग पाडलें! आदल्या वर्षी पांच लाख रुपये मिळाले असें पाहून दुसरें वर्षीही पुनः हेस्टिंग्सनें तितक्याच रकमेची मागणी केली व तिच्या सोबतीस चेतसिंगानें ब्रिटिश पलटण नोकरीस ठेवावी अशी अट घातली. अर्थातच हा जुलूम चेतसिंगास सहन झाला नाहीं. तरीपण त्या बिचाऱ्यानें अत्यंत अजीजीनें हेस्टिंग्स साहेबांस हा 'सरकारी' कर थांबविण्याबद्दल विनंति करून त्यांच्या खाजगी संतोषाकरितां म्हणून त्याला दोन लक्ष रुपये लांच दिली !× त्या बहाद्दरानें ही लांच तर खिशांत टाकलीच पण चेतसिंगावरील सरकारी जुलूम मात्र कमी केला नाहीं ! इतकेंच नव्हे पण रकम द्यावयास थोडा उशीर झाला ह्या उशिराचा दंड म्हणून १ लाख रुपये आणखी जास्तच मागितले! एवढ्यानेंच हेस्टिंग्सचा नीचपणा थांबला नाहीं. ही रकम द्यावयास चेतसिंग कांकूं करतो हें पाहिल्याबरोबर स्वतः हेस्टिंग्स कांहीं फौज घेऊन काशीस गेला. आणि 'तूं आमच्या शत्रूस सामील आहेस' असा त्याच्यावर खोटाच आरोप ठेवून त्याला पकडण्याचा हुकूम दिला. पण रबर देखील जास्त ताणलें तर तुटते तद्वत्च बनारसच्या रयतेनें आपल्या राजाचा ह्यावेळीं कैवार घेतला आणि मोठें बंड केलें. राजाची सुटका झाली पण हेस्टिंग्स मात्र उलट त्यांच्या ताब्यांत सांपडला. ह्या प्रसंगीं दोन कुलांगारांचा पुनः उल्लेख करावयाचा

---

× पहा—Burke's Speech at the impeachment of Warren Hastings Calcutta publication—Preface P. xviii. and Historical Essays—by Macaulay Vol II P. 629.

आहे. नागपूरकर भोसल्याचे दोन वकील हेस्टिंग्सजवळ होते. हेस्टिंग्स संकटांत आहे असें पाहून त्यांनीं त्याला हिंदूचा वेष दिला आणि त्याला पालखींत बसवून रात्रीं गुप्तपणें कोणास संशय येणार नाहीं अशा रीतीनें स्वतःच्या फौजेंत भागीरथीपार पोंचवून दिलें. ह्या वकीलांना हेस्टिंग्सचा येवढा कळवळा येण्याचें काय कारण झालें, कळत नाहीं. ह्यांची मदत नसती तर हेस्टिंग्सचा ग्रंथ येथेंच आटोपणार होता. पण आपलाच दाम खोटा तेथें कोणाला कसा दोष द्यावयाचा !÷

ह्याच्या पुढील अत्यंत हृदयद्रावक आणि महत्वाची गोष्ट म्हणजे अयोध्येच्या निरपराधी बेगमाचा हेस्टिंग्सनें केलेला छळ होय. अयोध्येचा वजीर सुजाउद्दौला हा १७७५ त मरण पावल्यावर त्याचा मुलगा असोफउद्दौल्ला ह्याला वजिरी मिळाली. सुजाउद्दौल्याच्या पश्चात् त्याची आई व पत्नी अशा दोन विधवा बाया जिवंत होत्या, त्या फैजाबादला रहात असत. असोफ मात्र लखनौला गोमतीच्या तीरावर राजवाडा बांधून रहात असे. असोफ हा धूर्त

---

÷ टीपः—असें प्रकार करण्यांत मुद्दाम खाजवून खरुज काढून चेतसिंगाला गट्ट करण्याचाच हेस्टिंग्सचा उद्देश होता हें पुढील विधानावरून समजून येईल.

The plan was simply this, to demand larger and larger Contributions till the Raja should be driven to remonstrate, then to call his remonstrance a crime, and to punish him by confiscating all his possessions.

—Macaulay P. 629.

नव्हता. तेव्हां इंग्रजांच्या बोलण्यास सहज फसून जाऊन ह्यानें ब्रिटिश पलटण नोकरीस ठेवली. पण त्याचा खर्च कांहीं त्याला झेपेना. पुढें हेस्टिंग्स व असोफ ह्यांची चुनारगडला भेट झाली असतां हेस्टिंग्सनें त्याला पैसे मागितले. पण त्याच्या जवळ पैसे कोठले ? फैजाबादला रहाणाऱ्या 'अयोध्येच्या बेगमां'च्या जवळ पुष्कळ खजीना आहे अशी त्यावेळीं ख्याती होती. खुद्द असोफनेंही आपल्या आई व आजीपासून पुष्कळ पैसे उपटले होते. पण तेव्हां असोफ व बेगमा ह्यांत असा तह झाला होता कीं, कोणीही कोणाला पैशाच्या बाबतींत त्रास देऊं नये. व हा तह पार पाडण्याची हमीही त्रयस्थ म्हणून शिष्टपणें इंग्रजांनीं घेतली ! पण आतां पैशाची गरज लागली तेव्हां नीच असोफनें बेगमांच्याकडे बोट दाखविलें, आणि त्या बरोबर ती तहाची हमीही लटपटून बेगमांना ह्या निमित्तानें लुटावयाचें हेस्टिंग्सनें ठरविलें. हेस्टिंग्स त्याकरितां फैजाबादला निघाला. किती झालें तरी बेगम असोफची आई असल्यामुळें आपण प्रत्यक्ष आईच्या विटंबनेची परवानगी दिली, ह्याबद्दल त्याचें मन त्याला फार खाऊं लागलें. पण आतां उपयोग नव्हता. हेस्टिंग्सनें प्रथमतः बेगमांजवळ असणाऱ्या दोघा प्रमुख कंचुकीस पकडून लखनौस आणलें आणि त्यांना तुरुंगांत टाकून त्यांचा छळ करण्यास आरंभ केला. त्यांना दोन महिनेपर्यंत खावयास दिलें नाहीं व रकम कोठें ठेवली हें सांगण्याकरितां त्यांचा नानाप्रकारें छळ केला. त्यांच्या रोजच्या रडण्या ओरडण्यानेंच कित्येक लोकांच्या डोळ्यास पाणी येई, पण हेस्टिंग्ससाहेबांच्या हृदयास मात्र पाझर फुटला नाहीं. ह्या कंचुकीच्या छळापासून

कांहीं उपलब्ध होत नाहीं असें पाहून आसन्नमरण स्थितींत त्यांना सोडून देण्यांत आलें. ह्याचवेळीं फैजाबादला बेगमांच्या वाड्यावर पहारा बसविण्यांत आला होता. तेथेंही असे नेमकें अन्न पाठविण्यांत येत असे. बेगमांच्या बरोबर सुमारें १०० आश्रित बाया होत्या. त्यांच्या हातापायास पलिते लावले, उपासमार केली, कोरडे ओढले, इतकेंच नव्हे, पण इतरही पाशवी प्रकार करावयास कमी केलें नाहीं! खुद्द बेगमांचाही असाच छळ झाला. तेव्हां कोठें मोठ्या कष्टानें त्याला जेमतेम १ कोट रुपये मिळूं शकले! हिंदुस्थानांतील एका खानदानीच्या घराण्यांतील पडदानशीन विधवांचा असा छळ हेस्टिंग्सनें केला आणि तो दुष्ट असोफनें पाहिला व ऐकला! ह्यावेळीं आपलें कृत्य बेकायदेशीर किंवा अन्याय्य ठरूं नये ह्याबद्दल हेस्टिंग्सनें फार काळजी घेतली. प्रमुख न्यायाधीश इंपे होता. त्याला फैजाबादला नेण्यांत आलें. भटजी जवळ बाळगला कीं, पारलौकिक गोष्टींची चिंता नसते, त्याप्रमाणेंच न्यायाधीश जवळ असला कीं, त्याच्या अनुमतीनें केलेलीं सारीं कामें न्याय्यच ठरतात अशी हेस्टिंग्सची समजूत असावी असें दिसतें! इंपेनें न्यायाचा फार्स केला आणि हेस्टिंग्सला इष्ट तो न्याय दिला. गोमुखांतून पडणाऱ्या पाण्याचें तीर्थ झालें! वस्तुतः फैजाबाद म्हणजे कांहीं इंपेच्या हद्दींत नव्हतें; किंवा त्याचा अधिकारही तेथें चालण्यासारखा नव्हता असें असतांही त्यानें लांबचा प्रवास करून अधिकारातिक्रमण केलें!

हेस्टिंग्सची हीं कृत्यें ऐकून संताप येतो आणि आमच्या लोकांच्या दुर्दैवाबद्दल कींव वाटावयास लागते. हेस्टिंग्सनें ब्रिटिश

राज्याच कल्याण केलें तें अशाप्रकारें केलें. हेस्टिंग्स विलायतेंत गेल्यावर त्यास पार्लमेंटपुढें खेंचण्यांत येऊन त्याची चौकशी झाली. बर्क, शेरिडान्, डंडास इत्यादि वक्त्यांनीं हिंदुस्थानची बाजू घेऊन हेस्टिंग्सचे अन्याय चांगलेच निदर्शनास आणले. * पण ब्रिटिश न्यायदेवतेनें आपल्या नोकराचा पक्ष घेऊन त्याला निर्दोष म्हणून सोडून दिलें असलें तरी आमच्या मनोवृत्तिप्रमाणें तो निर्दोष ठरणें कसें शक्य आहे ? हिंदुस्थानच्या लोकांची हृदयें इतकीं मेलेलीं खास नाहींत. अस्तु. हा १७८५ च्या फेब्रुवारींत विलायतेंत गेला. ह्याच्या कारकिर्दींत, रोहिल्याशीं एक, मराठ्याशीं एक, व म्हैसूरकराशीं दोन अशीं चार युद्धें झालीं. +

---

* **टीप**—बर्क साहेब आपल्या भाषणांत हेस्टिंग्सला प्रथमच काय म्हणतात तें पहा—

‘ I impeach him in the name of the people of India, whose rights he has trodden under foot and whose country he has turned into a desert..................I impeach the common enemy and oppressor of all ! —Edmund Burke.

\+ **टीप**—वारन हेस्टिंग्सची कारकीर्द अशी असूनही त्या संबंधींचें एका इंग्रज लेखकाचें उद्दाम विधान पहा .—

‘ Within twenty years of the battle of Plassey Bengal had received from Warren Hastings the first outlines of a *system of justice, logical, efficient, and impartial* to a degree never known before.’

—The making of British India by Ramsay Muir P. 22.

# मराठेशाहींत कलिप्रवेश !

———:o:———

हेस्टिंग्सच्या कारकीर्दींत ज्या अनेक मोठ्या गोष्टी झाल्या त्यांतच त्यानें मराठेशाहीस पाडलेल्या खिंडाराची गणना होते. पानपतापूर्वी आणि तदनंतरही कित्येक वर्षे मराठ्यांची सत्ता सार्वभौम होती. आतांपर्यंत पेशवे आणि मराठे सरदार ह्यांचा एक जिनसी गट असल्याकारणानें व स्वराज्यवर्धन व रक्षण करणें हेंच एकमेव ध्येय त्यांच्या समोर असल्याकारणानें इंग्रजांना आपलें बोट शिरकावयास फारशी संधी सांपडली नव्हती. ती हेस्टिंग्सच्या वेळीं सांपडली. पवित्र ठिकाणीं कलीस प्रवेश करतां येत नाहीं. पण नलराजाप्रमाणें नीतिधर्माचें यत्किंचितही उल्लंघन झालें तरी तो आंत घुसतो. आणि एकदां हा कलिप्रवश झाला, कीं तो पुरा नाश केल्याशिवाय कदापि रहात नाहीं ! बंगाल आणि मद्रास ह्या दोन्ही इलाख्यांत इंग्रजांनीं आपलें हातपाय चांगलेंच पसरलेले होते. मण महाराष्ट्रांत मुंबई गांव व आसपासचा थोडासा प्रदेश ह्याशिवाय त्यांच्या कर्तृत्वास कोठेंही वाव मिळाला नव्हता. वास्तविक मराठ्यांना नामोहरम केल्याशिवाय इंग्रजांना स्वस्थपणा मिळण्यासारखा नव्हता. नेमकी व्रणावर चोंच मारून आपलें पोट भरणाऱ्या कावळ्याप्रमाणेंच भाऊबंदकी व आपसांतील गृहच्छिद्रें हेंच इंग्रजांचें खाद्य होतें ! आणि मराठेमंडळांत भाऊबंदकी होते कधीं, किंबहुना ती करतां येण्यासारखी आहे कीं नाहीं, हें सूक्ष्मपणें पहाण्याकरितां वॉरन हेस्टिंग्स साहेबानें इ० स० १७७२ मध्यें

मॉस्टिन नांवाच्या एका इसमास पुणें येथें ठेवून दिलें. व त्यानेंही आपलें काम इमानेंइतबारें पार पाडलेलें दिसतें. कारण मॉस्टिनचें येणें आणि त्यानंतर थोड्याच दिवसांत पेशव्यांच्या भाऊबंदकीस उग्र स्वरूप येणें ह्याची एकच गांठ पडली. पानपतानंतर झालेली क्षीणशक्ति भरून काढणारा माधवराव अल्पवयांतच मरण पावला. माधवरावाच्या हयातींतच त्याचा चुलता राघोबा दादा ह्यांच्याशीं त्याचें पटेनासें झालें होतें. माधवरावानंतर नारायणराव गादीवर बसला. आपण पेशवा व्हावे, ही राघोबाची फार दिवसाची इच्छा. पण ती साध्य झाली नव्हती. नारायणरावांचा स्वभावही वाईट असल्यामुळें त्याला मारण्याचें कारस्थान सुरू झालें. आणि सुप्रसिद्ध ‘ ध ’ चा ‘ मा ’ होऊन शनिवारवाड्यांत ता. ३ आगस्ट १७७३ रोजीं दुपारीं दोन प्रहरीं नारायणराव गारद्यांच्या तरवारीस बळीं पडला. हा अमानुष खून पुण्याला मॉस्टिन येऊन राहिल्या-नंतर एक वर्षाच्या आंतबाहेर झाला. ह्यामुळें भाऊबंदकीचें कारस्थान चांगलेंच रंगलें आणि मॉस्टिन व पर्यायानें इंग्रज सरकार ह्यांनीं राघोबास हातांशीं धरलें.

मुंबई बेट इंग्रजांच्या ताब्यांत दुसऱ्या चार्लस् राजाच्या कार-कीर्दीपासून होतें. पण आंतापर्यंत त्याची वहिवाट आणि महत्व केवळ व्यापारी दृष्टीनेंच असल्यामुळें राजकारणाचे खेळ खेळण्याचें भाग्य त्या ठिकाणास लाभलें नव्हतें, पण १७७५ त मुंबई कौन्सिलच्या महत्वाकांक्षी अध्यक्षास मुंबईजवळचें साष्टी आणि २८ मैलावरचें वसईबंदर आपल्या ताब्यांत असावें असें वाटू

लागलें. × हीं ठिकाणें मराठ्यांनीं नुकीच पोर्तुगीजांपासून घेतलेलीं होतीं. पेशव्यांच्या घराण्यांत भाऊबंदकी रंगल्यामुळें इंग्रजांना सुसंधी प्राप्त झाली. नारायणरावांचा खून झाल्यानंतरही राघोबाचा मार्ग निष्कंटक झाला नाहीं. नाना फडणीस इत्यादि मुत्सद्दी मंडळींनीं बारभाईचें कारस्थान रचून लहानग्या सवाईमाधवरावास गादीवर बसवून राज्यकारभार सुरुं केला. राघोबास स्वतः पेशवाई पद मिळविण्याची हाव होती. म्हणून बारभाईशीं युद्ध करण्याकरितां त्याला कोणाची तरी मदत हवी होती. ती त्यानें इंग्रजांची घेतली. इंग्रजांना हें हवेंच होतें. त्यांनीं राघोबास मोठ्या खुषीनें मदत केली. पण तत्पूर्वी मदतीचा मोबदला म्हणून त्याच्याकडून सुरत मुक्कामीं तहाच्या कांहीं अटी कबूल करून घेतल्या. तहाचीं मुख्य कलमें अशीं होतीं कीं, ‘मराठ्यांशीं इंग्रजांचे झालेले पूर्वीचे तह राघोबानें मान्य करावे, इंग्रजांनीं राघोबास तूर्त पंधराशे पण पुढें लवकरच कमींत कमी पंचवीसशे फौज मदतीस द्यावी. या फौजेच्या खर्चाकरितां राघोबानें सर्व साष्टी बेट, तसेंच साष्टीलगत मराठ्यांच्या ताब्यांत असणारा भाग आणि त्याचें उत्पन्न, जंबूरस व ओलपाड हे गुजराथेंतील दोन परगणे, कारंजा कान्हेरी वगैरे मुंबई लगतचीं बेटें बडोद्याच्या गायकवाडामार्फत भडोच शहर व परगणा ह्यांत

---

× टीप–The Bombay Council interfered in the internal disputes of the Marathas in order to get possession of the sland of Salsette (साष्टी).
—The making of British India by Ramsay Muir P. 154.

होत असलेला मराठ्यांचा वसूल, अंकलेश्वराच्या उत्पन्नापैकीं सालिना पाऊणलक्ष रुपये, इंग्रजांनीं मदतीस दिलेल्या फौजेच्या खर्चीकरितां दरमहा दीड लक्ष रुपये व या रकमेच्या तारणादाखल गुजराथेंतील चार महालाचें तारण द्यावें. बंगाल व कर्नाटक इकडील इंग्रजीच्या जहागिरीवर मराठ्यांनीं पुढें केव्हांही स्वारी करूं नये. कंपनीस देऊं केलेला वरील मुलुख तहाच्या तारखेपासून इंग्रजाच्या स्वाधीन करावा व राघोबानें पुण्याच्या दरबारशीं स्वतंत्र तह केल्यानें जरी युद्धाचें कारण पडलें नाहीं तरी इंग्रजांनीं तहाप्रमाणें व्हावयाची ती मदत केली असें समजून सदर मुलुख त्यांना कायमचा देऊन टाकला असें समजावे !' ÷ राघोबा होळकर गायकवाडांकडूनही फजीत झालेला असल्यामुळेंच त्याला हा सर्वस्वी अपमानकारक तह कबूल करावा लागला. इतकेंच नव्हे तर तहाच्या अटी पाळण्याबद्दल तारण म्हणून राघोबाला आपले सहा लक्ष रुपयाचे जडजवाहीर आपले स्वाधीन करण्यास इंग्रजांनीं भाग पाडलें ! * राघोबा ह्या वेळीं स्वार्थानें धुंद झाला असल्याकारणानें त्याला इंग्रजाचे डावपेंच ओळखतां आले नाहींत. आपणाला मदत करण्यांत इंग्रजांचा हेतू स्वार्थनिरपेक्ष नाहीं हें त्याच्या ध्यानांत आलें नाहीं, किंवा स्वकीयांविरुद्ध लढण्यांत परक्यांची मदत घेऊं नये हें अलीकडील राष्ट्रीयत्वाचें तत्वज्ञानही त्याला अवगत असणें शक्य

---

÷ 'मराठे व इंग्रज'—न. चिं. केळकर. पूर्वार्ध पृ० ६२, ६३.

* टीप–हें जवाहीर पुढें २८ वर्षानंतर १८०३ मध्यें दुसऱ्या बाजीरावास गादीवर बसविल्यानंतर सन्मान्य कंपनीनें पेशव्यास बक्षीस म्हणून परत केलें !!

नव्हते. त्याची प्रामाणिक समजूत कीं इंग्रजांनीं ज्याचा हात धरला त्याला अपेश म्हणून येऊंच नये ! पण त्याच्या ह्या चुकीचें प्रायश्चित्त त्याला चांगलेंच भोगावें लागलें. व इंग्रजांच्या सहवासाचा त्याला फार पश्चाताप झाला. पण फार उशीरां !

तहांत ठरल्याप्रमाणें इंग्रजांकडून कर्नल कीटिंग हा बरोबर फौज घेऊन राघोबाचे मदतीस आला. त्याच्या व हरिपंत फडक्यांच्या हाताखालील बारभाईच्या सैन्याची आरास येथें गांठ पडून बारभाईचा पराभव झाला. (१७७५.) त्यांत पडलेल्या एकंदर लोकांपैकीं फक्त ८६ लोक काय ते यूरोपियन होते. तत्पूर्वी २० अक्टोबर १७७४ रोजीं रेग्युलेटिंग अॅक्टान्वयें हिंदुस्थानांतील सर्व इंग्रजी प्रदेशावर हुकमत गाजवावयाचा अधिकार बंगालच्या गव्हर्नरास मिळालेला असून त्याचा हुद्दा गव्हर्नर-जनरल असा ठरविण्यांत आला. व वारन हेस्टिंग्स साहेब त्यान्वयें मुख्याधिकारी झाले. ही बातमी पुढील महिन्यांतच बंगाल सरकारनें मुंबई सरकारास कळविली. पण ह्या वेळीं मुंबई सरकार राघोबाच्या भानगडींत पडलें असल्यामुळें व त्यांना साष्टी वगैरे घेणें असल्यामुळें त्यांनीं हें पत्र कित्येक दिवसपर्यंत दडपून ठेवून उत्तरच दिलें नाहीं ! × पण मुंबई सरकारच्या कारस्थानाची बातमी कलकत्ते-

---

× टीप–This letter was received at Bombay on the 7th December (1774), but as the president and members were then in the midst of preparations for the expedition to Salsette, they deferred the consideration of the Bengal letter,

करांस कळलीच. आणि त्यांनीं रागारागानें अधिकाराच्या तोऱ्यांत मुंबईकरांस पत्र लिहिलें. तें त्यांना २१ मे १७७५ रोजीं पोंचलें. तींत त्यांनीं साष्टीबद्दल कांहीं एक लिहिलें नव्हतें, पण राघोबाच्या भानगडींत इतःपर न पडण्याबद्दल स्पष्ट मनाई केली होती. इतकेंच नव्हे पण पुणें दरबारशीं तह करण्याकरितां म्हणून कर्नल ॲप्टन नांवाच्या एका वकीलास हेस्टिंग्स साहेबानें पाठवून दिलें. हा असा प्रकार झाल्यामुळें राघोबा बिचारा तोंडघशीं पडला. आरासच्या लढाईनंतर पावसाळा लागल्यामुळें त्याचा मुक्काम गुजराथेंतच होता. आरासच्या लढाईनेंही राघोबाचा फायदा कांहींच झाला नव्हता. मुंबईकरांना स्वतःच अखत्यारी उरली नव्हती तेव्हां ते राघोबाचें व्याह्याचें घोडें काय म्हणून मुद्दाम उभे करतील ? राघोबानें अधीर होऊन विचारावें आणि त्यांनीं गोड गोड व आशायुक्त वचनें देऊन फसवावे असें चाललें होतें. रेग्युलेटिंग ॲक्टान्वयें हें सारें गाडें फसलें. आणि हा ॲक्ट जर विलायतेंतून पसार झालेला आहे तेव्हां तेथें एखादा माणूस भांडावयास पाठविल्यास काम होणें शक्य आहे, अशीही राघोबास सल्ला देण्यांत आली ! इकडे ॲप्टन साहेबांनीं पुरंदर मुक्कामीं बारभाईशीं तह केला तो तर विलक्षणच. कलकत्ता सरकारनें मुंबईकरांचा एकपरी मोठा अपमानच केला होता. मुंबईची स्थिति

---

until after the troops had proceeded on their destination, *and sent no reply until the last day of the year.*

—History of the Marathas by Grant Duff
Vol. II P. 220, 221.

माहित नसतांना वेड्यासारखा युद्धबंदीचा हुकूम काढण्यांत गैर-मुत्सद्दीपणा आहे हें सिद्ध करण्याकरितां मुंबई सरकारकडून वुइल्यम टेलर नांवाच्या वकीलास कलकत्त्यास पाठविण्यांत आलें. व त्यानें-ही साष्टी व वसई ताब्यांत असणें कसें फायदेशीर आहे हें सिद्ध करून दिलें. सुरतेच्या तहाप्रमाणें राघोबानें वरील दोन परगणें लिहून दिलेंच होते. तेव्हां पुरंदर येथें तह करतांना (१-३-१७७६) ॲप्टन साहेबांनीं घातलेल्या अटींत साष्टी व वसई इंग्रजांकडे असावी हें मुख्य कलम होतें! मुंबई सरकारनें राघोबाचा अन्यायी पक्ष घेऊन खाजवून खरुज काढली हें पसंत नसल्याबद्दल ॲप्टन साहेबानें सांगितलें. व सुरतेस झालेला राघोबा—इंग्रजांचा तह साफ रद्द समजावा हेंही त्याला मान्य होतें. पण सुरतेच्या तहान्वयें हातीं आलेलें साष्टी बेट हातांतून जाऊं द्यावें असें मात्र त्यास वाटेना! समुद्र किनाऱ्याच्या दृष्टीनें सदरहू बेट हातांत असणें अगदीं अवश्य होतें. नाना फडणवीस आणि सखाराम बापू ह्यांनीं स्पष्ट प्रश्न उपस्थित केला कीं, सुरतेचा तह जर मुळींच मान्य नाहीं तर त्यांतील साष्टी बेटासंबंधींचेंच तेवढें कलम मान्य कसें? पण ह्याच्यावर समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं. इंग्रजांचें म्हणणें असें कीं, आज साष्टी बेट आम्ही कायमचें घेतों. कधीं काळीं जर तें परत करण्याचा प्रसंग आला तर मराठ्यांनीं मोबदला म्हणून तीन लक्षांचा मुलुख आम्हांस द्यावा! शिवाय सध्याच्या लढाईच्या खर्चाबद्दल भडोच वगैरे तीन लक्ष उत्पन्नाचा मुलुख व १२ लाख रुपये रोख इंग्रजांनीं मागितले ते वेगळेच! राघोबास मदत करणार मुंबईकर इंग्रज, आणि त्याचे

दुष्परिणाम आणि खर्च भोगावा लागणार बारभाईस ! हा उलटा न्याय पुणें दरबारच्या कारभाऱ्यास अगदीं पसंत पडला नाहीं. व कित्येक दिवसपर्यंत त्यांनीं अॅप्टन साहेबांस दाद दिली नाहीं. शेवटीं तर मुंबईकरांना पुनः युद्धाला परवानगी देण्याचेंही घाटत होतें. परंतु हरिपंत फडक्याच्या फौजा पगाराच्या बाक्या तुंबल्यामुळें आणि इतर कारणामुळें फारशा कार्यक्षम नव्हत्या. व हें भिजत घोंगडें तसेंच टाकून ठेवणें बारभाईसही फारसें इष्ट नव्हतें. म्हणून ही ब्याद टाळण्याकरितां व एकंदर प्रकरण जलदी निकालांत निघण्याकरितां नुकसानीचा पुरंदरचा तह मान्य करून त्यावर सह्या झाल्या व साष्टी ताब्यांत घेण्याचा इंग्रजांचा कपट मनोरथ इतक्या सोपस्कारानंतर पार पडला ! ह्या तहावर इंग्रजांतर्फे लेफ्टनन्ट कर्नल अॅप्टन व पेशव्यांच्या तर्फे सखाराम बापू व नाना फडणवीस ह्यांनीं सह्या केल्या. तहाच्या कागदांत पेशव्यांच्या नांवाचा उल्लेख नसून फक्त ‘ राव पंत प्रधान ’ ह्या पदव्यांचाच तेवढा उल्लेख आहे !

पुरंदरचा तह जितका बारभाईस अनिष्ट झाला त्याहून जास्त अनिष्ट राघोबास झाला. ह्या तहांत राघोबास इंग्रजांनीं बारभाईच्या स्वाधीन करावे, त्यानें दरमहा पंचवीस हजार रुपये घेऊन कोपर गांवीं स्वस्थ बसावें, त्याचें इंग्रजांकडे गहाण असलेले सहा लक्षाचें जवाहीरही बारभाईस द्यावे, इतःपर इंग्रजांनीं राघोबाचें वाटेस जाऊं नये, इत्यादि कलमें होतीं ! हा तह ऐकून राघोबास काय वाटलें असेल ह्याची कल्पनाच करावी ! ज्या बारभाईच्या पाडावाकरितां तो इंग्रजाकडे गेला तें तर साधलें नाहींच, पण गाडें उलटें अंगावर आलें ! आपलें जवाहीर देखील बारभाईच्या स्वधीन

केल्याचें ऐकून 'आमचे जवाहीर देणारा हा अप्पण कोण ?' असें चरफडून त्यानें उद्गार काढले ! राघोबा अशा तऱ्हेनें सर्वस्वी नागविला गेल्यावर आपल्या बळावर कांहीं करतां येण्यासारखें असल्यास करावें असें त्यास वाटलें. त्याचीही स्वतःची पुष्कळ फौज होती परंतु त्यांच्याही पगाराचा फडशा झाला नसल्यामुळें ती बेदील होती. मुक्काम हलवावा तर शिबंदीचा रोजमुरा फडशा करणें शक्य नाहीं आणि मुक्काम न हलवावा तर इंग्रज राहूं देत नाहींत, अशा दुहेरी संकटांत राघोबा सांपडला. पुरंदरच्या तहान्वयें राघोबास तेथून जाणें भाग होतें. तो मुलूख इंग्रजांच्या ताब्यांत असल्यामुळें, त्यांनीं 'तुमच्या फौजेचा आम्हांस त्रास होतो तेव्हां निघून जा, किंवा फक्त दोनशे लोकांनिशींच आमच्यांत या' असें राघोबास स्पष्ट बजावलें ! त्यांचा तो अतिथि--सत्कार ऐकून 'मसलत सर्वप्रकारें बिघडली, सर्व संकटप्राप्त्या एक इंग्रजाचे प्रतिकूळतेमुळें जहाली, आजपर्यंत ज्यांचा हात इंग्रजांनीं धरला तो सोडला नाहीं असा ह्यांचा लौकिक ऐकत आलो. ऐसें असतां सांप्रत आम्हास पटकी बसविली. केवळ विश्वासघात मोठे दगाबाजही बेइमानी होत गेले, त्यांच्यानेंही कोणाचा नसेल ऐसा ( दगा ) जाहला आहे' असें उद्गार राघोबानें आपल्या एका पत्रांत काढले आहेत !

अशाप्रमाणें प्रकरण एकाकडेस लागल्यासारखें दिसलें. परंतु मुंबई सरकारांस राघोबाचा पक्ष सोडणें स्वहिताच्या दृष्टीनें बरें वाटलें नाहीं. वारन हेस्टिंग्सलाही आपल्या कृत्याचा थोडा पश्चाताप वाटूं लागला. व मराठेमंडळांत पुनः हात घालून पुनः कसा

फायदा करून घ्यावा ह्याच्या विचारास तो लागला. नानांनीं ह्या वेळेस बुद्धिपुरःसरच केवळ इंग्रजांच्या तोंडांत मारण्याकरितां फ्रेंचांशीं विशेष संबंध ठेवला होता. तेव्हां ह्यासंबंधीं कांहीं आरोप पुणें दरबारावर करणें शक्य आहे असें इंग्रजांस वाटलें. इतक्यांत ह्यास उपकारक अशी दुसरीही गोष्ट घडून आली. आपसांतील फूट आणि भाऊबंदकी ही आमच्या पांचवीसच पूजली असल्यामुळें पुणें दरबारांतही ती घडून आली. पुरंदरच्या तहावर पेशव्यांच्या बाजूनें सही करणारा म्हातारा सखाराम बापू आतां राघोबाकडे झुकूं लागला आणि तत्पक्षीय कांहीं सरदार त्याला मिळाले. नाना फडणविसाचा चुलत भाऊ मोरोबा फडणवीस ह्यानेंहीं ह्या सुमारास बराच धुमाकूळ घातला. ह्या वेळपर्यंत राघोबा पुण्याकडे आलेला नव्हता. व मनांतून इंग्रजांनाही त्याला सोडावेसें वाटत नव्हतें. सखाराम बापूनें राघोबास पुण्यास आणण्याबद्दल मुंबईकरांकडे बोलणें लावलें. अर्थात राघोबाशीं सलूख करण्याचा त्यांत ध्वनि होता. फ्रेंचांच्या मानपानानें इष्ट संधीच्या शक्यतेबद्दल आधींच हुरळून गेलेल्या इंग्रजांना हें नवें मोठें साधन सांपडल्यासारखें झालें. पुरंदरचा तह मराठ्यांनींच मोडला असा नेहमीं प्रमाणें त्यांनीं पुकारा केला ! आणि सारा दोष मराठा मंडळावर लादून ‘आपणच पुरंदर तहाविरुद्ध वागावयास सिद्ध झाले ! वारन हेस्टिंग्सनेंही मुंबईकरांना पुणें दरबारशीं राघोबाचा पक्ष घेऊन भांडण भांडावयास संमती दिली, इतकेंच नव्हे पण मदतीकरितां कलकत्त्याहून जनरल गॉडर्डच्या हाताखालीं पुष्कळ फौजही पाठवून दिली. ह्याप्रमाणें २४ नोव्हेंबर १७७७

रोजीं मुंबईकरांनीं राघोबाशीं नवा तह केला. ह्यामुळें राघोबास नवजीवन प्राप्त झाल्यासारखें झालें. तावडतोब मुंबईकरांनीं कर्नल इगर्टनच्या हाताखालीं पांचशे गोरे आणि दोन हजार काळे इतकी फौज राघोबाच्या मदतीस पाठविली व हें मिश्र सैन्य झपाट्यानें पुण्याकडे यावयास लागलें. नाना फडणविसाचीही तयारी होतीच. शिंदे, होळकर, रास्ते, प्रतिनिधी इत्यादींच्या फौजा मिळून एकंदर भरती चाळीस हजार झाली. अशाप्रमाणें पनवेल मुंबईच्या दरम्यान व पुढें घाटमाथ्यावर आणि वडगांव मुक्कामीं १० जानेवारी १७७९ रोजीं ह्या फौजांच्या गांठीं पडल्या. मराठ्यांनीं गनिमी पद्धतीचा अवलंब केला व इंग्रजांना सर्व बाजूंनीं जेर केलें. ह्या युद्धांत इंग्रजाचें ३।४ सरदार पडले. ह्याच सुमारास भाऊबंदकी साठीं योजना झालेला मॉस्टिन साहेबही दुखण्यानें मेला. अशा तऱ्हेनें: सगळीकडून फजीत झाल्यामुळें इंग्रजांनीं तहाचें बोलणें लावलें. पण आतां मराठ्यांची कमान चढती असल्यामुळें त्यांनीं आतांपर्यंत इंग्रजांनीं साष्टी ऊरण जंबूसर जे जे महाल घेतले आहेत, ते सर्व बिनशर्त परत करावे, राघोबाला शिंद्यांचें स्वाधीन करावे, आणि पूर्वीं नानासाहेब आणि माधवराव ह्यांच्या बरोबर झालेल्या सख्यत्वाच्या तहाबरहुकूम सर्व कारभार गुण्या गोविंदानें चालावा इत्यादि जबर कलमें घातलीं होतीं. इंग्रजांना हा तह मान्य करण्यापलीकडे गत्यंतर नव्हतें. तो तह मान्य करण्यांत येऊन शूस्टर आणि फार्मर नांवाचें दोन अधिकारी मराठ्यांच्याकडे ओलीस म्हणूनही राहिले ! व राघोबा शिंद्याकडे गेला.

इतका सर्व खटाटोप करून साष्टी बेट हातांतून गेलें हें पाहून इंग्रजांस तोंडांत मारल्याप्रमाणें झालें ! तेव्हां हा लढा कोणत्या तरी निमित्तानें पुढें लढवावा म्हणून वडगांवच्या तहांतील कलमें पाळण्यास इंग्रज अळंटळं करूं लागले. कलकत्तेकरांस ही बातमी कळली. त्यांनीं पूर्वी जनरल गॉडर्डच्या हाताखालीं फौज रवाना केलीच होती. परंतु इंग्रजांच्या मनांत वडगांवचा तह मोडावयाचा असल्यामुळें त्यांनीं गॉडर्डला परत न बोलावतां तसेंच जाऊं दिलें. तो फौज घेऊन गुजराथेंत गेला. शिंद्यानें राघोबाकडून आपला पेशवाईवर हक्क नसल्याचें बेदावापत्र लिहून घेऊन त्याची झांशीस रहाण्याची व्यवस्था केली. परंतु गॉडर्डसाहेब आला असें पाहून राघोबानें शिंद्यांच्या फौजेवर हल्ला केला व गुजराथेंत पळून जाऊन पुनश्च इंग्रजांचा आश्रय धरला ! (मे १७७९) मध्यंतरी पावसाळा आल्यामुळें विश्रांतीचें चार महिने गेल्यावर गॉडर्ड वसई घ्यावयास गेला व त्यानें वसई घेतली. परंतु दुसरेंच दिवशीं रामचंद्र गणेश कानडे नांवाच्या शूर सरदारानें मरणाचें मोल देऊन त्याला चांगलेंच झोडपलें ! पुढें गॉडर्ड पुण्यावर चालून जाऊं लागला. परंतु पटवर्धन, होळकर इत्यादींच्या फौजेनें बोरघाटांत त्यास चांगलाच फजीत केला ! त्यांनीं चारही बाजूंनीं घेरून इंग्रज–राघोबास मनस्वी त्रास देण्यास सुरुवात केली. असें कांहीं दिवस चालल्यावर नाना फडणविसानें हैदराच्या वगैरे मदतीनें इंग्रजांविरुद्ध मोठें कारस्थान सुरूं केलें होतें. अशा विविध तापानें त्रस्त होऊन शेवटीं १७८३ मध्यें अँडरसन हा इंग्रजांचा वकील तहाचें बोलणें लावावयास आला व सालबाई मुक्कामीं तह ठरला ! त्यांत आणि

वडगांवच्या तहांत फारसें अंतर नव्हतें. फक्त साष्टी बेट इंग्रजांकडे रहावें ह्या कलमावर इंग्रजांचा विशेष जोर होता. व हैदराच्या मृत्यूमुळें नानानेंही विशेष ताणून न धरतां तें त्यांना दिलें. तेव्हां इंग्रजांना हायसें वाटलें. शिवाय राघोबानें चार महिन्यांत पेशव्यांकडे जावें व एकमेकांनीं एकमेकाच्या शत्रूस मदत करूं नये इत्यादि मामुली कलमें होतीं !

अशा प्रकारें ह्या मराठ्यांच्या युद्धाचा शेवट झाला. राघोबा स्वस्थ बसला व पुढें कांहीं महिन्यांनीं (११-१२-१७८३) वारला या युद्धापासून इंग्रजांचा मराठ्यांच्या राजकारणांत संबंध आला. ह्या एकंदर युद्धाचें समालोचन करतांना असें आढळून येतें कीं, साष्टी बेट हस्तगत करण्याकरितां आणि इतर फायद्याकरितां त्यांनीं खुनी राघोबाचा अन्याय्य पक्ष धरला. व कांहीं दिवस वॉरन हेस्टिंग्सनें सोवळेपणाचा मोठा आव आणला असला तरी शेवटीं तोही आपल्या जातीवरच गेला ! इंग्रजांनीं तह केले आणि मोडले ! आणि ज्या राघोबास त्यांनीं हातांशीं धरलें, त्याचा काडीचाही फायदा न करतां आपला मात्र करून घेतला !

---

सं. नं. ३२८

# सैनाती फौज : स्वरूप व कार्य.

हेस्टिंग्स साहेबाच्या कारकिर्दीनंतर लार्ड कार्नवालिस व त्यानंतर सर जॉन शोअर असे दोघे गव्हर्नर जनरल झाले. परंतु ते इतिहासाच्या तीव्रतेच्या दृष्टीनें फारसे महत्वाचे नाहींत. वारन हेस्टिंग्स साहेबाच्या अस्मानीसुलतानीमुळें अगोदरच सारें भारतवर्ष तापून गेल्या कारणानें ह्या तप्त कांचेवर आणखी पाणी घालण्यापेक्षां ती कांहीं दिवस थंड पडूं देणेंच इंग्रज मुत्सद्यांच्याही दृष्टीनें आवश्यक होतेंच आणि त्याप्रमाणें कार्नवालिस आणि शोअर ह्यांना अत्यंत सावधगिरीनें वागण्याची आणि कोणतेंही लफडें अंगांत अडकवून न घेण्याची स्पष्ट आज्ञा होती. त्याप्रमाणें त्यांनीं वागण्याचा आटोकाट प्रयत्न केला असला तरी कार्नवालिसच्या कारकिर्दींत चुकून म्हैसूर-कराशीं युद्ध झालेंच! हिंदुस्थान एखाद्याच्या जुलमानें त्रस्त झालें असलें म्हणजे त्या कारभारास तात्पुरता लगाम घालण्याची कला पार्लमेंटलाही बरीच साध्य झाली होती. हा 'ब्रेक' कदाचित् परोपकाराच्या उदात्त बुद्धीनेंही लावण्यांत येत असेल! मागे क्लाइव्ह साहेबाच्या वेळीं रेग्युलेटिंग ॲक्ट करण्यांत आला होता. त्याच प्रमाणें आतांही 'पिट्टचा कायदा' करण्यांत आला. पिट्ट पूर्वींचा मुख्य प्रधान फॉक्स ह्यानें प्रथमतः अशा तऱ्हेचें बिल पार्लमेंटपुढें आणलें, पण त्यांत कंपनीचे राज्यकारभारासंबंधीं सर्व अधिकार काढूनच टाकण्यांत आले होते. परंतु येवढा मोठा घास त्यावेळच्या लोकमताच्या लहान तोंडांत न मावल्यामुळें तें नापास झालें व फॉक्सला आपल्या जागेचा राजिनामा द्यावा लागला. त्यानंतर पिट्ट

प्रधान झाला व त्यानें पुढील माणसास लागलेल्या ठेंचेवरून शहाणें होऊन तत्सदृश पण थोड्याशा फरकानें दुसरा कायदा केला. व तो अंमलांतही आला. त्यांत जीं कलमें होतीं त्यांतच 'हिंदुस्थानांत आतां जास्त मुलुख जिंकूं नये' अशा अर्थाच्या कलमाचा समावेश होत होता. पण हिंदुस्थानचें काय नशीब असेल तें असो इतर सारीं कलमें तंतोतंत पाळण्यांत येऊन तेवढेंच नेमकें कलम पाळण्याचें टाळण्यांत आलें! एखादा व्यसनी माणूस आपल्या व्यसनाबद्दल खरा किंवा खोटा पश्चाताप पावल्यामुळें वारंवार तें सोडण्याचे निश्चय व प्रतिज्ञा करतो, परंतु त्याच्या त्या प्रतिज्ञा व्यसनानुकूल संधी येतांच साऱ्या विरघळून जातात! तशीच राज्यवर्धनाच्या बाबतींत कांहीं अंशीं इंग्रजांची स्थिती झाली होती. एखाद्या निर्ढावलेल्या अपराध्याप्रमाणें 'आतां यापुढें नाहीं' असे कबुली जबाब इंग्रजांनीं अनेक वेळा दिले होते. परंतु उपयोग काय? केवळ अशा व्यावहारिक आणि शाब्दिक निश्चयानें जर तृष्णेचें दमन होणें शक्य असतें तर पृथ्वीचा स्वर्ग व्हावयास काय हरकत होती? शोअर सोहेबानंतर लॉर्ड वेलस्ली ह्या प्रसिद्ध पुरुषाची गव्हर्नर-जनरलचे जागीं नेमणूक झाली. हा पुरुष क्लाइव्ह आणि हेस्टिंग्स ह्यांच्या मालिकेंत बसण्यास सर्वथैव योग्य होता. त्यानें कधींही कोणाच्या डोक्यांतून निघाली नाहीं अशी युक्ति काढली आणि तिच्या भरंवशावर सारें हिंदुस्थान आपल्या अंकित बनविलें. ती युक्ति म्हणजे 'तैनाती फौज' होय.

परोपकाराच्या उदात्त बुद्धीनें प्रेरित होऊन अनेक लोक स्वयंस्फूर्तीनें लोकांची सेवा करावयास तयार होतात व अशा सेव-

कांच्या अनेक संस्था अस्तित्वांतही आहेत. कोणाचें नाहक नुकसान होऊं नये अशी सदिच्छा कोणाचीही राहील व स्वतःचें कांही नुकसान न होतां अनायासें दुसऱ्याची संकटापासून मुक्तता होत असल्यास तसा प्रयत्नही करण्यास प्रायः कोणी आळस करणार नाहीं. परंतु कोणीही दुसऱ्यावर त्याच्या सुरक्षिततेची सक्ति करीत नाहीं! वेलस्ली साहेबांनीं मात्र ती केली. त्यांना हिंदुस्थानांतल्या दुर्बळ राजेरजवाड्याबद्दल अतिशय काळजी लागून राहिली होती. आणि त्यांनीं त्यांच्या रक्षणाचें कंकण बांधलें, जबरदस्ती केली व वेळप्रसंगीं कोणी आपलें रक्षण इंग्रजांकडून करून घेण्यास तयार नसल्यास त्याच्याशीं युद्धही केलें! त्यांनीं हें मित्रकार्य हिंदुस्थानांत वास्तव्य असे तोंपर्यंत नेटानें चालविलें आणि सर्वांची शत्रूंपासून मुक्तता केली! तैनाती फौज म्हणजे कोणाच्याही तैनातीस अगर सेवेस ठेवल्या गेलेली फौज. अशा प्रकारच्या फौजेची सुरुवात वॉरन हेस्टिंग्स साहेबांनीं प्रथमतः केली. आणि तिला पुढें वेलस्ली साहेबांनीं मूर्त स्वरुप दिलें. हिंदुस्थानचे लोक बुद्धीनें आणि शरीरानेंही सर्वोत्कृष्ट आहेत. त्यांच्या इमानाची आणि स्वामीनिष्ठेची कल्पनाही अनुकूल असल्यानें, त्यांना पाश्चात्य पद्धतीवर लष्करी शिक्षण दिल्यास त्याचा अतीशय उपयोग होऊं शकेल, ही कल्पना प्रथम डुप्ले ह्याचें मनांत आली व तदनुरुप फ्रेंचांनीं आपल्या फौजा तयार केल्या, शिंदे निजाम इत्यादि सारख्यांनीं देखील फ्रेंच जनरलांना नोकरीस ठेवून आपापल्या फौजांना पाश्चात्य धर्तीवर लष्करी शिक्षण दिलें. पानपतावर भाऊ साहेबांबरोबर गेलेला इब्राहिमखान गारदी व त्याचा तोफखाना हा फ्रेंच जनरलचें हात-

खालीच तयार झाला होता. डुप्लेची कल्पना सर्वोत्कृष्ठ होती. व त्याप्रमाणें फ्रेंचांनीं थोडाबहुत उद्योगही केला, पण फ्रेंचांच्या कमनशीबानें त्यांना यश लाभलें नाहीं, आणि त्याचा फायदा इंग्रजांनीं करून घेतला. त्यांनीं कंपनीच्या रक्षणाच्या नांवाखालीं पुष्कळशी देशी फौज ठेवलेलीच होती. पुढें त्यांना देशी राजांच्या उलाढाली करणें जरूर वाटल्यामुळें ह्या फौजेची संख्याही पुष्कळ वाढविली. आणि शेवटीं शेवटीं तर ज्याच्या त्याच्या रक्षणाचा जिम्माच त्यांनीं घेतला!

वरील विवेचनावरून हें ध्यानांत येईल कीं, तैनाती फौज बहुतांश हिंदु अगर हिंदी शिपायांची बनलेली होती. त्यांत थोडे बहुत गोरे लोक असत. अधिकारी मात्र निःस्संशय गोराच असला पाहिजे असा निर्बंध होता. आम्हा हिंदु लोकांत ‘स्वामी’ च्या ठिकाणीं व्यक्तीचीच स्थापना केल्या जात असल्यामुळें, व्यक्तीच्या हिताहितापलिकडे आमच्या कल्पनेची मजल जात नव्हती. आणि त्यावेळीं तर आपल्या विलक्षण एकजिनसीपणामुळें आणि एकाच यंत्राच्या अनेक चक्राप्रमाणें काम करण्याच्या पद्धतीमुळें हिंदुस्थानांतील इंग्रज जातीस व्यक्तीचेंच स्वरुप आलेलें होतें. ज्या तऱ्हेनें इंग्रजांनीं फौज तयार केली त्या तऱ्हेनेंच कोणीही करूं शकला असता. पण कोणाच्याही कल्पक बुद्धीची धांव इथपर्यंत पोंचली नाहीं. शिकवून तयार केलेल्या ह्या अपार सेना समुद्राचे एकमेव अधिपति इंग्रजच होते. वेलस्लीच्या वेळीं जरी इंग्रजांविरुद्ध मोठें कारस्थान होण्याचें घाटत होतें तरी सामान्य लोकांच्याच नव्हे तर राजेरजवाड्यांच्याही दृष्टीला इंग्रजांचें प्रस्थ मान्य होऊं लागलें होतें. आणि बरोबरीच्या नात्यानें व्यवसायबंधू म्हणून कोणीही त्यांची

मदत मागत असत. एका राजानें आपल्या शत्रूशीं लढाई करतांना दुसऱ्या राजाच्या मदतीची याचना करावी हा प्रकार सर्वमान्य असून आज हजारों वर्षांपासून चालत आलेला आहे. व हल्लीं ज्याप्रमाणें डॉक्टर डॉक्टरास किंवा वकील वकिलास मदत करणें हें आपलें कर्तव्य समजतो, त्याप्रमाणें पूर्वीच्या काळींही एक राजा दुसऱ्या राजाची मदतीची विनंती अव्हेरीत नसे. भारतीय युद्धांत अशी मदत घेतल्या गेली होती. व गेल्या महायुद्धामध्येंही अशा तऱ्हेचे संघ उर्फ गट स्थापन झाले होते. आपली फौज मदतीस पाठवून तिचा तात्पुरता मोबदला म्हणून रोख रकम किंवा अन्य कांहीं तरी घेण्याची पद्धतही रुढ होती. परंतु 'आमची फौज तुमच्या संरक्षणास ठेवा' अशा तऱ्हेचें बोलणें स्वयंस्फूर्तीनें कधींही कोणी केलें नव्हतें. आमंत्रणाशिवायच जेवावयास जाण्याची ही तैलंग-वृत्ति स्वाभिमानास कितीही घातक असली तरी केवळ पोट भरण्या-च्याच दृष्टीनें ती अत्यंत सोईची ठरते. क्षत्रियांचा दंड हातांत असला कीं, जगतांतील सर्व शक्ति त्याच्या अनुरोधानें आणि नियंत्र-णानें फिरत असतात, हें तत्व इंग्रजांनीं ओळखलें होतें. आणि म्हणूनच प्रथमतः त्यांनीं हें बळ आपल्या ताब्यांत ठेवलें. त्याबद्दल त्यांच्या दूरदृष्टीची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. हीच दूरदृष्टी त्यांनीं १८५८ च्या आमच्या शस्त्रसंन्यासाच्या वेळींही दाखविली आहे.

वेलस्लीच्या कारकिर्दींत तैनाती फौज उत्पन्न झाल्या नंतर ज्यांच्या ज्यांच्याशीं त्यांनीं तह केले त्यांच्या त्यांच्या तहांत बहुधा पहिलें कलम ह्या तैनाती फौजेच्या स्वीकाराचें असे. बरें ही फौज

स्वीकारणें म्हणजे सामान्य गोष्ट नव्हती. कदाचित् ह्या फौजेच्या स्वीकारानें स्वरक्षणाची काळजी दूर होत असली तरी तिच्या खर्चा-बद्दलची पहिल्याहून मोठी काळजी लागून रहात असे. सारांश हा इंग्रजांच्या व्यापारी पेशास शोभेल असा किफायतशीर व्यापार होता. फौजेचे मालक व अंमलदारही इंग्रजच असत. दानाचा स्वीकार करावयाचा म्हणजे जसा वरील दक्षिणेसह करावा लागतो. तद्वतच तैनाती फौज स्वीकारावयाची म्हणजे चार दोन अटी सोबत स्वीकारावी लागत असे. त्या अटी थोडक्यांत अशाः—(१) इंग्रज सार्वभौम असून फौज स्वीकारणारे त्यांचें मांडलिक आहेत असें समजणें (२) फौजेवर हुकमत इंग्रजांची राहील व वाटेल तेव्हां ते आपली फौज परत नेऊं शकतील (३) त्या फौजेच्या खर्चाबद्दल बहुधा कांहीं लाख उत्पन्नाचा **प्रदेश** कंपनीस **कायमचा** तोडून द्यावा. (४) इंग्रजांच्या मित्रा विरुद्ध त्या फौजेचा उपयोग करूं नये व ज्याच्या स्वाधीन ही फौज आहे त्यानें इंग्रजांच्या यूरोपियन शत्रूंस मुळींच नोकरीस ठेऊं नये. (५) फौज ठेवणारानें कोणाशीही आपल्या मतानें परभारें सख्य किंवा युद्ध करूं नये. त्या बाबतींत इंग्रज सांगतील तो निकाल मान्य करण्यांत यावा. वरील अटी पाहिल्याबरोबर ही फौज स्वीकारणें म्हणजे स्वतःच आपल्या स्वातं-त्र्याचा बळी देण्यासारखें होय हें स्पष्ट सिद्ध होतें. बहुतेकांनीं ही फौज नाखुषीनें आणि सक्तीनें स्वीकारली. परंतु ज्यांनीं आपखुषीनें ह्या फौजेची मागणी केली असेही कांहीं बहाद्दर राजे हिंदुस्थानांतच होऊन गेले! पूर्वींच्या काळीं गरीब अपराध्यास शिक्षा म्हणून हत्ती बक्षिस देण्याची चाल होती असें म्हणतात. तसाच कांहींसा

प्रकार ह्या तैनाती फौजेच्याही बाबतींत आहे. ह्या फौजमुळें इंग्रजांनीं येथील राजांची तरवार हिसकावून घेऊन त्यांना पूर्णपणें हतबल केलें, आपल्या यूरोपियन शत्रूंचा आश्रय तोडला, स्वतः सार्वभौमत्वाची प्राप्ती करून घेतली, आणि साऱ्या हिंदुस्थानची मिरास आपणच भोगून सर्व राजांच्या अखत्यारी मुखत्यारीचा अधिकार आपणच उपभोगला! एखाद्या हुशार दरवेशाप्रमाणें हिंदुस्थानच्या नाकांत वेसण घालून त्यांनीं त्याला गरगर फिरविलें आणि तेंही सारें हिंदी फौजेच्याच बळावर! ही करामत त्यांनीं कशी केली व हिंदी लोकांस कसें नागविलें तें क्रमाक्रमानें पाहूं.

---

# तैनाती फौजेस मराठ्यांचा बळी !

वेलस्ली हिंदुस्थानांत १७९८ त गव्हर्नर जनरल म्हणून आला त्या वेळची परिस्थिती मोठी धामधुमीची होती. १७८९ त फ्रान्स-मध्यें राज्यक्रांति होऊन नेपोलियन बोनापार्ट ह्या प्रसिद्ध पुरुषाचा उदय झाला. नेपोलियन हा इंग्रजाचा कट्टा शत्रू आणि जगज्जेता बादशहा होता. त्यानें यूरोपांत इंग्रजांना त्रासवून सोडलें होतें. हिंदुस्थानांतही बहुजनसमाज आणि विशेषतः राजे व इतर सत्ताधारी ह्यांच्या मनांत इंग्रजासंबंधीं भयंकर तिरस्कार भरला होता. आणि ते त्यांना बाहेर घालवून देण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. इंग्रजांना बाहेर घालवून देण्याकरिता त्यांचे यूरोपियन प्रतिस्पर्धी जे फ्रेंच त्यांना जवळ करण्यावांचून देशी राजांना गत्यंतर नसे. त्या-प्रमाणें निजामानें इंग्रजाचा संबंध सुटल्यावर १४ हजार फ्रेंच सैन्य नोकरीस ठेवलें. शिंद्याच्या फ्रेंच फौजेची प्रसिद्धी फार दिवसांपासून हिंदुस्थानांत होतीच. म्हैसूरांत टिपू सुलतान * हा इंग्रजांचा फार मोठा शत्रू अतिशय प्रबळ झाला होता. त्यानें पुढाकार घेऊन हिंदुस्थानांतल्या प्रबळ सत्ताधाऱ्यांचा एक संघ निर्माण करून इंग्रजांस तोंड देण्याचा निश्चय केला. व आपल्या प्रयत्नास हटकून यश यावें म्हणून त्यानें फ्रेंच बादशहा नेपोलियन ह्यासही मदतीस

---

* वास्तविक प्रस्तुत प्रकरणीं टिपू सुलतानाची माहिती कालक्रमानुसार देणें अवश्य होतें. परंतु कथासूत्राच्या अनुरोधानें ती पुढील स्वतंत्र प्रकरणीं दिलेली आहे.

बोलावलें. इंग्लंडचा तेजोभंग करावयास त्यास हिंदुस्थानांतच झोडपून काढलें पाहिजे हें मर्म नेपोलियनला पूर्णपणें माहित होतें. व त्या रोखानें तो खुष्कीच्या मार्गानें देश जिंकीत चालला. आणि इजिप्तांत येऊन बसला असल्याचीही बातमी आली. तत्पूर्वी फ्रेंच सैन्याची एक टोळी समुद्र मार्गानें येऊन मलबार किनाऱ्यावरील मंगरूळ बंदरावर उतरून तिनें श्रीरंगपट्टणास कूच केलें होतें. कंपनीचा हिंदुस्थानांतील खर्चही अलीकडे बराच वाढला असून त्या मानानें उत्पन्न मात्र बरेंच कमी झालेलें होतें. इतकेंच नव्हे पण कंपनीवर बरेंच कर्ज झालें असल्याचेंही उघडकीस आलें होतें. हिंदुस्थानांत इंग्रजांविरुद्ध जो मोठा संघ स्थापन झाला होता त्यास मदत करण्याकरितां अफगणिस्थानचा सुलतान जमानशाह हाही हिंदुस्थानवर स्वारी करणार अशा बातम्या उठत होत्या. सारांश कार्नवालिस–शोअरच्या कारकिर्दींत इंग्रजांची प्रगति न होतां त्यांचा पक्ष दुर्बळच होत गेला. व अशा दुर्बळ स्थितींत वेलस्ली साहेबाचें आगमन झालें. त्यानें ह्या सर्व परिस्थितीस अत्यंत शहाणपणानें टक्कर दिली. नशीबही त्यास अत्यंत अनुकूल होतें ह्यांत शंका नाहीं. म्हणूनच नेपोलियन व जमानशहा ह्यांच्या स्वाऱ्यांची भिती पुढें काल्पनिकच ठरली! वेलस्लीनें हिंदुस्थानांतल्या सर्व सत्ताधाऱ्यांचें नीट निरीक्षण केलें, व प्रबळाच्या पायावर डोकें ठेवून दुर्बळाच्या डोक्यावर पाय ठेवण्याचें अत्यंत प्रभावी धोरण आरंभिलें. व प्रबळाच्या पुढें मान वांकवीत असतांही बैलाच्या नाकांतील डांसाप्रमाणें त्यांना चिमटे घेऊन उत्तरोत्तर दुर्बळ करून आपल्या ताब्यांत आणण्याचा उद्योगही चालूंच ठेवला!

अजूनही हिंदुस्थानांत मध्यवर्ती सत्ता मराठ्यांचीच होती. बारभाईंनीं सवाईमाधवराव ह्या लहानग्या पेशव्यास गादीवर बसवून राज्यकारभार चालविला होता. बारभाईचा म्होरक्या नाना फडणवीस असल्यामुळें साऱ्या पेशवाईच्यीं सूत्रें नानाच्याच हातीं होतीं. असें म्हणावयास हरकत नाहीं. पेशव्यांचे सरदार शिंदे, होळकर, भोसले इत्यादींचीही स्थिति बरी होती. पण ते इतउत्तर पेशव्यांशीं फटकून वागूं लागून स्वतःला स्वतंत्र समजूं लागलें होते. इंग्रजांच्या राज्याचा पाया तर पूर्वींच खणला गेला असून त्यांचीही गादी स्थिर झाली होती. निजामही बराच प्रबळ होता. त्यानें १४ हजार फ्रेंच सैन्य ठेवल्याचें वर सांगितलेंच आहे. इंग्रजांविरुद्ध रचण्यांत आलेलें कारस्थान सिद्धीस गेलें असतें तर फारच उत्तम झालें असतें. परंतु हिंदुस्थानचें नशीब इतकें शिकंदर नव्हतें. अंतःस्थ गृहकलह हा येथील राजांचा विशेष होता. सजातीय हिंदु हिंदु सत्ताधाऱ्यांतच जर लढाया होत असत तर विजातीय हिंदु मुसलमान सत्ताधाऱ्यांत त्या झाल्यास नवल नाहीं. निजाम हा पूर्वींपासूनच मराठ्यांचा शत्रू होता. मराठ्यांनींही त्याला अनेकवार झोडपून काढलें होतें. पण त्याचा पुरा निःपात केला नाहीं. त्यामुळें तो शेवटपर्यंत संधी सांपडतांच मराठ्यांना त्रास देऊं लागला. निजामाकडे चौथाई व सरदेशमुखीची पुष्कळ बाकी थकल्यामुळें नानांनीं ह्याची मागणी केली पण निजामानें बाकी न पाठवतां उर्मट उत्तर दिलें. ह्या अपमानाचा सूड घेण्याकरितां नानांनीं निजामावर चाल केली. व खर्डा येथें उभय सैन्यांच्या गांठी पडून निजामाचा भयंकर पराभव झाला ( ४–३–१७९५ ). ह्या लढाईचे वेळेस सर्व मराठे सरदार

एक झाले होते. व निजामाचा पक्ष अगदींच लंगडा होता. ही परिस्थिति जाणूनच फ्रेंच सैन्य दूर करून आपली मदत घेण्याविषयीं इंग्रजांनीं निजामास सांगितलें होतें. निजाम शेवटपर्यंत इंग्रजांच्या मदतीच्या आशेवर होता. पण इंग्रजांनीं त्यास मदत न करतां फशीं पाडलें! मराठ्यांना ह्या लढाईपासून फार फायदा झाला. त्यांना ३७ लक्षांचा मुलूख मिळून त्यांचा दराराही खूप बसला. अशा तऱ्हेनें मराठ्यांचा उत्कर्ष होत असतां इंग्रजांच्या पोटांत फार दुखत होतें. व त्यांनीं मराठे शाहीचें गाडें उलटून टाकावयाचा आटोकाट प्रयत्न केला. मागे राघोबादादाचें वेळीं त्यांनीं आपलें पिल्लूं घुसविलें. पण नानाफडणविसाचें धूर्तपणानें सर्व प्रसंग टळला. व अजूनही नानाफडणविसाच्या धूर्तपणामुळेंच इंग्रज चुरमुरे खात बसले होते! राघोबा मरण पावल्यानंतर त्याचा मुलगा दुसरा हा उरलेला होता. परंतु सवाई माधवराव गादीवर असल्यामुळें त्याला पेशवाई मिळणें शक्य नव्हतें. बाजीराव आपल्या बापाप्रमाणेंच कलिपुरुष होता ×. राघोबाप्रमाणेंच त्यालाही पेशवाईची इच्छा होती. नानाफडणविसाचा तो आंतून द्वेष करीत असे. त्यानें नानाविरुद्ध सवाईमाधवरावास फितविण्याचाही अतीशय प्रयत्न केला. अशा ढंगामुळें नानाफडणविसानें बाजीरावास अटकेंत ठेवलें होतें. पेशव्यांच्या घराण्यांत सत्ता नसलेला पण सत्तेकरितां हपापलेला असा

---

× दुसऱ्या बाजीरावा संबंधींचें हें मत सार्वत्रिक आहे. परंतु कित्येक इतिहासकारांनीं बाजीरावाच्या स्वभावाची व कर्तृत्वाची दुसरी बाजू रंगविली असून त्याचें निर्दोषित्व सिद्ध केलें आहे. उदा० वि. ल. भावेकृत मराठी दफ्तर रुमाल दुसरा, प्रस्तावना वाचा.

त्याचें माथीं मारला आणि त्याबद्दल २४ लक्ष रुपयांची कबूली करून घेऊन तैनाती फौजेच्या मागे सांगितलेल्या सर्व अटी त्याच्यावर लागूं केल्या ! अशा रीतीनें निजामाचे दरबारांतून फ्रेंचाचें पाऊल अजिबात उखडलें. आणि तो सर्वस्वी इंग्रजांच्या अंकित झाला ! ! आपल्या कर्तबगारांस असा पहिलाच शुभशकुन. झालेला पाहून वेलस्लीस आनंद झाला. व निजामाप्रमाणें पेशवेही आपल्या तडाख्यांत येईल तर फार बरें असें त्यास वाटलें. बाजीराव उतावळ्या होताच ! स्वतः दगदग करण्यापेक्षां इंग्रजास पैसे देऊन व त्यांची फोज भाड्यानें घेऊन, स्वतःस निश्चिंत करून घेण्याची कल्पना त्यास आवडली. कदाचित् परिस्थितीनें जेर झाल्यामुळें-ही त्यानें हा विचार केला असेल ! नाना आणि दौलतराव शिंदे ह्यांनीं ह्या भलत्या भानगडींत न पडण्याबद्दल बाजीरावास दटावलें नसतें तर खात्रीनें त्यानें इंग्रजांचा 'दोन पैशाचा हत्ती' आपल्या घरांत आतांच घेतला असतां ! पण तसें न करितां टिपू विरुद्ध इंग्रजांस फक्त मदत देण्याचें त्यानें कबूल केलें. पण पुढें तीही दिली नाहीं !

ह्या वेळीं मराठ्यांच्या दुर्दैवानें आणि इंग्रजांच्या सुदैवानें एक गोष्ट घडून आली. मराठ्यांचा एकमात्र मुत्सद्दी 'खूप शर्तीनें राज्य राखणारा' आणि 'मनसुबीची तलवार' करणारा नाना फडणवीस हा अठराशें सालीं मरण पावला ! त्याच्या बरोबर मराठेशाहींतील शहाणपण नष्ट झालें ! नानापूर्वीं मराठेशाहींतील सारेच कर्ते पुरुष व मुत्सद्दी प्रायः मृत्युमुखीं पडले होते. आतां मराठेशाही उघडी पडली. बाजीरावास वडिलकीच्या नात्यानें शहाणपणाचा

उपदेश करणाराही कोणी राहिला नाहीं ! त्यामुळें बाजीरावाच्या स्वच्छंद वर्तनास धरबंद राहिला नाहीं. मराठेशाहीवरील ह्या आपत्ती पाहून वेलस्ली साहेबांस व इतर इंग्रजांस आनंदाच्या उकळ्या फुटत आणि ते स्वयशाबद्दल देवाची प्रार्थना करीत ! बाजीरावास आपली जबाबदारी ओळखतां येत नव्हती. वास्तविक मराठेशाहीच्या दौलतीचा वडिलकीचा मान त्याचा, पण त्यानें ह्यावेळीं आपलें जुनें वैर उकरून काढून विठोजी होळकरास हत्तीच्या पायांशीं देऊन ठार केलें ! त्यामुळें होळकर व पेशवे ह्यांच्यांत तंटा माजला. धनि—नोकरांत उघडपणें तंटा माजण्याचा करुणाजनक देखावा ह्यापूर्वी महाराष्ट्रांत दिसला नव्हता. विठोबाजीच्या खुनाचा सूड घेण्याचा निश्चय यशवंतराव होळकरानें केला व तो बाजीरावावर चालून आला. बाजीरावास सारी हिंमत शिंद्यांची होती. आणि त्याच्या तर्फे शिंदे लढलाही. परंतु होळकराच्या ह्या लढाईत शिंद्यांचा पराभव होऊन बाजीराव सात हजार सैन्य घेऊन सिंहगडावर पळून गेला. इंग्रजांचें ठाणें पुण्यापासून जवळच होतें. परंतु त्यांना आतां उघड-पणें कोणत्याच पक्षाकडून मागणी नसल्यामुळें आमंत्रणाची वाट पहात हे भिक्षुक स्तब्ध बसले होते. आपापसांत लढत असतां एक होऊन ह्या त्रयस्त शत्रूस रगडून टाकण्याची कल्पना मराठ्यांना आली नाहीं.!

सिंहगडाहून कर्नल क्लोज ह्याचे मध्यस्तीनें बाजीरावानें इंग्रजाकडे बोलणें चालविलें ! इंग्रज तर ह्या गोष्टीस टपलेलेच होते. यशवंतराव होळकर यद्यपि पुण्यास आलेला होता तरी तेथें आपली गादी स्थापण्याचा त्याचा विचार नव्हता उलट त्यानें बाजीरावास

हाच एक पुरुष उरलेला होता. तेव्हां अर्काटच्या महंमदअली प्रमाणें सहाजिकपणेंच इंग्रजांनीं त्यास हातांशीं धरलें व आपला डाव टाकावयास सुरुवात केली ! संकटें येतात तीं सगळीकडून एकदम येतात. खर्ड्यांच्या लढाईपासून सवाई माधवरावाची प्रकृति बिघडली व शेवटीं १७९५ त अक्टोबरच्या १० तारखेस माडीवरून खालीं चौकांत कारंजावर पडून त्याचा अंत झाला ! ह्यामुळें मराठेशाहीचें कंबरडेंच मोडल्याप्रमाणेंच झालें. नानानें मोठ्या हिंमतीनें आणि आशेनें वाढविलेल्या पेशव्याचा असा अंत झालेला पाहून मराठे-शाहीचाही अंत समीप आला असें त्यास वाटल्यास आश्चर्य नाहीं. सवाई माधवरावानंतर गादीवर कोणास बसवावें हा प्रश्न मराठ्यांच्या समोर उभा राहिला बाजीराव नानास आवडत नव्हता. तेव्हां तो पेशवाईचें गादीवर बसल्यास साऱ्या राज्याचा सत्यानाश करील ही सकारण भिती नानांनीं मुत्सद्दी मंडळास बोलून दाखविली व सवाई माधवरावांच्या विधवा बायकोच्या मांडीवर दत्तक घेऊन कारभार चालवावा अशी मसलत त्यानें सुचविली. पण पहिल्या बाजीरावाचें कुळांतील पुरुष शिल्लक असतां दत्तकाची उठाठेव करणें योग्य दिसत नव्हतें. ह्याच सुमारास महादजी शिंदे वारले त्यामुळें मराठे मंडळाचें व त्यांच्या उत्तरेकडील राजकारणाचें अत्यंत नुकसान झालें. महादजीचा दत्तकपुत्र दौलतराव शिंदे होता. नानाची ही मसलत ऐकून बाजीरावानें दौलतरावास हातांशीं धरलें. व त्याच्या मदतीनें पेशवाई मिळविण्याचा प्रयत्न केला ! शिंद्याचा जोर सामान्य नव्हता. तेव्हां बाजीराव निश्चितपणें एवीतेवीं पेशवा होणारच असें असतां आपणच तें काम कां न करा असें वाटून नानाफडणविसानें

बाजीरावास पेशवा केलें ! इंग्रजांना ही बरीच सुसंधी प्राप्त झाली होती. परंतु अजून शांततेच्या शपथेनें बांधून घेतलेलाच गव्हर्नर जनरल अधिकारावर असल्यामुळें बाजीरावाला विशेष मदत झाली नाहीं. बाजीराव पेशवा झाल्यामुळें नानावरील सूड उगविण्याची ह्याला राजरोस संधी सांपडली. व त्यानें दौलतराव शिंद्याशीं 'नानास कैद करशील तर दोन कोट रुपये देईन' असा करार केला. त्याप्रमाणें शिंद्यानें नानास कैद केलें व ठरावाप्रमाणें मोबदला मागूं लागला. परंतु ह्या कंगाल पेशव्याजवळ शिल्लक रकम कोठची? त्यानें एखाद्या मूर्ख आणि बेजबाबदार अधिकाऱ्याप्रमाणें शिंद्यास पुणें शहर लुटून आपली भरपाई करण्यास सांगितलें. व शिंद्यानेंही यथेच्छ पुणें लुटलें. ज्यांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वतःवर आहे त्यांची उलट लूट करविण्याचें बाजीरावाचें हें आत्मघातकी वर्तन मागील ( पृ० ५० ) असोफउद्दौल्यानें पैशाकरिता आईकडे बोट दाखविण्याच्या योग्यतेचें होतें. पुढें शिंद्यांनीं नानास १७९९ त सोडून दिलें.

१७९८ त येतांच वेलस्ली साहेबांनीं एकदमच आपल्या चढाईच्या धोरणास सुरुवात केली. व त्यांच्या तैनाती फौजेस पहिला बळी बिचारा निजाम पडला ! मराठ्यांचा सासुरवास निजामास फार होता. व त्यांच्या चौथाईच्या खंडणीपासून आपलें रक्षण करणारा त्यास कोणी तरी हवा होता. फ्रेंच जातीनें व तत्परतेनें मदत करीत नसत. इंग्रज ती संधी पहातच असल्यामुळें वेलस्लीनें निजामाशीं १७९८ त तह केला. व त्यान्वयें त्यांचीं कवायती पलटणें मोडून टाकून इंग्रजांचें ६००० सैन्य व तोफखाना

पाचारण केलें. पण बाजीरावास त्याच्या वर्तनाची भिती वाटून तो इंग्रजांच्या मदतीनें प्रथम मुंबईस जाऊन तेथून वसईस गेला. कर्नल क्लोजही त्यांच्याबरोबर वसईस गेला. होळकरानें कर्नल क्लोजला पुण्यासच रहाण्याविषयीं विनविलें, पण त्यानें तें ऐकलें नाहीं. मराठेमंडळाचा मानीव अधिपति बाजीरावच असल्यामुळें इंग्रजांनीं इतर किरकोळांच्याकडे न जातां बाजीरावासच हातांशीं धरलें. सुमारें २ वर्षांपूर्वीं अशीच स्थिती राघोबाची झाली होती. पण त्यावेळीं इंग्रजांचे प्रयत्न पुष्कळच फसले. तशी फसगत आतां होऊं नये अशी इंग्रजांची इच्छा होती. बाजीराव आतां अनन्य-गतिक असल्यामुळें होय नाहीं करीत त्यानें इंग्रजांशीं वसई येथें ३१ डिसेंबर १८०२ रोजीं तह ठरविला. इंग्रजांचा तह म्हटला कीं, गळ्यांत घोरपड अडकावून घेणेंच होय हें त्याला समजत नव्हतें असें म्हणतां येत नाहीं. पण विपन्नस्थितिप्राप्त मनुष्य काय करणार नाहीं ? हा वसईचा तह इतिहासांत फार प्रख्यात असून बाजीरावाचें व एकंदर पेशवाईचें स्वातंत्र्य ह्याच वेळीं नष्ट झालें असें पुष्कळांचें मत आहे त्यांतील कलमें :—'(१) इंग्रजांनीं आपली दहा हजार फौज बाजीरावाच्या संरक्षणाकरितां कायमची ठेवून द्यावी व तिच्या खर्चासाठीं ३६ लक्षांचा आपला मुलूख त्यानें इंग्रजांस तोडून द्यावा. (२) इंग्रजांच्या यूरोपियन शत्रूंस बाजी-रावानें आपल्या मुलुखांत आश्रय देऊं नये. (३) इतर राजे-रजवाड्यांशीं बाजीरावाचा तंटा उपस्थित झाला असतां, तो इंग्रजांनीं तोडावा. (४) इंग्रजांचें परवानगीशिवाय त्यानें कोणाशीं युद्ध

किंवा तह करूं नये '. + हा तह झाल्यानंतर मोठ्या इतमामानं इंग्रजांनीं आपली फौज देऊन बाजीरावास पुण्यास आणून पेशवाईच्या गादीवर कायम केलें. पण आतां पेशवेपद बाजीरावास असलें काय आणि नसलें काय ? जेथें सत्ता नाहीं तेथें नांवाचा तरी अभिमान काय धरावयाचा ? पुण्याच्या गादीवर मूर्ति बाजीरावाची पण सत्ता खरोखर इंग्रजांची अशी स्थिती होती. बाजीरावानें केलेला हा तह त्याचे सरदार जे शिंदे, होळकर, भोसले ह्यांना आवडला नाहीं. ÷ अशा तऱ्हेचा तह न करण्यासंबंधीं होळकरानें मागेंच बाजीरावास बजावलें होतें. हा तह अर्थातच शिंदे होळकरांना बंधनकारक असण्याचें कांहीं कारण नव्हतें. व त्याप्रमाणें त्यांनीं बोलूनही दाखविलें. वास्तविक ही सरदार मंडळी एखाद्या प्रचंड वटवृक्षाच्या अनेक बुंध्यांप्रमाणें आतां स्वतंत्र राजासारखी होऊन आपल्या मुखत्यारीनें स्वतंत्र कारभार करीत. तसें करतांना

---

+ सरदेसाई–मराठी रियासत पृ. १२६.

÷ आर्थर वेलस्लीनें १८०६ त 'Memorandum on Marquiss Wellesley's Government of India' ह्या सदराखालीं वेलस्लीच्या राज्याचें लांबलचक वर्णन लिहिलें आहे. त्यांत वसईच्या तहासंबंधीं तो खालील गर्वोक्ति लिहितो :—

'........I conclude that the treaty of Bassein was a wise, *just* and politic measure; that none of the chiefs had any right to interfere in it or question its stipulations !'

—Selection from Wellesley's Despatches
Edited by–Sidney J. Owen.
P. cviii.

ते बाजीरावाची सल्ला मुळींच घेत नसत पण इंग्रजांनीं मात्र येथें आपलें तर्कट लढविलें. कोणत्याही गोष्टीचा स्वतःस अनुकूल असाच अर्थ लावण्याची इंग्रजी मुत्सद्यांची पद्धत होती. मागें नबाबाच्या बाबतींत आम्ही जी टीप (पृ० ३६, ३७) दिली आहे, तीच बरोबर येथेंही लागूं पडते ! वेलस्ली साहेबांनीं शिंदे होळकरांस कळविलें कीं, 'पेशवे तुमचे मालक आहेत. वडिलकीचा आणि अखत्यारीचा मान त्यांच्याकडे आहे, अर्थात मराठी राज्याचे प्रतिनिधी ह्या नात्यानें त्यांनीं जें जें कांहीं ठरविलें तें तें तमाम मराठी राज्यास म्हणून तुम्हासही बंधनकारक असलेंच पाहिजे. नाहीं म्हणून चालणार नाहीं !' वेलस्ली साहेबाचें हें तर्कट मान्य केलें असतें तर आपोआपच मराठेशाहीच्या सर्व शाखा ताब्यांत येणार होत्या. परंतु तें तत्वज्ञान सरदारास न पटणें स्वाभाविक होतें. पेशवे वास्तविक मराठी राज्याचे चालक होत मालक नव्हे ! तेव्हां राज्याचें दान करण्याचा त्यास कांहीं अधिकार नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, हा तह आमच्या संमतीवाचून करण्यांत आला आहे, असें सरदारांचें म्हणणें होतें. हें सरदारांचें म्हणणें निःसंशय खरें होतें. आतां इंग्रजांनीं ज्या तऱ्हेचा युक्तिवाद केला होता त्याच्या विरुद्ध वर्तणूक त्यांनींच तत्पूर्वीं केली ! होळकरांच्या विरुद्ध पेशव्यांस मदत करणें म्हणजे उघड उघड होळकरांना स्वतंत्र मान्यता देणेंच नव्हतें काय ? इतकें कशाला ? वसईच्या तहान्वयेंच शिंदे-होळकर-भोसले इत्यादिकांशीं इंग्रजांचें संमतिशिवाय व्यवहार करण्याची बाजीरावास परवानगी नव्हती ! म्हणजे वरील सरदार बाजीरावापासून स्वतंत्र आहेत असाच त्याचा

अर्थ नव्हता काय ? * पण जेथें खाजवून खरूज काढण्याचीच प्रवृत्ति तेथें हा युक्तिवाद काय कामाचा ? 'आमचें म्हणणें ज्या अर्थी तुम्हांस पटत नाहीं त्या अर्थी तुमच्याशीं युद्ध करणें आम्हांस भाग आहे' असें म्हणून इंग्रजांनीं शिंदे-होळकर-भोसल्यांशीं लढण्याची तयारी केली.

शिंदे आणि भोसले तर एक झाले व होळकरही त्यांना मिळावयाचा. परंतु त्याला त्यावेळीं काय वाटलें कोण जाणें, तो तटस्थ राहिला ! इंग्रजांना ह्या एकीकरणाची सध्या भिती वाटण्यासारखी नव्हती त्यांना जर एखाद्या यूरोपियन राष्ट्राची मदत मिळेल तर किंवा ते स्वतःच संघ निर्माण करतील तर आपल्याला भिती आहे असें वेलस्लीस वाटत होतें. ३० मे १८०३ रोजीं वेलस्ली साहेबांनीं पुण्याचा रेसिडेंट कर्नल क्लोज ह्यांस जो खलिता लिहिला त्यांत त्यानें हीच भिती प्रगट केली होती. व त्याचें निवारण करण्याकरितां कशा तऱ्हेचें छद्म वर्तन करावयाचें हेंही क्लोज साहेबांस नीट पढवून ठेवलें होतें. त्या खलित्यानंतर तीनच दिवसांनीं शिंद्याच्या दरबारचा

---

* गव्हर्नर जनरलचा भाऊ आर्थर वेलस्ली ह्यानें आपल्या लिखाणांतही त्यांना स्वतंत्र ठरविलें आहे—

They make war and peace in their own names against whom they please, when they please, and as they please; and never use the Peshwa's name, or refer to its authority, excepting as a last subterfuge in the discussions which may attend their negotiations.

W. Despatches. P. civ.

रेसिडेंट कर्नल कालिन्स ह्यासही वेलस्ली साहेबांनीं एक खलिता पाठविला त्यांतही वरील तऱ्हेचाच आशय होता. × ही दोन्ही पत्रें मोठी मासलेवाईक आणि वेलस्ली साहेबांचें अंतःकरण उघडें करणारीं आहेत. अस्तु. शिंदे भोसल्यांचा मित्रसंघ मोडून काढण्याकरितां एका ठिकाणींच लढाई करण्यापेक्षां प्रत्येकाच्या मुलखांत स्वतंत्रपणें दंगा केलेला बरा, असें वेलस्लीनें ठरविलें त्याप्रमाणें जनरल लेकचे हाताखालीं उत्तरेकडे सैन्य पाठवून दक्षिणेकडील सैन्य वेलस्लीनें आपला भाऊ जनरल आर्थर वेलस्ली किंवा पुढें झालेला डयूक ऑफ वेलिंगटन ह्याचें स्वाधीन केलें. मराठ्यांचेंही जोड सैन्य सुमारें १ लक्ष जमलें होतें. १८०३ च्या आगस्ट मध्यें जनरल वेलस्लीनें अहमदनगरचा किल्ला घेतला. व भडोच घेतल्यावर आसई येथें उभय सैन्यांच्या गांठीं पडून मोठें युद्ध झालें. त्यांत शिंद्यांचा पराभव झाला. इंग्रजांच्या दुसऱ्या टोळीनें अशीरगड व बऱ्हाणपूर, भोसल्याचें कटक इत्यादि शहरें घेतलीं. आणि दिल्ली येथेंही शिंद्यांच्या लोकांचा पराभव करून ते इतिहास प्रसिद्ध शहर आणि तेथील वृद्ध बादशाहा शहाअलम ह्या दोघांसही त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलें. पुढें लासवाडी येथें लेकनें शिंद्यांचा आणि आडगांव येथें वेलस्लीनें शिंदे भोसल्यांच्या संयुक्त फौजांचा

---

× ह्या खलित्यांतील वसईच्या तहासंबंधीं शिंद्यास समजावून सांगण्याचें पुढील वाक्य पहा :—

'वसईच्या तहाचा हेतु कोणाचेंच स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा नसून सर्वांचा **न्याय्य** हक्क राखण्याचा आहे; कोणाचें कारभारांत मन घालण्याचा नाहीं'!

—मराठे व इंग्रज पृ. ९८ उत्तरभाग

पराभव केला. प्रस्तुत युद्ध सुमारें चार महिने चाललें होतें. इंग्रजांनीं ह्या युद्धांत एकाच ठिकाणीं तोंड देण्याचें धोरण न ठेवता जेथें जेथें उपर्युक्त मराठे सरदारांचीं ठाणीं असतील तेथें तेथें हल्ला करून तीं हस्तगत करून घेतलीं. दिल्ली हस्तगत करण्यामध्यें स्वतःला सार्वभौमत्वाचा मान मिळावा हीच इंग्रजांची एक मात्र इच्छा होती. शिंदे आणि भोसले दोघेही अगतिक झालेले होते. व त्यांना आंता तह करण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. परंतु शिंदे भोसले जरी एक झाले असले तरी वेलस्लीनें मात्र चलाखी करून त्या दोघांशीं स्वतंत्रपणें तह केले. देवगांव येथें इंग्रज व भोसले ह्यांचा तह झाला. त्यांतील कलमें :—'(१) वर्धा नदीच्या पश्चिमेकडील वऱ्हाड प्रांत व कटक प्रांत हे भोसल्यानें इंग्रजांस द्यावे. (२) निजामावरील आपले हक्क भोसल्यानें सोडून द्यावे (२) इतर संस्थानिकांशीं भोसल्याचा तंटा झाल्यास इंग्रज करतील तो निकाल भोसल्यानें मान्य करावा. आणि (४) इंग्रजांचा रेसिडेंट नागपुरास रहावा.' (म. रि.) देवगांव येथें शिंद्याशीं इंग्रजांचा तह झाला त्यांतील कलमें जवळ जवळ वरीलप्रमाणेंच आहेत. त्या तहान्वयें इंग्रजांना शिंद्यांकडून गंगा व यमुना ह्यांच्या मधील प्रदेश मिळाला व शिंद्यानें दिल्लीचा बादशहा, पेशवा, निजाम आणि गायकवाड ह्या सर्वांशीं आपला संबंध सोडावा असें ठरलें. असें ठरविण्यांत विशेष फाटाफूट करतां येऊन तहाची अंमलबजावणी करण्यास सोपें जावे हा वेलस्लीचा हेतू होताच !

इतकें झाल्यानंतर स्वस्थ बसलेल्या होळकराच्या मनांत आलें कीं, आपणही इंग्रजांशीं सामना करून त्यांना पिटाळून लावण्याचा

प्रयत्न करून पहावा. पण हे वराती पाठीमागचें घोडें कांहीं कामाचें नव्हतें. होळकर जर मित्रसंघांत सामील झाला असता तर कदाचित इंग्रजांचा पराभव झाला असता. होळकरानें भरतपूरच्या जाट राजास आपल्याकडे वळविलें. प्रथम यशवंतराव होळकरानें मान्सनच्या ७००० फौजेचा चांगलाच पराभव केला. परंतु दिल्ली मुक्कामीं यशवंतरावाचा पराभव होऊन त्यास पळावें लागलें. वेलस्लीनें भरतपूरच्या राजाशींही तह केला (१८०५). पुढें यशवंतरावासही तह करावा लागला. व त्यानंतर ह्या अपमानाच्या धक्क्यानें वेड लागून तो मरण पावला.

ह्या एकंदर युद्धामध्यें मराठ्यांची पाळेमुळें बरींच खिळखिळीं झालीं. वेलस्लीनें जे जे म्हणून तह केले त्या सर्वांचें स्वरूप जवळ जवळ सारखेंच होतें. वसईच्या तहापासूनच मराठे मंडळाचें सार्वभौमत्व मावळून तें इंग्रजांकडे यावयास लागलें. प्रस्तुत प्रकरणीं वेलस्ली साहेबांनीं केलेला सर्व गुप्त आणि उघड पत्रव्यवहार आणि मसलती वाचण्यालायक आहेत. वस्तुतः संधी म्हणजे मैत्री ! पण वेलस्ली साहेबांनीं केलेल्या संधीचें लक्षण कोणत्या प्रकारच्या मित्र शास्त्रांत मोडतें, किंबहुना त्याला 'संधी' किंवा 'तह' हें नांव तरी शोभतें काय ह्याचा विचार सूज्ञ वाचकांनीं करावा ! वेलस्ली साहेबाचें हें जयिष्णु धोरण विलायतेस आवडलें नाहीं असें म्हणतात, पण म्हणून त्यांनीं कांहीं हातीं आलेलें मराठी राज्य टाकून दिलें नाहीं ! बिचाऱ्या नेपोलियनचा यूरोपांत पराभव झाल्यानंतर फ्रेंचांची छबी मावळली. त्यांना हिंदुस्थानांतूनही हुसकून लावण्या-

करितां वेलस्लीनें शिंद्यावर शस्त्र उचललें ! इंग्रजांनीं आज पर्यंत तह करूनही मोडले, परंतु वरील प्रकारचे तह झाल्यानंतर आमच्या देशी राजांना ते मोडण्याची इच्छा किंवा हिंमत झाली नाहीं. वेलस्लीनें आपल्या सात वर्षांच्या आमदानींत एकट्या मराठेशाहीचींच हाडें खिळखिळीं केलीं असें नसून इतरही सत्ताधाऱ्यांस धुळीस मिळविलें तें पुढें पाहूं.

---

# हैदर, टिपू व इंग्रज

हिंदुस्थानच्या इतिहासांत धूमकेतू प्रमाणें क्षणिक पण अत्यंत ठळक आणि प्रबळपणें जीं राजघराणीं चमकलीं त्यांतच हैदर आणि टिपू ह्यांचा समावेश होतो. थोड्याशाच आयुष्यांत ह्यांनीं इंग्रजांस सळो कीं, पळो करून सोडलें होतें. हैदरअली हा मूळचा अगदी सामान्य माणूस होता. ह्याचा बाप फत्तेमहंमद हा पंजाबांत मुसलमानांचा एक लहानसा कारभारी होता. तेव्हांच १७२२ त हैदराचा जन्म झाला. महत्वाकांक्षा, धाडस, बुद्धि आणि ह्या सर्वांस काभास लावणारी गरिबी इत्यादि बहुमोल्य गुणांनीं तो युक्त असल्यामुळें आपलें नशीब काढण्याकरितां स्वतःच्या हाताखालीं असणाऱ्या दोनशें शिपायांनिशीं तो भटकत दक्षिणेंत आला. दक्षिणेंतील प्रदेशाची सत्ता अनेक हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती सत्ताधाऱ्यांत विभागली गेली होती. १७६० चे सुमारास म्हैसुरास नंदराज नांवाचा एक हिंदु राजा होऊन गेला. हैदरअली नंदराजापाशीं नौकरीस राहिला. व त्यानें तेथें कवायती फौज तयार करण्यास सुरुवात केली. त्या फौजेमुळें म्हैसूरच्या राजास पुष्कळ फायदा झाल्यामुळें त्यानें हैदरास स्वतःचा सेनापती नेमलें. हैदर हा जातीचा मुसलमान होता. त्यांनही जाणूनबुजून मोठे होण्याच्याच उद्देशानें दक्षिणेंत आलेला ! तेव्हांचा काळही धामधुमीचा होता. पानपतच्या लढाईची गडगड चालू असल्यामुळें दक्षिणच्या हिंदु द्वेष्ट्यांनीं उचल केली आणि त्याच सुमारास हैदरअलीनें

वेळचें युद्ध पुढें चालविलें. टिपूच्या विनंतीवरून फ्रेंच फौज बुसीचे नेतृत्वाखालीं त्याचें मदतीस आली होती. परंतु इंग्रज फ्रेंचांचा यूरोपांत तह झाल्याची बातमी आल्यामुळें तें परत गेलें. वस्तुतः ही लढाई इंग्रज व फ्रेंच ह्यांच्यांत प्रत्यक्ष होणारी नव्हती ! युरोपांत अशा प्रकारचा तह झाल्यास इंग्रज लोक फ्रेंचांशीं अप्रत्यक्ष रीतीनें कोणाला तरी मध्यें घेऊन लढत. पण तसें ह्यावेळीं फ्रेंचांनीं केलें नाहीं. फ्रेंच परत गेले तरी टिपूनें बेदनूर मंगरूळ वगैरे ठिकाणें घेऊन कित्येक इंग्रजांस कैदेंत टाकलें. अखेर इंग्रजांस त्याच्याशीं तह करावा लागला !

ह्या पुढील युद्ध कार्नवालिसच्या कारकिर्दींत १७९० ते ९२ पर्यंत चाललें होतें. मलबारांत त्रावणकोर आणि कोचीन हे दोन प्रांत आहेत. पैकीं त्रावणकोरचें राज्य एका हिंदू राजाच्या ताब्यांत होतें. कोचीन मात्र हैदरानें १७७६ त जिंकून तेथील राजास आपला मांडलिक बनविलें होतें. कोचीन प्रमाणेंच त्रावणकोरही आपल्या ताब्यांत यावें असें त्यास वाटलें. परंतु हैदराचें हें भावी बळ पाहून मागल्या युद्धाचे वेळेस शिताफी करून त्रावणकोरच्या राज्यास इंग्रजांनीं आपला मित्र करून घेतला. तेव्हांपासून टिपू अतिशय नाराज झाला. पुढें कोचीन आणि त्रावणकोर ह्या दोन लहान राज्यांत करंगनूर आणि आयरकोट ह्या ठिकाणा. संबंधानें कांहीं तंटा उपस्थित झाला. तेव्हां आपल्या मांडलिकांच्या रक्षणाकरितां टिपू त्रावणकोरावर चालून गेला. तेव्हा इंग्रजांनाही सुसंधी प्राप्त झाल्याप्रमाणें होऊन त्यानीं मित्र कार्य म्हणून त्रावण-

कोरचा पक्ष धरला. व अशा रितीनें आडपडदा धरून दोघेही लढावयास सिद्ध झाले! आपण आपल्या एकट्या फौजेनिशीं जय मिळवूंच अशी कार्नवालीस साहेबांस खात्री नसल्यामुळें त्यानीं निजाम आणि मराठे ह्यांना आपलया बाजूस वळविलें आणि होणारा फायदा तिघांनीं सारखा वाटून घ्यावा असें ठरलें. मराठ्यांच्या तर्फे परशुराम भाऊ पटवर्धन व हरिपंत फडके हे लढले व इंग्रजांतर्फे मेडोज व खुद्द कार्नवालिस हे लढाईस आले. निजामाचीही दहा हजार फौज आली. परस्पराचे जयपराजय होत होत अखेरीस मराठ्यांचे मर्दुमकीनें त्रिवर्गास जय मिळाला आणि त्यांचा टिपूशीं तह ठरला. त्यान्वयें टिपूनें आपलें अर्धें राज्य व तीन कोट रुपये त्रिवर्गास देऊन आपले दोन मुलगेही इंग्रजांकडे ओलीस म्हणून मोठ्या नाखुषीनें दिले.

वेलस्लीच्या कारकीर्दी पूर्वीं झालेली वरील युद्धें होत. ह्यांत एकंदरींत टिपूचीच चढती कमान दिसून येते. ह्यानंतर सुमारें ८।९ वर्षें टिपूला इंग्रजांशीं उघड लढण्याचा प्रसंग आला नाहीं. तरी पण आंतून टिपू इंग्रजांना व इतर देशी राज्यकर्त्यांनाही हुसकून लावण्याचा प्रयत्न करीत होता. टिपूच्या राज्यास लागूनच इंग्रजांची हद्द असून आपापलें राज्य वाढविण्याची इच्छा दोघांनाही होती. त्यामुळें अर्थातच त्या दोघांची टक्कर होणें अपरिहार्य होतें. मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें वेलस्लीचें वेळीं टिपूनें फ्रेंचांशीं कारस्थान चालविलें होतें. त्याचवेळीं त्याचा इंग्रजांशींही पत्रव्यवहार होतच होता. आपापसांत ज्या कांहीं लहान सहान कुरबुरी होत त्याचा निकाल लावण्याकरितां टिपूकडे एक वकील पाठविण्याचें इंग्रजांनीं

बोलणें लावलें होतें. परंतु टिपूनेंही गोड शब्दांतच त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या ! ता. २ एप्रिल १७९७ रोजीं टिपूनें फ्रान्समध्यें जें गुप्त पत्र पाठविलें त्याच्यांत त्याचे खरे खरे विचार लिहिल्या गेले आहेत. त्यानें त्या पत्रांत इंग्रजांना अतोनात शिव्या दिल्या असून आपण मदत केल्यास मनुष्यजातीचे शत्रू असणाऱ्या इंग्रजांस आपण हिंदुस्थानांतून केव्हांच नाहींसें करून टाकूं अशी आशा प्रदर्शित केली आहे. इतकेंच नव्हे पण मदत किती द्यावयाची, त्याच्याबद्दल मोबदल्याच्या अटी काय ठरवावयाच्या ह्याची ही त्यानें शहानिशा केली आहे. सुदैवानें मुंबई आणि गोवा हीं दोन्हीं ठिकाणें हातीं आल्यास टिपू मुंबई फ्रेंचांस देऊन गोवा स्वतःकडे ठेवणार होता ! सध्या जरी मराठे, निझाम इत्यादि टिपूचे मित्र होते तरी पुढें मागें त्यांनीं कांहीं वरचढपणा दाखविल्यास त्यांनाही हुसकून देण्याची टिपूची इच्छा असल्याचें ह्या पत्रांत व्यक्त झालेलें आहे. अशाच प्रकारचा पत्रव्यवहार अफगाणिस्थानच्या राजाशींही झालेला होता. परंतु त्यांत इंग्रजाविरुद्धच्या ह्या युद्धास जिहादचें म्हणजे धर्मयुद्धाचें स्वरुप असल्याचें टिपूनें लिहिलें आहे.+

---

+ त्या वेळीं परक्या मसलमानी राष्ट्रांतील लोकांचीही इंग्रजासंबंधीं काय कल्पना होती, हे २० सप्टेंबर १७९८ रोजीं सुलतान सलीमनें कान्स्टान्टिनोपलहून टिपूस लिहिलेल्या पत्रांत खालील तऱ्हेनें व्यक्त झालें होतें :—

'In a word, they are a nation whose deceitful intrigues and perfidious persuits know no bounds. They are intent on nothing, but on depriving people of their lives and properties, and on persecuting religion, whereever their arms can reach.' W. Despatches. P. 73

मागील युद्धांत यद्यपि निजाम हा टिपू विरुद्ध होता तरी आतां त्याची मदत टिपूस मिळणारी होती. मराठ्यांचेंही साह्य मिळण्याची त्यास आशा होती. अशा स्थितीमध्यें टिपूचें पारडें हलकें करण्याकरितां वेलस्ली साहेबांनीं मागें सांगितल्याप्रमाणें निजामास तैनाती फौज घेण्यास भाग पाडलें आणि निजाम अशा रितीनें फुटल्यामुळें टिपूचा एक मोठा आधार नाहींसा झाला.

निजामाची मदत नाहीं व फ्रेंचांनाही यावयास उशीर अशा असहाय स्थितिमध्यें टिपूस मारल्यास खात्रीनें जय येईल अशी इंग्रजांस आशा वाटत होती. परंतु अशा तऱ्हेची लढाई करावयास उघड निमित्त असें कांहींच नव्हतें. बाह्यात्कारीं टिपू इंग्रजांशीं मैत्री दाखवीत असे. तेव्हां युद्धास कांहीं कारण शोधण्याकरितां वेलस्ली साहेबानें युक्ति केली. त्यानें ' तूं जर आमचा मित्र आहेस तर आमच्या इतर मित्रांप्रमाणेंच आमची तैनाती फौज स्वीकार बघूं? असें टिपूस कळविलें ! परंतु ही अट टिपूस मान्य कशी होणार ? कितीही मोठा मित्र असला म्हणून केवळ त्याचें मित्रत्व सिद्ध करण्याकरितां आपला प्राण देणारे प्राणी विरळा ! आणि अशा तऱ्हेनें आपल्या मित्रत्वाची कसोटी पहाणारे तर त्याहूनही विरळा ! इंग्रजाची तैनाती फौज ज्यांनीं ज्यांनीं म्हणूम स्वीकारली तो तो त्यांचा खरा मित्र होत असे. इतर लोक मित्र नसून त्यांचें शत्रू होत ! टिपुसुलतानानें आपण तैनाती फौज स्वीकारण्यास तयार नसल्याचें वेलस्लीस कळविलें. त्याबरोबर ' तूं आमचा शत्रू आहेस, शत्रूस जिवंत ठेवतां कामा नये ' असें वेलस्लीनें टिपूस कळवून लढाईस निमित्त सांपडल्यामुळें जनरल हॅरिस ह्यास त्याच्या-

वर हल्ला करण्याची आज्ञा केली ! प्रस्तुत युद्धास इंग्रजाची यच्चयावत् फौज एकत्रित झाली होती. मुंबईहून स्टुअर्ट आपली फौज घेऊन आला. परंतु टिपूनें त्याच्या फौजेचा पराभव केला. मद्रासची फौज हॅरिसचें हाताखालीं दुसऱ्या बाजूनें आली. अशा पेचांत टिपू सांपडला. हेस्टिंग्सनें श्रीरंगपट्टणास वेढा दिला व बेअर्डनें किल्ल्यावर हल्ला केला. टिपू अत्यंत शौर्यानें लढला. थोडा वेळ अत्यंत हातघाईचें युद्ध झालें आणि टिपूच्या शरीरास अनेक गोळ्या लागून तो मरून पडला. किल्ल्यावर इंग्रजांचें निशाण लागलें ! इंग्रजांना अतिशय आनंद झाला. टिपूचें प्रेत शोधण्यांत आलें आणि दुसरें दिवशीं तें पुरण्यांत आलें. ह्या युद्धाचें सविस्तर व व मनोवेधक वर्णन त्या काळच्या ( १७९७–९९ ) हॅरिस, वेलस्ली, स्टुअर्ट इत्यादिकांच्या पत्रव्यवहारांत सुंदर रितीनें केलें आहे. टिपू मेल्याच्या अत्यानंदांत त्या वेळच्या एका पत्रामध्यें 'आमचे मित्र जे फ्रेंच किंवा तत्सम दुसरे ह्यांची आमच्या विरुद्ध मदत मागणाराचा, आम्ही कशा तऱ्हेनें नाश करतो हें हिंदुस्थानच्या लोकांनीं चांगलें ध्यानांत धरावे.' अशा तऱ्हेचे गर्वोक्तीचे उद्गार पत्र लेखकानें काढले आहेत !

टिपू मेल्यानंतर त्याच्या राज्याचें काय करावें असा प्रश्न इंग्रजांच्या पुढें पडला. प्रस्तुत राज्य एकदम ताब्यांत घेतल्यास हिंदुस्थानच्या लोकांस तें कितपत मानवेल ह्याची त्यांना थोडी भीति वाटली. शिवाय त्या योगें त्यांच्यावर जबाबदारीही जास्त येणार होती. तेव्हां जबाबदारी टाळूनच्या टाळून व एका कवडीचाही फायदा न सोडतां फुकटचा उदारपणा दाखवावयास मिळत असतां

तो कां सोडा असा विचार करून वेलस्लीनें तें राज्य म्हैसूरच्या जुन्या हिंदुराजाच्या नातवास 'देणगी' म्हणून देण्याचें ठरविलें! हा नातू कृष्णराज वोडियार नांवाचा होता. वेलस्लीनें त्याला आपला मांडलिक बनविलें. व त्याला तैनाती फौज स्विकारावयास लावून ह्या शिक्का मोर्तबानें त्याचें मांडलिकत्व पक्कें केलें! ह्या अंतिम युद्धामध्यें कर्तव्य म्हणून निजामानें इंग्रजांस मदत केली होती. व मागील प्रकरणीं सांगितल्याप्रमाणें दुसऱ्या बाजीरावानेंही मदत देण्याचें कबूल केलें होतें. पण ती मदत आली नाहीं! मदती बद्दल म्हैसूरांतला तीस लक्षांचा मुलूख निजामास देण्यांत आला व १० लक्षांचा मुलुख मराठ्यांस देण्याचें ठरविण्यांत आलें. परंतु मदत न दिल्यामुळें फुकटचा मोबदला मराठ्यांनीं घेतला नाहीं. तेव्हां तो मुलुख निम्मा निम्मा इंग्रज व निजाम ह्यांनीं वाटून घेतला. कृष्णराज वोडियारला राज्य समर्पण करतांना वेलस्लीनें उदारपणाचें असें प्रदर्शन केलें कीं कांहीं पुसूं नये! जणूं कांहीं म्हैसूरच्या ह्या अस्सल मालकाच्या विपदावस्थेची कींव येऊनच त्यांनीं टिपूस मारण्याचा खटाटोप केला!! कृष्णराजाशीं केलेल्या तहाची एकंदर सोळा कलमें असून प्रत्येक कलमांत अशा कांहीं अटी लादलेल्या आहेत कीं, त्यायोगें कृष्णराजाचें हातपाय जास्तजास्तच बद्ध व्हावे! अशा तऱ्हेनें मैत्रीचे तह करण्यापेक्षां उघड शत्रुत्व बरें असें कोणासही वाटल्यास नवल नाहीं! सारांश प्रस्तुतच्या युद्धानें सारें म्हैसूरचें राज्य इंग्रजांच्या ताब्यांत आलें. टिपूच्या कुटुंबास ९ लक्षांची नेमणूक करून दिली व त्यांना वेलोर येथें नेऊन ठेवलें.

इंग्रज जितके पाताळयंत्री होते तितकाच टिपूही पाताळयंत्री होता. त्यामुळें दोघेही परस्परावर कडी करण्याचा प्रयत्न करीत.

दोघेही एकमेकांचें अंतरंग ओळखून होते. ‘ गांठ पडली ठकाठका त्याचें वर्म बोले तुका ’ असाच येथें प्रकार झाला. हिंदु राजाचे दृष्टीनें टिपू आणि इंग्रज दोघेही सारखेच परके होते. तेव्हां त्यांच्या जयापजयाबद्दल हिंदूंना आनंद दुःख होण्याचें कांहींच कारण नव्हतें. परंतु कांहीं वर्षांपुरता हैदरटिपूचा हिंदुस्थानच्या इतिहासाशीं संबंध आला म्हणूनच आम्हालाही तो द्यावा लागला ! टिपू आणि तत्कालीन इतर हिंदू राज्यकर्त्ते ह्या दोघांमध्यें एक मोठा फरक दिसून येतो तो हा कीं, हिंदु राज्यकर्त्यांनीं टिपूप्रमाणें धर्माभिनिवेशानें अगर देशस्वातंत्र्याच्या लालसेनें इंग्रजास हुसकून लावण्याचें संघटित आणि मनापासून प्रयत्न केले नाहींत ! आमचे हिंदु प्रामाणिक, धार्मिक आणि इंग्रजांच्या गोड वाणीस व डांवपेचास भुलणारे असे होते. त्यामुळेंच फारशा लढाया न करितां ते इंग्रजांच्या अंकित झाले. सुनीति व कुटिल नीतीच्या झगड्यांत सध्याच्या काळांत तरी कुटिल नीतीच जय पावते असा अनुभव प्रत्यहीं येत आहे !

# इंग्रजांच्या जबड्यांत—!

जगाच्या कल्याणा संताच्या विभूती ।
—देह कष्टवीती उपकारें !—तुकाराम

मराठे आणि म्हैसूरकर ह्यांचा वेलस्ली साहेबांनीं बळी घेतला. निजाम तर अगोदरच फशीं पडला होता. आतां उरल्या सुरल्या व हातांत येणाऱ्या सटरफटर सत्ताधाऱ्यांचाही मूलतः अगर अंशतः नायनाट करून टाकण्याची इच्छा त्यांना उद्भवल्यास आश्चर्य नाहीं. आणि त्याप्रमाणें त्यानीं आपल्या जबड्यांत एक एक घास घालावयास सुरुवात केली !—आणि ती स्वार्थ म्हणून नव्हे तर हिंदुस्थानच्या लोकांवर उपकार म्हणून !

शिवाजी महाराजांच्या वेळीं त्यांचा सावत्र भाऊ व्यंकोजी ह्यानें कर्नाटकांत लहानसें राज्य स्थापलें होतें. तंजावर त्याची राजधानी होती. तें राज्य आजतागायत चालू होतें. तंजावरच्या राजांनीं आपल्या राज्याच्या सीमा वाढविण्याचें किंवा दुसऱ्यावर विनाकारण अगर सकारण स्वाऱ्या करण्याचें फारसें मनांत आणलें नाहीं. अशा तऱ्हेच्या एकलकोंड्या वृत्तिमुळें हिंदुस्थानच्या इतिहासांत ह्या राज्याचा इतिहास मोठासा महत्वाचा गणल्या जात नाहीं. परंतु 'अजापुत्रं बलिं दद्यात्' ह्या न्यायानें असल्या दुर्बळ राज्यांवरच कोणाचीही पापी दृष्टी असणार ! कर्नाटक प्रांत हा नबाबाच्या ताब्यांत होता व नबाब हा बादशहाचा नोकर होता.

हिंदुस्थानांतलि सर्व सत्ता बादशहाची ह्या तत्कालिन बहुजनमान्य पण औपचारिक समजुतीप्रमाणें कर्नाटकचा नबाब तंजावरावर बादशहातर्फे उगीच स्वतःच्या सार्वभौमत्वाचा हक्क सांगत असे. व त्याच्या त्या कुरकुरीपासून फारसा त्रास होऊं नये म्हणून तंजावरचें राजेही बहुधा त्याला खंडणी देऊन चूप करीत. व पर्यायानें स्वतःचें मांडलिकत्वही कबूल करीत. सदरील खंडणीच्या वसूली कारितां कर्नाटकच्या नबाबानें तंजावरावर कित्येकदां स्वाऱ्याही केल्या होत्या. व नबाब क्लाइव्हच्या वेळीं इंग्रजांचा मित्र झाल्यावर त्याला ह्या लढायांत मित्रकार्य म्हणून इंग्रजांनीं मदतही केली होती. क्लाइव्ह साहेबानंतर १७७१ मध्यें एकदां मद्रासकरांनीं तें राज्य खालसाही करून टाकलें होतें. परंतु त्यावेळीं विलायतेंतील लोकमत ह्या अतिप्रसंगास अनुकूल नसल्यामुळें कंपनीच्या डायरेक्टरांनीं सुमारें पांच वर्षांनंतर तें तुळजाजी नांवाच्या तंजावरच्या तत्कालीन राजाच्या स्वाधीन केलें ! पण ह्या व्यवहारापासून इंग्रजांस कांहींच फायदा झाला नाहीं असें मात्र नाहीं ! ह्या राज्याचें मोठ्या उदारपणानें प्रतिदान केल्यानंतर तंजावरच्या राजास तैनाती फौजेचा त्याचवेळीं अहेरही देण्यांत आला ! आणि ह्या महाग अहेराच्या मोबदल्यांत त्याच्यापासून इंग्रजांनीं २७७ गांवें काखोटीस मारून आपल्या विरुद्ध त्यानें कधींही जाऊं नये असा त्याच्यापासून करार करून घेतला ! अर्थातच हें काम वारन होस्टिंग्सचें वेळीं झालें. एकदम कोणतीही वस्तू संपूर्ण गट्ट करण्यापेक्षां हळूहळू ती खाल्ली तर पचनशक्तीस निःसंशय मदत होत असते. ह्या न्यायानेंच इंग्रजांनीं पूर्ण तंजावरचा एकच घास

केला नाहीं. तुळजाजीस औरस मुलगा नसल्यामुळें हिंदुधर्म-शास्त्राप्रमाणें त्यानें सरफोजी नांवाच्या एका मुलास दत्तक घेतलें. दुर्दैवी तुळजाजी १७८७ त मरण पावल्यावर सहाजिकच त्याची गादी सरफोजीकडे येणारी होती परंतु सरफोजी गादीवर बसणार इतक्यांत इंग्रजांस कांहीं तरी खुटीउपाडपणा करण्याची बुद्धि झाली आणि मद्रासच्या इंग्रज कौन्सिलनें सरफोजीचें दत्तविधान अशास्त्र ठरविलें! हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें यथाविधि झालेलें दत्तविधान अशास्त्र ठरविण्याचा हिंदु नसणाऱ्या इंग्रजांना अधिकार काय, किंवा त्यांनीं तसें करतांना कोणतीं कारणें पुढें केलीं होतीं, ह्याची शहा-निशा कोणी केलेली फारशी आढळत नाहीं. इंग्रजांच्या मतलब सिंधूतून कोणत्या वेळीं काय युक्ति निघेल व कोणत्या प्रकरणाचा अर्थ कसा करण्यांत येईल ह्याचा कांहीं नेम नसे. ईश्वर निर्मित नात्यांवर त्यांचा हक्क असे ! व त्यानीं एखाद्या राजास स्वतःच्या बायकोस बहीण किंवा बहिणीस बायको समजण्याचा जरी कायदे-शीर निर्बंध घातला असता तर तो देखील त्याला पाळणें भाग होतें व आहे ! इंग्रजांना हें दत्तविधान खरोखर अशास्त्र ठरवा-वयाचें होतें तर त्यांचे डोळे दत्तविधान झालें त्या वेळीं कांहीं फुटले नव्हते ! परंतु त्यावेळीं इंग्रजांचा शास्त्राभ्यास पुरा झाला नव्हता. तो दत्तक गादीवर बसण्याचे वेळीं पुरा होऊन दत्तविधानाच्या योग्यायोग्यतेचे संपूर्ण नियम त्यांना नेमके बिनचूक आठवले; व त्यानीं तदनुसार सरफोजीस गादी न देतां तुळजाजीचा भाऊ अमरसिंह ह्यास गादी दिली ! ह्या प्रकारावरून भाऊबंदकी करणें हाच एकंदर कारस्थानाचा इंग्रजांचा उद्देश होता असें स्पष्ट

दिसतें. गादी स्वतःकडे असावी अशी इच्छा कोणासही अस-णार ! त्या प्रमाणें ती अमरसिंह व सरफोजी ह्या दोघासही होती. सरफोजीनेंही आपलें दत्तविधान सशास्त्र असल्याचें सिद्ध करण्याची फार खटपट केली. वेलस्ली साहेबांनीं ह्या सर्व गोष्टीचा फेरविचार केला व १७९९ त सरफोजीचें दत्तविधान इतक्या वर्षांनीं सशास्त्र ठरविलें गेलें ! सदरील दत्तविधान कायमचें अशास्त्र ठरविलें गेलें असतें तर निदान इंग्रजांची हटवादी न्याय-प्रियता तरी जगास दिसून आली असती. परंतु तें पुनः सशास्त्र ठरविलें गेल्यामुळें इंग्रजांच्या जबानींत कांहीं प्रामाणिकपणा व इमान नाहीं, ते दुतोंडे आहेत हें आपोआपच सिद्ध झालें ! सरफोजीचा गादीवरील हक्क कबूल करण्यांत आला खरा परंतु ही न्यायबुद्धि अगर दया कोणत्या नव्या अन्यायास जन्म देणार ह्याची त्या बिचाऱ्यास कल्पना नव्हती. दुष्ट लोकांची दया देखील मोठी घातक असते ! अखेरीस वेलस्ली साहेबांनीं नेहमींप्रमाणें 'राज्य सुरळीत चालवितां येत नाहीं' असा ठपका ठेऊन अमर-सिंहास पदच्युत केलें व सरफोजीस गादीवर बसविलें ! परंतु ती ह्यावेळीं बापाची गादी नसून इंग्रजांचा शाप होता ! कारण त्या बिचाऱ्याचें $\frac{४}{५}$ राज्य इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेतलें आणि बाकीचें $\frac{१}{५}$ केवळ खालसा राजाची नेमणूक म्हणून त्याच्याकडे राहूं दिलें ! बिचारा दुर्बल सरफोजी अश्रू ढाळण्यापलिकडे काय करणार ? तंजावरच्या राज्यासंबंधींचे हे सगळे व्यवहार होत असतांना 'आम्हाला तेथील राजापासून सुराज्याचीच अपेक्षा आहे

व आम्ही सुराज्याकरितांच सर्व करणार ' + अशा अर्थाचे एका इंग्रजानें आपल्या पत्रांत उद्गार काढले आहेत !

तंजावर राज्य खालसा झालें त्याप्रमाणेंच अयोध्येच्या वजीरावरही ही धाड लवकरच येऊन कोसळली. तंजावरचें राज्य हिंदूचें होतें आणि अयोध्येचें मुसलमानाचें होतें. परंतु त्यावेळीं इंग्रजांच्या पुढें हिंदु-मुसलमान हा भेदाभेद नसून एखाद्या वेदांती योग्याप्रमाणें हिंदु-मुसलमान ह्या दोघांचेही बाबतींत ते ' समदर्शी ' होते ! वारन हेस्टिंग्सनें अयोध्येच्या बेगमांचा छळ केल्याची व असोफनें ब्रिटिश पलटण नोकरीस ठेवल्याची हकीकत मागें ( पृ. ५० ) आलीच आहे. असोफनें हेस्टिंग्सच्या सांगण्यावरून जी ही फौज नोकरीस ठेवली तिचा सालीना खर्च ७६ लाख रुपये त्यास इंग्रजांस द्यावा लागे ! त्या बिचाऱ्यानें ही ब्याद काढून घेण्याबद्दल इंग्रजांस अनेकदां विनवणी केली. पुढें कार्नवालिस साहेबाच्या वेळीं त्याची ही विनंती अंशतः फळास येऊन राज्य चांगलें चालविण्याच्या अटीवर २५ लक्षाची सूट मिळूं शकली. हा असोफउद्दौला १७९७ मध्यें मरण पावला. एखादा राजा मरणें व दुसरा गादीवर बसणें ह्यामधील संधीकाल इंग्रजांस अतिशय प्रिय असे. त्याप्रमाणें असोफ मेल्यावर त्याचा दासीपुत्र वजीरअली हा

---

+ ' We have nothing to ask of him, but a pure and virtuous administration of the affairs of his country. '

Letter from Henry Dundas to Mornington
D/21-3-1799.

गादीवर बसला. परंतु त्याला गादीवर बसून पुरें एक वर्ष होत नाहीं तोंच त्याचें दुर्दैव ओढवलें! बापाच्या वेळची ब्रिटिश फौज त्याच्याही उरावर होतीच. तशांत वजीरअलीस चांगलें राज्य चालवितां येत नाहीं असें वेलस्ली साहेबास आढळून आल्यामुळें त्यांनीं एकदम त्यास पदच्युत केलें! व असोफचा भाऊ सादतअली ह्यास गादीवर बसविण्यांत आलें (१७९८) आणि ह्या उपकाराची फी म्हणून त्याच्याशीं नवा तह करण्यांत येऊन ब्रिटिश फौजेचा खर्च पूर्वीप्रमाणेंच ७६ लाख करण्यांत आला! व अलाहाबादचा किल्ला ब्रिटिश फौजेस रहावयास म्हणून इंग्रजांनीं आपणाकडे घेतला. यद्यपि वजीरअली पदच्युत झाला तरी त्याला इंग्रजांचा आपल्या राज्यांतील सावळागोंधळ आवडला नाहीं. अपमानशल्य त्याच्या मनांत सारखें जाचत होतें. आणि म्हणून इंग्रजांस ताळ्यावर आणण्यासाठीं त्यानें पुष्कळ धडपड करून पाहिली. ही धडपड बंद करावी एतदर्थ वजीरअलीची समजूत करण्याकरितां वेलस्ली साहेबांनीं चेरी नांवाच्या एका मनुष्यास पाठविलें. परंतु वजीरअली संतप्त असल्यामुळें त्यानें ह्या शिष्टाईकरितां आलेल्या दूतास आणि त्याच्या साथीदारास भरदरबारांत यमसदनास पाठविलें व इंग्रजांच्या ऋणाचें ओझें अंशतः हलकें केलें! ह्या प्रकारामुळें वजीरअलीस इंग्रजांनीं पकडून आजन्म तुरुंगांत ठेवलें. सादतअली गादीवर होताच. तो इंग्रजांचा मिंधा होता. त्याच्या राज्यांत वजीरअली सारख्या त्याच्या नातलगानें बंडाळी करावी, ही गोष्ट त्याच्या शासनास कमीपणा आणणारी आहे व हा कमीपणा काढून टाकण्याकरितां पूर्वीच्या ब्रिटिश पलटणीची वृद्धि केल्याशिवाय

गत्यंतर नाहीं, असें वेलस्ली साहेबांनीं सादतअलीस कळविलें. अर्थातच ही इंग्रजी फौज वाढविल्यानंतर वेलस्ली साहेबाच्या नियमाप्रमाणें तैनाती फोजेसंबंधींच्या सुधारलेल्या सर्व अटी त्यांना लागू करण्यांत येणार होत्या! बिचारा सादतअली! त्यानें इंग्रजांच्या ह्या सूचनेस 'होय' कोणत्या तोंडानें म्हणावें? अगोदरच ब्रिटिश फौजेच्या खर्चाच्या ओझ्यानें त्याची पाठ वांकून गेली होती. त्यांत आतांची ही नवी भर पडली म्हणजे पाठ मोडल्याशिवाय खास रहाणार नाहीं, ही त्याला खात्री वाटली. अयोध्येमध्यें ब्रिटिश फौज वाढविण्याचें खरें कारण काय? ह्याची शाहानिशा वेलस्लीनें कोर्ट ऑफ डायरेक्टरांच्या सिक्रेट कमिटीस ता. २८ नोव्हेंबर १७९९ रोजीं जो खलिता लिहिला त्यांत केली आहे. ( See—W. Despatches. P. 188. ). त्याच्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, हिंदुस्थानांतील स्वतःच्या राज्याची सुरक्षितता कायम ठेवण्याकरितांच वेलस्लीनें ही उठाठेव केली! त्याच खलित्यांत 'आपणास अयोध्येच्या राज्यांत सुधारणा व्हावी अशी अत्यंत उत्कट इच्छा आहे; आणि त्याकरितांही हें सर्व करणें जरूरच आहे, अशी मखलाशी करण्यास वेलस्ली चुकला नाहीं! सादतअलीनें फौज ठेवण्यास होय म्हणण्याच्या बाबतींत कांकूं केलें. पण तेवढ्यानेंच वेलस्ली साहेबाची मर्जी गेली! त्यानें सादतअलीसही ९ फेब्रुवारी १८०० रोजीं रागारागानें एक लांबलचक खलिता लिहिला. तो अतिशय वाचनीय आहे. त्यांत त्यानें भाषा अत्यंत उद्धट वापरली असून 'तुझ्या राज्यांत तैनाती फौज ठेवण्याचा आमचा अधिकारच आहे! अयोध्येच्या लोकांसंबंधींची कळकळ आम्हाला स्वस्थ बसूं देत नाहीं.

तुझा वैयक्तिक मान व हित आणि अयोध्येच्या लोकांची उन्नति आणि सुख हेंच आम्हांस तुझ्या राज्यांत तैनाती फौज ठेवण्याकरितां भाग पाडीत आहे! मी तुझा कायदेशीर व अस्सल पालक ( legitimate guardian ) आहे व पालक ह्या नात्यानें सर्व तऱ्हेची काळजी घेणें मला जरूर आहे! तुझी फौज रद्दी असल्यामुळें तेथें नवी आणल्याशिवाय गत्यंतरच नाहीं ' * इत्यादि प्रकारची बेजबाबदार विधानें केलीं असून सादतअलीच्या मागील कांहीं कृत्याबद्दल त्याची बरीच हजेरी घेतली आहे! सारांश ह्या खलित्यांत, अपराध माझा नाहीं, सारा तुझाच आहे व ह्या भानगडी करण्यांत आमचा काडीचा फायदा नसून निरपेक्षपणें केवळ परकल्याणाच्या दृष्टीनेंच हें सर्व आम्ही करीत आहोंत असा वेलस्लीनें आव आणला आहे! इंग्रज हे हिंदुस्थानच्या राजांचे व राज्याचे ' कायदेशीर व खरे पालक ' कधीपासून झाले, व त्यांना नेमलें तरी कोणी? दया, नीति, निरपेक्षता इत्यादि गुण इग्लंडांत इतके कां उत्पन्न व्हावे कीं, त्यास तेथें पूर येऊन तो लोंढा हिंदुस्थानचे अंगावर यावा? हिंदुस्थानच्या राजांनीं पूर्वजन्मीं खात्रीनें पाप केलें असलें पाहिजे, नाहींपेक्षां त्यांच्यावर न्यायाची आणि नीतीची जबरदस्ती कां झाली असती? अस्तु. सादतअलीवर बरीच जबरदस्ती करण्यांत आली.

---

* '...............shall it be contented that the *legitimate protector and guardian of your dominions is not bound by every principle of duty to provide such a system without delay?*...........'

Despatches P. 196.

शेवटीं वेलस्ली साहेबांचें म्हणणें कबूल करण्याखेरीज त्याला गत्यंतर राहिलें नाहीं. त्यानें १८०१ मध्यें आपली फौज कमी केली आणि मोठ्या नाखुषीनें 'सुधारलेली' ब्रिटिश फौज नोकरीस ठेवली. त्याच्या अटी कबूल करणें व फौजेचा खर्च देणें त्यास भाग पडलें. व तत्प्रीत्यर्थ इंग्रजांनीं सध्या आग्रा नांवानें प्रसिद्ध असलेला वजीराचा दीड कोट रुपये उत्पन्नाचा प्रदेश आपल्याकडे घेतला व सादतअलीकडून 'आपण चांगलें राज्य चालवूं' अशा तऱ्हेचा कबूली जबाब लिहून घेतला. अशा तऱ्हेनें सादतअलीची पुरी विटंबना केल्यावर वेलस्ली साहेबाची शापदृष्टी इतरांकडे वळली !

खालसा झालेलें तंजावर ज्या कर्नाटकच्या सार्वभौमत्वाखालीं म्हणून होतें. त्या कर्नाटकावरही आपल्या मांडलिकाप्रमाणेंच प्रसंग येऊन ठेपला. क्लाइव्ह साहेबानें अर्काटच्या वेढ्यानंतर महंमदअलीस अर्काटचा नबाब केलें. महंमदअली हा यद्यपि इंग्रजांच्या कृपेनें राज्यपदावर चढला होता तरी त्याच्याशींही पुढें इंग्रजांचे अनेक तंटे झाले. हा महम्मदअली १७९५ त मरण पावल्यावर त्याचा मुलगा ओमदत उमरा हा गादीवर बसला. ओमदतनें १८०१ पर्यंत सहा वर्षे राज्य केलें. त्याच्या विरुद्ध कांहींतरी कुलंगडें उपस्थित करून त्याला तोंडांत टाकण्याकरितां इंग्रज कारण शोधतच होते. इतक्यांत श्रीरंगपट्टणचे लढाईनंतर तेथील किल्ल्यांत इंग्रजांना टिपू सुलतानाचे हातचे कांहीं कागदपत्र मिळाले ! व त्या कागदपत्रांवरून इंग्रजांना असा शोध लागला कीं, महंमदअली व ओमदत उमरा ह्या दोघांचाही इंग्रजांचा शत्रू जो टिपू त्याच्याशीं संबंध होता. व

त्यांनीं इंग्रजांच्या विरुद्ध टिपूस सामील होण्याचा प्रयत्न केला ! हा शोध लागल्याबरोबर मग काय विचारता? मुळींच पुरावे नाहींत तेथें नवे उत्पन्न करण्याची ज्यांची तयारी व उमेद तेथें खरोखरच पुरावा सांपडल्यावर काय सांगावयास पाहिजे ? ह्या प्रकरणाची इंग्रजांनीं १८०१ पर्यंत गुप्त आणि उघड चौकशी केली. अनेक साक्षी घेतल्या आणि नबाब दोषी आहे असें ठरविण्यांत आलें. इतक्यांत इंग्रजांच्या सुदैवानें ओमदत १८०१ मध्यें मरण पावल्या-बरोबर त्याचे राज्य इंग्रजांनीं खालसा करून त्याचें वारसास लहान-शीं नेमणूक करून दिली ! हें राज्य खालसा करतांना वेलस्लीचें हुकमानें मद्रासच्या गव्हर्नरानें एक लांबलचक फर्मान काढलें. त्यांत महंमदअली व ओमदत उमरा ह्या दोघांही पितापुत्रांनीं विश्वासघात केल्याचें विधान केलें असून तत्संबंधींची अकरा कारणें दिलेलीं आहेत. मामुलीप्रमाणें ह्याही फर्मानांत 'आम्ही महंमद-अलीवर दया केली. त्यांच्या खंडणीच्या बाबतींतही थोडी सूट दिली. वडीलकीच्या नात्यानें आम्हीं त्याची काळजी वहात होतों, असें असूनही हे विश्वासघातकी नबाब टिपूस मिळण्याच्या विचारांत होते ! ह्या जगांत न्याय म्हणून उरलाच नाहीं. काय करावें ! आजपर्यंत पुत्रवत् पालन केलेल्या व आमच्या म्हणून म्हटलेल्या दोन्ही नबाबांनीं आमच्याशीं जें कृतघ्नपणाचें व विश्वासघाताचें वर्तन केलें तें जगास जाहीर करणें भाग पडण्याचा दुःखदायक प्रसंग आमच्यावर यावा ह्याबद्दल आम्हाला अत्यंत खेद होत आहे. +'

---

+ 'In proceeding to exercise this right it was painful to the British Government to be

इत्यादि तऱ्हेची छञ्मी आणि मोहक विधानें केलीं आहेत ! वरील दोन्ही नबाब उघडपणें टिपूस मिळाल्याचा दाखला इतिहासांत नाहीं. त्यांनीं टिपूशीं पत्रव्यवहार केला असला तरी त्याच्या न्याय्यान्यायत्वाची चर्चा करण्याला इंग्रजांना नाक तरी कोठें होतें ? खरी गोष्ट अशी कीं, म्हैसूर ताब्यांत, मद्रासही ताब्यांत तेव्हां तो प्रदेश सलग आपल्याच ताब्यांत असावा एवढ्याच करितां मधली ही कर्नाटकची ब्याद् काढून टाकण्यांत आली.

आतां या पुढील उदाहरण स्वयंप्रेरणेनें आणि स्वखुषीनें तैनाती फौज स्वीकारण्याचें आहे. गायकवाडाची स्थापना बऱ्याच वर्षांपासून बडोद्यास झाली होती. नारायणराव पेशव्यांच्या खुना-नंतर पुण्यास पेशव्यांच्या घरांत भाऊबंदकी माजली. त्यामुळें सरदार लोकांतही दोन पक्ष झाले. दमाजी गायकवाडांच्या चार मुलांपैकीं फत्तेसिंगराव व सयाजीराव राघोबाकडे आले व गोविंदराव बारभाईचे बाजूस राहिला. पुढें बारभाईचा जय झाल्यावर सहाजिक-पणेंच गोविंदरावाची बडोद्यांत स्थापना झाली. गोविंदराव गायक-वाड १८०० मध्यें मरण पावल्यावर त्याचा मुलगा आनंदराव गादीवर बसला. तेव्हां शिंदे होळकर, भोसले इत्यादिकांशीं इंग्रजांचें

---

compelled to expose to the world all these humiliating proofs of the ingratitude and treachery of the Nabobs Mahomad Ali and Omdut ul Omra towards the power which has *uniformly proved their guardian and protector*'

P. 184.

तह झाले नव्हते. मराठी सरदाराचे एकजिनसी गटास कोठे तरी भगदाड पाडावें ही वेलस्लीची पहिले पासून इच्छाच होती. त्यांत आनंदराव मूर्ख असल्यामुळें कारभार देखील त्याचा धाकटा भाऊ फत्तेसिंगराव ह्यास पहावा लागत असे. त्याच्या राज्यांत अनेक घोटाळे माजले. ह्या सर्व दगदगींतून मुक्त होण्याकरितां ह्या मूर्ख राजानें वेलस्लीशीं तैनाती फौजेचा आपण होऊन तह केला! आणि अशा तऱ्हेनें स्वराज्याच्या भानगडींतून तो मुक्त झाला! मराठे सरदारांपैकीं एकानें असा कित्ता घालून दिल्यामुळें इतरांनींही तसेंच वागावे अशी वेलस्लीनें खटपट केली. परंतु तें काम तितकें सोपेपणानें सिद्धीस गेलें नाहीं हें मागें आठव्या प्रकरणांत आलेंच आहे. आपलें स्वातंत्र्य आपले हातानें गमविण्याचें भिकेचे डोहाळे ज्यास आठवले त्याचा नाश झाल्यावांचून कसा राहील? इंग्रजांना निःसंशय अशा करणीचें कौतुक वाटलें असेल. 'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन' अशीच इंग्रजांची स्थिति झाली. गायकवाडास स्वतःच्या आरब फौजेचा त्रास होत असल्यामुळें त्यानें ब्रिटिश फौज नोकरीस ठेवली परंतु त्याला कांहीं आपली स्वतःची फौज सुधारतां आली नाहीं.!

वेलस्ली साहेबाचें हें राजकारण भारतवर्षीय आहे. त्यानें परराष्ट्रीय राजकारणही केलेलें आहे. फ्रेंचांना नामोहरम करणें आणि ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानांत दृढमूल करणें हे दोन हेतू त्याचे समोर होते. अफगाणिस्थानचा सुलतान जमानशहा ह्याचे टिपूशीं सूत होते ही गोष्ट मागें आलीच आहे. तेव्हां पुढेंमागें भानगड झाल्यास त्यास वाटेंतच अडवून टाकावें म्हणून वेलस्ली साहेबांनीं

इराणांत आपला एक वकील पाठवून इराणच्या राजाशीं दोस्तीचा तह केला. त्यांत शहानें फ्रेंचांना अडवून धरावें आणि इंग्रजांनीं इराणांतील व्यापार करावा अशा दोन इंग्रजांना सोइस्कर अशा अटी ठरविण्यांत आल्या !

अशा तऱ्हेनें वेलस्ली साहेबांनीं कारभार केला. १८०२ मध्यें अनेक झटापटीनंतर मराठ्यांचा बळी घेण्याचा खटाटोप करीत असतां वेलस्ली साहेबांच्या कार्याबद्दल विलायतेंत गलबला होऊं लागला ! व वेलस्लीनें हिंदुस्थानच्या लोकांस सर्वस्वीं नागविलें असें सर्व लोक म्हणूं लागले. अगोदरच बिचारे इंग्रजलोक नेपो-लियनच्या स्वाऱ्यामुळें घाबरून गेले होते. त्यांत हें राजेश्री हिंदुस्थानांत अशा तऱ्हेनें वागल्यास इंग्रज राष्ट्रावर आणखी काय संकटें येतील असें लोकांस वाटलें. ही गोष्ट वेलस्लीच्या मानी स्वभावास न आवडून त्यानें १८०२ मध्यें राजीनामा पाठविला होता. पण त्यावेळीं तो मंजूर झाला नाहीं. पुढें १८०५ पर्यंत त्यानें निरनिराळीं कामें केलीं त्यांतही वेलस्लीचें आपलें पूर्वींचेंच धोरण ! तेव्हां ह्या उपाधखोर माणसास विलायत सरकारनें परत बोलावलें. व त्याच्या जागीं पुनश्च कार्नवालिसची नेमणूक केली ! कोर्ट ऑफ प्रोप्रायटर्सच्या सभेनें वेलस्ली साहेबांस बहुमतानें दोषी ठरविलें. वेलस्लीच्या एकंदर कारकिर्दीचें समालोचन केलें असतां तो मोठा कारस्थानी आणि जबरदस्त माणूस होता हें तर उघड दिसतें. त्यानें आपल्या कारकिर्दींत हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य सार्वभौम ( Paramount Power ) बनविलें असें म्हणतात. वेलस्लीनें आपल्या कारकिर्दींत कोणत्या ना कोणत्या प्रकारानें बराच

मोठा भाग इंग्रजांच्या ताब्यांत आणला. तो मोठा मुत्सद्दी खरा व मुत्सद्यांचीं कृत्यें नीतीच्या निकषावर फारशी घासून पहाण्यांत फलप्राप्ती नाहीं होहि गोष्ट खरी, परंतु मुत्सद्यांच्या झालें तरी नीतीस कांहीं एक अंतीम सीमा आहे. वेलस्लीनें हिंदुस्थानाची अगदी दिवसा ढवळ्या लूट केली. आणि ती करतांना सारें निरपेक्ष आहे असें दाखविलें. एखाद्यानें चोरी केल्याचें ऐकून जितका त्वेष येत नाहीं, तितका त्यानें निर्लज्जपणें व शिष्टपणें चोरीचें समर्थन केलें असतां, किंबहुना उलट ती चोरी नसून उपकारार्थ पदरमोडच आहे असें दाखविलें असतां येतो!! तैनाती फौज हा फारच मोठा तोडगा वेलस्लीनें शोधून काढला ह्यांत शंका नाहीं. ह्या तोडग्याचें वैय्यर्थ आणि संकट येथील राजे लोकांस कळलें नव्हतें असें नाहीं. परंतु पुष्कळदां बिचाऱ्यांचा नाइलाज झाला. त्याला काय करणार? वेलस्ली साहेबांस प्रथमतः जरी दोषी ठरविण्यांत आलें तरी नंतर ३० वर्षांनीं पार्लमेंटनें तो ठराव बदलून गौरवास्पद असा दुसरा ठराव केला व त्यास दोन लाखाची रकम नजर केली. व इंडिया हाऊसमध्यें त्याचा पुतळाही ठेवण्यांत आला. वेलस्ली साहेबांस यश आलें म्हणून सर्व इतिहासकारांचें मतें तो मोठा मुत्सद्दी, हुशार, आणि 'जगाच्या कल्याणा' झटणारा 'संताची विभूती' ठरला! अपयश आलें असतें तर तो लबाड, विश्वासघातकी आणि बदमाष ठरला असता. दृष्टी कोनांतच काय तो फरक. हिंदुस्थानच्या लोकांनीं कोणती दृष्टी घ्यावयास पाहिजे व कोणती दृष्टी त्यांच्या राष्ट्रीय स्वाभिमानास उचित आहे हें त्यांनींच आपलें ठरवावें.

———

# मराठेशाहीचा अंत !

१८०३ सालीं वसईच्या तहानें बाजीरावाचें आणि एकंदर मराठी राज्याचें हातपाय बांधल्या गेले. आणि इंग्रजांच्या सक्तीच्या आश्रयानें व दोस्तीनें बाजीराव राज्यकारभार चालवूं लागला. परंतु बाजीरावाला कशाचेंच स्वातंत्र्य न उरल्यामुळें अशा लाजिरवाण्या स्थितींत रहाणें त्यास आवडेना. म्हणून त्यानें ह्या पाशांतून सुटण्याकरितां प्रयत्न चालविले. पूर्वीच्या एकंदर पेशव्यांचे मानानें बाजीराव जरी कलिपुरुष आणि नादान होता तरी त्याला आपण जितका समजतो तितका तो खास नव्हता. त्याची वृत्ति अतिशय धार्मिक होती आणि तो इंग्रजांचा मनापासून द्वेष करीत असे. परंतु मुत्सद्दीपणाचा त्याच्या ठिकाणीं बराच अभाव होता. त्यावेळचे इंग्रज मुत्सद्दीपणांत त्याच्या गुरूचेही गुरू होते. अशा स्थितींत त्याचा कसा टिकाव लागावा ? तरी त्याच्याकडून झालें तेवढें त्यानें केलें. त्याच्या दरबारीं इंग्रजांचा रेसिडेंट असे. त्याच्या एकंदर कारकिर्दींत तीन रेसिडेंट बदलले. बाजीराव वाणीचा मोठा मिठ्ठास बोलणारा असल्यामुळें अनेकदां हे ब्रिटिश रेसिडेंटही फसत !

बाजीरावाची कारकीर्द प्रजेला फारशी सुखावह झाली नाहीं. त्यानें कोणाच्या जहागिरी जप्त केल्या, तर उगाच कोणाला डोक्यावर बसवून घेतलें ! त्याच्या तैनातींत आणि अंतरंगांत नीच लोकांचाच भरणा फार होता. त्या लोकांपैकींच त्रिंबकजी डेंगळे हा एक होता त्रिंबकजी बोलण्या चालण्यांत बराच चतुर असून तो मराठेशाहीचें

निःसंशय कल्याण चिंतीत असे. परंतु त्याच्या अंगीं आवश्यक मुत्सद्दीपणा नसल्यामुळें व बाजीराव सर्वस्वीं त्याच्याच आधीन झाल्यामुळें त्याचा नाश झाला. वसईच्या तहानें बाजीरावास जें थोडें फार राज्य परतंत्र स्वरूपांत देण्यांत आलें होतें तेवढेंही त्यास देण्यास वस्तुतः इंग्रज राजी नव्हते. परंतु मराठेशाहीस एकदम गट्ट करून टाकण्यास त्यांना निमित्त सांपडेना. म्हणून त्यास कांहीं काल चुरमुरें खात स्वस्थ बसावें लागलें. १८१८ त पेशवाईचा व त्याबरोबर मध्यवर्ती मराठेशाहीचा पूर्णपणें अंत झाला. १८०३ ते १८१८ च्या दरम्यान बाजीरावास कोणत्या तरी पेचांत आणून टाकण्यास इंग्रज मुत्सद्दी एक सारखे प्रयत्न आणि कारस्थाने करीत होते. त्यांनीं बाजीरावावर हेर नेमले आणि आणि त्याच्याकडून आगळिक घडविण्याची योजना करून ठेवली. ‘बाजीराव’ ह्या व्यक्तिबद्दल मराठे सरदार आणि मराठी प्रजा ह्यांना अत्यंत तिटकारा वाटेल व त्यांना बाजीरावापेक्षां इंग्रजच जास्त जवळचे आणि परोपकारी वाटतील अशीही व्यवस्था रेसिडेंट एलफिन्स्टन इत्यादींनीं केली. बाजीरावानें कित्येकांच्या जहागिरी जप्त केल्या त्यांत मुद्दाम आडकाठी आणून त्यांनीं जहागिरदारांची सहानुभूती मिळविली. बाजीराव हे खेळखंडोबे करावयास शिकला तो कोणाचे प्रेरणेनें व प्रयत्नानें हाही एक गूढ प्रश्नच आहे. त्यावेळच्या एकंदर परिस्थितीवरून बाजीरावाला बदसल्ला देणारे इंग्रजांचे हेर नसतीलच असें निश्चयानें म्हणवत नाहीं. जहागिरदार, सरदार व प्रजा ह्यांचा आप्तपणा अशा तऱ्हेनें सिद्ध केल्याबरोबर इंग्रजांना बाजीरावाच्या रक्षणाचा पुनः एकदा उमाळा आला. व त्यांनीं त्याच्या तैनातीस आणखी

थोडी फौज ठेवली. व त्याच्यावर कर्नल फोर्ड ह्यास अधिकारी नेमले. ही जी फौज नेमण्यांत आली होती, हींत मराठी बोलणाऱ्या शिपायास शक्य तो मज्जाव करण्यांत येऊन मातृभाषेंतील आपुलकीही तोडून टाकण्यांत आली ! येथून तेथून भरणा हिंदुस्थानी परदेशांचा ! ह्या सर्व फौजेनें 'बाजीराव इंग्रजांशीं इमानानें राहिल्यास आपणही तोपर्यंत त्याच्याशीं इमानानें राहूं' अशी संकेतार्थी शपथ घेतली होती. सारांश आपली प्रजा, किंवा जिच्या भरंवशावर स्वसंरक्षणाची मदार अशी परदेशी फौज ह्या दोन्हीपासून बाजीरावास वस्तुतः अलग करून इंग्रजांनीं त्यास खरोखरच परदेशीं बनविलें ! इंग्रजांचा हा उघड आणि गुप्त स्वरुपाचा जुलूम बाजीरावास मुकाट्यानें सहन करणें भाग पडे. पण अंतस्थ रितीनें त्यानें शिंदे—होळकर—भोसले इत्यादींना स्वतःस मिळण्यास व इंग्रजांशीं सामना देण्यास विनविलें. ह्या बातम्या इंग्रजांस लागत होत्या. परंतु बाजीरावास पकडण्यास उघड पुरावा काय ? इतक्यांत इंग्रजांच्या सुदैवानें अकल्पितपणें किंवा सकल्पितपणेंच एक कारण घडलें.

पेशवे आणि गायकवाड ह्यांच्या दरम्यान बऱ्याच दिवसांपासून हिशेबासंबंधीं तंटा चालला होता. पेशव्यांना गायकवाडाकडून कांहीं येणें होतें व त्या येण्याबद्दल बाजीरावानें त्याच्याकडे तगादा लावला तेव्हां त्या रकमेचा हिशेब पुरा करण्याकरितां गायकवाडांनीं आपला दिवाण गंगाधरशास्त्री पटवर्धन ह्यास पुण्यास पेशव्याचें दरबारीं पाठविलें. ( १८१४ ) गायकवाड हा इंग्रजांचा दोस्त झाला असल्यामुळें त्याच्या दिवाणाच्या सुरक्षिततेची हमी

मित्रकार्य ह्मणून इंग्रजांनीं घेतली परंतु ही हमी केवळ वरपांगी होती. कारण इंग्रजांनीं शास्त्र्याबरोबर आपला एकही शिपाई दिला नाहीं कीं दुसरी कांहीं व्यवस्था केली नाहीं ! ह्यावरून गंगाधर शास्त्र्याच्या जीवास कांहीं अपाय झाल्यास किंबहुना अपायानुकूल परिस्थिती उत्पन्न करतां आल्यास इंग्रजांच्या पथ्यावरच पडण्याजोगें होतें हें सिद्ध होत नाहीं काय ! पुढें एक वर्षभर पुण्यास राहून हिशेबाची काटकीट केल्यावर गंगाधरशास्त्री आणि बाजीराव हे बरोबर पंढरपुरास गेले. बाजीरावाचा मंत्री त्रिंबकजी आणि गंगाधर शास्त्री ह्यांची फारच मैत्री होती. बाजीरावानेंही गंगाधरशास्त्र्याची चांगली बरदास्त ठेवली होती. पंढरपुरास कांहीं दिवस राहिल्यावर ता. १४ जुलै १८१५ रोजीं रात्रीं श्रीविठ्ठलाच्या देवळाच्या महाद्वारासमोरील रस्त्यावर गंगाधर शास्त्र्याचा कोणी दुष्टानें एकाएकीं खून केला ! मराठेशाहीचा अंत होण्याच्या घटनेमधील हा खून ही अतिशय महत्वाची आणि लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट होय. हा खून कोणीं केला याचा नंतर केव्हांही पत्ता लागला नाहीं. परंतु गंगाधरशास्त्राच्या रक्षणाची त्याच्या जिवंतपणी इंग्रजांस जेवढी काळजी वाटली नाहीं तेवढी त्याच्या मरणानंतर वाटूं लागली आणि गंगाधर शास्त्र्याच्या खूनानें इंग्रजांस आपलें निधान हरपल्यासारखें झालें ! हा खून करणारा कोण ? हा तपास इंग्रजांनीं चालू केला. व शेवटीं बाजीरावं व त्रिंबकजी पंढरपुरास असतां ज्याअर्थीं हा खून झाला त्याअर्थीं तो त्यांच्या कोणत्यातरी हस्त-काकडून झाल्याशिवाय राहिला नाहीं असें आपलें तर्कट लढविलें ! इंग्रजांना बाजीरावावर संकट आणण्यास निमित्तच हवें होतें,

त्यांनीं गंगाधर शास्त्र्याच्या रक्षणास एकही रक्षक दिला नव्हता व रक्षणाची हमी घेऊनही नेमका खून झाला, खून झाल्यानंतरही गंगाधर शास्त्र्याच्या कुटुंबास इंग्रजांनीं कांहीं मदत केली नाहीं आणि त्याच्या खुनाचा पुरावाही मुळींच उपलब्ध न होतां सर्व इमारत केवळ तर्कावरच रचावी लागली; ह्या सर्व गोष्टींचा एकसमयावच्छेदें-करून विचार केला म्हणजे कोणाच्या प्रेरणेनें व इच्छेनें हा खून घडून आला ह्याचा सहज निकाल लागतो! गंगाधर शास्त्री हा एखाद्या धोक्याच्या कामगिरीवर जात नसूनही ज्याअर्थी इंग्रजांस त्याच्या जीविताची हमी घेणें आवश्यक वाटलें, त्याअर्थी त्याच्या भावी खूनाचें स्वप्न इंग्रजांस पूर्वींच पडलें असलें पाहिजे अशी सहज शंका येते. 'बाजीरावानें हा खून केला' असें प्रत्यक्ष म्हणण्याचें धाडस इंग्रज अधिकाऱ्यांस करविलें नाहीं. परंतु 'हा खून त्रिंब-कजीनें केला असावा, असा आम्हास संशय आहे, सबब त्यास आमच्या स्वाधीन करा' असें बोलणें एलफिन्स्टन साहेबानें लावलें. परंतु त्रिंबकजीवर बाजीरावाची अत्यंत प्रीति असल्यामुळें आपल्या ह्या एकनिष्ठ सेवकास त्यानें सुखासुखीं इंग्रजांच्या स्वाधीन केलें नाहीं! पण ह्या गोष्टीमुळें तर इंग्रजांचा संशय उलट बळाविल्याचें आढळून आलें! बाजीरावास खरोखरीच खून करावयाचा होता तर तो पुण्यांत आजपर्यंत करतां आला नसता असें नव्हे. खून करावयास त्यास रात्रच हवी होती, किंवा तो चोरूनच करावयाला पाहिजे होता असाही कांहीं प्रकार नव्हता. बरें, खून करावयाजोगें कांहीं मोठें निमित्तही उत्पन्न झालें नव्हतें. दुसरी गोष्ट अशी कीं, बाजीराव हा अत्यंत धार्मिक वृत्तीचा होता. बापानें केलेल्या खूनाची पाप

निष्कृती करण्यांतच त्याचा पुष्कळसा वेळ खर्च होत असे. अशा स्थितींत तो पुनः पंढरीसारख्या पुण्यक्षेत्रीं व तोही महाद्वारांत एका ब्राम्हणाचा खून करील हें शक्य वाटत नाहीं! खून बाजीराव अगर त्रिंबकजी ह्यांपैकीं कोणीही केल्याची तत्कालीन कोणत्याही पत्र लेखकाची किंवा मराठी माणसाची समजूत नव्हती. खुद्द गंगाधर शास्त्र्याचे आप्त देखील बाजीराव व त्रिंबकजी ह्यास ह्या खूनाचा संपर्क लागूं देत नाहींत. त्यावेळच्या प्रभाकरादिक शाहीरांनींही आपल्या पोवाड्यांत बाजीरावावर किंवा त्याच्या पक्षास दोषी धरलेलें नाहीं. पुनः गंगाधर शास्त्र्याच्या खुनापासून बाजीरावास काडीचा-ही फायदा नव्हता उलट इंग्रजांस मात्र तो पुष्कळच होणारा होता. इतक्या सगळ्या गोष्टी जमेस धरल्या म्हणजे हा खून बाजीरावानें अगर तत्पक्षीयांनें केला हें म्हणणें उघड उघड खोटें ठरतें. गंगाधर शास्त्र्याचा खून त्याच्या बडोद्यांतीलच कांहीं शत्रूंनीं केला असावा असेंही कित्येक म्हणतात, तें कांहीं असलें तरी बाजीरावावर मात्र खुनाची आळ आली खरी! एका हिंदु ब्राम्हणाचा खून झाला आणि त्याच्या बलीनें इंग्रजांचें मात्र काम साधलें! बाजीराव व त्रिंबकजी ह्यांच्यावर हा खुनाचा दोषारोप फक्त इंग्रज ग्रंथकारांनींच प्रथम केला आहे हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. (पहा. म. द. रु. २.)

ह्या खूनामुळें इंग्रजांना मात्र निमित्त मिळाल्याप्रमाणें झालें व त्रिंबकजीस बाजीराव आपल्या स्वाधीन करीत नाहीं हें पाहून ह्या खुनांत बाजीरावही सामील असलाच पाहिजे असें इंग्रज उघड उघड ह्मणूं लागले. त्रिंबकजीस इंग्रजांचे स्वाधीन करणें ह्मणजे त्यानें खून केला हें मान्य करण्यासारखेंच होतें. आणि स्वाधीन न करावें

तरी हा आरोप चुकत नव्हता. अशा दुहेऱ्या अडचणींत बिचारा बाजीराव सांपडला! पुढें इंग्रजांनीं त्याच्यावर जबरदस्ती केल्यामुळें त्यानें त्रिंबकजीस इंग्रजांचें हवालीं केलें. इंग्रजांनीं त्यास ठाण्याच्या तुरुंगांत ठेवलें. तेथून सुमारें आठ महिन्यांनीं तो पळून आपला स्वामी जो बाजीराव त्याजकडे पुनश्च गेला. त्यामुळें 'त्रिंबकजीची सुटका खरोखर बाजीरावामुळेंच झाली व बाजीराव ज्याअर्थीं त्रिंबकजीचा मित्र त्याअर्थीं तो आमचा शत्रूच झाला' अशा तऱ्हेचा युक्तिवाद इंग्रज लढवावयास लागले. वस्तुतः त्रिंबकजीच्या पळण्याचा व बाजीरावाचा कांहींही संबंध नव्हता ह्या वेळेस बाजीरावास इंग्रजांनीं त्रिंबकजीस आपल्या स्वाधीन करण्यासच केवळ सांगितलें नाहीं; तर त्याचे पुरंदर आणि सिंहगड हे दोन किल्लेही आपणांकडे घेतले! आणि गायकवाडांच्या हिशेबाच्या बाबतींत स्वतःकडे वडिलकी घेऊन त्याचा निकाल आपणच करून टाकला! त्यांत असें ठरविण्यांत आलें कीं, 'बाजीरावानें गायकवाडास कांहींही मागूं नये, गायकवाडानें सालिना फक्त चार लक्ष रुपये बाजीरावास द्यावे व बाजीराव पूर्वीं तैनाती फौजेच्या खर्चाबद्दल २६ लक्ष रुपये इंग्रजांस देत असे तो त्यानें आतां ३४ लक्ष रुपये द्यावा!' गायकवाडाच्या हिशेबाच्या बाबतींत वस्तुतः बाजीरावावर इंग्रजांनीं ह्या अटी घालावयास नको होत्या. परंतु कोणत्याही उपायानें सावज घेरावयाचें हा निश्चय! वसईचा तह आतां आपोआपच मोडला गेला परंतु उघडपणें तो प्रथम बाजीरावानें मोडला कीं, इंग्रजांनीं मोडला हें वरील विवेचनावरून आपोआप सिद्ध होतें. पुष्कळ इतिहासकार हा तह मोडावयास बाजीरावास जबाबदार धरतात पण तें बरोबर नाहीं.

अशा तऱ्हेनें एकीकडे वसईचा तह बाजीरावास मोडावयास लावून दुसरीकडे सातारकर महाराजाशीं पेशव्याविरूद्ध संगनमत करण्याची इंग्रजांनीं खटपट चालविली, सातारकर महाराज छत्रपति प्रतापसिंह हे त्यावेळच्या सर्व मराठी राज्याचे प्रभू असून पेशवे खरोखर त्यांचें नोकर होते. व ह्या सेवकधर्माप्रमाणें इंग्रजांशीं युद्ध करावयाचे वगैरे बाबतींत तो छत्रपतीची परवानगी घेतल्याशिवाय कधीं राहिला नाहीं. छत्रपतीच्या दृष्टीनें जर त्याचें कांहीं चुकत असलें, तर त्याला शहाणपणाच्या दोन गोष्टी सांगण्याचा किंवा जागेवरून अजिबात काढून टाकण्याचा छत्रपतीस पूर्ण अधिकार होता. परंतु त्यांनीं हा अधिकार ह्यावेळीं अंमलांत तर आणला नाहींच पण आपल्या ह्या नोकराच्या विरुद्ध इंग्रजांस मिळण्याचा मात्र भ्याड-पणाचा बेत केला ! ह्या कामीं रंगो बापूजी गुप्ते नांवाचा फितुरी इसम मुख्य असून खंडेराव शिर्के, नरसू काकडा इत्यादि इसम त्याचे साथीदार होते. ह्या रंगो बापूजीनें रेसिडेंट एलफिन्स्टन आणि महाराज ह्यांचीं गुप्त पत्रें परस्परास गोसाव्याच्या रुपांत पोंचवावींत. असें करण्यामध्यें रंगो बापूजीस महाराजांपासून रोहिडखोऱ्यांतील देशमुखकुळकर्ण्यांचें वतन व इतरही अशाच स्वरूपाच्या लाभाची अपेक्षा होती. परंतु इंग्रजांच्या नादीं लागून जेथें खुद्द महाराजच फसत होते, तेथें हा रंगो बापूजी सारख्यास कसला फायदा होणार ? इंग्रजांनीं महाराजांना वचन दिलें कीं, पेशव्यांचा संपूर्ण नायनाट करून तुमच्या स्वाधीन सारी व्यवस्था करूं ! परंतु पेशवे पराजित झाल्यावर तें राज्य महाराजांच्या हातीं तर आलें नाहींच, पण महाराजांची जी जुनी ऐट होती तीहि

कायम राहिली नाहीं ! रंगोबापूजीसही अर्थात अत्यंत भणंग स्थितींत आणि विपदावस्थेंत मरावें लागलें ! १८१७ चा दसरा पुण्यास चांगला थाटाचा झाला व हाच सुमूहूर्त समजून पेशव्यानें इंग्रजां-विरूद्ध उघड फौज जमविण्यास सुरुवात केली. शिंदे, भोंसले इत्यादिकांकडेहि वकील रवाना करण्यांत आले. ह्या मोहिमेपूर्वी तत्संबंधींची कायदेशिर मंजूरी घेण्याकरितां बाजीराव छत्रपती महाराजास माहुली मुक्कामीं जाऊन भेटला व पुष्कळ बोलणें होऊन प्रतापसिंहांनीं बाजीरावास लढाईची परवानगी दिली परंतु बाजीराव तेथून परत फिरतो न फिरतो तोंच महाराष्ट्राच्या ह्या प्रभूनें ही बातमी ' अलपिष्टन बहादूर ' ह्यांस नेरून कळविण्यास बळवंतराव चिटणिस नांवाच्या एका इसमास आज्ञा केली ! × जेथील जबाबदार व्यक्तीच अशातऱ्हेचें वर्तन करावयास लागल्या तेथें परक्यांचें राज्य झाल्यास कांहीं नवल नाहीं !

बाजीरावासही आपल्या प्रभूच्या ह्या दुहेऱ्या वर्तनाचा संशय आला होता ह्मणून त्यानें ह्या लढाईत पुढें खुद्द महाराजांनाच बायकामुलांसह आपल्या बरोबर घेतलें होतें. महाराजांना उघडपणें पेशव्याच्या विरूद्ध जाण्याची हिंमत नव्हती. त्यामुळें नाखुषीनें कां होईना, पण त्यांना बाजीरावानें महाराजांच्या अधिकाराप्रमाणें व योग्यतेनुरुप त्यांची व्यवस्था ठेवली. त्यांचें कोणत्याही तऱ्हेनें कमी पडूं दिलें नाहीं. परंतु ही संधी साधून महाराजांना चीड आणण्याकरितां सर्व इंग्रज मुत्सद्यांनीं ' बाजीरावानें प्रतापसिंह महाराजांस कैद केलें व महाराज पेशव्यांच्या कैदेंत आहेत ' असा

× भारत इतिहास सं. मंडळ पु. १७. पा. २०.

डांगोरा पिटावयास सुरुवात केली! खरा प्रकार वस्तुतः असा नव्हता. राजनीतीच्या दृष्टीनेंही बाजीरावानें छत्रपतीस बरोबर घेतलें हें योग्यच केलें. ते बाजीरावाबरोबर नसते तर कदाचित् मराठी राज्याची इतिश्री लौकरच झाली असती! बाजीरावाचा सेनापती बापू गोखले होता. शिंदे भोंसल्याची मदत त्यास मिळाली नाहीं. बाजीरावाची फौज थोडी, विस्कळित आणि अगदी थोड्या दिवसांत तयार केलेली! फितुरीचाही बुजबुजाट खूप झालेला! अशा स्थितींत इंग्रजांसारख्या शिस्तवार फौजेशीं लढून जय मिळविणें शक्य नव्हतेंच. बाजीरावालाही हें समजत नव्हतें असें नाहीं परंतु मिळमिळीतपणें पारतंत्र्याच्या स्वातंत्र्यांत राहण्यापेक्षां एकदा सोक्षमोक्ष झालेला बरा; असा स्वाभिमानाचा विचार करूनच त्यानेंही लढाई आरंभिली! ह्या त्यांच्या दीप—पंतग न्यायाच्या भलत्या साहसाबद्दल अनेक इतिहासकार त्याची टवाळी करतात. परंतु तें योग्य नसून त्याचा हा स्वाभिमान व स्वातंत्र्यप्रियता ह्याबद्दल त्यास धन्यवादच दिले पाहिजेत. बाजीरावांत अनेक दोष होते पण ह्मणून त्याचा अपजय झाला येवढ्याच कारणाकरितां नाहीं तेही दोष त्याला चिकटवूं पाहणें हें सहृदयतेचें लक्षण खास नव्हें! एकंदर कार्याचें महत्व केवळ परिणामांवरूनच न ठरवितां कर्त्याच्या हेतूकडेही लक्ष द्यावें लागतें. आमच्या मतें बाजीरावाचें हें शेवटचें वर्तन अत्यंत बाणेदारपणाचें होतें. अस्तु. बाजीरावानें प्रथमच पुण्याजवळील खडकी गांवावर रेसिडेंटाच्या ठाण्यावर हल्ला केला परंतु त्यांत बाजीरावाचा पराभव झाला. व कर्नल स्मिथ ह्यानें पुणें काबीज केलें आणि १७ नोहेंबर १८१७ रोजीं पुण्यावर इंग्रजांचें निशाण फडकूं लागलें. ह्या लढाईंत

व्यक्तिशः बाजीरावानें भाग घेतला नव्हता. त्या वेळीं तो पर्वतीवर होता. लढाईंत पराभव झालेला पाहून तो २००० फौज व बापूगोखले इत्यादींना बरोबर घेऊन सासवडाकडे निघाला. स्मिथ साहेबानें पुणें घेतलें, पण पुण्यांतील लोकांस आपण अजून परतंत्र झालों असें वाटेना. अजूनही बाजीराव परत येतील असें त्यास वाटत होतें. बाजीरावाचा मुक्काम कोठें होता हें त्याच्या मागून गेलेल्या सरदारास देखील कळलें नाहीं ! मोठ्या मुष्किलीनें त्यांनीं त्यास सासवडावर गांठलें. सुमारें ६ महिनेपर्यंत बाजीराव इंग्रजांस झुकांडी देत देत आपल्या जागा बदलीत होता. व येवढें धुरंधर इंग्रजी सैन्य पण तेंही फसत होतें. त्याच्या ह्या कृतीस सर्व इतिहासकारांनीं ‘ पळ ’ असें नांव दिलें आहे. शक्य तो आपला जीव बचावून पुनः शत्रूवर चढाई करावी असें गनिमी काव्याचें लक्षण असतें ! मग बाजीराव पळाला असेंच कां ह्मणावें ? त्यानें मराठेशाहीचें आयुष्य टिकविण्याचा निदान लांबविण्याचा तरी प्रयत्न केला असें कां ह्मणूं नये ? परंतु अपजशी बाजीरावानें कांहीं केलें तरी जग त्यावर कसा विश्वास ठेवणार ? आणि तो ‘ पळाला ’ असें क्षणभर गृहीत धरून चाललें तरी त्यांत त्याची विलक्षण टवाळी करण्यासारखें काय आहे ?

ह्या सहा महिन्याच्या अवधींत खडकी, कोरेगांव आणि आष्टें ह्या तीन ठिकाणीं इंग्रज—मराठ्यांच्या लढाया झाल्या. ह्या युद्धास तोंड लागण्यापूर्वीं इंग्रजांनीं आणखी एक कारस्थान केलें. बाजीरावाच्या धन्यास ज्याप्रमाणें इंग्रजांनीं फितविलें त्याचप्रमाणें त्याचा धुरंधर सेनापती बापू गोखले ह्यासही फितविण्याचा इंग्रजांनीं प्रयत्न केला.

आणि ‘ लढाईचें वेळीं तुमची आमची दोस्ती लक्षांत असूं द्यावी ’ असा त्यास निरोप पाठविला ! परंतु बापु गोखले निमकहराम नव्हता. तो पक्का स्वामीनिष्ठ असून हाडानें पक्का महाराष्ट्रीय होता. त्यानें ‘ ह्या निरोपास उत्तर दिलें कीं, ‘ आपण ज्याचें पदरीं आह्मास ठेवले त्याचे इमानी इतबारी चाकरीवर प्राण गेला तर चिंता नाहीं. तूर्त त्याच्यांशीं बेईमानी केल्यास तुह्मी दौलत द्याल. परंतु लोकांचा अपवाद, आणि परलोक नाहीं. हें कार्य आमच्यानें होणार नाहीं...... स्वामी द्रोह आहे. आह्मी करून स्वप्राणानिशीं राहूं व त्यायोगानें दौलत मिळवूं............त्या पेक्षां जीवन माफक सन्मुख युद्धामध्यें सरकार कामावर आल्यास ( मरण पावल्यास ) श्रेयस्कर आहे ! ’ हें त्या थोर पुरषाचें उत्तर वाचून कोणाचें हृदय सद्गदित झाल्यावांचून राहील ? महाराष्ट्राच्या ह्या पडत्या काळांतही बापु गोखल्यासारखे बहादूर सेनापती होते ह्मणूनच इंग्रजांस किंचित्काल तरी दहशत बसली. आमच्या महाराष्ट्रीय इतिहासावर एकदम निष्क्रियतेचा शिक्का मारणाऱ्या लोकांनीं ह्या उत्तराचे निःसंशय मनन करावें ! १ जानेवारी १८१८ रोजीं कोरेगांवास लढाई झाली तींत इंग्रजाचा बराच नाश झाला. त्रिंबकजी डेंगळ्यानेंही बरा पराक्रम केला. या प्रवासांतही बाजीरावाबरोबर सातारकरमहाराज होतेच. परंतु प्रतापसिंहास बाजीरावापासून फोडावे ही इंग्रजांची इच्छा. ह्मणून स्मिथ साहेबानें १० फेब्रुवारी रोजीं साताराचा किल्ला घेतला. व महाराजांशीं दोस्ती दाखविण्याकरितां त्यावर आपलें आणि छत्रपतीचें अशीं दोन निशाणें लावलीं ! व असें जाहिर केलें कीं, ‘ पेशव्याचे राज्य खलासा करण्यांत येईल. पण महाराजांना मात्र त्यांच्या साताऱ्च्या गादीवर बसविण्यांत येईल !’

असें करण्यांत त्यानीं पेशवे व छत्रपती ह्यांना वेगवेगळे लेखून त्यांच्या राज्यमर्यादाही वेगवेगळ्या ठरविल्या ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. ही गोष्ट महाराजांस कळल्यावर त्यांना चुटपुट लागली. पुढें १० च दिवसांनीं ह्मणजे २० फेब्रुवारी रोजीं पेशवे व इंग्रज ह्यांच्या फौजांची आष्टें येथें गांठ पडून बापू गोखल्यानें पराक्रमाची शर्थ करून इंग्रजांना स्तंभित केलें! बापू गोखले धारातीर्थी पडला व त्यानें आपलें नांव अजरामर करून घेतलें! महाराजांना ह्या धावपळीचा कंटाळा असल्यामुळें ते इंग्रजांच्या स्वाधीन झाले. त्यांना साताऱ्या गादीवर बसविण्यांत आलें. बाजीराव मात्र तेथून झुकांडी देऊन गेला तो वऱ्हाडपर्यंत आला व पुष्कळ फिरला, त्याच्या सरदारांनींहि त्यास सोडलें व तो असहाय झाला.

दरम्यान इंग्रजांनीं पुण्याच्या लोकांस त्यांच्या रक्षणाचें आश्वासन दिलें होतें. तेथें अंदाधुंदी फार माजली. पुण्याचें लोक बाजीरावाची वाट पाहून पाहून थकले. बाजीराव हातांत आल्याशिवाय व त्याची कायदेशीर चौकशी झाल्याशिवाय इंग्रजांस पुणें शहराची कोणतीही व्यवस्था करतां येत नव्हती. बाजीरावाबरोबर त्याच्या प्रवासांत जें कांहीं सरदार होते ते व पुण्यांत स्थायी असलेले बाजीरावाच्या बाजूचे लोक त्याच्या पासून मनानें व शरीरानें अलग करावे अशा करितां इंग्रजांनीं आणखी एक गंमत केली. त्यांनीं साताऱ्या गादीवर महाराजांस बसविल्यानंतर त्यांच्याकडून मोबदला ह्मणून एक काम करून घेतलें. व ४ एप्रिल १८१८ रोजीं त्यांच्याकडून एक जाहिरनामा प्रसिद्ध करविला. त्यांत ‘ बाजीराव बंडखोर आहे. त्याचा आमचा कांहीं संबंध

नाहीं. त्याला आह्मीं कामावरून दूर केलें आहे. तरी त्याच्या नादीं कोणीही लागू नये ' अशा अर्थाचा नोटीसवजा मजकूर होता! महाराजांनीं हें लिहितांना यत्किंचितही विचार केला नाहीं. परंतु झालें तें योग्यच झालें असें ह्मटलें पाहिजे. कारण आतां राज्य टिकविण्याची जबाबदारी बाजीरावावर राहिली नसून छत्रपतीवर होती. परंतु राज्य टिकविण्याकरितां छत्रपतींनीं कांहींही प्रयत्न केले नाहींत. पुढें त्रासून जाऊन धोलकोट येथें १६ मे रोजीं बाजीराव इंग्रजांच्या हातीं लागला. आणि तो इंग्रजांच्या स्वाधीन न होतां परत पुण्यास गेलाही असता तरी त्याला ' पेशवा ' ह्मणून स्वतंत्र आस्तित्व राहिलें नव्हतें! तेंव्हा पेशवा नसलेल्या ' बाजीराव ' नांवाच्या ह्या एका खाजगी मनुष्यानें ' मी दक्षिणेंत कधींही जाणार नाहीं व मी किंवा माझे वारस पेशव्यांचे गादीवर किंवा मुलखावर हक्क सांगणार नाहींत. ' असा करार इंग्रजांना लिहून दिला व त्याची चौकशी होऊन त्याला ८ लक्षाची नक्त नेमणूक देण्यांत येऊन बिठूर उर्फ ब्रह्मावर्त येथें गंगाकिनारीं नेऊन ठेवलें! व अशा रीतीनें मराठेशाहीचा अंत झाला.

बाजीराव बिठूरास गेल्यावर इंग्रजांनीं पुण्यास आपली व्यवस्था केली व साऱ्या प्रजाजनांच्या सांत्वनाकरितां एक जाहीरनामा काढला. हा जाहीरनामा म्हणजे गोड भाषेचा एक नमुना आहे. ' आम्ही परोपकाराकरितां हें सगळें करीत आहोंत! आम्ही कोणाच्या वतनांत अगर जहागिरींत हात घालणार नाहीं. सर्वांना सारखा न्याय देण्यांत येईल.' ÷ इत्यादि मामुली गोष्टी त्यांत सांगितल्या आहेत.

÷ ह्या जाहीरनाम्यांसंबंधीं एक तत्कालीन लेखक म्हणतो:—

त्रिंबकजीस तुरुंगांत टाकण्यांत आलें व तो तेथेंच मेला. पेशव्यांचें राज्य खालसा झालें, परंतु प्रतापसिंहांस त्यांतलें कांहीं एक मिळालें नाहीं. महाराष्ट्राचा फार मोठा प्रदेश इंग्रजांनीं तोंडांत टाकला. व ह्या महाराष्ट्राच्या धन्यास सातारा गांव व आसपासचा मुलुख काय तो दिला! मराठेशाहीचा बळी घेतांना इंग्रजांनीं वचनांची उलट सुलट केली, करार करण्यांत गडबडगुंडा केला व विश्वास देऊन मातबर लोकांस फसविलें! केव्हां त्यांनीं पेशव्यास छत्रपतीचा नोकर ठरविलें तर केव्हां त्यांना परस्परांपासून स्वतंत्र ठरविलें! प्रतापसिंहांशींही इंग्रजांचें वर्तन अत्यंत अन्यायाचें झालें. असल्या विपदावस्थेंतही छत्रपती सरकार आपलें लुटपुटें राज्य अत्यंत इमानानें चालवीत असतां लवकरच इंग्रजांस त्यांच्याबद्दल संशय आला व त्यांना पदच्युत करण्यांत येऊन त्यांचीही रवानगी त्यांच्या नोकराप्रमाणेंच गंगाकांठीं काशीस करून देण्यांत आली! बाजीराव वऱ्हाडांत आला असतां त्याच्या मदतीस जाण्याबाबत नागपूरच्या भोंसल्यांनीं थोडासा प्रयत्न केला होता, परंतु इंग्रजांनीं त्यांचा तेथेंच पराभव करून तैनाती फौज त्यांच्या माथीं मारून त्यास हतप्रभ केलें.

---

'The object of all political manifestoes is to make out a case and this contains the British side of the question. *The other side is never publicly exhibited*; for the Native powers have yet to learn the practice of this *diplomatic weapon*.'

—Blacker's Maratha war, 1817-18-19, P. 254..

# मधलीं तीस वर्षें.

इंग्रजांनीं १८१८ त मराठेशाही घशांत घातली त्यावेळीं लार्ड हेस्टिंग्स हा गव्हर्नर जनरल होता. त्यानंतर १८४८ मध्यें लार्ड डलहौसी कामावर येईंपर्यंतच्या तीस वर्षांमध्यें सहा सात गव्हर्नर जनरल झाले. ह्या तीस वर्षांची संक्षिप्त हकीकत प्रस्तुत प्रकरणीं लिहिणें आहे. हेस्टिंग्स हिंदुस्थानांत येण्यापूर्वी शांततेचा मोठा भोक्ता होता. वेलस्लीनें हिंदुस्थानांत जो अधाशीपणा केला त्याबद्दल विलायतेंत असतांना ह्या हेस्टिंग्स बोवांनीं मोठें आकांत तांडव केलें होतें. इतकेंच काय पण त्यांच्यावर अधिकारी होऊन येण्याचा प्रसंग आला, तेव्हां प्रस्थान समयीं हे राजेश्री तर ह्या शांततेच्या शपथेनें बद्धपरिकरहि झाले होते. परंतु हिंदुस्थानास त्यांचा पाय लागला मात्र, तोच त्यांची तत्वनिष्ठा व बडबड जागच्या जागींच जिरली. आणि हिंदुस्थान म्हणजे इंग्लिश लोकांचें विस्तीर्ण आणि हक्काचें कुरण आहे, त्यांनीं तेथें अप्रतिबद्धपणें खुशाल चरावे, अशा तऱ्हेची मतधारणाच केवळ नव्हे तर कृतीही करावयास त्यांनीं सुरुवात केली. हिंदुस्थानच्या जमिनीचा गुणच असा असावा कीं, कोणासही तिची अभिलाषा उत्पन्न व्हावी. त्यांतल्या त्यांत इंग्रजासारख्या बुभुक्षितास तर ती विचारूंच नये. ह्या हेस्टिंग्स साहेबांनीं पेंढाऱ्यांचा बंदोबस्त केला आणि बहुतेक मराठी राज्यकर्त्यांना आपल्या ताटाखालचीं मांजरें बनवून सोडलें.

हेस्टिंग्स नंतर येणारे अधिकारी हे वेलस्ली किंवा डलहौसीच्या मानानें कमी महत्वाचे असले तरी एकंदरींत त्यांची जात

वरच्याहून भिन्न होती असें मुळींच नाहीं. क्लाइव्हनंतर वेलस्ली पर्यंत इंग्रजीराज्य सारखें उन्नतावस्थेंतच येत गेलें. आणि पहातां पहातां तें ' अणूपासूनि ब्रह्मांडा येवढें ' मोठें झालेलें दिसलें ! वेलस्लीला सार्वभौमत्व प्राप्त करून देणारा अशी मुळीं पदवीच आहे. परंतु वेलस्लीच्या वेळच्या सार्वभौमत्वास परस्पर संमतीचें स्थायी स्वरूप आलेलें नसल्यानें त्यांचे राज्यकर्त्यांशीं अनेक खटके उडाले. हें स्थायी स्वरूप डलहौसीच्या वेळीं प्राप्त झालें असें ह्मणावयास हरकत नाहीं. हेस्टिंग्सपर्यंत इंग्रजांनीं हिंदुस्थानांतल्या अंतर्भागांतील सत्ताधाऱ्यांशींच फार झटापटी केल्या परंतु सरहद्दी पक्क्या ठरून तेथील रक्षणाचा पक्का बंदोबस्त झाल्याशिवाय ह्या मधल्या सत्तेला फारशी किंमत नसते. ह्मणून ही सरहद्द ठरविण्याच्या व वाढविण्याच्या मार्गास इंग्रज मुत्सद्दी लागले. आणि हाच हेतू पुढें ठेवण्यांत येऊन पंजाब, नेपाळ, ब्रह्मदेश, अफगाण, सिंध, इत्यादींशीं इंग्रजांचीं युद्धें झालीं. हीं सर्व युद्धें निरानिराळ्या वेळीं झालीं. ह्या सर्व युद्धांचा इतिहास लक्षांत घेतां असें दिसतें कीं, हीं युद्धें करणें इंग्रजांना अपरिहार्य मुळींच झालें नव्हतें. ' येन केन प्रकारेण ' कोठें तरी आपला पाय शिरकवावा, एकाला गादीवरून काढ दुसऱ्याला बसव, दुसऱ्याला काढ तिसऱ्याला बसव, ह्याच्यावर आरोप कर आणि त्याला हातांशीं घे; इत्यादि प्रकार इंग्रजांचें सर्व ठिकाणींच दृष्टीस पडतात ! त्याचप्रमाणें वरील युद्धांत प्रकार झाले. मात्र त्यामुळें इंग्रजांच्या इच्छेप्रमाणें त्यांच्या मर्यादा पक्क्या झाल्या व आसेतुहिमाचल सर्व हिंदुस्थान त्यांच्या ताब्यांत आल्यासारखें झालें. हिंदुस्थानांत राज्य-वर्धन करतांना इंग्रज येथील भौगोलिक मर्यादांकडे फार लक्ष देत.

एखाद्या राजास ग्रासावयाचें असलें तर शक्य तोंपर्यंत ते त्याच्या शेजारापर्यंत आपला व्याप वाढवीत, किंवा त्या बिचाऱ्याला दोन्हीं बाजूंनीं घेरून टाकीत. व अशा तऱ्हेनें तो चेपला गेला म्हणजे सहजच त्याचा नायनाट होई. एखाद्यानें इंग्रजास मित्र म्हटलें कीं, त्यानें तें वचन आजन्मच नव्हे तर वंशपरंपरा पाळलेंच पाहिजे असा इंग्रजांचा मोठा कटाक्ष असे. ह्या मित्रानें किमपीहि इंग्रजांविरुद्ध वर्तन केलें कीं, त्या मैत्रीचें रुपांतर एकदम भयंकर शत्रुत्वांत होऊन जात असे. १८२६ मध्यें लार्ड अम्हर्स्टच्या वेळीं जाट लोकांचें इंग्रजांशीं युद्ध झालें तें अशाच मासल्याचें होतें. अस्तु.

लहान लहान राज्यें कोणत्यातरी निमित्तानें खालसा करीत असावे, स्वस्थ बसूं नये; हा महामंत्र वेलस्ली साहेबांनीं उत्तम तऱ्हेनें इतर इंग्रज मुत्सद्यांस स्वकृतीनें पटवून दिला होता! हाहि यज्ञ ह्या तीस वर्षांत कांहीं बंद पडला नाहीं. ह्या बाबतींत १८२८ ते १८३५ च्या दरम्यान गव्हर्नर जनरलच्या जागेवर असलेल्या लार्ड वुइल्यम बेंटिंकचें नांव प्रमुखत्वानें घेण्यांत येतें. इंग्रज हिंदुस्थानांत आले तों ते स्वतःस हिंदुस्थानांतील लोकांपेक्षां ज्ञानी आणि वडीलच समजूं लागले. आणि येथील लोकांच्या खाजगी अगर सार्वजनिक कारभारांत हात घालण्याचा आणि शहाणपणा शिकविण्याचा आपल्यास जन्मसिद्ध हक्कच आहे, असें ते समजूं लागले. असा आपल्या कर्तबगारीचा आत्मविश्वास असणें ही गोष्ट अभिनंदनीय खरीच! आपण सार्वभौम आहों, अशा समजुतीनें ते हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांची काळजी घ्यावयास लागले खरें, पण ती येथील राज्यकर्त्यांनीं कां घेऊं द्यावी? त्यांना त्यांच्या परोपकाराचा

एकदम विश्वास पटेना, आणि हे कोणी तरी लफंगे लोक आपणास नागविण्याकरितांच आले आहेत अशी येथील राजांची समजूत होऊं लागली, त्यामुळें अनेक भानगडी उपस्थित झाल्या. राजपुताना आणि मध्य-हिंदुस्थान येथें आतांप्रमाणेंच पूर्वींहि देशी राज्यकर्त्यांची गर्दी होती. ह्या संस्थानांपैकीं, जोधपूर, ग्वाल्हेर, इंदूर, बडोदें, भोपाळ आणि दक्षिणेंत म्हैसूर इतक्या ठिकाणीं बेंटिकच्या कारकीर्दींत भानगडी उद्भवल्या. व इतक्याही ठिकाणीं कोणास तरी पदच्युत करून दुसऱ्यास गादीवर बसविलें; किंवा स्वतःकडे कांहीं काल व्यवस्था घेतली. त्याचप्रमाणें काचार आणि कुर्गप्रांत येथील राज्यें खालसा करण्यांत आलीं. पैकीं काचारचें राज्य वारसांच्या अभावीं खालसा करण्यांत आलें. कोणास वारस नसला कीं, त्याचे वारस इंग्रजच होत असत ! व एखाद्या औरस संतति नसलेल्या राजानें दत्तक घेण्यापूर्वीं किंवा नंतरही इंग्रजच त्या राजास त्याच्या राज्यासकट नेमणुकीचा मोबदला देऊन दत्तक घेऊन टाकीत ! बेंटिक साहेबाच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत विद्या-दानास सुरुवात झाली. ह्यावेळीं इंग्रज मुत्सद्यांनीं कोणती दिशा स्विकारली व तिचा हेतू काय होता इत्यादींचें विवेचन पुढें एका स्वतंत्र प्रकरणीं करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें सतीचा बंदोबस्त, ठगीचा नायनाट इत्यादि चांगली म्हणविलीं जाणारीं कामेंहि त्याच वेळीं करण्यांत आलीं !

१८४३ त लार्ड एलनबरोच्या वेळीं इंग्रजांचें शिंद्यांशीं एक युद्ध झालें होतें. त्यांतील परोपकार तर अत्यंत मासलेवाईक आहे ! ह्यावेळपर्यंत ग्वाल्हेरच्या गादीवर असलेला जानकोजी शिंदे १८४३ त

निपुत्रिक मरण पावला व त्याच्या अल्पवयी विधवेनें जयाजीराव नांवाच्या एका लहानमुलास दत्तक घेतलें. ह्या रियासतीचे मालक अशा तऱ्हेनें अल्पवयी असल्यामळें त्या राज्यांत कोठेशी गैरव्यवस्था झाल्याचें इंग्रजांस आढळून आलें ! त्या बरोबर ह्या धर्मावतारांनीं आपली फौज शिंद्यांना शासन करावयास त्यांच्या राज्यांत तावडतोब पाठविली ! आणि महाराजपूर व पन्यार ह्या गांवीं लढाया होऊन शिंद्यांचा पराभव झाला. व बिचाऱ्या शिंद्यास इंग्रजांशीं तह करावा लागला. त्या तहाअन्वयें ह्या लढाईंत इंग्रजांना आलेला सर्व खर्च शिंद्याकडून भरून घेण्यांत आला. जणूं कांहीं ही लढाई शिंद्यांच्या उपकारास्तवच करण्यांत आली होती ! त्याचप्रमाणें शिंद्याची फौजही कमी करण्यांत येऊन महाराणीला तीन लाख रुपये नेमणूक देऊन स्वस्थ बसण्यास सांगण्यांत आलें ! ही लढाई करण्यांत इंग्रजांचा हेतू काय हें लढाईचा परिणाम पहातां तावडतोब कळून येतें. इंग्रजांना खरोखर हिंदी राज्यकर्त्यांची फौज शक्य तो कमी करून त्यांना निर्बल करून टाकावयाचें होतें. अशा तऱ्हेनें त्यांना निर्बल केल्याशिवाय इंग्रजांचें राज्य निष्कंटक होणारें नव्हतें. परंतु हें युद्ध करतांना गव्हर्नर जनरलनें आपल्या ह्या हेतूचें कोठेंही उद्घाटन केलेलें दिसत नाहीं. उलटपक्षीं आपल्या परोपकाराची फुशारकी मात्र मारली आहे ! शिंद्याच्या राज्यांत गैरव्यवस्था माजली आणि ती मोडून टाकण्याची इंग्रजांची खरोखरच मनापासून इच्छा होती, असें क्षणभर गृहीत धरून चाललें तरी समोपचारानें त्यांना ती मोडतां आली नसती असें नाहीं. ह्याकरितां अगाऊ सूचना देखील न देतां एकदम लढाई करावयास प्रवृत्त होणें हा निव्वळ

आततायीपणा झाला! आणि असल्या आततायी माणसास कोणतें शासन करावें हें आमच्या संस्कृत शास्त्रकारांनीं चांगलें सांगून ठेवलें आहे. परंतु ह्या आततायी माणसांचा जोर ह्यावेळीं इतका होता कीं शिंद्यांच्या फौजेस हात टेकणें भाग होतें. शिंद्यांच्या राज्यांत गैरव्यवस्था होण्यास जर अल्पवयी राणीच कारणीभूत होती तर फक्त तिचा बंदोबस्त केला असता तर भागण्यासारखें होतें. परंतु तसेंच केवळ न करतां मुद्दाम फौज कमी करण्यांत आली. ह्यावरून इंग्रजास राणी ह्या व्यक्तिपेक्षां शिंद्यांच्या फौजेचीच विशेष भीति वाटत होती हें सिद्ध होत नाहीं काय? पण ह्या युक्तिवादाचा आतां काय उपयोग? इंग्रजांना अक्कल होती ती त्यांनीं उपयोजिली—त्यांना शिव्याशाप देण्याचें काम केवळ आपणांकडे उरलें आहे!! एल्‌नबरोची हिंदुस्थानांतील पहिलीच बोहनी होती. परंतु असल्या तऱ्हेच्या व्यापारानें दुकान चालण्याऐवजीं त्याचें दिवाळेंच वाजण्याचा संभव विशेष असें जाणून विलायतेच्या अधिकाऱ्यांनीं ह्या उपाधखोर माणसास लवकरच परत बोलावून घेतलें!

येणें प्रमाणें ह्या तीस वर्षांत अनेक युद्धें झालीं. ह्या युद्धांबरोबरच आम्हीं कोणत्याही धर्माच्या लोकांस कसलाच उपसर्ग पोचूं देणार नाहीं असें तोंडानें म्हणत म्हणत ख्रिस्ती मिशनऱ्यांना रान मोकळें सोडण्यांत आलें. पूर्वींपासून ख्रिस्ती मिशनरी हिंदुस्थानांत येण्याची इच्छा करीत होते. व कांहीं आलेंही होते. त्यांच्या येण्याचा परिणाम काय झाला तें पुढें विवेचूं. ह्या तीस वर्षांतील दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे चहाच्या मळ्याची निपज होय! बेंटिंकच्या कारकीर्दींत यूरोपियन लोकांस हिंदुस्थानांत जमीन

खरीद करण्यास व शेती वगैरे करण्यास परवानगी देण्यांत आली. त्याबरोबर अनेक बुभुक्षित इंग्रजांनीं चहाच्या मळ्याचा व्यापार सुरू केला. आणि तेव्हांपासूनच हिंदुस्थान ह्या गढूळ पाण्याच्या पुरांत वाहून जावयास सुरुवात झाली !

रुक्ष मरुभूमीवर ज्याप्रमाणें क्वचित् एखादें डबकें दृष्टीस पडावें त्याप्रमाणें ह्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या राजवटींतही क्वचित् मेट्काफ् सारखा महाभाग दृष्टीस पडतो. मेट्काफ्ची नेमणूक १८३७ त गव्हर्नर जनरल म्हणून केली होती. परंतु ह्यानें हिंदुस्थानच्या लोकांस छापखानें व वर्तमानपत्रें काढून वाटेल तें लिहिण्याची परवानगी दिली ! त्याबरोबर हीं राज्य करण्याची लक्षणें नव्हेत, असें जाणून बिचाऱ्यास राजिनामा द्यावयास भाग पाडण्यांत आलें ! सारांश त्या काळचा आणि हल्लींचाही कालमहिमाच असा कीं, चांगला माणूस म्हणून टिकूंच नये आणि वाइटच टिकावा ! वर्तमानपत्राच्या रुपानें हिंदुस्थानच्या लोकांस तोंड फोडलें तर इंग्रजांचें अन्याय चव्हाट्यावर येतील ह्याची काय वाट ? अत्यंत अन्यायी आणि अपराधी माणसासही आपलीं पापें चव्हाट्यावर येऊं नये व आपल्या सोंवळेपणाचेंच प्रदर्शन व्हावें अशी इच्छा असते. परंतु पापाचा पायगुणच असा कीं, तें कधीं गुप्त राहूं शकत नाहीं. आणि जों जों तें गुप्त राखण्याचा प्रयत्न करावा तों तों आणखीच पापें होत जातात. एक पाप झांकण्याकरितां दुसरें व दुसरें झांकण्याकरितां तिसरें अशी पापांची परंपरा असते. व ह्या पापी परंपरेवर उभारलेल्या इमारती बिनपायावर उभारलेल्या इमारतीं सारख्याच अशाश्वत असतात ! अस्तु.

# चाळीसपूर्वीच्या घडामोडी !

हार्डिंजपर्यंतचा काळ आटोपला. हिंदुस्थानांत आतां इंग्रजी सत्तेसारखी प्रबळ आणि मोठी सत्ता एकही नव्हती. अनुभवानें आणि कांहींसें भितीनें येथील देशी राजेही ' इंग्रज हे सार्वभौम अतएव आपले धनी आहेत, आतां त्यांच्या मुद्रेकडे पाहूनच आपली मुद्रा बदलविणें भाग आहे ' अशा तऱ्हेची खूणगांठ बांधावयास शिकले होते. इंग्रजांनीं प्रत्येक राजदरबारीं आपला रेसिडेंट ठेवलाच होता. रेसिडेंट ह्मणजे संस्थानिकांच्या डोक्यावर जुलमाची लटकलेली तरवारच असतो. बिचाऱ्या राजेलोकांना कोणतींही कामें आपल्या मुखत्यारीनें करतां यावयाचीं नाहींत. त्यांची शेंडी सारी अधिकाऱ्यांच्या हातांत ! इंग्रजांनीं हे जे रेसिडेंट नेमले होते ते आपल्या कामांत कधींही कुचराई करीत नसत. त्याचें काम संस्थानिक राजेलोकांसंबंधींच्या खऱ्या खोट्या बातम्या वरिष्ट अधिकाऱ्याकडे पाठविण्याचें असे. बाह्यतः सर्व संस्थानिक इंग्रजांच्या ताब्यांत आले होते खरे, पण म्हणून त्यांच्यापासून इंग्रजांना त्रास पोंहचत नव्हता असें नव्हे. प्रत्येकाची स्वतंत्र व्यवस्था ठेवावयाची व प्रत्येकाशीं वेगवेगळ्या भानगडी उपस्थित करावयाच्या ह्यांत इंग्रजांना सहाजिकच त्रास वाटूं लागला. प्रत्येकाला वेगवेगळा शिधा देऊन त्यांच्या कडून वेगवेगळा स्वयंपाक करून घेण्यापेक्षां एकच मोठा स्वयंपाक करून सर्वांना एकाच मोठ्या पंक्तीस बसविणें सोईवार पडतें. असें करतांना प्रत्येकाला आपल्या आवडीनावडीप्रमाणें स्वतंत्र अति व

उरत नाहीं हें खरें आहे; पण त्याकडे यजमानानें लक्ष तरी कां द्यावें? अशाच तऱ्हेची स्थिती संस्थानिकांच्या बाबतींत इंग्रजांची झाली होती. वारन हेस्टिंग्स, वेलस्ली आणि बेंटिंक ह्यांनीं आपआपल्या परी ह्या लोकांना गट्ट करून टाकलें होतेंच. परंतू सर्पसत्रांतूनही उरलेल्या अनेक सर्पांप्रमाणें अजूनही पुष्कळ लहान राज्यें जिवंत होतींच. तेव्हां एखादा आस्तिक उत्पन्न होण्याचपूर्वींच वरील लोकांना समूळ खाऊन टाकणारा जनमेजय उत्पन्न करणें इंग्रजांना भागच होतें. आणि मुख्यत: ह्याच कारणाकरितां ग. ज. चे जागेवर लॉर्ड डलहौसी ह्या पुरुषाची नेमणूक झाली.

डलहौसी हा शरीरानें नाजूक पण बुद्धीनें हुशार आणि काम करण्यांत पटाईत होता. आपल्या वयाच्या ३५ वर्षें पर्यंत इंग्लंडांत जबाबदारीचीं कांहीं कामें केल्यानंतर नेमणूकीप्रमाणें १२ जानेवारी १८४८ रोजीं तो कलकत्त्यास येऊन पोंचला. त्याची कारकीर्द आठ वर्षें झालीं. परंतू ही आठ वर्षें ह्मणजे वादळाची पूर्व घटनाच होती. अनेक दिवस खावयास न मिळालेला वनराज आपल्या भक्षावर तुटून पडावा त्या प्रमाणेंच डलहौसीही हिंदुस्थानावर तुटून पडला होता! त्यानें इंग्रजी राज्याची सुरु झालेली इमारत जवळ जवळ कळसास पोंचविली, बेंटिंकच्या वेळच्या सीमा पक्क्या केल्या, पंजाब सबंध घशांत घातला आणि आगगाडी तारायंत्रादिक आधुनिक सुधारणांची सुरुवात करून त्यानें हिंदुस्थानच्या पारतंत्र्यांत भर घातली! डलहौसी साहेबाचें वर्तन अत्यंत अमानुष होतें. असें नसतें तर त्याच्या कामास ताबडतोब १८५७ च्या स्फोटासारखीं जालीम फळें आलींच नसतीं.

डलहौसी साहेबाच्या कर्तृत्वास सुरुवात पंजाबपासूनच झाली. हार्डिंज साहेबाच्यावेळीं इंग्रजांचें शीख लोकांशीं युद्ध झालें होतें. व युद्धानंतर ठरलेल्या तहाप्रमाणें पंजाबप्रांत रणजितसिंगाचा मुलगा धुलिपसिंग ह्याच्याकडे आला होता. व तो अल्पवयी असल्यामुळें कारभार त्याची आई व रेसिडेंट लारेन्स हे पहात असत. अर्थात पंजाब प्रांत हा इंग्रजांचा मांडलिक झाला. वरील तहाबरहुकूम हा असा हक्क मिळतांच, त्याला पुरताच घशांत घालावा अशी इच्छा इंग्रज मुत्सद्यास उत्पन्न झाली. पंजाबप्रांत आपल्या संपूर्ण ताब्यांत असावा अशी इच्छा इंग्रजांच्या मनांत फार दिवसांपासून होतीच. सदर प्रांत ताब्यांत आल्यानें अनेक गोष्टी साधतां येण्यासारख्या होत्या. लष्करीदृष्टया हिंदुस्थानचें संरक्षण करण्यास हा भाग अवश्यमेव ताब्यांत पाहिजे. वायव्य दिशेकडील मुसलमानी राष्ट्रांपासून किंवा वरील रशियादिक प्रबळ राष्ट्रांपासून संरक्षण करून घेण्याचा पुढें मागें प्रसंग आल्यास, त्याकरितांही पंजाब ताब्यांत असणें जरूर होतें. अशा तऱ्हेचीं अनेक कारणें तत्कालीन अनेक ब्रिटिश लेखकांनीं दिलेलीं आहेत. हे सर्व खरें, तरी निमित्त उत्पन्न झाल्याशिवाय किंवा केल्याशिवाय कांहीं करतां येणें शक्य नव्हतें. शेवटीं तसलें निमित्त मिळालें. मुलतानप्रांत हा पंजाबमध्यें मोडत असे. त्या प्रांतावरील सुभेदार हा अर्थातच पंजाबचा ह्मणजे पर्यायानें इंग्रजांचाही मांडलिक झाला होता. ह्या प्रांतावर सावनमल नांवाचा सुभेदार होता. तो १८४४ त मरण पावल्यावर त्याचा मुलगा मूलराज कारभार पाहूं लागला. परंतु त्यावेळीं त्यानें पंजाब दरबारास द्यावयाचा नजराणा दिला नाहीं. पूर्वीपासून तो

पंजाबसरकारास फार मोठी खंडणी किंवा कर देत असे. परंतु पुढें हार्डिंजच्या वेळीं झालेल्या युद्धापासून उद्भवलेल्या अव्यवस्थित परिस्थितीचा फायदा घेऊन त्यानें आपली खंडणीहि देण्याची टाळाटाळी केली. ह्या कामाचा वस्तुतः धुलिपसिंगास राग यावयाचा तो एकीकडेच राहून लारेन्स साहेबानेंच रागाचें अवसान आणलें; व मूळराजास त्याच्या कारभाचे हिशेब मागितले. मूळराजाचें वजन आणि दर्जा एखाद्या राजासारखाच असल्यामुळें त्यास त्या मागणींत अपमान वाटून त्यानें ती नाकारली. लारेन्स साहेबांनीं कामाचा राजीनामा द्यावयास त्यास जबरदस्तीनें भाग पाडलें ! मूळराज हा पंजाबच्या प्रजेला अत्यंत आवडत असल्यामुळें त्यांना इंग्रजांचा अत्यंत राग आला. इंग्रजांनीं मुलतानवर खानसिंग नांवाच्या एका माणसाची सुभेदार म्हणून नेमणूक केली. व बरोबर व्हॅन्स ॲग्न्यू व अंडरसन नांवाचे दोन इंग्रज गृहस्थ दिले. प्रस्तुत नवे सुभेदार व त्याचे साथीदार मुलतानला गेले. व मूळराजानेंही किल्ला त्याच्या स्वाधीन केला. परंतु इंग्रजांनीं आपला प्रिय सरदार काढून देऊन ह्या भलत्या पराधर्मियांची येथें स्थापना केली, ह्याबद्दल राग येऊन सदरील दोघाही गोऱ्या गृहस्थांना किल्ल्यांतील लोकांनीं ठार मारलें ! हा पेटलेला वणवा इंग्रज तावडतोब शांत करूं शकले नसते असें नाहीं. परंतु तो तावडतोब शांत केला असता तर पंजाबप्रांत गिळावयास कसा मिळता ? इंग्रजांनीं हा वणवा बुद्धिपुरःसरच विझविला नाहीं ! ÷

---

÷ The British Indian authorities were not honest in their professions. They wanted to

किंबहुना लोकांना आपल्या विरुद्ध बिथरविण्याची मात्र खटपट केली ! ह्या अनुरोधानें पुढें थोड्याच दिवसांत पंजाबच्या लोकांत ' इंग्रज आपलें राज्य घेणार ' अशा साधार बातम्या पसरल्या ! कारण त्या तऱ्हेच्या अनेक घटना पंजाबांत प्रत्यहीं होत असत. ह्या समजुतीमुळें आणि कोणाच्या ना कोणाच्या प्रेरणेनें सर्व लोक इंग्रजाविरुद्ध बिथरले. राणीही इंग्रजांविरुद्ध असल्याची लॉरेन्स व डलहौसी साहेबांस बातमी लागली ! तेव्हां डलहौसी साहेबास ही सुसंधी प्राप्त झाल्याप्रमाणें वाटून त्यानें महाराणीस पकडून काशीस नेऊन तुरुंगांत ठेऊन दिलें ! व फौज पाठवून मुलतानचा किल्ला घेण्यांत आला. शिखांचें सैन्य शेरसिंगाच्या हाताखालीं तयार होतें. त्यांनीं इंग्रजांचें बरेंच नुकसान केलें. परंतु शेवटीं इंग्रजांनाच जय मिळाला. मूळराज आणि शेरसिंग दोघेही ताब्यांत आले. अशा तऱ्हेनें युद्धाचा शेवट झाला ( २७ फेब्रुवारी १८४९. ) महाराणीस काशीस नेलें तें अत्यंत अपमानानें आणि तेथें वागविलें तेंही राजस्त्रियेस किंबहुना कोणत्याही हिंदुस्त्रियेस शोभणार नाहीं अशा तऱ्हेनें ! तिला कोणासही भेटतां येत नसे. सर्व व्यवहार करावयाचे ते ग. ज. च्या एजंटामार्फत ! राणीच्या विरुद्ध तिला

---

swallow up the Punjab and hence they did not try to nip the Multan revolt in the bud."

—Rise of the Christion Power in India.

by B. D. Basu.

Vol. V P. 239.

पकडण्यायोग्य कोणताही कायदेशीर पुरावा सांपडला नव्हता. ह्याबद्दल आधार भरपूर आहेत. × परंतु असें असतांही एका इंग्रजी लेखकानें 'मोठ्या मानसन्मानानें राणीस नेण्यांत आलें' असें मोठ्या ऐटींत लिहिलें आहे. + कैद करून नेत असतां कितीहि सुखांत नेलें तरी तो कशाचा मान आणि सन्मान ! मानसन्मानाच्या कल्पना वेगळ्या आहेत. ज्या क्षणीं राणीस लाहोरहून हलविलें त्याच क्षणीं इंग्रजांनीं तिची अब्रू घेतली ! नंतर कितीही मानसन्मान ठेवून मलमपट्टी केली तरी ही गेलेली अब्रू कशी परत मिळणार ?

हें युद्ध झाल्यानंतर डलहौसी साहेबांनीं फर्मान काढून पूर्ण पंजाबप्रांत खालसा करून ब्रिटिश राज्यास जोडल्याचें जाहिर केलें व धाकट्या धुलिपसिंगास त्याच्या प्रियतम हिंदुशीख धर्मापासून वंचित करण्यांत येऊन ख्रिस्ती बनविण्यांत आलें ! इतकेंच काय पण त्याला त्याच्या प्रिय हिंद देशांतूनही हद्दपार करून इंग्लंडांत नेऊन ठेवलें !! तेथें त्याला सालिना पांच लक्षांची नेमणूक दिली. धुलिपसिंगाच्या आईस मात्र त्याच्याबरोबर पाठविण्यांत आलें नाहीं. इंग्रजांनीं ह्या मायलेकराची ताटातूट केली आणि इंग्लंडवेलसच्या

---

× उदा० पहा R. of the C. P. in India Vol. V P. 240.

+ The Sikh queen Mother..........had been *respectfully*, removed from Lahore to the distant sacred city of Benares.

Dalhousie's Work in India
by W. W. Hunter P. 72.

दीडपट मोठा पंजाबप्रांत आपलासा केला ! शीख फौजांचीं हत्यारें काढून घेण्यांत येऊन त्यांना रजा देण्यांत आली. सारांश हा पंजाबप्रांत ताब्यांत घेतांना मूळपासूनच कारस्थानें झालेलीं आहेत. ह्यांत झालेलें युद्ध तर जाणून बुजून इंग्रजांनीं उत्पन्न केलें आहे ! परंतु असल्या तऱ्हेचें प्रयोग करून पाहण्यांत इंग्रजांच्या पदरचें कांहीं खर्च होत नसे. दोन्ही बाजूंनीं लढणाऱ्या फौजा बहुतांशीं हिंदीच असत. अपजय येऊन जिवावर बेतलीच तर हिंदी लोकांच्याच ! आणि जय आला तर त्याचा फायदा मात्र स्वतःस होणार ! पैसा लागावयाचा तोही कांहीं इंग्लडांतून आणावयाची जरूर नव्हती ! पंजाबप्रांत खालसा करण्याची वर जीं अनेक कारणें दिलेलीं आहेत त्यांतच दुसऱ्या एका लेखकानें 'आमच्यांत शक्ति असल्यामुळें, पंजाब ताब्यांत घेण्याचा आमचा हक्कच आहे' ! असल्या तऱ्हेचें, 'बळी तो कान पिळी' चें तत्व सांगितलें आहे !÷ असें सांगण्यांत हा लेखक अगदीं खरें बोलला ह्यांत शंका नाहीं ! बाबांनों, 'बळी तो कान पिळी' हें तत्व जर खरें आहे व ह्या तत्वाबरहुकूम जर तुमचे व्यवहार होतात तर नीति, न्याय आणि परोपकार इत्यादि आत्मश्लाघेच्या गप्पा तरी कशास मारता ?

---

÷ People begin to discover that, in a country where from time immemorial might is right, *we having the greatest might have also the best right........it has become our duty as well as our right to hold.*

Letter from Sir G. Campbell
to Dalhousie.

'वळी तो कान पिळी' चा न्याय तुम्हांस माहित आहे आणि जगतास तो माहित नाहीं असें तुम्हीं समजतां काय? मग मुद्दाम आठवण देऊन जखमेवर मीठ कां बरें घालतां? आज तुमची चलती आहे म्हणून मस्तपणानें तुम्ही लिहूं बोलूं शकता. पण उद्यां हिंदुस्थाननें शक्ति प्राप्त केल्याबरोबर तसलाच शक्तीचा प्रयोग तुमच्यावर करण्याचे कांहीं माथेफिरूंनीं खरोखरच मनांत आणलें तर तुमची काय दशा होईल ह्याचा कांहीं विचार केला आहे काय? मग मुद्दाम हात दाखवून अवलक्षण करण्यांत काय अर्थ आहे? अस्तु.

ह्यानंतर डलहौसी साहेबांनीं नेपाळजवळील सिकिम संस्थानचा वरील प्रमाणेंच बंदोबस्त केल्यानंतर हिंदुस्थानांतील अग्नेय दिशेकडील सरहद्द पक्की करण्याकरितां ब्रम्हदेशकडे आपली दृष्टि वळविली. ॲम्हर्स्टच्या वेळीं १८२५ मध्यें ब्रम्ही लोकांशीं इंग्रजांचें युद्ध झालें होतें. त्यांतील तहान्वयें इंग्रजांनीं आपला रेसिडेंट ब्रम्हदेशांत पाठविला. तेथें १८३७ त थरवादी नांवाचा राजा गादीवर बसला. त्याला इंग्रजांशीं संबंध ठेवणें अगदीं आवडत नव्हतें. त्यामुळें तेथें रहाणाऱ्या रेसिडेंटास स्वतःचा जीव धोक्यांत असल्यासारखा वाटे. पुढें चार वर्षांनीं तर ह्या राजानें रेसिडेंट अजिबात काढूनच टाकला. तीन चार वर्षें अशीं गेलीं व पुढें थरवादी राजा मारला गेल्यावर त्याचा मुलगा गादीवर बसला. हिंदुस्थानांतील इतर भागांप्रमाणेंच इंग्रज व्यापाऱ्यांचा प्रवेश ब्रम्हदेशांतही झालाच होता. विशेषतः पेगू प्रांतांत सोन्याच्या खाणी वगैरे असल्यामुळें त्या प्रांतावर इंग्रजांचा लोभ तर अतिशयच

जडला ! तेव्हां तिकडील सरहद्द पक्की करण्याच्या व समुद्रसान्निध्याच्या दृष्टीनें जसा तो प्रांत ताब्यांत असावा त्याप्रमाणेंच ह्या सुवर्ण लोभास्तवही तो ताब्यांत असावा अशी इच्छा डलहौसी साहेबाच्या मनांत उद्भवल्यास आश्चर्य नाहीं. परंतु युद्धाशिवाय केवळ कागदी घोडे नाचवून हा प्रांत आपणांस मिळत नाहीं हेंही डलहौसीनें ओळखलें. तेव्हां पंजाबप्रमाणेंच मुद्दाम युद्ध करण्याच्या प्रयत्नास इंग्रज मुत्सद्दी लागले. सामान्यतः त्या वेळच्या हिंदुस्थानांतील सर्वच इंग्रज लोकांची विजीगिषुत्वामुळें चढेलपणाची भावना झाली होती. त्यामुळें त्यांच्या हांतून सहज लीलेनेंही माजोरीपणाची कृत्यें होऊन जात. त्या प्रमाणेंच ब्रह्मदेशांत रहाणाऱ्या शेफर्ड नांवाच्या एका इंग्रज व्यापाऱ्यानें एका ब्रम्ही खलाशाचा खून केला ! कदाचित् तो भावी कार्यसाधनाच्या दृष्टीनें डलहौसीच्या अंतस्थ प्रेरणेवरूनही करण्यांत आला असावा ! इतरही व्यापारी अशींच लहानमोठीं कृत्यें करूं लागले. तेव्हां ही माजलेलीं लक्षणें बंद करण्याकरितां रंगूनच्या गव्हर्नरनें शेफर्डचा ९९९ रुपये दंड केला. ह्यांत न्यायदृष्टीनें कांहींही वाईट झालें नाहीं. परंतु एका इंग्रज व्यापाऱ्याचा अपमान आणि तोही हिंदुस्थानांत ! ! ह्याचा बंदोबस्त अवश्य केला पाहिजे असा डलहौसीनें विचार करून त्या रंगूनच्या अधिकाऱ्याकडून त्यानें नुकसान भरून मागितलें व त्या विरूद्ध त्यानें ब्रम्हदेशच्या राजाकडे ताकीदवजा फिर्याद केली ! इतकेंच नाहीं, पण आमची मागणी पोकळ नाहीं, नुकसान भरून न दिल्यास घनचक्कर दाखवूं; असें सुचविण्यासाठींच जणूं कीं काय कमोडोर लॅाबर्ट नांवाच्या गृहस्थाबरोबर दोन लढाऊ आगबोटीहि तिकडे

पाठविल्या. भरून मागितलेलें नुकसान नऊ हजार रुपये होतें! वस्तुतः ह्या चोरांच्या उलट्या बोंबा होत्या. तरीही ब्रम्हदेशच्या संभावित राजानें पडतें घेऊन रंगूनच्या गव्हर्नरची बदली करून त्याची चौकशी आरंभिली. व रंगूनला दुसरा सुभेदार नेमला. तेव्हां लॅाबर्ट साहेबास एके दिवशीं कांहीं हुक्की येऊन तो आपल्या कांहीं मंडळीसह दुपारचें वेळीं ह्या नव्या सुभेदारास भेटावयास गेला. परंतु 'गव्हर्नर साहेब निजले आहेत सबब ह्यावेळीं त्यांना भेटणें शक्य नाहीं' असें त्याच्या नोकरानें उत्तर दिलें. परंतु तेवढ्यानें लॅाबर्ट साहेबाची मिजास गेली आणि आपला मोठा अपमान झाल्याचें त्यानें सोंग आणलें! व ह्या अपमानाचा व बेअब्रूचा पुरा सूड उगविण्याकरितां प्रथम ब्रम्हदेशांतलि आपले यूरोपियन लोक आश्रयास घेऊन त्यानें ब्रम्ही राजाची समुद्रांतील आगबोट पकडली! व आवाच्या राजास उत्तराकरितां पांच आठवड्याची मुदत देऊन निर्वाणीचा खलिता लिहिला कीं, रंगूनच्या मस्त अधिकाऱ्यास काढून टाका व आमच्या अपमानाची भरपाई म्हणून दहा लाख रुपये द्या! इतकें होत आहे तोंच पूर्वसंकेताप्रमाणें डलहौसी साहेबानें लॅाबर्टच्या मदतीस फौज पाठविली. इंग्रजांची नियत काय आहे, व होत असलेल्या गोष्टी कोणत्या रोखानें व उद्देशानें होत आहेत हें न समजण्यास ब्रम्ह-देशाचा राजा कांहीं शेणामेणाचा नव्हता! तोही लढाईस सिद्ध झाला. व इरावती नदींत पहिल्यानें युद्धास तोंड लागलें. पुढें क्रमाक्रमानें मार्ताबान, रंगून, प्रोम इत्यादि ठिकाणीं लढाया झाल्या. त्यांत इंग्रजांनीं निरपराधी व गरीब ब्रम्ही लोकांचीही शेळयामेंढ्या प्रमाणें क्रूरपणें कत्तल करून आपली रक्तपिपासा शांत करून

घेतली ! इंग्रजांचें नशिब जोरावर असल्यामुळें त्यांच्या ताब्यांत इच्छेप्रमाणें सर्व पेगू प्रांत १८५२ च्या नोव्हेंबरांत आला व डलहौसीनें तो झटपट इंग्रजी राज्यास जोडूनहीं टाकला ! असें करतांना त्यानें आवाचें ब्रम्ही राजास मोठ्या ऐटींत पत्र लिहिलें त्यांत तो म्हणतो :—

'ब्रिटिश लोकास त्रास दिल्याबद्दल नुकसान भरून मागत असतां तें राजानें न दिल्यामुळें आम्हांस शस्त्राच्या जोरावर तें भरून घ्यावें लागलें. आम्ही अनेक शहरें व किल्ले काबीज केले, आणि सर्व ठिकाणीं ब्रम्ही फौजेचा पाडाव केला. पेगू प्रांत आतां आमच्या ताब्यांत आहे. वेळेवर जागें होण्याचा उपाय तुम्ही फुकट घालविल्यामुळें, सर्व नुकसान भरून येण्यासाठीं पेगू प्रांत आमचेकडे राहील. येथील ब्रम्ही फौजेस हांकून देऊन आम्ही सर्व व्यवस्था करूं. पेगूच्या रयतेनें आमच्या न्यायी अंमलास निर्भयपणें सामील व्हावें. जरूर तेवढें नुकसान भरून घेतल्यामुळें आतां जास्त मुलूख घेण्याची आमची इच्छा नाहीं; तथापि ह्यापुढें आवाचें दरबार आमच्या विरुद्ध जाईल, तर त्याचा सूड उगविण्यांत इंग्रज सरकार मागें पुढें पहाणार नाहीं" (मराठी भाषांतर—सरदेसाई. मूळ इंग्रजी पहा—Dalhousie's work in India by Hunter P. 118-119 )

काय हा न्यायाचा आणि औदार्याचा दप ! त्रास कोणी कोणास दिला आणि पहिला अपराध तरी कोणाकडून झाला ? शेफर्डला दिलेल्या न्याय्य शिक्षेबद्दल व भेट न घेतल्याच्या क्षुल्लक गोष्टीबद्दल जर ब्रम्ही लोकांना दहा लाख रुपये दंड, तर बिचारा ब्रम्ही खलाशी प्राणास मुकला ह्याबद्दल इंग्रजांना किती तरी मोठा दंड करावयास पाहिजे ! हा दंड सांगतांना लॅंबर्ट साहेबाच्या जिभेस हाड तरी कोठें होतें ? व तसें करावयास त्यास अधिकार

तरी कोणी दिला होता ! दुसरी गोष्ट अशी कीं, खरोखरच रंगूनच्या सुभेदारानें अपराध केला असें गृहित धरून चाललें तरी त्याबद्दल ब्रम्हदेशच्या राजास शिक्षा काय म्हणून द्यावयाची ? रंगूनचा सुभेदार म्हणजे कांहीं ब्रम्हदेशचा राजा नव्हे ! चोर सोडून संन्याशास सुळी देण्याचाच हा प्रकार नव्हे काय ? सुभेदाराचा अपराध कबूल करूनही त्या बिचाऱ्यास खाऊन टाकण्यांत आलें ! व सुवर्णभूमी असा पेगू प्रांत ताब्यांत घेऊनही 'आतां जास्त मुलूख घ्यावयाची इच्छा आमची नाहीं' असें औदार्य दाखवून कोणाचें समाधान होणार आहे ? पेगू प्रांत ताब्यांत असावा हा मूळ उद्देश, व तो साध्य करण्याकरितां म्हणूनच ह्या लटुपटुच्या लढाया सर्वदा व अपमानाचें उसनें अवसान आणावें लागलें ।

# कागदी घोड्यांचा पराक्रम !

मागील दोन्हीं प्रांत ताब्यांत घेतांना डलहौसी साहेबास तरवार हातांत घेणें भाग पडलें. परंतु त्याच्या ह्या पुढील कारकिर्दीचा इतिहास केवळ लेखणीच्या फटकाऱ्याचा आणि डोक्याच्या कुटिलतेचा आहे. मागील दोन्ही उदाहरणांत डोक्याची कुटिलता कमी होती असें नाहीं; परंतु पुढील उदाहरणें त्यावरही कडी करणारीं आहेत ! शक्य तोंवर हिंदुस्थानांतील प्रदेश इंग्रजी राज्यास जोडावा, मग त्याकरितां कोणतेही उपाय करावे लागले तरी हरकत नाहीं, असा डलहौसीचा निश्चय होता. वेलस्ली साहेबाच्या वेळेपासून इंग्रजी-सत्ता स्वतःस सार्वभौम म्हणवूं लागल्यानंतर त्यांनीं देशी संस्थानांशीं कांहीं तह केले होते. ह्या आपल्या ताब्यांत असलेल्या गरीब बिचाऱ्या सर्व संस्थानांना खाऊन टाकण्याची डलहौसीनें एक युक्ति योजली. ती युक्ति म्हणजे बेवारसी राज्यें खालसा करून टाकण्याची होय ! ह्या बाबतींत डलहौसीनें संस्थानांचे साधारणतः तीन वर्ग केले होते. ते असे :—(१) जीं संस्थानें प्रत्यक्ष ब्रिटिश मांडलिकत्वाखालीं नाहींत त्यांच्या कारभारांत कायदेशीररीत्या इंग्रजांस ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाहीं. शक्तीच्या भरंवशावर जेवढी अस्मानीसुलतानी गाजवतां येईल तेवढीच ! (२) जीं संस्थानें पूर्वतहानुरूप इंग्रजांच्या सार्वभौमत्वाखालीं नांदत आहेत, त्यांच्यापैकीं एखादा राजा निपुत्रिक वारला तर इंग्रजांना वाटल्यास दत्तकाची परवानगी द्यावयाची, नाहीं तर

तें राज्य खालसा करावयाचें. दत्तक राजाच्या जिवंतपणींच घेतला गेला असेल तरीही राज्यपदाकरितां त्याची योग्यायोग्यता ठरवून त्याला गादीवर कायम करणें न करणें हें सर्वस्वीं इंग्रजांच्या मर्जीवर रहावयाचें (३) ज्याला पूर्वपरंपरेनें एखादें संस्थान प्राप्त झालें नसून केवळ इंग्रजांनीं कृपावंत होऊन त्याला सनद वगैरे करून तीं सत्ता दिली असेल तर अशा प्रकारच्या निपुत्रिक राजाला दत्तकाचा अधिकार मुळींच मिळणार नाहीं. वरील संस्थानांपैकीं कोणाचा औरस वारस जिवंत असूनही जर कांहीं राज्यकारभारांत अव्यवस्थितपणा आढळला तरी तें संस्थान खालसा करण्याचा इंग्रजांस अधिकार आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कोणत्या ना कोणत्या युक्तिनें त्यानें सर्व संस्थानिकांना बांधून टाकलें. आतापर्यंत औरस पुत्र नसल्यास दत्तक घेऊन त्याला सर्व अधिकार मिळण्याची सोय होती. परंतु तें धर्मशास्त्र आतां केवळ डलहौसीच्या लहरीवर राहूं लागलें ! एखाद्या राजास दुर्दैवानें मुलीच मुली झाल्या किंवा मुळींच अपत्य झालें नाहीं तर त्यानें औरस पुत्र कोठून आणावयाचा ? व औरस पुत्राच्या अभावीं स्वतःच कायमचें गादीवर असण्याकरितां मृत्युच्या दाढेंतून तरीं किती दिवस वाचावयाचें ? सारांश, वेलस्ली व बेंटिंकप्रमाणेंच डलहौसी साहेबानें-ही दीन दुबळ्यांचा यज्ञ आरंभला. व ह्या राजमेधांत थोड्याच काळांत अनेक आहुती पडल्या ! ह्या सर्वांचा इतिहास अत्यंत शोकजनक आहे ! आमच्या भारतवर्षीय राजपुरुषांची अब्रू डलहौसीनें भरबाजारांत विकावयास मांडली व त्यांच्यावर नसते आरोप केले ! ते क्रमाक्रमानें पाहूं.

**सातारा (१८४८)** :—ह्या राजमेधांतील पहिली आहुती साताऱ्याची पडली. दुसऱ्या बाजीरावाला राज्यवंचित करतांना ज्या प्रतापसिंह छत्रपतीची मदत इंग्रजांनीं घेतली होती, त्याला १८३७ त पदच्युत करण्यांत येऊन त्याचा भाऊ शहाजी ह्यास गादीवर बसविण्यांत आलें. ह्या दोघांही भावांना औरस संतति नसल्यामुळें त्यांनीं दत्तक घेतले होते. १८१८ त साताऱ्या छत्रपतीशीं इंग्रजांचा जो तह झाला त्यांत सदरील संस्थान वंश-परंपरा कायदेशीर पालकांच्याकडे चालत राहील असें स्पष्ट म्हटलें आहे. इतकेंच नव्हे तर तें संस्थान एक तऱ्हेनें स्वतंत्र असून इंग्रजांना खंडणी देत नसे. ही गोष्ट पुढें साताऱ्या राणीनें व्हिक्टोरिया राणीस पाठविलेल्या कागदपत्रांतून चांगली नजरेस आणली आहे. असें असतां वरील संस्थानच्या कारभारांत हात घालावयाचा डलहौसीस कांहीं अधिकार नव्हता. परंतु त्यानें तो अधिकार निर्लज्जपणें प्रस्थापित केला खरा .× वरील दोन्ही

---

× डलहौसी कलकत्त्यास आल्यानंतर साताऱ्यासंबंधींचें विलायतेहून त्याच्या चुलत्यानें पाठविलेलें पाहिलेंच खाजगी पत्र पहा—

"The death of the Ex-Raja of Satara certainly comes at a very opportune moment. The reigning Raja is, I hear, in very bad health, and it is not at all impossible we may soon have to decide upon the fate of his territory. I have a very strong opinion that on the death of the present prince without a son, and no adoption should be permitted, this petty principality

बंधू १८४७–४८ त मरण पावल्यावर तहाप्रमाणें त्यांच्याकडे संस्थानची सर्व व्यवस्था येणार होती. वरील वारसाचें दत्तविधान कायदेशीर व शास्त्रोक्त रितीनें झालें आहे असें तेथील रेसिडेंटानें लिहिलें आहे. परंतु डलहौसीस ही आडकाठी आली नाहीं. त्यानें मागील तहावर भाष्य करून लिहिलें कीं, 'तहांतील 'वारस' (heirs) व अनुगामी (successors) हे शब्द फक्त 'औरस संततीस' लागू करावयाचे. दत्तविधान मंजूर किंवा नामंजूर करणें हें सरकारचें मर्जीवर आहे.' दत्तक घेतला तर त्याला त्या कुळा-संबंधीं पारलौकिक सर्व अधिकार घ्यावयास आमची ना नाहीं; परंतु त्याला राजकीय हक्क देण्याची आमची इच्छा नाहीं! डलहौसीनें ही अशी पगडी फिरविलेली पहातांच साताराचे लोक थक्क झाले. वरील भाष्य ग. ज. नें डायरेक्टरांच्याकडे पाठविलें. परंतु डायरेक्टर्स सारे गोरे लोक व हिंदुस्थानच्या चालीरितीसंबंधानें अनभिज्ञ होते. त्यानीं ग. ज. च्या इच्छेप्रमाणें संस्थान खालसा करण्यास परवानगी दिली. आणि अशा तऱ्हेनें ही शिवाजी महाराजापासून अविच्छिन्नपणें चालत आलेली छत्रपतीची पवित्र गादी नष्ट झाली! हें कृत्य करण्यांत निःसंशयपणें डलहौसीनें सद्सद्विवेक बुद्धीचा खून केला. आणि आपल्याच जुन्या वचनाला हरताळ फासला.

---

should be merged in the British Empire: and if the question is decided in my 'day of sextonship', I shall leave no stone unturned to bring about that result".

Life of Lord Dalhousie by Lee-Warner
Vol II P. 158.

नागपूर (१८५३) :—सातान्याच्या मागोमागच इंग्रजांच्या राज्यापूर्वींच स्थापन झालेल्या नागपूरच्या भोसल्यांच्या राज्यावर खालसा होण्याची पाळी आली. खालसा करण्याचे वेळीं सातार-पेक्षां नागपूरचें राज्य फार मोठें असून तेथील उत्पन्नही पुष्कळ होतें. तेथून वऱ्हाड लागूनच असल्यामुळें व येथें कपाशीची लागवड उत्कृष्ट होत असल्यामुळें व्यापारी व राजकीय ह्या दोन्ही दृष्टींनीं नागपूरचें राज्य इंग्रजांना हवें होतें. त्यामुळें तें गट्ट करण्या-करितां उपाययोजना काय करावी ह्याचा विचार डलहौसी फार दिवसांपासून करीत होता. १८२६ मध्यें नागपूरच्या राजाशीं इंग्रजांचा जो तह झाला त्यान्वयें नागपूरचा राजा व राज्य हे स्पष्ट-पणें इंग्रजाचे 'कायमचे दोस्त व मदतनीस' (perpetual friendship and alliance.) ठरल्या गेले. व तेव्हां सरकारीरित्याही नागपूरचें राज्य हें 'हिंदुस्थानांतील भरीव आणि वजनदार श्रीमंतांपैकीं एक आहे (one of the substantive powers of India) असें जाहीर करण्यांत आलें ! वरील सर्व उल्लेख अगदीं निःसंदिग्ध असल्यामुळें नागपूरच्या राज्यांतही अडथळा आणण्याचें डलहौसीला वस्तुतः कांहींच कारण नव्हतें. परंतु सुरू केलेल्या राजमेधातील आहुतींना खंड पडूं नये ह्या उदात्त व धर्मप्रवण भावनेनेंच बिचाऱ्यानें तें काम केलें ! १८१७ मध्यें आप्पासाहेब भोसल्यास नागपूरच्या गादीवरून वाईट म्हणून इंग्रजांनीं पदच्युत करून त्याची राणी बाकाबाई हिच्या मांडीवर रघूजी भोसले नांवाच्या मुलास दत्तक दिलें व राज्यकारभार चालू झाला. ही उठाठेव करतांनाही 'वंशपरंपरा' हें राज्य चालूं रहाण्याचा तह करण्यात

आला होता ! ह्या तिसऱ्या रघूजीनें नागपूरचा राज्यकारभार अत्यंत शहाणपणानें आणि दक्षतेनें हांकला. त्याच्या पूर्वीच्याच पिढीच्या अनुभवावरून त्यांचें तोंड चांगलेंच पोळलें असल्यामुळें राज्यासंबंधींची सर्व खबरदारी घेणें त्याला भागच होतें ! रघुजीच्या उत्कृष्ट राज्यकारभाराची साक्ष त्यावेळच्या स्वदेशीय लेखकांचीं कागदपत्रें उत्कृष्टपणें देतात. असें असतांही निर्लज्जपणें डलहौसीनें त्या संबंधीं लिहितांना 'न्यायविक्रेता, कृपण, मद्यपी आणि व्यभिचारी'+ असलीं शेलकीं आणि चीड आणणारीं विशेषणें लावलीं आहेत !÷ १८५३ मध्यें प्रस्तुत रघूजी भोसले वयाच्या ४७ व्या वर्षी निपुत्रिक मरण पावला. तेव्हां त्याच्या अज्ञानावस्थेंत

---

+ So favoured and so aided, he has, nevertheless, lived and died a *seller of justice a miser a drunkard, and a debauchee.*

Papers relating to the Raja of Berar, 1854.

÷ डलहौसीचाच अनुवाद एका खिस्तीधर्ममार्तंडानें खालीलप्रमाणें केला असून अशा राजांच्या दरबारीं ब्रिटिश रेसिडेंट ठेवण देखील आम्हाला कमीपणाचें वाटतें असें ध्वनित केलें आहे ! जणू कांहीं डोक्यावर कोणी ओझेंच दिलें होतें !:—

'........The great Maratha Prince of Nagpur made himself notorious for private vices and public oppressions, so flagrant, what it is impossible to read the official reports by our Resident, without sense of shame that an English representative had to give the sanction of his presence to such a court.'

Hunter P. 64.

पूर्वी पालक असलेल्या त्याच्या आजीनें त्याच्या विधवा राण्यांच्या संमतीनें एका निकटच्या आप्ताच्या यशवंतराव अहेरराव नांवाच्या मुलास दत्तक घेतलें आणि हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें त्याला भोसले घराण्याचे सर्व व्यवहारिक, राजकीय आणि पारलौकिक अधिकार देण्यांत आले. प्रस्तुत दत्तविधान झालें त्यावेळीं नागपूरचा रेसिडेंट मॅन्सेल हा येथेंच होता. त्यानें त्यांत कांहींही अडथळा आणला नाहीं. 'सन्माननीय सत्ता' ( Substantive power ) म्हणूनही त्यांना दत्तक घेण्याचा संपूर्ण अधिकार होता. परंतु ही सोन्यासारखी संधी येतांच डलहौसीनें पूर्वीचे तह विसरून जाऊन २८ जानेवारी १८५४ रोजीं असें जाहीर केलें कीं, 'भोसल्यांच्या राज्यास कोणीही वारस किंवा प्रतिनिधी नसल्यामुळें तें खालसा करण्यांत येत आहे !' असें करतांना त्यानें राण्यांची संमती घेतली नव्हती कीं, त्यांना एखादी पूर्वसूचनाही देण्यांत आली नव्हती ! जुन्या तहावर भिस्त ठेवून नागपूरचे सत्ताधारी आणि लोक स्तब्ध होते. त्यांना राखेच्या खालीं अग्नी दडला असेल अशी कल्पनाही नव्हती. हें अकल्पितपणें उत्पन्न झालेलें संकट पाहून लोक थक्क झाले. आपल्याच वचनांची अशी उघड पायमल्ली केलेली पाहून, ह्या अन्यायाबद्दल अनेक इंग्रजी लेखकांनींही डलहौसीस दोष दिला आहे. अस्तु. डलहौसीच्या आज्ञेप्रमाणें नागपूरच्या महालास इंग्रजांचीं कुलपें लागलीं. आणि भोसल्यांच्या पुरातन वाड्यातून त्यांची सर्व संपत्ती बाहेर काढण्यांत आली. उंट, घोडे, हत्ती, दागदागिनें जडजवाहीर, चांदीचीं व सोन्याचीं भांडीं; सारांश हातीं लागेल तें इंग्रजांनीं लुटलें. ह्या संबंधीं डलहौसीनें असें लिहिलें

आहे कीं, 'भोसल्यांना आपल्या खाजगी संपत्तीचें बहुधा नीट संरक्षण करतां येणार नाहीं म्हणून ती विकून त्याची रोख रक्कम त्यांच्या करतां म्हणून आम्ही आपल्याजवळ ठेवीत आहों'! ही सर्व संपत्ति सिताबर्डीवर नेण्यांत येऊन त्याचा जाहीर लिलाव पुकारण्यांत आला! नागपूरच्या इभ्रतदार राजांची ही अब्रू न्यायाच्या आणि परोपकाराच्या नांवाखालीं भर चवाठ्यावर जेव्हां लिलावांत मांडण्यांत आली तेव्हां सर्वांच्या डोळ्यास पाणी आलें. राण्यांनीं इंग्रजांची फार विनवणी केली पण त्यांचें कोण ऐकणार? त्या दिवशींच्या लिलावांत इतक्या किंमतीचा माल घेणार तरी कोण? पांच सहाशे हत्ती, उंट, घोडे आणि बैल ह्या सर्वांची किंमत सारी १३०० पौंड आली आणि त्यावेळच्या प्रत्येकीं १०० रुपये किंमतीच्या मोठमोठ्या सुंदर बैलांच्या जोड्या साऱ्या पांच पांच रुपये किंमतीस विकण्यांत आल्या! (See Sir John Kaye's History of the Sepoy War in India) जडजवाहिर कलकत्त्याच्या बाजारांत पाठविण्यांत आलें. महालांतील लांकडी सामानही नेण्यांत आलें. ही परिस्थिती पाहून म्हाताऱ्या बाकाबाईनें 'सामानास हात लावाल तर मी महालच पेटवून देईन' अशा तऱ्हेचा धाक घातला, परंतु तिच्या त्या धमकीस कोणीही भीक घातली नाहीं! अशा तऱ्हेनें नागपूरच्या राज्याची वाताहत झाली. ती ऐकून कोणत्या सहृदय पुरुषाच्या डोळ्यांतून अश्रू येणार नाहींत? ह्या प्रसंगींचें डलहौसीचें वर्तन किती अन्यायाचें, क्रूरपणाचें आणि कृतघ्नपणाचें होतें! राज्य खालसा करण्याचा त्याचा अक्षम्य अन्यायही घटकाभर क्षम्य मानला तरी त्यानें शेवटीं

भोसल्यांच्या व्यक्तिगत संपत्तीची ( कांहीं थोडे अपवाद खेरीजकरून ) जी लूट केली ती तर सर्वस्वी रानटीपणाची आणि लोभीपणाची होती. त्याबद्दल कोणी कितीही मखलाशी केली तरी खरी गोष्ट लपवितां येणें शक्य नाहीं. ही राज्यक्रांति झालेली पाहून भोसल्यांची नोकर मंडळी बिथरली. परंतु त्या सर्वांना मोठमोठ्या रकमा देऊन फितविण्याचा प्रयत्न करण्यांत आला ! कारण हे सर्व लोक बिथरल्यास इंग्रजांना फार जड गेलें असतें. अशा तऱ्हेनें हिंदुस्थानच्या नकाशांत नागपूरच्या ७५५०० चौरस मैल क्षेत्रफळाच्या विस्तीर्ण राज्यांत इंग्रजांचा तांबडा रंग फासण्यांत आला.

**झांशी** (१८५३)—झांशी प्रांत पहिल्या बाजीरावापासून मराठ्यांच्याकडे होता. त्या प्रांतावर पेशव्यांनीं रघुनाथ हरी नेवाळकर नांवाच्या गृहस्थास 'वंशपरंपरा' सुभेदार नेमले. • पेशवाईचा अंत होण्याचें पूर्वींपासूनच हे झांशीचे सुभेदार इंग्रजांचे मित्र होते. पुढें १८१८ त पेशवाई नष्ट करण्यांत आली; आणि त्यावेळच्या सोईस्कर अशा राजकीय तत्वज्ञानाप्रमाणें पेशव्याचे मांडलिक म्हणून झांशीचे सुभेदारही इंग्रजांच्या ताब्यांत आल्याचें जाहीर करण्यांत आलें. आतांपर्यंत येथील २।३ राज्यकर्त्यांची राज्यव्यवस्था, कार्यपद्धती आणि पराक्रम अत्यंत उत्कृष्ट होते. ह्या बद्दल हेस्टिंग्स साहेबानें देखील आपल्या लिखाणांत स्तुतिपर उद्गार काढले आहेत. परंतु हे स्तुतीपर उद्गार जोंपर्यंत बरोबरच्या मैत्रीचा संबंध होता तोंपर्यंत ठीक होते. परंतु मांडलिकत्वाची नवी सोयरीक जमल्याबरोबर पूर्वीची समजूतही हळूहळू बदलणें भाग

होतें ! हें नातें जेव्हां प्रथम सुरू झालें तेव्हां इंग्रजांनीं ह्या सुभेदाराशीं नवा तह केला. आणि त्यांना मागील प्रमाणेंच 'वंश-परंपरा' म्हणून झांशीचें राज्यावर कायम केलें. १८३७ त गंगाधरराव नांवाचा सुभेदार गादीवर बसला. ह्या गंगाधररावाचें लग्न मोरोपंत तांब्यांची मुलगी मनुबाई उर्फ सुप्रसिद्ध लक्ष्मीबाई हिच्याशीं झालें होतें. त्याला बरेच दिवसपर्यंत मूल झालें नव्हतें. त्यामुळें १८३९ त त्यानें डायरेक्टरांच्याकडे दत्तक घेण्याची परवानगी मिळण्याविषयींचा अर्ज केला. व त्याला तशी परवानगी देण्यांतही आली. पुढें त्याला औरस मूल झालें पण तें वाचलें नाहीं. तेव्हां त्यानें पूर्वीच्या परवानगीचा फायदा घेऊन तेथील रेसिडेंटास साक्ष ठेऊन दामोदर नांवाच्या मुलास दत्तक घेतलें. व आपल्या पश्चात लक्ष्मीबाईस त्याचे पालक नेमले. आतांपर्यंत त्यानें केलेल्या गोष्टींत तहाविरुद्ध अगर बेकायदेशीर असें कांहींही नव्हतें. किंबहुना त्याची वर्तणूक फाजील राजनिष्ठेची होती असें म्हटलें तरी चालेल. पुढें गंगाधरराव १८५३ च्या नोव्हेंबरांत मरण पावला. त्याबरोबर डलहौसी साहेबानें पूर्वीचे करारमदार सर्व गुंडाळून ठेवून ता. २७ फेब्रुवारी १८५४ रोजीं जाहीर केलें कीं, 'झांशीच्या राजांना दत्तक घेण्याचा अखत्यार असण्याइतके ते स्वतंत्र नाहींत. सबब त्यांचें राज्य खालसा करण्यांत येत आहे ! डलहौसीनें हें जें तर्कट केलें तें कोणत्या आधारानें हें त्याचें त्यालाच ठाऊक. झांशीच्या सुभेदारांना दत्तक घेण्याचा अगर न घेण्याचा अधिकार ठरविणारे हे इंग्रज कोण ? बरें त्यांना तसा अधिकार आहे असें गृहित धरलें तरी डायरेक्टरांनीं तरी पूर्वी दत्तकाची परवानगी कां द्यावी ?

तऱ्हा त्याना सारासार विचार नव्हता काय ? व अशी परवानगी देऊनही डलहौसीनें ऊलट पगडी कां फिरवावी ? इतर देशी राजांच्या बाबतींत जसें त्याचें व्याभिचारित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यांत येतो तसाही येथें प्रकार नव्हता. ही गोष्ट तर सरकारीं दरबारीं नमूद होती ! परंतु ‘ हम करेसो कायदा ’ हेंच इंग्रजांचें तत्व होतें. झांशी इंग्रजानीं खालसा केली खरी परंतु ह्या लहानशा राज्याकरितां आपल्याला १८५७ च्या रणयज्ञांत भयंकर मोबदला द्यावा लागणार आहे अशी कांहीं त्यांना कल्पना आली नसेल. अशा स्थितींत राणीसाहेब ‘ बंडवाल्यां’स मिळाल्या तर त्यांत गैर असें काय झालें ?

**अयोध्या ( १८५६ )**—डलहौसीनें खालसा केलेल्या लहान मोठ्या संस्थानांपैकीं सर्वांच्या शेवटीं खालसा केलेलें हें संस्थान होय. अयोध्येचे वजीर हे दिल्लीच्या बादशहानें नेमलेले होते. इंग्रजांनीं बंगालांत हातपाय पसरल्या पासूनच त्यांची दृष्टी अयोध्येकडे लागली होती. अयोध्याप्रांत श्रीमंत होता. त्यामुळें वारन हेस्टिंग्सपासून सर्वच कर्तबगार ग. ज. नीं अयोध्येच्या राज्यांत बोट शिरकविण्याचा प्रयत्न केला. वेलस्ली साहेबांनीं सादत अलीशीं केलेल्या तहाचें वर्णन मागें ( पृ० १०३–१०५ ) आलेंच आहे ! डलहौसी साहेबांचा लोभ वरील सर्वच ग. ज. पेक्षांही प्रबळ झाला. आणि त्यानें तर तें संस्थान खालसा करण्याचा निश्चयच केला. इंग्रजांची मैत्री म्हणजे शत्रुत्वाहूनही वाईट, हा अनुभव अयोध्येच्या वजीरांना जितका आला असेल तितका दुसरा कोणासही आला नसावा. ह्या वजीरांना

इंग्रजांनीं हळुहळू मानभावीपणानें नसता मान द्यावयास सुरुवात केली. हेस्टिंग्स साहेबांनीं तर त्यांच्या मागें 'राजा' ही पदवी लावून 'हिज मॅजेस्टी' ( His Majesty. ) ह्या नांवानें गौरवून लिहावें आणि बोलावें ! असें करण्यांत केसानें गळा कापण्याखेरीज त्याचा दुसरा कोणताही हेतू नव्हता. डलहौसीच्या कारकिर्दीतील हिंदुस्थानांत असलेल्या तत्कालिन अनेक इंग्रजी लेखकांनीं अयोध्येच्या सुबत्तेचें आणि हवामानाचें वर्णन मोठें बहारदार आणि तोंडास पाणी सुटण्यासारखें केलें आहे. व आपल्या लिखाणांत हें राज्य खालसा करण्याबद्दल गर्भित सूचनाही केल्या आहेत. त्यावरून प्रस्तुत राज्य खालसा होण्याच्या बुडाशीं कोणती मनोवृत्ती होती हें व्यक्त होत आहे. अयोध्येच्या गादीवर सादतअलीनंतर गाजी-उद्दीन, नासिरुद्दीन, महमद अलीशहा, अमुजाद अलीजा इतके सुभेदार झाल्यानंतर १८४७ त वजीदजा नांवाचा सुभेदार गादीवर बसला. ह्या सर्व सुभेदारांबद्दल अत्यंत वाईट मजकूर लिहिण्या-करितां त्यावेळीं जणूं कांहीं प्रेरणा केल्या जात होती असें दिसतें. कारण मिस्-मेयोच्या 'मदर इंडिया' प्रमाणेंच त्याकाळीं १८५५ मध्यें इंग्लंडांत 'एका पौर्वात्य राजाचें खाजगी जीवन' ( The private life of an Eastern King ) नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें असून त्याचा लेखक 'अयोध्येचे माजी राजे नासिरुद्दीन साहेब ह्यांच्या खाजगींतला एक माणूस' ( A member of the Household of his late majesty Nassir-u-deen, king of Oudh ) होता. त्यांत अयोध्येच्या राजांचें अत्यंत हिडीस चरित्र दिलें असून प्रस्तुत राज्य खालसा न करणें

इंग्रज सरकारला मोठें लांच्छनास्पद आहे असें म्हटलें आहे. आपल्या विरुद्ध अशा तऱ्हेचा पद्धतशीर उद्योग होत आहे, ह्याची बिचाऱ्या अयोध्येच्या वजीरांना कल्पनाही नव्हती. ह्याच्यापुढें अयोध्या प्रांतांत जितके म्हणून यूरोपीयन आणि अँग्लोइंडियन जाऊन राहिले होते, त्यांनी अयोध्येच्या प्रजेच्या वतीनें इंग्रजाकडे वजीराविरुद्ध भराभर तक्रारअर्ज गुजरले. आणि प्रस्तुत राज्य खालसा न केल्यास आम्हा गरीब रयतेची धडगत नाहीं असेंही बजावले ! अर्ज करणारे लोक अयोध्येचे मूळचे रहिवाशी नव्हते किंवा त्यांना तेथल्या खऱ्या रहिवाशाचे प्रतिनिधीही कोणी नेमले नव्हते. तेव्हां त्यांच्या ह्या अर्जांच्या मागे कोणाची प्रेरणा व मनोवृत्ति असेल हें ओळखणं फारसें कठीण नाहीं. १८०१ मध्यें वजीराशीं इंग्रजाचा जो तह ठरला होता त्यांत 'वजीराचें कोणत्याही परकीय अगर आत्मीय शत्रूपासून रक्षण करणें' ( To defend the territories which will remain to His Excellency the Vizir, against all foreign and domestic enemies ) असें शब्द आहेत. तेवढाच मोडका तोडका व बादरायण संबंधात्मक आधार डलहौसीस सांपडला आणि त्यानें सुतानें स्वर्गास जाण्याची तयारी केली ! अयोध्येच्या प्रजाजनाकडून आलेल्या अर्जांचा विचार करावा म्हणून त्यानें कर्नल स्लीमन नांवाच्या एका माणसास १८४९–५० च्या दरम्यान चौकशी करण्याकरितां अयोध्येंत पाठविलें. तो चोर, ठग, डाकू वगैरेंना पकडण्यांत मोठा हुशार होता म्हणतात—आणि चोराच्या वाटा चोरालाच ठाऊक असतात असा नियम आहे ! हा स्लीमन

साहेब शिकविला पढविलाच असल्यामुळें त्यानें चौकशीचें सोंग करून अपेक्षेप्रमाणें ‘ हा प्रांत खालसा केल्याखेरीज गत्यंतर नाहीं ’ असा आपला अभिप्राय कळविला. पुढें त्याची बदली होऊन औटरॅम् रेसिडेंट झाला. त्याचाही अभिप्राय वरील प्रमाणेंच ! इंग्रज आपलें राज्य खालसा करणार असें अयोध्येच्या खऱ्या रहिवाशांना पक्कें कळून आलें व तेथें २०० प्रमुख लोकांची सभा भरविण्यांत येऊन ही आपत्ती टाळण्याकरितां १॥ लक्ष पौंडापर्यंत खर्च करावयाची आपली तयारी आहे असा त्यांनीं निश्चय केला परंतु त्यांचा प्रयत्न निष्फळ ठरून डायरेक्टरांच्या परवानगीनिशीं डलहौसी साहेबानें १८५६ त वरील राज्य खालसा केल्याचें जाहिर केलें. व वजीरास सालीना बारा लक्षाची नेमणूक करण्यांत येऊन कलकत्त्यास पाठविण्यांत आलें ! डलहौसीनें प्रस्तुत राज्य खालसा करण्यांत अत्यंत अन्याय केला असा अरोप त्याच्या मित्रमंडळीनींही बेधडकपणें केला आहे. पण बेशरम लोकांना कोणाच्या म्हणण्या बोलण्याचें काय होय ?

**किरकोळः**— डलहौसीनें सुरू केलेल्या प्रस्तुतच्या राजयज्ञांत चिल्लर राजांच्याही कांहीं आहुती पडल्या त्यांत वेलस्लीच्या वेळींच पूर्ण नागविल्या गेलेल्या परतु • आतांपर्यंत नाममात्र शिल्लक असलेल्या अर्काटच्या व तंजावरच्या राजांच्या नेमणूकी बंद करण्यांत आल्या. संबळपूरचे संस्थान तेथील राजा निपुत्रिक वारला म्हणून खालसा करण्यांत आलें. आणि खैरपूरच्या राजाशीं मुद्दाम तंटा उपस्थित करण्यांत येऊन त्याचाही शेवट करण्यांत आला.

**हैद्राबाद प्रकरण ( १८५४ )**—हिंदुस्थानांत दक्षिणेंत निजाम आणि उत्तरेंत अयोध्या अशी दोन मुसलमानी मोठीं राज्यें होतीं.

सदरील दोन्ही श्रीमंत राज्यांना खाऊन टाकावें अशी इंग्रजांची इच्छा होतीच पैकीं अयोध्येची हकीकत वर आलीच आहे. तत्पूर्वी थोडे दिवस हाच प्रयोग निजामावर करण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु तो ह्या वेळीं निजामाच्या हुशार प्रधानाच्या बुद्धिमत्तेमुळें पूर्ण यशस्वी होऊं शकला नाहीं. वऱ्हाडप्रांत निजामच्या ताब्यांत होता व सुपीकतेमुळें इंग्रजांना त्याची हाव होती. तेव्हां निजामास त्रास द्यावयास डलहौसीनें सुरुवात केली. निजामाकडे पुष्कळ दिवस झाले कंटिजंट फौजेची बाकी तुंबली होती. कंटिजंट फौज म्हणजे मांडलिकानें स्वखर्चानें साम्राज्य सरकारच्या पदरीं त्यांच्या उपयोगाकरितां ठेवलेली फौज होय. ह्या फौजेचा उपयोग इंग्रज करीत असून त्याचा खर्च मात्र निजामास द्यावा लागे ! होतां होतां बाकी ८० लाख रुपये झाली. शेवटीं डलहौसी साहेबानें निजामास अत्यंत अपमानपूर्वक बजावलें कीं, 'बाकी टाक; नाहींतर वऱ्हाडप्रांत तात्पुरता कर्जाची फेड होईपर्यंत तोडून दे.' त्याप्रमाणें १८५३ त ५०० पायदळ व २०० स्वार इंग्रजाकडे रहावयाचे ठरून खर्चाबद्दल 'वऱ्हाडप्रांत, कृष्णा व तुंगभद्रा ह्याजमधील रायचूर दुआब व नवलदुर्ग परगणा हे सुपीक प्रदेश' तोडून देण्यांत आले. परंतु तात्पुरता म्हणून इंग्रजांच्या जबड्यांत गेलेला वऱ्हाड पुनः कधींही निजामाच्या ताब्यांत आला नाहीं. पुढें १९०३ मध्यें तर कर्झन साहेबांनीं त्याचा पुरता निकाल करून टाकून तो प्रांत सालीना २६ लक्ष रुपये कबूल करून कायमचा इंग्रजी राज्यास जोडला. त्यानंतर १९२६ मध्यें लॉर्ड रीडिंगच्या वेळीं निजामानें तो परत मागितला होता. परंतु त्याच्या याचनेची कशी वासलात लागली

हें वर्तमानपत्रांच्या वाचकांस माहीत असेलच ! पंजाब आणि ब्रम्ही युद्धाची भानगड जर उपस्थित झाली नसती तर निझामाची नागवणूक कांहीं वर्षें पूर्वींच झाली असती.+

डलहौसीनें टपाल, आगगाड्या, तारायंत्रें, विद्यादान इत्यादि चांगल्या समजल्या जाणाऱ्या सुधारणाही हिंदुस्थानांत सुरूं केल्या. परंतु त्या करण्यांत डलहौसीचें मन केवळ हिंदुस्थानच्या कल्याणानेंच प्रेरित होतें कीं आपलें राज्य सुयंत्रित चालावें हा त्यांत हेतु होता हें इतक्या दिवसांच्या अनुभवानें सहज कळून येत आहे. डलहौसी साहेबानें युद्धें दोनच केलीं. बाकी सर्व पराक्रम पूर्णपणें कागदी घोड्यांचाच आहे ! खरोखरच्या घोड्यापेक्षांही कागदी घोड्यांची दौड किती सर्वंकप असते व सकृद्दर्शनीं नाजूक दिसणारी कलमही किती विलक्षण विष ओकूं शकतें हें डलहौसीनें चांगलें सिद्ध केलें. त्याच्या अंगीं फार कर्तबगारी होती हें तर त्याच्या शत्रूसही कबूल करावें लागेल. अशी कर्तबगार माणसें इंग्रजांत होतीं म्हणूनच त्यांचें राज्य होऊं शकलें. कामें करतांना त्यांनीं

---

+ 'The two great Mussalman States, Hyderabad and Oude, were marked down for annexation, and the process of undermining them, as the Blue Books tell us, was only delayed by the wars in the Punjab and Burmah'.

—An article by Mr. Robert Knight in The Statesman, July 1-1880 P. 162. quoted by B D. Basu.

नीति अनीति गुंडाळून ठेवली म्हणूनच तें सूख पावूं शकले ! हिंदुस्थानचे लोक मात्र फाजील नीतीमत्तेमुळें नाश पावले. १८५६ त अयोध्या प्रकरणानंतर लवकरच डलहौसी विलायतेंत रवाना झाला. जातांना त्याला वाटलें कीं, आपण इंग्रजी राष्ट्राचें खूप काम केलें व राज्यास स्थैर्य आंणलें. परंतु त्यानें आपल्या वर्तनानें हिंदुस्थानांत जणूं कांहीं मोठा सुरुंग भरून ठेवला होता. व त्याची पाठ फिरते न फिरते तोंच ह्या सुरुंगाचा भयंकर स्फोट होऊन सारें हिंदुस्थान धुळीनें आाणि धुरानें व्याप्त झालें. आणि त्या धक्क्यानें इंग्रजांचें आसन डळमळून त्यांचा धीर तात्पुरता तरी खचला !

# भयंकर स्फोट !

डलहौसी परत गेल्यानंतर कॅनिंग साहेबाची ग. ज. चे जागेवर नेमणूक झाली. डलहौसी साहेबांनीं हिंदुस्थानांत जो नंगा नाच घातला होता त्यानें सर्व हिंदुस्थान संतप्त झालें होतें. आणि त्याचा परिणाम १८५७ च्या भयंकर स्वातंत्र्ययुद्धांत झाला. १८५७ सालीं जो भयंकर स्फोट झाला, त्यास 'बंड' म्हणून संबोधण्याची पद्धतच पडून गेली.+ परंतु तो शब्द स्वार्थी लोकांनीं रुढ केला आहे ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. इंग्रज लोक जेते आहेत म्हणून त्यांनीं बंड म्हटलें त्याचा अनुवाद करून आपणही तसेंच म्हटलें तर आपण बेअकली पोपट ठरूं. व आपल्या भेकडपणाचें जगांत प्रदर्शन होईल. दुर्दैवानें आमच्या विद्यार्थ्यांस लहानपणापासूनच 'बंड' म्हणून शिकविण्यांत आलेलें असतें आणि आपल्या देशांतीलच अत्यंत मोठ्या समजल्या जाणाऱ्या लोकांनींही असाच नादानपणाचा उपदेश केलेला दिसतो. उदा० पुढील उतारा पहा :—

"बंडास मूळ कारण धर्माभिमान तर खराच, पण त्याच्याही पलीकडील मुख्य कारण म्हटलें तर अज्ञान होय. काडतुसांस गाईचें

---

+ '..........the first Indian Political movement of the nineteenth century. The movement was National as well as Political '

—Young India by Lajpat Rai P. 108.

व डुकराची चर्बी लावतात, इतकें केवळ ऐकूनच मूर्ख लोक बिथरले. ऐकलेली गोष्ट खरी किंवा खोटी ह्याचा कोणी शोध केला काय ? एक बोलला म्हणून दुसरा बोलला आणि दुसरा बिघडला म्हणून तिसरा बिघडला अशी अंधपरंपरा चालून अविचारी मूर्खांचा समाज जमला, आणि बंड माजलें. त्यास नाना, तात्या, बाळाराव, झांशींची राणी इत्यादि डोयजड माणसें मिळालीं. इतक्यांनीं मिळून केलें तें काय ? देशाची दुर्दशा; दुसरें कांहीं नाहीं !

" ज्यांनीं एवढें अनावर कृत्य करून आपली फजिती, हजारों लोकांची इतिश्री आणि स्वदेशाची धूळधाण केली त्यास काय म्हणावें ? कोणी शहाणा मनुष्य त्यास शूर किंवा पराक्रमी म्हणेल काय ? प्रांतांत चोर दरवडेखोर असतात ते लोकांचीं घरेंदारें लुटून द्रव्य नेतात, किंवा थोडी बहुत हाणमार करतात, एवढेंच काय तें ! पण हे बंडवाले त्याहून-दुष्ट होत !

—ओककृत हिंदुस्थानकथारस पृ. २७६.

आणखी आमच्या अधःपाताची परिसीमा ती काय व्हावयाची राहिली ! 'बंडवाल्यां' संबंधीं अनेक इंग्रज लेखकांनीं वृथा गैरसमज पसरविले. पण आपल्याच हिंदी लोकांनीं तर त्या बिचाऱ्यांची किंमत त्याहूनही नीचतर ठरवून टाकली ! ज्या वेळीं हिंदी लोकांच्या त्या प्रयत्नास आपण 'बंड' म्हणतो, त्यावेळीं आपल्या मनांत केवळ तिरस्काराचीच भावना असूं शकते, अभिमान किंवा कौतुकाची नाहीं ! 'बंड' हा शब्दच तिरस्कार-जनित आहे ! १८६४ त सर जॉन के ( Sir John Kaye ह्यांनीं आपला १८५७ चा प्रसिद्ध इतिहास छापला त्यास त्यांनीं देखील 'शिपायांचें युद्ध' ( History of the Sepoy War) असें नांव दिलें आहे. एका तत्कालांत वावरणाऱ्या इंग्रज लेखकास

जें ‘ युद्ध ’ वाटलें तें आपणास मात्र ‘ बंड ’ वाटावें हें आश्चर्य नव्हे काय ? ‘ १८५७ चा प्रयत्न हें धर्मयुद्ध नव्हतें. व स्वातंत्र्य युद्ध तर नव्हतेंच नव्हतें. ती केवळ कांहीं नाखूष आणि मूर्ख शिपायांची टुरटूर होती. त्याला देशांतील बहुमताचा पाठिंबा नव्हता व देशांतील बहुजन समाजास इंग्रजांच्या अंमलांतून मुक्त होण्याची इच्छाही नव्हती ’ अशा तऱ्हेचे आरोप पुष्कळांकडून करण्यांत येतात. परंतु ते आरोप मुद्दा सिद्ध शकत करूं नाहींत. एकतर हिंदुस्थानच्या तत्कालीन लोकांच्या हृदयांत आधुनिक एक राष्ट्रियत्वाची कल्पना रुजली नव्हती. तेव्हां त्या कल्पनेप्रमाणें त्यांचा प्रयत्न नव्हता हें खरें आहे. परंतु आपली जात बाटणार आपला धर्म बाटणार व आपण ख्रिस्ती होणार ह्या उत्तान धर्म-प्रेमामुळेंच त्यांनीं हा प्रयत्न केला असला म्हणून तो कमी योग्यतेचा मुळींच ठरत नाहीं. त्या वेळच्या कल्पनेप्रमाणें धर्मस्वातंत्र्य आणि देशस्वातंत्र्य ह्यांत अभेद होता. जोंपर्यंत धर्मावर घाला येत नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थानच्या लोकांना जुलमाबद्दल फारसा तिरस्कार वाटत नसे. परंतु धर्म बुडतो अशी त्यांना सकारण अगर अकारण भिती वाटली तरी ते बिथरत असत. ह्यांत त्यांचा गुणच व्यक्त होत नाहीं काय ? धर्मप्रेमासंबंधीं ज्यांचीं मनें अत्यंत मुर्दाड बनलीं आहेत अशा सध्याच्या ‘ सहिष्णु ’ हिंदु लोकांनीं त्या वेळच्या लोकांच्या कृत्यास ‘ धर्मवेड ’ म्हणावें हें सहाजिकच आहे ! आज अशी एक तरी गोष्ट हिंदुस्थानांत आहे काय कीं, ज्याला हात घातला असतां त्यांना चेव येईल व ते पिसाळून जातील ? स्वातंत्र्याच्या कल्पना देशांतील लोक बोलतात पण त्याची तरी

त्यांना खरी आग लागून गेली आहे काय ? मग कर्तृत्ववान अशा जुन्या लोकांना दोष देण्याचा आपणास काय अधिकार आहे ? हिंदुस्थानचे ' बंडवाले ' जर ' धर्मवेडे ' होते तर जगांतले कोणते लोक धर्मवेडे नाहींत ? मुसलमानांच्या स्वाऱ्या धर्मवेडामुळेंच झाल्या आणि इंग्रज लोक, जे हिंदुस्थानांत व जगभर पसरले आहेत, त्यांच्यांतही व्यापाराच्या खालोखाल धर्मवेडच नाहीं काय ? तरीही त्यांनीं केलेलीं तीं ' युद्धें ' व ' लढाया ', आणि हिंदुस्थानांतलें मात्र केवळ ' बंड '—त्याला कांहींच किंमत नाहीं ! दुसरी गोष्ट हें बंड केवळ शिपायांचें असून त्यांस दुसरें कोणीही सहाय्यकर्ते नव्हते असें म्हणतात. त्यांच्या हें ध्यानांत येत नाहीं कीं, कोणत्याही युद्धाच्या प्रसंगीं कोणत्याही देशांतील बहुजन समाज त्यांत भाग घेत नसतो. थोडे शिपायी आणि लढाऊ माणसेंच भाग घेतात. सामान्य जनता बहुधा तटस्थ रहाते. हिंदुस्थानांतही असेंच झालें. युद्धांत भाग घ्यावयाच्या तो फक्त शिपायांनीं नाहीं तर काय शेळपटांनीं ?

१८५७ च्या भयंकर प्रसंगाचा इतिहास व त्यावेळचीं सर्व कागदपत्रें काळजीपूर्वक वाचलीं तर त्यांत असें आढळून येतें कीं, तो एका विशिष्ट मनोवृत्तीनें व व्यवस्थेनें इंग्रजांविरुद्ध केलेला कट होता व ही गोष्ट इंग्रज लेखकांनींही मान्य केली आहे. मग हिंदुस्थानचे स्वातंत्र्यशत्रू असणाऱ्या इंग्रजांविरुद्ध जर तो कट होता तर हिंदुस्थानचें दृष्टीनें तो सर्वस्वीं आवश्यक, अपरिहार्य आणि न्याय्यच नव्हता काय ? व ही गोष्ट आपणास निःसंशयपणें

अभिमानास्पद नाहीं काय ? ज्यावेळीं आतां इतक्या आगगाड्या बोकाळल्या नव्हत्या व तारायंत्रेंही लोकांच्या सोईकरितां नव्हती अशा स्थितींत कटाच्या लहानसहान बातम्या देखील सर्व उत्तर-हिंदुस्थानभर पसरून जात व इंग्रज अधिकाऱ्यांना त्याचा सुगावाही लागत नसे ही गोष्ट आश्चर्यकारक आहे. केवळ कशीं तरी केलेलीं कामें अशीं पद्धतशीर होत नसतात. डलहौसीच्या कृत्यामुळें अनेक राजे इंग्रजांविरुद्ध खवळून गेले होते. त्या राजांना पूज्य समजणारें लोकही अर्थातच खवळले व त्यांच्या संसर्गानें एकंदर देशाचे शिपायीही खवळले. ठिकठिकाणीं बातम्या पोंचविण्याकरितां त्या वेळीं देशभर अनेक साधूंचें पीक झालें होतें. व पत्रव्यवहार गुप्त पण अप्रतिहतपणें चालावा म्हणून—जातिबंधनें अत्यंत कडक असतांही—भाकरींचा उपयोग करण्यांत येऊन त्यांच्या पोटांतून लिहिलेले कागद पाठविण्यांत येत. एक छदामही न घेतां ज्या अर्थीं स्वयं अगर परप्रेरणेनें इतके लोक साधूंच्या वेषांत विशिष्ट कार्याकरितां भटकत होते त्याअर्थीं ह्याचा धागा कोठेंतरी निश्चितपणें असावा असेंच अनुमान निघतें. असें कांहीं नसतें तर ही वावटळ साऱ्या हिंदुस्थानभर एकदम उडलीच नसती. १७५७ पासून १८५७ पर्यंतच्या शंभर वर्षांत इंग्रजांनीं हिंदुस्थानवर लहान मोठे जे अन्याय केले होते ते अशा तऱ्हेनें एकदम बाहेर पडले. प्रस्तुत युद्ध केवळ ‘ शिपायांचें बंड ’ होतें असें गृहित धरलें तरी शिपायांनीं तरी बिथरावयास काय झालें ? पिकल्याशिवाय विकत नाहीं त्याप्रमाणें त्यांच्या असंतोषास इंग्रजांची गैरवर्तणूकच कारणीभूत झाली नसेल काय ? काडतुसास गाईची आणि डुकराची चर्बी लावली

असते अशी खोटींच समजूत होऊन शिपायी बहकले असें सांगण्यांत येतें. परंतु इतकें क्षुल्लक कारण येवढें प्रचंड वादळ उत्पन्न करूं शकणार नाहीं. तें कदाचित अनेक कारणांपैकीं एक तत्कालिक क्षुल्लक कारण असूं शकेल, परंतु मुख्य कारण हिंदी लोकांचा इंग्रजांवरील विश्वास उडाला हेंच होय. 'करावें तसें भरावें' ह्या न्यायानें हिंदुस्थाननेंही कोणत्याना कोणत्या स्वरूपांत इंग्रजांची पूजा केली त्यांत बिघडलें कोठें? व इंग्रजांच्याही दृष्टीनें त्यांत अन्यायाची परमावधी कोठें झाली?

इंग्रजांविरुद्ध बरेच दिवसांपासून देशवासियांच्या अंतःकारणामध्यें असंतोष धुमसत होता. त्याला मधून मधून उगीच कोठें लहानशा ठिणगीचें स्वरुप येई. परंतु अशी कांहीं गोष्ट असेल अशी इंग्रजांना शंका देखील आली नाहीं. ह्यांतही स्वातंत्र्ययुद्धाच्या कटाचा व्यवस्थितपणाच दिसतो. ह्या युद्धाचें पुढारीपण महाराष्ट्रीय वीरांच्याकडे होतें ही गोष्ट खचित अभिमानास्पद आहे. महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याची ताजी स्मृति त्यांना असल्यामुळें त्या अपेक्षेनें त्यांना इंग्रजांचें पारतंत्र्य दुःसह वाटत होतें. अशा तऱ्हेनें सर्व उत्तर हिंदुस्थानभर लढाऊ लोकांचीं मनें इंग्रजी सत्तेविरुद्ध भारल्या गेलीं. गुप्त जाहिरनामे निघावयास लागले. आणि सहजच लोक इंग्रजांशीं बेफिकीर वृत्तीनें वागावयास लागले. ज्या कोणत्या व्यक्तीनें ह्या सर्व शिपायांच्या मनांत धर्मप्रेमाची खरी किंवा खोटी भावना उत्पन्न केली असेल त्याच्या मुत्सद्दीपणाची कमाल खरी! त्यानें हें पूर्ण ओळखलेलें दिसतें कीं, हातांत शस्त्र धरल्यांवाचून

युद्धांत पडलेल्या एकूण एक शिपायास राज्यक्रांतीची व हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची तर्कशुद्ध कल्पना असेलच असें म्हणवत नाहीं. बहुधा ती असणें अशक्यच आहे. व त्यांत कांहीं आश्चर्यही नाहीं. एखाद्या कृत्याच्या हेतूच्या बाबतींत लहानसान सांगकाम्यांना जबाबदार न धरतां मूळ सूत्रचालकांसच जबाबदार धरलें पाहिजे. एकंदर इतिहासावरून मात्र सूत्रचालकांची कल्पना स्पष्ट दिसते.

युद्धाची निश्चित उठावणी होण्याचें पूर्वी कांहीं कांहीं वैयक्तिक प्रतिकाराचें प्रयत्न होत असत. त्यांतच २९ मार्च १८५७ रोजीं झालेली एक गोष्ट अत्यंत रोमहर्षण आहे. दमदम येथील नवीन कारखान्यांत तयार करून वाटल्या जाणारीं नवीन काडतुसें गाईची व डुकराची चर्बी लावलेलीं आहेत अशी जिकडे तिकडे अफवा पसरली होती. त्या वेळचा धर्माभिमान आतांसारखा शिथिल झाला नसल्यामुळें कांहीं ठिकाणच्या फौजेंतील शिपायांनीं तीं घ्यावयाचीं नाकारलीं. व त्याकरितां त्यांना शिक्षाही भोगाव्या लागल्या. हिंदुस्थानांत ख्रिस्ती मिशनरी येऊन त्यांनीं येथील लोकांस बाटविण्याचें काम चालविलेंच होतें. व आतांप्रमाणेंच तेव्हांही त्या कामीं सरकारची सहानुभूती होती. ही गोष्टही शिपायांच्या असंतोषास विशेष कारणीभूत झाली. बऱ्हामपुर येथील नं. १९ च्या पलटणीनें हीं काडतुसें घ्यावयाचें नाकारलें व त्याकरितां त्यांना शिक्षा सुनावण्यांत आल्या. ह्या शिक्षेची अंमलबजावणी करण्याकरितां त्या पलटणीचा अधिकारी कर्नल मिचेल हा दंडितांसह बराकपूरला आला. त्या पलटणींत मंगल पांडे

नांवाचा एक हिंदु शिपायी होता. इंग्रजांच्या ह्या निष्कारण अन्यायानें इतर लोक कदाचित चिडूनही स्तब्धच राहिले. पण मंगलपांड्याचें तरुण रक्त असें स्तब्ध राहीना ! त्याला आपल्या धर्माचा अभिमान होताच. व एवींतेवीं आपणाला शिक्षा होणारच मग आपल्या व आपल्या देशाच्या ह्या गोऱ्या शत्रूंपैकीं कांहींना तरी यमसदनास कां पाठवूं नये ? असा त्यानें विचार केला व उपरोक्त दिवशीं रविवारीं एका हातांत तरवार आणि एका हातांत पिस्तूल घेऊन तो घराबाहेर पडला. आणि आपल्या धर्मबांधवांना म्हणूं लागला कीं, 'बंधूंनों, इंग्रज लोक आपल्या धर्मावर उठले आहेत. त्यांचा नाश करूं या ! बाटलेलीं काडतुसें तुम्ही घेऊं नका—तुम्हाला कांहीं हृदय असलें तर मला मिळा.' परंतु त्याच्या त्या कळकळीच्या बोलण्यांत कोणीही सामील झालें नाहीं ! तरीही हा नवजवान इंग्रजांच्या रहात्या जागेकडे मोठ्या आवेशानें जाऊं लागला. व त्याला एक इंग्रज अधिकारी दिसल्याबरोबर त्यानें गोळी झाडली. पण ती चुकली. त्याच्या भोंवतीं नं. ३४ च्या पलटणींतील व इतरही अनेक शिपायी जमले. परंतु कोणीही वैयक्तिक अगर सामुदायिक रीतीनें त्याच्या मदतीस आलें नाहीं. परंतु त्याला अडथळाही कोणी आणला नाहीं. परंतु त्यांपैकींच एक फितुरी इसम निघाला आणि त्यानें ॲडजुटंटच्या बंगल्यावर धावत जाऊन ही बातमी कळविली. ताबडतोब ॲडजुटंट लेफ्टनंट बग व सार्जंट मेजर हडसन हे दोघे मंगलपांड्याच्या मैदानावर आले. त्यांना पहातांच पांड्यानें त्यांच्यावर गोळी झाडली. पण ती बगच्या घोड्यास लागली. बगनेंही उलट गोळी मारली पण तीहि

ढुकली. तेव्हा बग तरवार घेऊन धावला असतां मंगलपांडेही मोठ्या आवेशानें आणि जीवाची पर्वा न करितां आपली तरवार घेऊन बग व हडसन ह्या दोघांवर तुटून पडला. त्या दोघांनीं आपली शिकस्त केली पण त्यांना मंगलपांड्याचा पराभव करतां आला नाहीं. शेवटीं त्या वीराच्या हातून दोघेही रक्तबंबाळ आणि अनन्यगतिक होऊन खालीं पडले. साहेबांच्या मदतीस भोंवतालच्या चारशें शिपायांपैकीं कोणीही आलें नाहीं. इतकीं त्यांच्याविषयीं शिपायांचीं मनें विटलीं होतीं ! परंतु त्यांपैकींच शेखपलटू नांवाचा नीच मुसलमान फितुर झाला आणि त्यानें हिंमत करून स्वतःस लहानशी जखम खाऊनही मंगलपांड्याचे हात मागल्या बाजूस घट्ट धरून ठेवले. व साहेबद्वय मोठ्या मुष्किलीनें बंगल्याकडे पळून गेले. पुढें पलटूनें पांड्यास सोडलें. ही बातमी सगळीकडे पोंचली असल्यामुळें त्या ठिकाणीं जनरल हियरस आपल्या दोघा पुत्रांबरोबर लष्करी पोषाखांत व भरलेल्या पिस्तुलासहीत आला. व त्यानें तेथील शिपायांस दटावलें. मंगलपांडे सर्व देशबांधवांस आपल्या मदतीस बोलावीत होता. व त्याप्रमाणें कित्येक पुढें होतही होते. तोंच जनरल गरजला कीं, 'माझी आज्ञा मानणार नाहीं त्याचा मी प्रथम मुडदा पाडीन ! खबरदार ! त्यास मदत केली तर !' मंगलपांडे पुढें होत होता. त्याबरोबर हियरसेनें आपल्या मुलास बजावलें कीं, 'जॉन, मी ह्याच्या गोळीनें मेलों तर तूं त्याचा सूड घेतल्याशिवाय कदापि राहूं नकोस !' अशा तऱ्हेचा हियरसेचा रुबाब व धाडस पाहून शिपायी दबले. आणि कोणीही मंगलपांड्याच्या मदतीस गेला

नाहीं ! आतां मात्र त्यास अत्यंत खेद वाटला आणि त्वेष आला ! आपण इतक्या निकरानें आपल्या देशशत्रूच्या रक्तानें न्हाण्यास टपलों असतां एकही सखीचा लाल आपल्या मदतीस येऊं नये ह्याचें त्यास दुःख झालें. सर्वांना मंगलबद्दल आदर होता. परंतु सर्वांची मनोवृत्ती त्याच्या सारखी असाधारण व उन्मत्त नव्हती ! अखेरीस भयंकर खेद वाटून त्या उद्वेगाच्या भरांत ह्या वीरानें हातांतील पिस्तूल स्वतःच्याच छातीवर रोखून तें उडविलें. आणि रक्तबंबाळ होऊन धाडकन् धरणीवर अंग टाकलें ! परक्या अविंधाकडून अप्रतिष्ठेनें आपला प्राण जाण्यापेक्षां तो स्वतःच घेतलेला बरा असा त्यानें विचार केला असावा. पण दुर्दैवानें तो मेला नाहीं. फक्त बेशुद्ध झाला. त्याला औषधोपचाराकरितां दवाखान्यांत पाठविण्यांत आलें. व पुढें लष्करी पद्धतीचा खटला होऊन त्यास ता. ६ एप्रिल रोजीं सर्वांसमक्ष फांशी देण्यांत आलें.

मंगलपांड्याचें कृत्य माथेफिरुपणाचें व उतावळेपणाचें होतें ह्यांत शंका नाहीं. पण तें अभिनंदनीय नाहीं काय ? आजच्या काळांत देखील असा एखाद्यानें वैयक्तिक प्रतिकार केला तर आपण त्याच्या देशभक्तीची तारीफ करतोंच कीं नाहीं ? तत्कालीन शिपायांना तरी मंगलचें चरित्र आदरणीय व कदाचित् अनुकरणीयही वाटलें असावें! आपल्या प्राणावर सहजासहजीं उदार होणारा पुरुष महात्माच ह्मणावा. मंगलनें आपल्या मनोवृत्तीप्रमाणें स्वदेशकार्यीं प्राण खर्च केले होते ! त्याप्रमाणें तो हुतात्मा ठरला. त्याच्या संध्येचीं पात्रें लोक पूज्य मानूं लागले व त्याच्या प्रतिमेचीही पूजा

होऊं लागली. एक मंगल मेला पण त्याच्या रक्तबिंदूतून पुढें हजारों 'बंडखोर' व 'माथेफिरू' मंगल निर्माण झाले ! मंगलचें मंगल झालें !

पुढें युद्ध ऐन भरांत आल्यावर अनेक ठिकाणीं अनेक गोष्टी झाल्या त्या सर्वच द्यावयाची जरूरी नाहीं. पण झांशीच्या शूर संग्रामदेवतेचा मात्र वृत्तांत दिल्यावाचून रहावत नाहीं. मागील प्रकरणीं झांशी खालसा झाल्याचा वृत्तांत दिला आहे. बिठूरास राहणाऱ्या नानासाहेब पेशव्याची नेमणूकही बंद करण्यांत आली होती. इत्यादि कारणांमुळें हे सर्व माजी राज्यकर्ते आणि जहागीरदार एक झाले. झांशीच्या महाराणी साहेबांशीं इंग्रजांचें वर्तन अत्यंत अन्याय्य झालें होतें. राणीसाहेबांना जी पांच हजारांची लहानशी नेमणूक मिळत असे तीहि बंद करण्यांत आली. त्यांचें जडजवाहीर व इतर संपत्ती जप्त करण्यांत आली व शिवाय राणी-साहेबांच्या नवऱ्याच्या हातचें कांहीं कर्ज होतें तें मात्र राणीसाहेबां-नींच फेडलें पाहिजे अशी त्यांच्यावर इंग्रजांनीं सक्ति केली. ह्याच्या विरुद्ध राणीसाहेबांनीं पुष्कळ सांगून पाहिलें पण कोण ऐकतो ? राणीसाहेबांचा परिवार मोठा होता. त्यांचा स्वभावही अत्यंत दयाळू असल्यामुळें परिवारास व आश्रितांस सोडून देणें त्यांना बरें वाटेना. एखाद्या सामान्य ब्राम्हण विधवेप्रमाणें त्या आपलें आयुष्य दानधर्मांत घालवूं लागल्या. झांशीमध्यें इंग्रज लोकांकरितां जी गोहत्या होत असे, ती पाहून राणीचें हृदय तीळतीळ तुटत असे. झांशीला प्रथम शांतता होती. पण इतर ठिकाणचे लोण येथें येऊन येथील शिपायांनींही ७ जून १८५७ रोजीं उठावणी केली. झांशी येथील फौजेसंबंधीं इंग्रजांना मोठा विश्वास होता. पण विपरीत

घडून आलें. राणीसाहेब उघडपणें क्रांतिवाद्यांना मिळाल्या नव्हत्या. इंग्रजलोकांनींही त्यांच्यावर विश्वास ठेवून आपलीं बायकां-मुलें किल्ल्यांत ठेवलीं. राणीसाहेबांनींही त्यांना मदत केली. पुढें बिथरलेल्या शिपायांनीं इंग्रजांकरितां म्हणूनच राणीच्या वाड्यास वेढा दिला. व त्यांच्या पासून कांहीं लाख रुपये घेऊन व इंग्रज-लोकांची कत्तल करून दिल्लीस प्रयाण केलें. ह्या कत्तलींत राणीसाहेबांनीं भाग घेतला नव्हता. त्या वरून इंग्रजांच्या बाजूसच दिसत होत्या. झांशीच्या इंग्रजांची पूर्णपणें धूळधाण झाल्यामुळें राणीसाहेबांनीं किल्ला व झांशीचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. व तेथें उत्कृष्ट व्यवस्था केली. आपल्या पासून इंग्रजांनीं हिसकून घेतलेली झांशी आपल्या ताब्यांत आलेली पाहून त्या मानिनी स्त्रीस किती समाधान वाटलें असेल! कांहीं महिनेच राणीसाहेब गादीवर होत्या पण तेवढ्याच अवधींत त्यांनीं आपल्या रामराज्याचा अनुभव प्रजेस आणून दिला. राणीसाहेब ह्या रावसाहेब पेशव्यांच्या बालमैत्रीण व मानलेली बहीण. मर्दानी व लष्करी खेळांत त्या हुशार होत्या. त्यांनीं शस्त्राचे कारखाने काढले व फौज तयार केली. इंग्रजांवर देखील त्यांनीं अत्याचार होऊं दिले नाहींत. राणीसाहेब राजनिष्ट नाहींत असें म्हणण्यास कांहीं उघडपणें पुरावा नसतांही नत्थेखान नांवाच्या एका नीच मुसलमानानें इंग्रजांना त्या 'बंडावाल्यां'ना सामील असल्याबद्दल खोटेंच कळविलें! इंग्रजांना तरी राणीस गिळंकृत करावयाचेंच होतें. तत्पूर्वीं क्रांतिवाद्यांची दिल्ली, कानपूर इत्यादि ठाणीं पडलीं. कानपुराहून पेशव्यांना निघून जावें लागलें. पेशव्यांची ही दुर्दशा पाहून राणीसाहेब

त्यांना मिळाल्या. शेवटीं सर ह्यू रोजच्या अधिपत्याखालीं इंग्रजांची धाड झांशीवर आली. राणीसाहेबांनीं अत्यंत शौर्यानें आपला किल्ला कित्येक दिवसपर्यंत लढविला. व ' आपण झांशी चुटकीसरशी घेऊं ' ही इंग्रजांची आशा विफल केली. त्या रणांगणावर येत तेव्हां शिपायांना उत्साह चढे. किल्ल्यांत ठिकठिकाणीं जीं भगदाडें पडत तींहि त्या दुरुस्त करीत. राणीच्या अप्रतिम शौर्यानें आणि मुत्सद्देगिरीनें येवढा मोठा इंग्रज सेनापती पण तोही थक्क झाला. पण एका नीच फितुरी इसमानें इंग्रजांना किल्ल्यांत शिरावयाची गुप्त वाट दाखवून दिली आणि आपला देह सार्थकीं लावला ! + आतां किल्ल्यांत रहातां येणें शक्य नाहीं असें पाहून त्या आपले वडील मोरोपंत तांबे, खजिना इत्यादि बरोबर घेऊन व आपल्या लहान-ग्यास पाठीशीं बांधून रात्रीं शत्रूची फळी फोडावयास निघाल्या. ते समयीं त्यांनीं तटावरून आपला घोडा फेंकला ! रात्रीं शत्रूंनीं त्यांचा पाठलाग केला पण त्या हातीं सांपडल्या नाहींत. मोरोपंत तांबे मात्र मध्यंतरी राहिले व पुढे दुष्ट इंग्रजांनीं त्यांना झांशीच्या किल्ल्यासमोर फांशीं दिलें ! राणीसाहेब गेल्यानंतर ४ एप्रिल १८५८ रोजीं झांशी इंग्रजांच्या हातीं आली. व त्यांनीं सुमारे दोन आठवडे तेथें नंगा नाच घातला ! दिसेल त्या माणसाची कत्तल करावी, वित्त धन लुटावें. जाळपोळ करावी असें नाना प्रकार चालले होते. त्यावेळची आणि इतरही ठिकाणची इंग्रजांच्या

---

+ राणी लक्ष्मीबाईचे सुप्रसिद्ध चरित्रकार कै. दत्तात्रय बळवंत पारसनीस ह्यांनीं आपल्या चरित्रांत उपरोक्त फितुरी माणसाची पाठ थोपटली आहे ! कारण काय तर त्यानें किल्ल्याच्या मर्मस्थानाची वाट ' दयाळू ' इंग्रजसरकारास दाखवून दिली !! ( पृ. २१३ टीप. आवृत्ति १८९४. )

दुष्टपणाचीं वर्णनें वाचून अंगावर शहारे उभे रहातात. झांशीच्या कत्तलींत सुमारें वीसहजार लोक ठार करण्यांत आलें. राणीसाहेब झांशीहून काल्पीस गेल्या. तेथें पेशव्यांचें ठाणें होतें. पेशव्यांचा रणशूर सेनापती तात्या टोपे आणि राणीसाहेबांचें सैन्य ह्यांची व इंग्रजी सैन्याची कुंच येथें गांठ पडली. त्या समयीं राणीसाहेबांनीं विलक्षण पराक्रम गाजवून अनेक इंग्रजांना लोळविलें. काल्पी इंग्रजांच्या ताब्यांत गेल्यावर शिंद्यांची मदत घेण्याकरितां म्हणून राणी-साहेब, पेशवे इत्यादि मंडळी ग्वाल्हेरीस गेली. ग्वाल्हेरच्या शिंद्याला ह्यावेळीं राजनिष्टेचा भयंकर उमाळा आला असल्यामुळें तो ह्या स्वदेशा-करितां व स्वधर्माकरितां लढणाऱ्या हुतात्म्यांबरोबर सामील झाला नाहीं ! परंतु राणी व पेशवे ह्यांनीं इंग्रजांकडून लढणाऱ्या शिंद्यांच्या फौजेचा पराभव करून ग्वाल्हेर घेतलें. तेव्हां शिंदे इंग्रजांकडे पळून गेले. ग्वाल्हेरीस पेशव्यांना राज्याभिषेक करण्यांत आला. परंतु राणीच्या सांगण्याप्रमाणें त्यानें सैन्याची मात्र व्यवस्था केली नाहीं. त्यामुळें पुढें लवकरच जयाजीराव शिंदे व इंग्रज ह्यांच्या फौजा ग्वाल्हेरीवर चालून आल्या असतां पेशव्यांचा पराभव झाला. आतां चहूंकडून आकाश फाटलें होतें. राणीसाहेब इंग्रजांच्या हातांत सांपडल्या असत्या तर त्यांची धडगत नव्हती. त्यांनीं आज पराक्रमाची शर्थ केली. अनेक वार खाल्ले, शेंकडो स्वदेशशत्रूंच्या रुधिरानें पृथ्वीमातेला न्हाऊं घातलें. परंतु तें बळ किती पुरणार ? शेवटीं तशाही स्थितींत त्या इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन निसटणार होत्या, परंतु त्यांच्या छातीवर जबर वार लागला. व एक डोळा साफ उडूनच गेला ! तरी त्यांनीं आपली तरवार थांबविली नव्हती

शेवटीं ह्या शूर अबलेनें दुष्ट अविंधांकडून आपला देह विटाळूं नये म्हणून तरवार मारून घेऊन प्राण विसर्जन केलें. ( १८ जून १८५८. ) त्यांच्या विश्वासू नोकरांनीं राणीसाहेबांच्या शवास अग्नि दिला व दत्तक पुत्राचें रक्षण केलें !

राणीसाहेबांची ही अत्यंत संक्षिप्त हकिकत आहे. संपूर्ण हकिकतीकरितां मोठीं पुस्तकें वाचावीं. ज्या ज्या वेळीं राणीलक्ष्मीबाईचें नांव आपण उच्चारतों त्या त्या वेळीं आपल्या अतःकरणांत अननुभूत अशा चैतन्याचा संचार होत असतो. ह्या ब्राम्हण विधवेच्या पराक्रमा-बद्दल इंग्रजांनींही स्तुतिस्तोत्रें गायिलीं असून त्या केवळ स्वदेशाकरितां व स्वधर्माकरितां लढल्या अशी स्पष्ट कबूली दिली आहे. अशा तऱ्हेच्या स्वातंत्र्यदेवतेची आपण परतंत्र लोकांनीं नित्य पूजा करावी, तिचीं स्तोत्रें गावीं आणि शक्य तर तिच्या स्वदेशभक्तीच्या उत्कटतेचें अनुकरण करण्याचा प्रयत्न करावा. मनांत असलें म्हणजे साधी बायको देखील किती चमत्कार दाखवूं शकते हें यावरून दिसतें ! ही महाराष्ट्राची केवळ २३ वर्षं वयाची स्वातंत्र्य-लक्ष्मी अस्तास गेली आणि तेव्हांपासून हिंदुस्थानांत अंधार पडला. राणीसाहेबांची एकंदर कामगिरी अत्यंत मुत्सद्देगिरीची होती असें दिसतें. सत्तावनच्या क्रांतियुद्धांत त्या मनानें पूर्वीपासूनच सामील असाव्या. कारण त्या तशा सामील असण्यास इंग्रजांनींच त्यांच्या डोक्यावर उपकाराचे डोंगर रचून ठेवले होते !

सुमारें वर्ष दीड वर्ष ह्या क्रांतियुद्धाच्या ज्वाला सर्व उत्तर हिंदुस्थानांत पसरलेल्या होत्या. प्रथमतः अत्यंत व्यवस्थितपणा दिसूनही पुढें तो नाहींसा झाला. स्वातंत्र्यवाद्यांना धोरण राहिलें

नाहीं व त्यांनीं पुढें विशेष मुत्सद्दीगिरीही दाखविली नाहीं. प्रत्येक ठिकाणीं वेगवेगळ्या वेळीं उठावणी करण्यांत आली. त्यामुळें इंग्रज लोकांना ह्या युद्धाचा उपशम करणें सोपें गेलें इंग्रजांना मुख्य मदत शीखांची झाली. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यकाजांत शीख लोक मात्र विरुद्ध राहिले व त्यांनीं परकीयांस मदत केली. विशेष मुत्सद्दी-पणाच्या केंद्राच्या ठिकाणीं ही युद्धाची धुमश्चक्री वर्ष दीडवर्ष सहज लांबली. ह्या युद्धांत देशी शिपायाकडून इंग्रज लोकांवर प्रथम अत्याचार झाले. ही गोष्ट खरी आहे. पण ते तसे होऊं नयेत म्हणून इंग्रजांनीं तरी अशी काय मोठी पुण्याई जमवून ठेवली होती ? १०० वर्षांचें सांठविलेलें विष जणूं कांहीं एकदम बाहेर पडावें त्याप्रमाणें हिंदी शिपायांची वर्तणूक झाली. तरी पण हिंदी शिपा-यांनीं कोणत्याही इंग्रज स्त्रीची किंवा मुलाची जाणून बुजून विटंबना केली नाहीं. ह्याची कबूली त्यावेळीं असणारे व पुढील ही अनेक इंग्रज लेखक देतात. ÷ उलटपक्षीं इंग्रज लोकांनीं त्याच्या मोबदल्यांत घेतलेला सूड हा अत्यंत भीषण स्वरुपाचा आणि मानवतेस सर्वस्वीं काळिमा आणणारा असे. त्यांनीं ठिकठिकाणीं कत्तली केल्या, जाळपोळ केली व लुटालुट करून इतर पशुतुल्य वर्तणूक केली ! ह्या वेळीं लष्करी चौकशीची कोर्टें बसविण्यांत आलीं

---

÷ No English women were stripped or dis-honorued, or purposely mutilated.

—Justin Mc. Carthy's.

'History of our own Times'

Vol. III quoted by B. D. Basu.

असून त्या पुढें कोणत्याही माणसाची तडकाफडकीं लटुपटुची चौकशी होत असे. व त्याला फांशीचीच शिक्षा होई! हिंदी माणूस दिसला कीं त्याच्या तोंडांत अपवित्र पदार्थ कोंबावे, जुलमानें त्यांचा धर्म बाटवावा आणि मग हालहाल करून झाडावर टांगून किंवा अन्य तऱ्हेनें मारावें असें चाललें होतें! + ही शिक्षा फक्त क्रांतिकारक शिपायांकरितांच नसून सार्वत्रिक होती. केव्हांही राज्यक्रांतिच्या संध्याकालीन वेळीं कोणत्याही देशांत अस्वस्थता पसरणें अपरिहार्य असतें. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळींही तेथें अशीच अस्वस्थता व अंदाधुंदी होती. त्यामुळें त्यावेळच्या कोणत्याही अत्याचाराकडे जरा सदय दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे. ह्या चौचिंधीच्या प्रसंगांत कित्येकांनीं आपले खाजगी सूडही उगवून

---

+ 'मार्शल लॉ'च्या वेळचें एका स्थळाचें वर्णन पहा—

(i) It is on the records of our British Parliament, in papers sent home by the Governor-General of India in council, that the aged, woman and children, were sacrificed, as well as those guilty of rebellion. They were not deliberately hanged, but burnt to death in their villages—perhaps now and then accidently shot...............It has been stated in a book patronised by high class authorities, that 'for three months eight dead carts daily went their rounds from sunrise to sunset to take down the corpses which hung at the cross roads and market places. (P. 203.)

घेतले व कोणी लुटालुटीची हौस फेडून घेतली ! परंतु येवढें मात्र खरें कीं नैतिक व भीषणतेच्या दृष्टीनें काळ्या व गोऱ्या लोकांच्या अत्याचारांचें मापन केलें तर गोऱ्या लोकांच्या अपराधांचे पारडें खात्रीनें खाळीं जाईल. इंग्रजांना अप्रिय असलेल्या तत्कालीन इतिहासांत अनेक हिंदी लोकांनीं चोरून मारून अनेक इंग्रज स्त्री-पुरुषांचे व मुळांचे सदयतेनें प्राण वांचविल्याचा व त्यांचें रक्षण केल्याचा उल्लेख आहे. इंग्रज व हिंदी शिपायी ह्या दोघांची दानत, कर्तबगारी व समाजांतील दर्जा ह्यांत काय फरक आहे व हिंदी शिपायी कसे श्रेष्ट आहेत हें के साहेबांनीं चांगलें दाखविलें आहे. ( See. Kaye & Malleson. Vol. I P. 185-183. ) भूतदया हा हिंदुस्थानच्या लोकांचा पुरातन धर्म, त्यांना इंग्रजांवर बेनाहक शस्त्र धरण्याची हौस थोडीच होती ? परंतु सामानें व ममतेनें काम होणें अशक्यच आहे अशीच त्यांची समजूत झाल्यास

---

(ii) No loyalty, no fidelity, no patient good service on the part of these good people could extinguish, for a moment, the fierce hatred which. possessed our white soldiers against all those who wore the dusky livery of the East. (P. 438).

—Kaye & Malleson's 'Indian Mutiny' Vol. II.

गोऱ्या लोकांचीं पशुतुल्य लीला आणखी वाचावयाची असल्यास पहा—
(i) Kaye & M. Vol II P. 77. (ii) Charles Balls 'Indian Mutiny' Vol I P. 257. (iii) Holmes 'Histoty of the Indian Mutiny' P. 363

त्यांचा काय अपराध ? कानपूर येथें पेशव्यांच्या लोकांनीं थोड्या इंग्रजांची कत्तल करून ज्या विहिरींत त्यांचीं शरीरें टाकलीं होतीं असें म्हणतात. ती अजूनही स्मृती म्हणून इंग्रज लोकांना दाखविण्यांत येते ! पण उलट प्रकारची मात्र स्मृती आपल्याजवळ भावनेपलीकडे कांहींही नाहीं !

सत्तावनचें क्रांतियुद्ध अशा तऱ्हेनें समाप्त झालें. हिंदुस्थानचें नशीब अत्यंत वाईट असल्यामुळें तो स्वातंत्र्याचा—सशस्त्र क्रांतीचा—प्रयत्न फसला. आतां त्या सर्व घटना स्मृतिनिर्विशेष होऊन त्यांचें केवळ ऐतिहासिक स्वरूप मात्र उरलें आहे ! त्या प्रसंगांतील अनेक लहान सहान गोष्टींचा उल्लेख कोणत्याही कागदांत कोणीही केला नसेल; पण आपल्या स्वदेश बंधूंनीं भूमातेवर आपल्या रक्तांनीं लिहिलेले इतिहास ज्याला भावना व हृदय असेल असा कोणताही पुरुष केव्हांही सहज वाचूं शकेल. त्यांतील गोष्टींनीं आपलीं हृदयें उत्तेजित होतील, भ्याडपणाचा नायनाट होईल, आणि हिंदुस्थानच्या भावी स्वातंत्र्याच्या इतिहासांत सत्तावन सालीं कामास आलेल्या हुतात्म्यांच्या समाधी बांधण्यांत येऊन तेथें तोफांच्या आवाजांत सर्वत्रांचे मुजरे झडतील !

# शस्त्रसंन्यास व दीर्घकालीन शांतता.

येनकेन प्रकारेण सत्तावनच्या क्रांतियुद्धाचा शेवट झाला. इंग्रजांचें नशीब बलवत्तर असल्यामुळें व इतउत्तर त्यांनींच हिंदुस्थानांत आणखी कांहीं काळ शासक असावे अशीच ईशेच्छा असल्याकारणानें त्यांचा जय झाला व स्वदेशार्थ प्राणावर उदार होणाऱ्या देशभक्तांना व हुतात्म्यांना व त्या बरोबरच अनेक निर्दोषी मनुष्यांना अति भयंकर तऱ्हेनें शासन करण्यांत आलें. ह्या वर्ष दीडवर्षांच्या रणधुमाळीचा इंग्रजांवर कांहींच परिणाम झाला नाहीं असें मात्र नाहीं. हिंदुस्थानांतून इंग्रजांचें राज्य समूळ नष्ट होऊन पुनः स्वराज्य नांदावें अशी क्रांतिवाद्यांची इच्छा होती. ती त्यांची इच्छा पूर्णपणें सफल झाली नसली तरी ह्या वेळीं हिंदुस्थानांत एकप्रकारें राज्यक्रांतीच झाली! कंपनीच्या कारकिर्दीची अक्षरशः शंभर वर्षें पूर्ण भरल्यामुळें ती लयास गेली. कंपनीनें केलेल्या भयंकर अन्यायांपासून ह्या भानगडी उत्पन्न होतात अशी इंग्लंडांतील समंजस लोकांची खात्री होऊन ही कंपनीच नको असें त्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें १८५८ सालीं पार्लमेंटांत कायदा करण्यांत येऊन त्यान्वयें कंपनीनें मिळविलेलें हिंदुस्थानचें राज्य हें आतां संपूर्ण इंग्लंडचें समजण्यांत येऊन व्हिक्टोरिया राणी सरकारानीं व पार्लमेंटनें आपल्या ताब्यांत राज्यकारभार घेतला. हिंदुस्थानांतील लोकांनाही राज्यव्यवस्थेंत कांहीं फरक झाल्याशिवाय बरें वाटण्यासारखें नव्हतें. ह्या कायद्यामुळें राज्यव्यवस्था बदलली पण राज्य पद्धती व शासकांची मनोवृत्ती कांहीं फारशी बदलली नाहीं.

पार्लमेंटनें आपल्या ताब्यांत कारभार घेतला. त्यावेळीं पुढें केव्हांही संकटें उपस्थित होऊं नये ह्याची त्यांनीं अगाऊच तरतूद करून ठेवण्याकरितां म्हणून एक कायदा करून भारतवर्षियांच्या हातांतील शस्त्रें हिसकावून घेऊन त्यांना पूर्णपणें निःशस्त्र करून टाकलें! हें त्यांनीं जें अत्यंत मुत्सद्दीपणाचें कृत्य केलें त्याला जगांतल्या इतिहासांत कोठेंही तोड नाहीं. शस्त्र हें राष्ट्राचें बळ होय व बळाशिवाय राष्ट्रधारणाच होऊं शकत नाहीं. अर्थात् शस्त्राविना राष्ट्र हें दंतहीन सापाप्रमाणें निरुपद्रवी होय हें जाणूनच इंग्रजांनीं आमच्याकडून हा शस्त्रसंन्यास करविला. हिंदुस्थानच्या हातांतील शस्त्रें काढून घेण्याची कल्पना मुत्सद्दी इंग्रजी डोक्यांत आली असेल. पण त्या बरहुकूम हिंदुस्थानांतील इतक्या लोकांनीं आपलीं शस्त्रें कशीं मुकाट्यानें काढून दिलीं हा विचार करण्यासारखाच प्रश्न आहे. याही वेळीं बहुधा हिंदुस्थानांतील लोक इंग्रजांच्या गोड वाणीस फसले असतील! त्यावेळीं सर्वांनींच आपापलीं यच्चयावत् शस्त्रें दिलीं असतील असें नाहीं. पुष्कळांनीं भितीनें तीं लपवून ठेवलीं असतील व अजूनही जुन्या तरवारी व भाले इत्यादि शस्त्रें, पुष्कळांच्याकडे अडगळींत पडलेलीं व जंग चढलेलीं अशीं धूळ खात पडलीं असण्याचा संभव आहे. आतां त्या शस्त्रांचा उपयोग विळ्या कोयत्यासारखा देखील कोणी करीत नसतील, आणि एकाकाळीं ज्यांना शत्रूंच्या रक्ताचें मनसोक्त पान करावयास मिळत असें त्यांना आतां भाजी कापावयासही कोणी विचारीत नाहीं हें मनांत येऊन तीं हतभागी शस्त्रें अश्रु ढाळत असतील! आणि

समजा तीं अडगळींतलीं सारीं शस्त्रें पुनः उपलब्ध झालीं तरी आतां त्याचा काय उपयोग ? गेल्या सुमारें शंभर वर्षांत जगांत किती क्रांति झाली आहे, युद्धकला किती परिणतावस्थेस गेली आहे तेथें तुमच्या आटाळ्यांतील जंग चढलेल्या जड तरवारीला कोण विचारतो ? व तिनें कार्य तरी कसलें होतें ?—कदाचित् तीं शस्त्रें अजूनही फलदायी असतील, पण गेल्या शंभर वर्षांत आपला पराक्रम खंडित झाल्यानें तीं पेलण्याचें तरी सामर्थ्य आपल्या क्षीण बाहूंत उरलें आहे काय ? गेल्या कित्येक वर्षांच्या अज्ञानानें हिंदुस्थानच्या बहुजनसमाजास बंदुक कशी हातांत धरावी हें देखील समजत नाहीं, इतके ते निष्पाप, कोमल आणि दयाशील झाले आहेत ! त्यांना आतां ताज्या मनुष्यरक्ताचें दर्शनही दुर्लभ झालें असल्यामुळें सात्विकतेच्या पराकोटीस पोंचण्याचें पुण्यकार्य अनायासेंच पार पडलें आहे ! !

सत्तावनच्या क्रांतियुद्धाबरोबरच हिंदुस्थानच्या सामुदायिक पराक्रमाचा खरा इतिहास समाप्त झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. हिंदुस्थानचें शस्त्र आणि पराक्रम ह्या अन्योन्याश्रयीन गोष्टी एकदमच लुप्त झाल्या ! १८५७ पासून आजपर्यंतचा इतिहास निःशस्त्रांचा असल्यामुळें जगाच्या चढाओढींत त्याला फारसा मान नाहीं. ज्याचें शस्त्र गेलें त्याचें जगांत काय नाहींसें व्हावयाचें राहिलें ? शस्त्र गेलें कीं राष्ट्र शीलभ्रष्ट होतें, त्याचें नैतिक बळ कमी होतें व त्याच्या शारीरिक व नैतिक दुर्बलतेचा फायदा घेऊन अनेक बिलंदर त्याजवर आपला वरचष्मा ठेवूं लागतात. तशीच स्थिती हिंदुस्थानची झाली आहे. ह्या अवधींत लो० टिळकासारख्या

पुण्यपुरुषांनीं स्वराज्याप्रीत्यर्थ आपलीं आयुष्यें खर्च केलीं तरीही त्या निःशस्त्र चळवळी असल्यामुळें हिंदुस्थानचा पुनरुद्धार त्यांना आपल्या आयुष्यांत करतां आला नाहीं. सत्तावनपासून आतांपर्यंत दीर्घकालीन शांतता नांदत आहे. हिंदुस्थानाच्या अंतर्भागांत तेव्हांपासन एकही लढायी झाली नाहीं कीं, असंतोषाचें एकही प्रबल स्वरूप दिसलें नाहीं ! क्वचित हिंदुमुसलमानांचीं भांडणें होतात. पण जुन्या लढायांच्या मानानें ह्या लाठीकाठीच्या मारामाऱ्या केवळ क्षुल्लक आणि म्हणून उपेक्षार्ह होत. त्यांनीं तरी बिचाऱ्यांनीं काय करावें? दोघांचेही पूर्वज एकाकाळीं स्वतंत्रपणें लढले त्याची आठवण दोघांनाही सुप्तरुपानें असल्यामुळें व सध्या तसला पराक्रम करणें अशक्यप्राय होऊन बसल्यामुळें व त्यांना केंव्हांतरी अशी हौस फेडून घ्यावी लागते ! अस्तु. आपल्या राज्यांत ज्याला जास्त काल शांतता ठेवतां येईल तो राजा उत्कृष्ट असें ठरविण्यांत येतें. त्या दृष्टीनें इंग्रजांच्या सारखे उत्कृष्ट राज्यकर्ते आजपर्यंत झाले नाहींत असें म्हणावें लागेल ! आज ते असे छातीवर हात ठेवून हिंदुस्थानच्या शांततेची हमी साऱ्या जगास देऊं शकतात ! व जगही आज हिंदुस्थानपासून शांततेशिवाय इतर गोष्टींची अपेक्षा करीत नाहीं—कारण निःशस्त्र राष्ट्रापासून जगानें दुसरी कोणती अपेक्षा करावयाची ? म्हातारीं माणसें नेहमींच गतानुभवाची अभ्यासजड व निरुपद्रवी वटवट करीत असतात. त्यांच्या काठीची कोणाला भिती वाटत नाहीं ! हिंदुस्थानासही शस्त्रसंन्यासामुळें अकालीं वृद्धत्व प्राप्त झाल्यामुळें आतां त्याच्याकडे म्हाताऱ्या सारखी निरुपद्रवी वटवट करण्याचें आणि तत्वज्ञान सांगण्याचें तेवढें काम उरलें आहे !

खट्याळ मुलांप्रमाणें इतर बेगुमान व स्वतंत्र राष्ट्र ह्या म्हाताऱ्या हिंदुस्थानला उगीच डिवचतात, वेंडावतात, खडे फेंकून मारतात आणि फिदी फिदी हंसतात; आणि हें सर्व पाहून ऐकूनही ह्या म्हाताऱ्या राष्ट्राला त्याचा प्रतिकार करण्याचें क्षीणवाणीशिवाय अन्य साधन नाहीं ! !

हिंदुस्थानांतील बहुजन समाजाचीं शस्त्रें काढून घेतलीं असलीं तरी हिंदी फौजा मात्र, फारशा कमी केल्या नाहींत. हिंदी फौजेशिवाय आपलें हिंदुस्थानांतील व जगांतील स्थान टिकूंच शकणार नाहीं हें इंग्रजांना चांगलें माहीत असल्यामुळें त्यांना आपल्या लष्करांत हिंदी माणसांना घ्यावेंच लागतें. त्यांच्यावरील नियंत्रणें मात्र वाढलेलीं असून इंग्रजी शिपायांच्या मानानें त्यांना सर्व दृष्टींनीं अपमानानें वागविण्यांत येत असतें. परंतु ह्या हिंदी शिपायांपासून पुढें मागें प्रसंग आल्यास हिंदुस्थानचें आत्मसंरक्षण होण्यासारखें नाहीं. त्याकरितां इतर देशाप्रमाणें येथेंही सार्वत्रिक लष्करी शिक्षण दिलें पाहिजे. इतक्या चळवळी आतांपर्यंत झाल्या परंतु ह्या शस्त्रांच्या पुनरुज्जीवनार्थ चळवळ करण्याची कल्पना एकाही पुढाऱ्याच्या डोक्यांत आली नाहीं. परंतु अलीकडे डॉ० मुंजे ह्यांच्या सारखे पुढारी त्यासंबंधीं अभिनंदनीय प्रयत्न करीत आहेत ही सुदैवाची गोष्ट होय. ईश्वरकृपेनें ह्या चळवळीस यश आल्यास भावी तरुण हिंदुस्थान त्यांची स्तुतिस्तोत्रें अखंड गात राहील ! सध्या तरी शस्त्र वापरण्यास सरकारी परवानगी हवी असते. व ही परवानगी सरसकट सर्वत्रांस मिळतें असें नाहीं.

क्रांतियुद्धानंतर व्हिक्टोरिया राणीनें एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. तो मागील कोणत्याही जाहीरनाम्यापेक्षां जास्त गोड आणि उदारपणानें अघळपघळ भरलेला आहे. त्यांत हिंदुस्थानच्या प्रजेस इंग्रजांच्या अंमलांत आनंदानें रहाण्यास सांगितलें असून आपण निःपक्षपातीपणानें राज्य चालवूं अशी हमी दिली आहे. त्याच प्रमाणें १८५७ चें वादळ ज्यामुळें मुख्यतः उत्पन्न झालें अशा संस्थान खालसाच्या कोणत्याही भानगडी न करतां त्यांना दत्तकाची वगैरे परवानगी देण्यांत येईल असें वचन दिलें आहे. तसेंच जात-गोत मनांत न आणतां योग्यतेप्रमाणें सर्वांस सारख्या नौकऱ्या देण्यांत येतील, प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणें वागण्याची मुभा आहे, त्यांत इंग्रज सरकार हात घालणार नाहीं; इत्यादि कलमें आहेत. ह्या जाहीरनाम्यांतील प्रत्येक कलम पुढें प्रामाणिकपणानें पाळल्या गेलें असें नाहीं. त्या वचनांना हरताळ लावणारीं अनेक कामें राज्यकर्त्यांकडून करण्यांत आलीं. ह्या जाहीरनाम्यामुळें हिंदुस्थानच्या जुन्या इतिहासावर जणूं काय पडदा टाकला आणि तेव्हांपासून नव्याच युगनाटकास आरंभ झाला! जिकडे तिकडे इंग्रजाबद्दल आदर वाढल्यासारखा दिसूं लागला. जो तो इंग्रजी संस्कृतीचें अनुकरण करूं लागला. आणि राष्ट्रापेक्षां समाजसुधारणेकडेच विचारी पुरुषाचें लक्ष वेधलें. इतके सगळें झालें तरी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां रात्रंदिवस तळमळणारे आत्मे अजून नाहींसे झाले नव्हते. व ते नाहींसे होणें कधींही शक्य नाहीं. ज्याप्रमाणें हे तळमळणारे आत्मे नाहींसे झाले नाहींत त्याचप्रमाणें ब्रिटिश नोकरशाहीचा खुनशीपणाही नाहींसा झाला नाहीं. लो० ना

प्रथम शिक्षा झाली त्याच वेळीं नोकरशाहीचा खुनशीपणा जगास विशेष तऱ्हेनें प्रगट झाला. व आजवर तो सारखा वाढतच जाऊन तिनें अनेक निरपराध व निष्पाप हिंदी लोकांचे बळी घेतले. लार्डकर्झन नांवाच्या व्हाइसरायांनीं बंगालची फाळणी केल्यानंतर हिंदुस्थानचे लोक संतप्त झाले व १९०७-०८ मध्यें देशभर क्रांतिकारकांची चळवळ उपस्थित झाली होती. त्यावेळीं व नंतरही वैयक्तिक व सामुदायिक प्रतिकाराचे अनेक प्रयत्न झाले. अजूनही तसे क्वचित होतात. त्यांच्या देशभक्तीच्या तल्कटतेचें जरी अभिनंदन करण्यासारखें असलें तरी तशा उतावळ्या प्रयत्नापासून देशाला तादृश उपयोग होण्यासारखा नाहीं. ह्यावेळीं दडपशाहीचाही जोर अतिशय होऊन अनेक लोक फांसावर लटकाविले गेले, पुष्कळ अंदमानांत खितपत पडले. आणि कित्येक हद्दपार झाले! लोकमान्यासारख्यांनाही ह्यावेळीं हद्दपारीची शिक्षा झाली होती. पण लवकरच ह्याचा उपशम होऊन मोर्ले—मिंटो सुधारणा हिंदुस्थानास मिळाल्या. आणि चळवळे लोक तुरुंगांत असल्यामुळें ह्या तुटपुंज्या सुधारणांनीं लोकांचें समाधान झालें! पुढें १९११ सालीं जार्ज बादशहास राज्याभिषेक झाला त्यावेळीं लोकांच्या राजनिष्ठेस पुनरपि मोठा ऊत आला होता! त्यानंतर लौकरच वैध आणि सनदशीर चळवळीस आरंभ झाला ही स्थिती कांहीं दिवस टिकली. त्यानंतर जर्मन युद्ध १९१४ त उत्पन्न झालें. या अन्यायी युद्धांत हिंदुस्थानाला इंग्रजांस मदत करावी लागली. चार वर्षे हें युद्ध चाललें. व बहुतांशीं हिंदी फौजांच्या जोरावर इंग्रजांना जय मिळाला. पण इतक्यांत १९१८ सालीं अमृतसर येथील

जालियनवाला बागेंतील भयंकर कत्तल होऊन पुन: असंतोष माजला. हा असंतोष बंद करण्याकरितां व दशवार्षिक मुदत संपत होती म्हणून १९१९ मध्यें हिंदुस्थानला सुधारणांचा दुसरा हप्ता फारच कार्पण्यानें देण्यांत आला. पुढें १९२० मध्यें लो० टिळक दिवंगत झाल्यावर म० गांधींच्या अहिंसावादी असहकारितेचा देशांत उदय होऊन हे नवीनच गांधीयुग सुरू झालें. असहकारितेच्या मागें 'अनत्याचारी' हें विशेषण जितक्या स्पष्टपणें लावलें होतें तितक्या स्पष्टपणें तें आतांपर्यंतच्या कोणत्याही चळवळीच्या मागें नव्हतें. शस्त्राभावीं येथें होणाऱ्या कोणत्याही चळवळी आपोआपच अनत्याचारी होत असत! परंतु असहकारितेस हा मानीव, काल्पनिक अगर अनुच्चारित अत्याचारही खपला नाहीं! ह्या चळवळींतील तत्वें जरी अत्युत्कृष्ट व साधुत्वाचीं होतीं. तरी हिंदुस्थानकडून त्यांचें पालन व्यवस्थित रीतीनें झालें नाहीं. एखाद्या दुष्काळांत उपासमारीनें पीडित झालेल्या माणसास आपत्ती निवारणार्थ आणखी उपवास करावयास सांगण्यासारखाच हा प्रकार होता. अगोदरच अहिंसा, शांतता इत्यादि गोष्टींचें हिंदुस्थानाला अजीर्ण झालें होतें त्यांत हा असा मारा झाल्याबरोबर येथील बहुजनसमाजाच्या मनोवृत्ति कणखर बणण्याऐवजीं निर्बल बनूं लागल्या व त्यांत ढोंगीपणा शिरूं लागला. हातांत शस्त्र व व सामर्थ्य असल्यावर अहिंसेच्या अनत्याचाराच्या गोष्टी शोभतात; अमेरिका आणि इंग्लंड नाहीं का आज हातांत शस्त्र घेऊन शस्त्रसंन्यासाच्या आणि अनत्याचारी अहिंसेच्या गोष्टी करीत? पण हातांत शस्त्र धरण्याचीही ताकत नाहीं. त्यांच्या अहिंसेच्या व तत्वज्ञानाच्या पोकळ

गप्पांना जगांत कोण डुंगणार आहे ? खादीप्रसारासारख्या उत्कृष्ट गोष्टीही ह्या चळवळीपासून उदय पावल्या हें त्यांतल्या त्यांत बरें झालें. हा सर्व इतिहास अगदीं नवीन असल्यामुळें सर्वत्रांस ज्ञातच आहे.

सध्याही येथें अनेक चळवळी चालू आहेत. हिंदु-मुसलमान, ब्राम्हण--अब्राम्हण इत्यादि सारख्या राष्ट्रघातक भांडणांनाही देशांत ऊत येत आहे. ह्या अंतर्गत भांडणांपासून इंग्रज सरकारचें एकंदर कल्याणच होत असल्यानें तीं मोडण्याचा सरकार झटून प्रयत्न करीत नाहीं--किंबहुना त्यांस उत्तेजनच देत आहे. ह्या तंट्या-भांडणांतून हिंदु तेवढा बळकट व एक होण्याकरितां अलिकडे हिंदु-सभेची चळवळ उदय पावली आहे. तिनें मात्र हिंदुस्थानचीं सर्वांगीण उन्नत्ति होण्याची आशा वाटत आहे. बुद्धीच्या दृष्टीनें हिंदुस्थानचें लोक कधींच कमी नसल्यामुळें जगांतल्या बौद्धिक चढा-ओढींत येथील विद्यार्थी भाग घेऊन यशस्वी ठरत आहेत. यद्यपि सध्या उच्च विद्या कलांच्या बाबतींत हिंदुस्थान समृद्ध नसला तरी येथील विद्यार्थ्यांची तिकडे प्रवृत्ति होत असून अनेक विद्यार्थी पर-देशांतून शिक्षण घेऊन येत आहेत. सरकारचाही दृष्टीकोन पूर्वी इतका फडक राहिलेला नसून हिंदी प्रजाजनांच्या अनेक गोष्टी सहन करून घेण्याची सरकारला संवय होत आहे. स्वयंनिर्णयाच्या तत्वानुसार हिंदुस्थानला सुधारणा व स्वराज्याचें कांहीं अधिकार क्रमाक्रमानें देण्याचें जाहिर करण्याचा उदारपणा सरकारनें दाख-विला आहे. सुधारणांचा नवीन हप्ताही मिळण्याचें घाटत आहे.

पण ह्या चळवळी, हालचाली आणि सुधारणा केवळ चूल बोळ-क्याच्या होऊन राहिल्या आहेत. त्यांना आंता शंभर वर्षांपूर्वीचा जोर दिसत नाहीं. त्या वेळचा शिलेदारी बाणा आज नष्ट झाला असून शस्त्रजनित चैतन्याचें दृश्य केवळ स्वप्नवतच होऊन राहिलें आहे ! ह्या दीर्घ कालीन शांततेचें कारण शस्त्र संन्यासाशिवाय कोणतें असूं शकणार आहे ? ह्या सर्व असहाय परिस्थितींतून आर्यावर्ताचा स्वातंत्र्य-सूर्य कधीं उगवेल तो उगवो !

———

# ख्रिस्ती मिशनरी व हिंदुस्थान

खिस्ती मिशनऱ्यांचा इतिहास बराच जुना आहे. आज मितीसि त्यांचा व सर्व जगाचा थोडा फार संबंध येत आहे. आम्हीं मिशनऱ्यांच्या हिंदुस्थानांतील प्रयत्नाकडे व इतिहासाकडे पहाणार ते धार्मिक दृष्टीनें नसून मुख्यतः राजकीय दृष्टीनें होय. आज जगांत जेथें जेथें इंग्रजांचें व इतर युरोपियनांचें राज्य आहे. तेथें तेथें तें ' मणौ वज्रसमुत्कीर्णे सूत्रस्येव ' ह्या न्यायानें प्रथम मिशनऱ्यांचा ख्रिस्ती धर्मप्रसार व नंतर राज्यकर्ते अशाच क्रमानें स्थापन झालें आहे. आणि म्हणूनच इंग्रजी राज्याचे बिनीचे लोक आणि वर्धक ह्या दोन्ही दृष्टींनीं ख्रिस्ती मिशनऱ्यांचें महत्व अतिशय मोठें आहे. जगांतील इतर ठिकाणांप्रमाणेंच हिंदुस्थानांतीलही मिशनऱ्यांचा आद्येतिहास अतिशय संतापजनक व बायबलांतील तत्वांना सर्वस्वीं हरताळ फांसणारा असा आहे! फार पूर्व काळीं हा ख्रिस्ती मिशनऱ्यांचा कळपच्या कळप पौर्वात्य देशांतील मनुष्यकुरणांचा फडशा पाडण्याकरितां बुभुक्षित वृत्तीनें इकडे आला, व त्यांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणें हिंदुस्थानांतच जास्त खाद्य मिळालें. एकनाथाच्या वेळीं तर फादर स्टीफन्स नांवाचा एक मिशनरी इकडे येऊन राहिला होता. आणि अनेक वर्षांच्या दीर्घ परिश्रमानें त्यानें मराठी भाषा आपलीशी करून त्या भाषेंत येथील लोकांना चकविण्याकरितां ज्ञानेश्वरी इ० ग्रंथांच्या धर्तीवर ' ख्रिस्तायन ' नांवाचा एक सुंदर ओवीबद्ध ग्रंथही लिहिला!

१५४१ मध्येंही फ्रान्सिस झेविअर नांवाचा युरोपियन ख्रिस्ती मिशनरी हिंदुस्थानांतून व इतर पौर्वात्य देशांतून फिरला होता. ह्या गृहस्थाच्या दुष्टपणाइतकीच त्याची चिकाटीही दांडगी होती. झेविअरला पौर्वात्य भाषा येत नव्हत्या. पण त्याची त्यानें मुळींच पर्वा न करितां लोक बाटविण्याचें आपलें काम सुरू केलें. तो रस्त्यावर फ्रेंच, पोर्तुगीज, लॅटिन इत्यादि भाषांतून पण बहुतांशीं अभिनयाच्या सहाय्यानें आपलीं धर्मविषयक व्याख्यानें देई. त्याच्याजवळ एक घंटा आणि एक क्रूस असे. हा रस्त्यांतून घंटा वाजवीत फिरत असला म्हणजे विनोदानें अनेक मुलें व माणसें त्याचें मागें लागत. तो स्वतः क्रुसाचा मुका घेऊन त्यांना मुका घ्यावयास सांगत असें. तसेंच तो प्रत्येकास एक एक माळ बक्षीस देई. आणि येवढ्या लहानशा विधीनेंच ते बाटले असें तो जाहीर करी. झेविअरचें हे प्रयत्न शांतताप्रधान असत. परंतु त्याच्या ह्या करण्यानें लोकांना मात्र आपण ख्रिस्ती झाल्याची कांहींच भावना होत नसे. आणि यदाकदाचित् झालीच तरी त्यावेळचें ब्राम्हण त्यांना तावडतोव स्वधर्मांत घेत. अशा तऱ्हेनें आपले प्रयत्न निष्फळ होतात हें पाहून झेविअरनें अत्यंत अमानुष प्रकार करण्याचें योजलें. त्यानें गोव्यांतील पोर्तुगीज सैनिकांची मदत घेऊन हिंदूंचीं देवळें पाडावीं, त्यांतील मूर्ती फोडाव्या व तेथें चर्चें उभारावीं, लोकांवर जुलूम करावा, विहिरींतून मांस टाकावें आणि इतर अत्याचार करावें. अशा तऱ्हेनें ह्या शिखानष्टानें किती मंदिरें पाडलीं आणि किती लोक बाटविलें ह्याची गणनाच नाहीं ! ह्यानें गोव्याला शाळा आणि कॉलेज काढलें. तेथें जबरदस्तीनें

मुलें आणून बाटविण्यांत यत. झेवियरला मदत करण्याकरितां म्हणून अनेक मिशनरी परदेशांतून इकडे येऊं लागलें. पुढें हा झेविअर चीन, जपान, इत्यादि ठिकाणीं फिरला व त्यानें धर्म प्रसार केला. परंतु त्याचें प्रस्थ हिंदुस्थानांत जसें बसलें होतें तसें इतर ठिकाणीं बसलें नाहीं. त्यामुळेंच हिंदुस्थान परतंत्र झालें व इतर राष्ट्रें शाबूत राहिलीं. झेविअरच्या व तत्सदृश इतर मिशनऱ्यांच्या प्रयत्नांचा इतिहास अशा तऱ्हेनें अतिशय संतापजनक आणि ख्रिस्ती धर्मास कलंकभूत असा असतांही त्याच्या नांवांचीं अनेक स्मारकें करण्यांत आलीं. व सध्याही त्याच्या नांवाच्या अनेक संस्था चालविण्यांत येत आहेत. पोर्तुगीज लोकांनीं येथील लोकांना बाटविण्याचें कामीं भयंकर जुलूमजबरदस्ती केली; व आम्हींही बाटलेल्या लोकांना अदूर दृष्टीनें दूर ठेवलें! इतकें झालें तरी त्यांचे आचारविचार बदलले नाहींत. अजूनही गोमांतकांत शेंकडों वर्षांपासून नांवानें ख्रिस्ती पण धर्मानें पूर्णपणें हिंदू असलेलीं हजारों कुटुंबें आहेत. त्यांना फिरून स्वधर्मांत घेण्याची कामगिरी हल्लीं सुरू झाली आहे ही संतोषाची गोष्ट होय.

यूरोपियन देशांत आपसांत कितीही भांडणें असलीं तरी ह्या धर्मप्रसारविषयक कामांतून त्यांच्यांत एकत्व वसत असतें. त्यामुळेंच पोर्तुगीज मिशनऱ्यांनीं खणलेल्या पायावर इंग्रज लोकांना आपली भव्य इमारत उभारतां आली. एकीकडे राजकारणी इंग्रज आपल्या व्यापाराचें आणि सत्तेचें पिल्लू हिंदुस्थानांत प्रसवीत असतां दुसरीकडे त्या पिल्लांच्या खाण्यापिण्याची आणि पोषण

वर्धनाची व्यवस्था करण्याचें काम अगोदर पासूनच ख्रिस्ती मिशनरी करीत होते. व अजूनही पूर्वीइतक्याच चिकाटीनें करीत आहेत. इंग्रज सत्ताधारी निःपक्षपातीपणाचा केवढाही टेंभा मिरवोत आणि त्यांच्या जाहीरनाम्यांतून धार्मिक समतेच्या कितीही पोकळ गप्पा मारलेल्या असोत, त्यांच्याकडून आतांपर्यंत ख्रिस्ती मिशनऱ्यांना मदत झालेली आहे, होत आहे, आणि अशींच पुढें होत राहील ! व ह्यांत कांहीं आश्चर्यही नाहीं. युरोपियन ख्रिस्ती मिशनरी हे येथील विद्यमान सत्ताधाऱ्यांचे जातभाई व धर्मबंधूच असल्यामुळें आपल्या राज्याबरोबरच आपला धर्मही ह्या हिंदुस्थानावर पसरलेला पहावयास सांपडल्यास आपले डोळे संतुष्ट होतील अशी कल्पना त्यांच्या मनांत कां येऊं नये ? प्रत्यक्ष इंग्लंडच्या राजांच्या पदव्यांच्या बिरुदावळींत ‘धर्मसंरक्षक’ [Defender of the Faith] ही पदवी लावलेली असते, ती फुकट कशी असेल ? व ज्या धर्माचा येवढा मोठा सम्राट रक्षक आहे, त्याचा वरचष्मा ह्या दुर्दैवी व हतबल देशांत असल्यास आश्चर्य तरी कसलें ? ख्रिस्ती मिशनरी इंग्रजांच्या राज्यापूर्वी येथें होते; आणि इंग्रजांचें राज्यानंतर तर त्यांना हिंस्थानांत येऊन धर्म-प्रसार करण्याचा कायदेशीर परवानाच मिळाला मग काय पाहिजे ? आज मिशनरी संस्था इतक्या प्रबळ असण्याचें कारण केवळ राजाश्रय होय.

वस्तुतः धर्माचा संबंध मुख्यतः हृदयाशीं असतो. ज्याला ज्या धर्मविषयक कल्पना पटतील त्या तो घेत असतो. धर्माच्या बाबतींत जबरदस्ती करणें रानटीपणाची परमावधी होय. परंतु जे

धर्मच मुळीं अनुदारत्वाचे बनलेले आहेत, ह्यांच्या अनुयायांनीं जर रानटीपणा केला तर तो अयोग्य आहे असें कोण म्हणेल? जगांत हिंदुस्थान हाच असा एक देश आहे कीं, ज्यानें परधर्मियांचें आघात गेल्या शेंकडो वर्षांपासून आजपर्यंत अखंड सोसले, आणि तरीहि त्यानें अजून स्वत्व समूळ सोडलें नाहीं! हिंदुस्थानांतील सुपीक व मऊ जमिनीप्रमाणेंच येथील लोकांचीं अंतःकरणेंही मऊ आहेत. त्यामुळें प्रथम मुसलमानांना आपला रानटी धर्म येथें पसरविण्यास चांगलें फावलें. मुसलमान लोक कडवे असून, धर्मवेडे असत, व त्यांचे अत्याचार राक्षसांनाही लाजविणारे असत, हें सर्व खरें असलें तरी ख्रिस्ती मिशनऱ्यांची चिकाटी व सुधारलेली पद्धत मुसलमानांना अवगत नसल्यामुळें त्यांच्या भयंकर अत्याचारांपासूनही ह्या प्रमाणांत त्यांना फायदा मिळाला नाहीं. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे प्रयत्न थोड्या निराळ्या धर्तीवर चालू झाले. त्यांनीं शाळा काढल्या, मोफत दवाखाने काढले, सूतिकागृहें काढलीं, अनाथगृहें, [Poor houses] रात्रींच्या शाळा इत्यादि संस्था काढल्या आणि तद्द्वारें व इतर प्रलोभनें दाखवून धर्मप्रसार चालविला. त्यांनीं हिंदुस्थानांतील खालच्या व अस्पृश्य म्हणून मानल्या गेलेल्या जातींत धर्मोपदेश सुरू केला, त्यांच्या करितां वाङ्मय उत्पन्न केलें; आणि म्हणून त्याच जातींतून त्यांना बरेंच खाद्य मिळत गेलें. दिवसोंदिवस ह्या बाटग्या लोकांची संख्या वाढत गेली आणि त्यामुळेंच हिंदुस्थानच्या राजकीय स्थितीवर फार मोठा परिणाम होऊन हिंदुस्थानचें पारतंत्र्य दृढतर झालें! वस्तुतः बाटणाऱ्या लोकांत अडाणी लोकांचीच संख्या जास्त रहात असते. कोणत्याच

धर्माचीं तत्वें समजण्यापूरतीं त्यांचीं बुद्धी प्रगल्भ झालेली नसते. ज्या हिंदुधर्मांत असे लोक पूर्वी असतात त्या धर्माचीं देखील तत्वें त्यानें अभ्यासिलीं असतात असें नव्हे. केवळ पूर्वपरंपरेनें चालत आलेला म्हणूनच त्याला ह्या धर्माबद्दल आत्मीयता वाटत असते. स्वधर्माची जर ही स्थिती तर परक्या मिशनऱ्यांमुळें स्वीकारलेल्या नव्या ख्रिस्ती धर्माचीं तत्वें त्याला किती समजलीं व पटलीं असतील, व पाद्री साहेबांनीं तीं तत्वें त्या अडाण्याच्या गळीं उतरवितांना कोणतीं साधनें उपयोजलीं असतील ह्याबद्दल विचारच करावयास नको! अशा प्रकारच्या शेंकडो अडाणी लोकांनीं जो धर्मत्याग केला तो त्यांना तो धर्म पटला म्हणून नव्हे, तर ह्या धूर्त मिशनरींनीं त्यांना कांहीं तरी ऐहिक फायद्याचें प्रलोभन दाखविलें म्हणूनच होय, हें सिद्ध करावयास पुराव्याचीच गरज आहे असें नाहीं! पारलौकिकाकारितां ऐहिकाचें प्रलोभन! अशा प्रकारें धर्मप्रसार करणें म्हणजे त्या धर्माच्या आद्य प्रणेत्यास उघड उघड फसविणेंच नव्हे काय? अस्तु.

इंग्रजांच्या दीर्घकालीन शांततेच्या अव्वल आमदानींत जसे निरक्षर अडाणी लोक ख्रिस्ती झाले त्याच प्रमाणें इंग्रजी शिक्षणानें बहकलेले व स्वधर्माचा विसर पडलेले सुशिक्षित लोकही धर्मभ्रष्ट झाले! त्यामुळें देशाची थोडी हानी झाली असें नाहीं. ह्यावर कोणी असा मुद्दा पुढें आणतात कीं, जे मनानें कमअस्सल व निरुपयोगी असतात तेच धर्मच्युत होतात. ते स्वधर्मांत असलेतरी त्यांचा कांहीं उपयोग होण्यासारखा नसतो. परंतु लोहचुंबकांत लोखंडालाच फक्त

ओढण्याची शक्ती असते, सोन्याला ओढण्याची नसते. हें खरें असलें म्हणून आपण लोखंडाचा सर्वथा त्यागच करावा हें उचित नव्हे. संख्याबलाचें महत्व थोडें आहे असें नाहीं. म्हणून ही गळती थांबविणें आपलें कर्तव्य होय. एकदां मनुष्य ख्रिस्ती झाला कीं लगेच आपणांस साहेब समजूं लागतो. त्याला असें वाटतें कीं, आपला आणि इंग्रज सत्ताधाऱ्यांचा आकाशांतील बाप एकच असल्यामुळें ऐहिक गोष्टींतही त्यांचा आमचा समान दर्जा होऊन आम्ही हिंदुस्थानचे राजे झालों आहोंत! त्यामुळें तो आपल्या जुन्या जातभाईंशीं फटकून वागूं लागतो; लागलींच आपलीं पूर्वाश्रमींचीं रानटी नांवें बदलवून नवीन पद्धतीचीं ख्रिस्ती नांवें ठेऊन घेतो, स्वतःचा पोषाख बदलवितो आणि आपल्या कुलस्त्रियांचीही लुगडीं सोडून तेथें झगे चढवितो. अशा रितीनें बाह्यतः परक्या बनलेल्या मनुष्यांचीं हृदयेंही लवकरच परकीं बनतात आणि तो अग्नीप्रमाणें आपल्याच देशजननीचा भक्षक बनतो! शरीर बद्ध झालें तरी चालेल परंतु मन आणि हृदय बद्ध होणें म्हणजे अधःपाताची परिसीमा होय. मुसलमानांची सत्ता इतकीं वर्षें येथें होती तरी त्यांना आमचीं मनें मारतां आलीं नाहींत. तें काम धर्तलेनें मिशनऱ्यांच्या व स्वशिक्षणाच्या सहाय्यानें इंग्रज करीत आहेत! ख्रिस्ती धर्मप्रसारामुळें येथील लोक स्वसंस्कृतीपासून निर्दयपणें तोडल्या गेले. व त्यांच्या धार्मिक बलिदानानें इंग्रजी राज्यास बळकटी आली. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नास पूर्वींच्या काळीं व कांहीं प्रमाणांत सध्याही काळ्या ख्रिस्ती लोकांचा किती अडथळा होत आहे हें सर्वश्रुतच आहे. मागें अयोध्या

खालसा करतांना तेथें इंग्रजाचें राज्य हवें असें म्हणणारें सर्वच लोक गोरे व काळे ख्रिस्ती होते ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. मिशनरी लोकांचें प्रयत्न बिलकूल संथपणें चालत असल्यामुळें हिंदुस्थानची शक्ति किती कमी होत आहे हें आपल्याला कळून येत नाहीं. मुसलमानांचें प्रयत्न जुलुमाचे होते, ख्रिस्ती लोकांचे सध्याचे प्रयत्न दयेचे आहेत! ळांतल्यापेक्षांही बाटग्या लोकांचा धर्माभिमान नेहमींच जास्त तीव्र असतो त्याप्रमाणें सध्याही धर्मक्षेत्रांत हे बाटलेले लोकच 'आपण गुंतले दुसऱ्यास गोंविती' असल्या तऱ्हेचें काम करीत आहेत. प्रथमतः इंग्रज मिशनऱ्यांच्या भुलथापांनीं येथील बाटलेल्या लोकांनीं स्वतःला कितीही इंग्रजांबरोबर मानून घेतलें असलें, तरी त्यांचा हा गर्वज्वर आतां उतरला असावा. कारण इंग्रज लोक त्यांच्यांत आणि त्यांच्या पूर्वाश्रमींच्या रक्तसंबंधींयात कांहींच फरक करीत नाहींत ही गोष्ट त्यांच्या अनुभवास आली असावी असें त्यांच्या कांहीं चळवळींवरून वाटूं लागलें आहे.

मिशनरी लोकांच्या उपकाराचे गोडवे अनेक समंजस लोकही गातांना आढळून येतात. मिशनरी लोकांची चिकाटी अवर्णनीय आहे. त्यांच्यांतील अत्यंत विद्वान लोकही अगदीं थोड्या वेतनावर एखाद्या शैक्षणिक संस्थेंत अगर अनाथालयांत सारा जन्म घालवितांना आढळून येतात. आमच्या देशांत छपाईची कला प्रथम त्यांनीं आणली, आमच्या मलींना प्रथम शिक्षण देण्याचा उपक्रम त्यांनीं केला. त्यांनींच प्रथम आम्हांस समाजसुधारणा शिकविली

हिंदुस्थानांतील सामान्य जनसमूहांत शिक्षणाचें प्रमाणही त्यांनींच वाढविलें इत्यादि गुणमालिका अमान्य करतां येणार नाहीं हें खरें, तरी पण त्या फायद्यांच्या मानानें त्यांनीं हिंदुस्थानचें नुकसान किती करून टाकलें, ह्याचा कोणी विचार केला काय? त्यांनीं आमच्यांत सुधारणा केली असेल पण आमची संस्कृती मात्र मारून टाकण्याचा प्रयत्न केला! ज्यांनीं आमची संस्कृती ठार मारली, आमचा स्वदेशाभिमान नष्ट केला, आमचें पारतंत्र्य दृढ केलें, त्यांनीं आमच्यापुढें अनेक सुधारणांची रासच्या रास ओतली तरी त्याचा काय उपयोग? नष्ट झालेल्या 'प्रज्ञे' चा मोबदला तुमच्या लहान सहान सुधारणांनीं मिळूं शकतो काय? आमच्या देशांतील दुष्काळपीडित गरीब हिंदूंच्या रिकाम्या पोटांत ख्रिस्ती मिशनरी अन्न घालत असले तरी त्या जीवितापेक्षांही जास्त मूल्य-वान् असणारा त्याचा धर्म हिरावून घेतल्या जातो हा कोठला परोपकार? ख्रिस्ती मिशनरी स्वदेशांतून इकडे येतो तो ह्या खात्रीनेंच कीं, इकडील सर्व लोक पशू आहेत आणि आपण त्यांना सद्धर्म देऊन मनुष्यत्वाप्रत पोंचविणार आहोंत +! आणि आपल्या

---

\+ एक पाद्री धर्ममार्तंड अगदीं आवेशाच्या भरांत येऊन पुढीलप्रमाणें लिहितात :—

'.......... Poor India! When will she be truly happy? When will her inhabitants, instead of being a multitude of jarring communities, be combined into one people? When will she rise from the *degradation of ages* and emulate, or perhaps excel, even the proudest

ह्या समजुती प्रमाणें तो आमरण प्रयत्न करतो. ही त्याची चिकाटी व कार्यतत्परता मात्र निःसंशय अनुकरणीय आहे.

सध्या ख्रिस्ती मिशनरींचें जाळें हिंदुस्थानांत तरी सर्वत्र पसरून राहिलें आहे. अगदीं लहानांत लहान खेड्यापाड्यांतूनही त्यांचा प्रवेश झालेलाच दिसतो. त्यांच्या ह्या जाळ्यांत पूर्वींच्या काळीं अनेक मासे अडकत असत. पण अलीकडे धर्म जागृतीच्या आणि शुद्धि-चळवळीच्या काळांत ती संख्या बरीच कमी झाली आहे. तरी पण ह्या प्रचंड हिंदू धर्माला ह्या परधर्मरूपी ज्या अनेक जळवा लागल्या आहेत, त्यांनीं आतांपर्यंत हिंदुधर्माचें किती रक्त शोषण केलें हें पाहिलें म्हणजे आश्चर्य वाटतें. सुरुवातीस डोळेझांक केल्याचा हा परिणाम आहे. मिशनऱ्यांचा उद्योग दांडगा, जाहिरात दांडगी, आणि सरकारी आश्रयही दांडगा त्यामुळें त्यांच्याच संस्थांची संख्या आज हिंदुस्थानांत जास्त आढळून येते. आंकड्या-करितां पुढील उतारा पहा :—

" हिंदुस्थानांत परधर्मियांनीं धर्म प्रसारार्थ अनेक प्रकारचे उद्योग चालविले आहेत. त्यांत ख्रिस्ती मिशनऱ्यांचे उद्योग सर्वांत अधिक व सुव्यवस्थितपणें चालले आहेत. खुद्द हिंदुस्थानांत धर्म प्रसार करणाऱ्या ७०० ख्रिस्ती संस्था आहेत. त्यांत ब्रिटिश,

---

peoples of the west in all that forms the glory and defence of Nations? *This can only be when India becomes Christian.*

—Letters to Indian Youth let. XVII P. 255.

अमेरिकन, जर्मन इत्यादिकांच्या प्रमुख आहेत. ब्रिटिश मिशनास २७६९९३५३ पौंड, अमेरिकन मिशनास ९७३६०८४ पौंड, स्वीडन-नार्वे व स्वित्झर्लंड मधील मिशनास ७८०९२० पौंड, कानडाच्या मिशनास ७२२०९४ पाड, जर्मन मिशनास ६२९९ पौंड म्हणजे एकंदर ५८४१७२६९० रुपये वरील संस्थांचा अहवाल प्रसिद्ध झाला त्या साली हिंदुस्थानांत× खर्च झाले आहेत. ही झाली आर्थिक मदत. त्या मदतींतून अनेक कामें चालत असून ख्रिस्ती बनविण्यासाठीं ७२१८ नेटिव्ह ख्रिस्ती व १८७९९ पाद्री नियुक्त करण्यांत आले आहत. या पाद्र्यांत २१३१ यूरोपियन पुरुष, १४८१ यूरोपियन विवाहित स्त्रिया व २४०८ यूरोपियन कुमारिका कामें करीत आहेत. या संस्थांच्या ख्रिस्ती उपदेशक तयार करण्याच्या ६१ शाळा, १४१ अनाथालयें, १७० शिल्प विद्यालयें, ६१७ हायस्कूलें, १५८२० रविवारच्या शाळा, ९८ शेतकी शाळा, ५० कालेजे, ९४ शिक्षक ट्रे. स्कूल्स, ४३ छापखाने, देवळांच्या अधिकाऱ्यासाठीं ६५ शाळा, ९९ वृत्तपत्रें, ४८८६ दवाखानें १६९८ डाक्टर्स व नर्सेस ४८०४४ शिक्षक आहेत. ५२१०३६ कॉलेजे व शाळांतील विद्यार्थी, ७८२९२४ सभासद, व १८५३०३६ रुपये सभासदांची वार्षिक वर्गणी आहे. ख्रिस्ती लोकांनीं आपल्या धर्म प्रसाराचे कसे अफाट प्रयत्न चालविले आहेत हें हिंदुसमाजानें जागरुकपणें पहावे+. इतक्या दूर देशांत

---

× वरील आंकडे १९२३ सालचे आहेत. निरनिराळ्या ख्रिस्ती संस्था, त्यांचे चालक, वृत्तपत्रें व मासिकें इत्यादींची स्थळ व नांवनिशीवार माहिती हवी असल्यास ‘ Biennial Survey of

येऊन अशा रितीनें धर्मप्रसाराचें त्यांनीं चालविलेलें काम पाहिलें म्हणजे ख्रिस्ती लोकांच्या दीर्घ प्रयत्नाबद्दल कौतुक वाटल्या खेरीज रहात नाहीं. अशा संघटित व बलशाली परधर्माशीं हिंदुसमाजाला टक्कर द्यवयाची असल्यानें हिंदुसमाजानें आपली सुव्यवस्थित संघटणा केली तरच त्याचा तरणोपाय आहे ही गोष्ट ध्यानीं धरली पाहिजे ”.

—केसरी. ता. २८ मे १९२९ पृ. ६.

वरील विवेचनावरून केवळ धार्मिकच नव्हे तर राजकीय दृष्ट्याही हा ख्रिस्ती मिशनरींचा पाश किती जबर आहे ह्याची कल्पना येईल. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां ज्या अनेक अंगांनीं प्रयत्न करावा लागणार आहे, त्यांत मिशनरींचें उच्चाटण हेंही अंग प्रमुखत्वानें असावें लागणार आहे. इतर देशांतून कदाचित् एक राष्ट्रियत्वाकारितां एक धर्माची जरूर नसेल. पण हिंदुस्थानांत मात्र दोन विभिन्न धर्मियांत एकराष्ट्रियत्व उत्पन्न होण्यासारखी स्थिती नाहीं. कारण येथील विद्यमान परधर्मियांना हिंदुस्थान हा अजून स्वदेश वाटत नाहीं. आणि म्हणूनच हिंदुस्थानच्या भावी एक-

---

occupation and Directory of Christian Missions in India, Burma and Ceylon—Compiled by Rev. A. Mc Leish, U. F. C. Mission, Ajmer. ’ ह्या पुस्तकाची अगदी ताजी आवृत्ति पहा. सदर पुस्तकांतील संस्थांची मोजदाद करतां वरील आकड्यांत गेल्या सहा वर्षांत बरीच भर पडली असें आढळून येते. तसेच आर्यसमाजानें प्रसिद्ध केलेले ‘ घोर आक्रमण ’ हें हिंदी चोपडें ही ह्या बाबतींत वाचनीय आहे.

राष्ट्रियत्वाकरितां हिंदुकरितांच हिंदुस्थान हीच भावना उपयोगी पडणार आहे. परंतु ही चळवळ अजूनही स्वतःला राष्ट्रीय म्हणवून घेणाऱ्या अनेक बड्या व्यक्तींना 'अराष्ट्रीय' वाटते, ही दुर्दैवाची गोष्ट होय. हिंदुस्थान हा धर्मप्रवण देश आहे. त्यांचें राजकारण धर्माशीं निगडित झालें आहे. ही गोष्ट विसरतां येत नाहीं. जी स्थिती ख्रिस्ती धर्माची तीच मुसलमानी धर्माची आहे. ह्याही तोटींतून हिंदुस्थानांतून बरेंच पाणी बाहेर गेलेलें आहे. राजकारणांत ह्यांचा तृतीय पंथच असतो ! सारांश राजाश्रयामुळें ख्रिस्ती धर्म आणि राजसत्तेची 'री' ओढणारा म्हणून मुसलमानी धर्म हे दोन्ही धर्म राजकीय, सांस्कृतिक वा आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीनें हिंदुस्थानला खाऊन टाकीत आहेत ही गोष्ट खरी.

# परतंत्र हिंदुस्थानांतील शिक्षण.

मनुष्याची वैयक्तिक अगर राष्ट्रीय उन्नत्ति अगर अधोगती ही सर्वस्वी त्या राष्ट्रांत देण्यांत येणाऱ्या शिक्षणावर अवलंबून असते. आणि म्हणून एखाद्या देशाच्या तत्कालीन स्थितीची चिकित्सा करतांना तेथील शिक्षण पद्धतीचीही चिकित्सा केल्याशिवाय गत्यंतर नसतें. शिक्षण स्वतः कधींच वाईट नसतें. 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' हें वचन अगदीं खरें आहे. परंतु पाणी स्वतः कितीही निर्मळ असलें तरी त्यांत विष मिळविलें कीं, तें जसें घातक होतें, तसेंच शिक्षणाचेंही आहे. सध्याच्या परतंत्र हिंदुस्थानांत ज्या पद्धतीनें शिक्षण देण्यांत येतें ती पद्धतीच मुळीं विषमिश्रित आहे. आणि आज इतक्या वर्षांपासून इंग्रजी सत्तेच्या पारतंत्र्याचें जड जूं हिंदुस्थान आपल्या मानेवर धिमेपणानें जो वाहून नेत आहे, ह्याचें बहुतांशीं कारण येथील सद्यःशिक्षणच होय. एखादें राष्ट्र जेव्हां दुसऱ्या राष्ट्रास कायमचें आपल्या ताब्यांत ठेवूं इच्छितें तेव्हां तें त्याप्रमाणें उपाय योजनाहीं करीत असतें. जेत्यांना जितांस समूळ मारण्यांत कांहीं फायदा नसतो, तर त्यांना कायमचें बद्ध ठेवून त्यांच्याकडून कायमचें स्वहित साधून घेण्यावरच जेत्यांचें जीवित अवलंबून असतें. त्याप्रमाणेंच इंग्रजांनींही केलें.

इंग्रज लोक रानटी आहेत असें आज तरी म्हणावयाची कोणाची प्राज्ञा नाहीं ! ते कदाचित रानटीपणाची अनैतिक कृत्यें

करीतही असतील तरी तीं सुधारलेल्या स्वरूपांत करितात येवढें बरीक खरें ! इंग्रजांना हिंदुस्थानवर राज्यच करावयाचें तें तिकडून सगळे कामकरी इकडे आणून करता येणें कधींही शक्य नव्हतें. त्यांना हिंदुस्थानच्या लोकांची मदत घेणें भागच होतें व म्हणून त्याकरितां त्यांना शिक्षण देणेंही अवश्य होतें. अर्थात इंग्रजांनीं हिंदुस्थानांत जें शिक्षण सुरूं केलें तें येथील लोकांच्या फायद्याच्या दृष्टीनें नसून आपल्या राज्ययंत्राची गती सुयंत्रित चालावी म्हणूनच होय. इतक्या निःसत्व शिक्षणापसूनही हिंदुस्थानचें जें अल्पस्वल्प फायदे झाले असतील ते अर्थातच शिक्षणाचा मूळचा गुणच कल्याण करणें हा असतो म्हणून ! त्या फायद्याबद्दल इंग्रजांना शाबासकी देण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

हिंदुस्थानांत शिक्षण देण्याची सरकारी व कायदेशीर चळवळ प्रथमतः बेंटिंकच्या वेळीं झाली. तत्पूर्वी येथें कांहीं शाळा घालण्यात आल्या होत्या पण त्यांचें स्वरूप फारसें सुसंबद्ध नव्हतें. बेंटिंकच्या वेळीं मात्र हिंदुस्थानांत आणि विलायनेंत येथील शिक्षणाबद्दल वाद सुरूं झाले. त्यांत दोन पक्ष मुख्य होते. एका पक्षाचें म्हणणें असें कीं, हिंदुस्थानांत शिक्षण द्यावयाचें तें त्यांच्या स्वभाषेंतून आणि पौर्वात्य पद्धतीनेंच दिलें पाहिजे. त्यांच्या संस्कृतीवर जबरदस्तीनें आपली पद्धती लादली तर तें वाईट होईल. परंतु अशा प्रकारच्या न्यायी आणि कनवाळू लोकांची संख्या अतिशयच कमी होती. उलट दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें कीं, हिंदुस्थानांत जें शिक्षण द्यावयाचें तें इंग्रजी भाषेंतून आणि इंग्रजी पद्धतीनेंच दिलें पाहिजे ! ह्या खऱ्याळ पक्षाचा मेकॉले हा म्होरक्या

होता. १८३३ मध्यें मेकाले गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलचा लॉ मेंबर म्हणून प्रथम हिंदुस्थानांत आला तेव्हां ह्या प्रश्नास विशेष जोर चढला. पहिल्या पक्षांतील होरेस वुइलसन इत्यादि प्रमुख लोकांनीं इंग्रजी व संस्कृत भाषेचें तुलनात्मक अध्ययन करून त्यांतील गोडी चाखल्यानंतर व संस्कृत भाषेची व ग्रंथांची श्रेष्ठता अनुभवास आल्यानंतरच आपलें मत बनविलें. परंतु मेकाले साहेबांस संस्कृत व इतर पौर्वात्य ज्ञानाचा बालाग्रही गंध नव्हता. परंतु तरीही त्या बहाद्दरानें पेनेच्या एका झटक्यासरशीं ह्या महत्वाच्या प्रश्नाचा कायमचा निकाल लावून टाकला ! येथील शिक्षणासंबंधीं त्यानें आपली जी प्रसिद्ध कैफियत ( Minute ) लिहिली त्यांत त्यानें पौर्वात्य भाषा, कला व ज्ञान ह्याची अमर्याद टवाळी केली आहे ! त्याचें मतें हिंदुस्थानांतील ज्ञान इंग्लंडमधील बोर्डिंगांतून रहाणाऱ्या शेंबड्या पोरींना देखील हंसूं लोटण्यासारखें टाकाऊ आहे ! +

---

+ "........the pupils will there acquire what was known 2000 years ago, with the addition of vain and empty subtleties since produced by speculative men, such as is already taught in all parts of India. *The Sanskrit syetem of education would be the best calculated to keep the country in darkness*..................whether we can countenance, at the public expense, *medical doctrines which would disgrace an English farrier, astronomy which would move laughter in girls at an English boarding school; history abounding*

जणूं कांहीं इंग्रजी भाषा व ज्ञान ह्यांना कोणालाही हंसतांच आलें नसतें ! कोणत्याही गोष्टीची टवाळी करण्याइतकें सोपें काम दुसरें नाहीं. त्या वस्तूंतील गुणवर्णनाकरितां मात्र अक्कल लागत असते. वस्तुतः विशिष्ट भाषा म्हणजे कांहीं ज्ञान नव्हे. ज्ञान म्हणजे सुविचार व नैतिक प्रगती होय. कोणतेही सुविचार कोणत्याही भाषेंतून सांगितले तरी ते सारखेच पथ्यकर होतात. पण स्वभाषेंतून ते सांगितले तर परिचय व सुगमता ह्यामुळें ते जास्तच मधुर आणि निकट परिणामी होतात ! हिंदुस्थानांत मात्र ह्याच्या उलट स्थिती आहे.

अशा तऱ्हेनें स्वपक्षाचें जोरदार रितीनें समर्थन केल्यामुळें मेकालेची सरशी झाली आणि सध्याच्या विषारी पद्धतीचा पाया घालण्यांत आला. ही शिक्षणपद्धती सुरू करण्यांत तत्कालीन इंग्रज मुत्सद्यांचा कोणता स्तुत्य हेतू होता तो पाहण्यासारखा आहे ! वस्तुतः हिंदुस्थानला सुशिक्षित करण्याचें इंग्रजांना काय प्रयोजन होतें ? व ह्या परोपकारापासून त्यांना कोणत्या स्वर्गाची प्राप्ती होणारी होती ? त्यांना इतर कांहीं कामें नव्हतीं म्हणूनच त्यांनीं ह्या येथील शिक्षणाचा उपव्याप केला काय ? असें जर नाहीं तर हिंदुस्थानच्या कल्याणाव्यतिरिक्त इतर कांहीं विचार त्यांच्या

---

*in kings thirty feet high, and reigns thirty thou. sand years long, and geography made of seas of treacle and seas of butter.*"

—B. Administration P. 146-147.

डोक्यांत असतील हें उघड आहे. तें समजून घेण्याकरितां ह्या पद्धतीचा आद्यजनक व शिक्षण कामिटीचा अध्यक्ष जो मेकाले त्यानें हिंदुस्थानांतून आपल्या बापास १२ अक्टोबर १८३६ रोजीं पाठविलेल्या खाजगी पत्रांतील एक सुप्रसिद्ध उतारा वाचनीय आहे. तो असा :—

" Our English schools are flourishing wonderfully. We find it difficult,—indeed in some places impossible to provide instruction for all who want it. At the town of Hooghly fourteen hundred boys are learning English. The effect of this education on the Hindus is prodigious. No Hindu who has received an English education ever remains sincerely attached to his religion. Some continue to profess it as a matter of policy; but many profess themselves pure Deists, and some embrace Christianity. It is my firm belief that, if our plans of education are followed up, there will not be a single idolator among the respectable classes of Bengal thirty years hence. And this will be effected without any efforts to proselytise; without the, smallest interference with religious liberty merely by the natural operation of knowledge and reflection. I heartily rejoice in the prospect. "

—Macaulay's Life and Letters. quoted in हिंदुधर्म आणि सुधारणा.

ह्या पत्रावरून त्यांचें अंतरंग उघड होत आहे. सारें हिंदुस्थान ख्रिस्तमय करून टाकण्याची गुप्त भावनाही तत्कालीन मुत्सद्दी लोकांच्या डोक्यांत होती तर ! आणि मेकालेचें हें भविष्य तीस वर्षांतच नसले तरी पुढें बऱ्याच अंशानें खरें झालें ह्यांत शंका नाहीं. इंग्रज लोकांना आमची स्वधर्मासंबंधींची उत्कटता मारून टाकावयाची होती. कारण स्वभाषेमुळें स्वधर्माचा जिव्हाळा उत्पन्न होतो व स्वधर्माची कृत्यें अव्याहत चालवितां येण्याकरितां देशस्वातंत्र्याची जरूर भासूं लागते, व पुढें दलित लोक त्याप्रमाणें उपाय योजनाही करूं लागतात ! ही भावना हिंदुस्थानच्या मनांत उदित होऊं न देण्याची इंग्रजांची आटोकाट इच्छा होती. आणि म्हणूनच त्यांनीं मुद्दाम हें परकीय भाषेंतून शिक्षण सुरूं केलें.

इंग्रजी भाषेंत आधुनिक शास्त्रें, कलाकौशल्य इत्यादि हरएक विषयाचें ज्ञान आहे ही सत्य गोष्ट आहे व आधुनिक जगांत ती भाषा प्रत्येकानें शिकावी हही खरें; पण सर्वथैव त्याच भाषेचा जुलमानें अभ्यास केल्यामुळें ती उपयोगी ठरण्याऐवजीं अपाय कारक मात्र ठरते. इंग्रजी ज्ञानाबरोबर हिंदुस्थानच्या लोकांची धर्मश्रद्धा हळुहळू लोप पावूं लागून त्यांना इंग्रजी व ख्रिस्ती चष्म्यांतून पहाण्याची संवय लागूं लागली. त्यामुळें आपलें तेवढें वाईट आणि इंग्रजाचें तेवढें चांगलें अशी त्यांची साहाजिक समजूत होऊं लागली. अशा नादान समजुतीच्या लोकांनीं देशसुधारणेचे कितीही प्रामाणिक प्रयत्न केले तरी त्याला कितीसें यश येणार? पाश्चात्य धर्तीवर येथेंही नाना तऱ्हेचे समाज, परिषदा, कमिट्या व

कमिशनें निघालीं, पण देशाचा उद्धार होण्याचें चिन्ह त्यायोगें दिसेना. मूळच कलुषित झाल्यावर प्रवाह कलुषित झाल्यावांचून कसा राहील? अशाही शिक्षणांतून लोकमान्यासारखे धुरंधर उत्पन्न झाले ते केवळ अपवाद म्हणून! हिंदुस्थानांतील शिक्षण हें विलायतेंतील शिक्षणांची नक्कल आहे हें खरें; पण अस्सलांतील चैतन्य नकलेंत कोठून येणार? तेथील शिक्षणामुळें विद्यार्थी स्वदेशभक्त निपजतात, येथें त्याच इंग्रजी शिक्षणामुळें विद्यार्थी भ्याड आणि कमकुवत होत जातात! इंग्रजी शिक्षणास हिंदुस्थानांतील हवा मुळींच मानवत नाहीं. हिंदुस्थानांत इंग्रजी राज्यें होऊन आज इतकीं वर्षें झालीं असूनही त्यांना येथील साक्षरतेचें प्रमाण शेंकडा दोनतीनच्या वर नेतां आलें नाहीं, व ज्यांना त्यांनीं शिकविलें त्यांची अधोगती तर निरक्षरांपेक्षांही जास्त करून टाकली! त्याला कोणी शिक्षण म्हणेल काय? आज हिंदुस्थानांतील युनिव्हर्सिट्यांतून दरसाल हजारो तरुण तयार होऊन बाहेर पडतात, पण त्या बिचाऱ्यांची जगांत व संसाराच्या धकाधकींत काय किंमत ठरली आहे? अर्जांची भेंडोळी घेऊन ३०-३५ रुपयाकरितां कचेऱ्यांत खेटे घालणाऱ्या ग्रॅज्युएटांचे तांडे पाहिलें म्हणजे हें शिक्षण नसून पूर्वजन्मींचा शाप असावा असें वाटूं लागतें! आमच्या पदवीधरांना हातानें कोणतेंही काम करतां येत नाहीं कीं, पोट भरण्याचा एखादा उद्योग येत नाहीं. सरकारांनीं देशांत कांहीं औद्योगिक शाळा काढल्या म्हणून टेंभा मिरविण्यांत येतो, परंतु त्या औद्योगिक शाळा सामान्य गरीब विद्यार्थ्यांच्या काबूंत येतील अशा आहेत काय? इतकें कशाला? ज्याला 'उच्च' शिक्षण म्हणून मोठें नांव देण्यांत

येतें ते तरी किती गरीब लोक घेऊं शकतात ? व तें सर्व घेतल्यावर खर्च केलेल्या रकमेचा अर्धा हिस्सा तरी त्याला आयुष्यांत संग्रह करता येतो काय ? सारांश अनेक वर्षे हाडाची काडें करूनही फायद्याचा एक बिंदूही धडपणें हातीं येत नाहीं.

हिंदुस्थानच्या गतस्वातंत्र्याच्या काळांत आतांसारखी शिक्षण-व्यवस्था नव्हती. तेव्हां शाळांच्या मोठमोठ्या इमारती नव्हत्या, युनिव्हर्सिट्या नव्हत्या, पुस्तकें नव्हतीं, वाचनालयें नव्हतीं किंवा विद्यार्थ्यांचें आयुष्य कमी करणाऱ्या परीक्षाही नव्हत्या. तेव्हां कोठले तरी तात्या पंतोजी कोणत्या तरी पद्धतीनें ठराविक पद्धतीचें शिक्षण देत. तरीही तेव्हांच्या लोकांची मनःस्थिती सध्याच्या लोकांपेक्षां जास्त चैतन्यस्फुरित, कार्यप्रधान आणि स्वातंत्र्योन्मुख रहात असे. आणि आज शिक्षणाची इतकीं सुधारलेलीं साधनें अस्तित्वांत असतांही विद्यार्थी केवळ रडेच निपजत आहेत ! हा केवळ काल-महिमाच आहे असें म्हणवत नाहीं. केवळ शाळांच्या आणि वाचनालयांच्या इमारती कांहीं मुलांना स्वदेशभक्तीचे धडे देऊं शकत नाहींत, तर तेथें जिव्हाळ्याच्या शिक्षकांची आवश्यकता असते. शृंगारखचित प्रेताप्रमाणेंच बाह्यावडंबरीय पण चैतन्यरहित शिक्षण व्यर्थ होय. जाणून बुजूनच 'परतंत्र' असणाऱ्या देशांत त्या निर्मल शिक्षणाचा लाभ कसा मिळावा ?

आमच्या विद्यार्थ्यांना लहानपणापासून जीं पुस्तकें शिकावीं लागतात, तींही ह्या परतंत्र परिस्थितीचीच हत्यारीं अपत्यें असतात. रोज रोज मुलांच्या कानीं कपाळीं स्वतःच्या निष्क्रियतेचे, पूर्वजांच्या

मूर्खपणाचे, स्वधर्माच्या निंदेचे व स्वातंत्र्यमारक प्रलाप कानीं पडत असल्यामुळें मोठेपणीं त्यांच्या मनाला तजेला कसा मिळावा? त्यांना स्वतःच्या कर्तबगारीचा आत्मविश्वास कसा वाटावा? हिंदुस्थानांत शिकविण्यांत येणाऱ्या टेक्स्टबुकांसारखीं पुस्तकें इतर स्वतंत्र देशांतील शाळांतून कधींही चालू करण्यांत येणार नाहींत! येथील मुलांना शौर्याच्या गोष्टी वाचावयाच्या त्या देखील ग्रीक किंवा इंग्रज लोकांच्या वाचल्या पाहिजेत. मोठ्या लोकांचीं चारित्रें हवीं असलीं तरी तीं देखील जार्ज वाशिंग्टनसारख्यांशिवाय दुसऱ्यांचीं मिळावयाचीं नाहींत! जणूं कांहीं आमच्या देशांत तत्सम मोठीं माणसें झालींच नाहींत! येथें शिकविण्यांत येणाऱ्या इतिहासासंबंधीं तर विचारूंच नये! शिवाजीचा लुटारूपणा संबंधीं कांहीं वर्षांपूर्वीं तरी प्रत्येक विद्यार्थ्याला खडान्खडा माहिती असे! शाळांतून शिकविण्यांत येणारीं हीं सर्व पुस्तकें एकत्र करून त्यांतून अनेक आक्षेपार्ह उतारे काढून दाखवितां येतील. परंतु स्थलाभावामुळें तें शक्य नसल्यामुळें नमुन्याकरितां कांहीं वाक्यें देत आहोंतः—

1— 'When the English came to India, there were no railways, no post office, no newspapers, no schools or colleges worthy of the name, no useful Vernacular literature; the fires of *Sati* blazed, the female infant cry was soon hushed by a violent death, bribary poisoned the fountains of justice, and the desolation of

famine-stricken provinces told how grievous was the misrule in the land.'

P.75.

2— 'Krishna was a debauched character and Shiva was worse if possible, and yet many Hindus believe that they were divine.'

P. 76.

Studies in English—A manual for Indian Students
by W. Mc Mordie, M. A.

वरील वाक्यें शाळांत शिकविण्यांत येणाऱ्या एका प्रसिद्ध इंग्रजी लेखकाच्या इंग्रजी व्याकरणाच्या पुस्तकांत 'काळा' च्या प्रकरणांत उदाहरणादाखल म्हणून दिलेलीं आहेत ! संबंध व प्रयोजन नसतांना आमच्या देशाच्या व देवधर्माच्या निंदेचे हे प्रलाप आमच्या विद्यार्थ्यांनीं वाचावयाचे आणि त्याबद्दल एक अवाक्षरहि काढावयाचें नाहीं हा जुलूम आहे ! मागे ज्ञानकोशांत महंमदपैगंबरा संबंधीं कांहीं मानहानिकारक मजकूर आल्याचें वाटल्यावरून मुसलमानांनीं त्या विरुद्ध आकाशपाताळ एक करून सोडलें; परंतु वरील प्रकारचीं आमच्या देश, धर्म व देव निंदेचीं पुस्तकें सर्रास चालू असतां त्याबद्दल आजपर्यंत एकाही हिंदू शिक्षकानें किंवा हिंदू पालकानें ओरड करूं नये हें आश्चर्य नव्हे काय ? अस्तु. पुढील उतारेही वाचनीय आहेतः—

3— 'If loyalty were all then the example of Germany in the Great War would provide a

true educational ideal.'

P. 24.

4— 'One cannot expect the civic virtues to grow where the spirit of the press is bad, where the local bodies, such as Councils, Municipalities, District Boards, etc , are indifferent or even antagonistic to progress, improvement, and the ordinary standards of modern civilization: where class prejudices are fostered and perpetuated: where public life is dominated by self interest: where bribery is winked at and tolerated.'

P. 27.

A lesson on 'Citizenship' 'from A modern English Reader' by J. S. Armour, M A. I. E. S.

5— 'If a great avalanche were to sweep down and bury all the Swiss in their valleys, it would matter very little to the rest of the world'

How Man Conquered Nature.
by Minnie J. Reynolds
P. 114.

वऱ्हाड मध्यप्रांतीय हायस्कूलांतून मॅट्रिकच्या इयत्तेला शिकविण्यांत येणाऱ्या वरील पुस्तकांतून जर्मन व स्विस लोकांची व नांव न घेतांही हिंदुस्थानची किती अमर्याद निंदा केली आहे! ह्या सर्व क्रमिक पुस्तकांतून इंग्रजांच्या निंदेचा एक शब्दही आढळणार नाहीं, उलट स्तुती मात्र भरपूर आढळेल. हिंदुस्थानच्या

लोकांची राजनिष्ठा आपल्याच पायाशीं एकनिष्ठपणें असावी म्हणून इतर देशांच्या निंदेचा केवढा हा खटाटोप! अशा तऱ्हेच्या पद्धतशीर शिक्षणपद्धतीपासून आमच्या विद्यार्थ्यांच्या बालमनावर विपरीत परिणाम होऊन त्यांच्या कडून भावी काळांत नागरिकत्वाची जबाबदारी पार न पडल्यास आश्चर्य कसलें!

मुळींच शिक्षण नसण्यापेक्षां वाईट शिक्षण बरें, ह्या न्यायानें दुसऱ्या शिक्षण पद्धतीच्या अभावीं आहे हेंच शिक्षण घेतल्याशिवाय सद्य स्थितींत दुसरा मार्ग नाहीं. त्यापासून शक्य तो फायदा पदरांत पाडून घेणें हें विद्यार्थ्यांचें कर्तव्य होय. सध्या हिंदुस्थानच्या लोकांत जी स्वाधिकाराची जागृती दिसते ती सर्वथैव इंग्रजी शिक्षणाचाच परिणाम होय असें तदभिमान्यांकडून सांगण्यांत येते, परंतु ही जागृती बहुतांशीं परिस्थितीप्राप्त असल्यामुळें कोणत्याही प्रकारचें शिक्षण राहिलें असतें तरी ती झाल्य शिवाय राहिली नसती किंबहुना शिक्षण जर अधिक तेजस्वी असतें तर ही जागृती अधिक राहिली असती. अशा स्थितींत इंग्रजी शिक्षणापासून अमुक फायदे झाले असा टेंभा मिरविण्यांत काय अर्थ आहे? हिंदुस्थानला स्वातंत्र्याचे दिवस पुनरपि आणावयाचे असतील आणि त्याची सर्व तऱ्हेनें भरभराट करून गेलेलें वैभव परत मिळवावयाचें असेल तर प्रथम येथील शिक्षण पद्धती बदलला पाहिजे हें उघड आहे.

—— :o:——

# हिंदुस्थान आणि इंडिया.

आपल्या देशास ‘ इंडिया ’ हें नांव ब्रिटिश लोकांनीं दिलेलें आहे. हिंदुस्थान म्हणजे ब्रिटिशापूर्वीचें भारतवर्ष आणि इंडिया म्हणजे तदनंतरचें भारतवर्ष होय. भारतवर्षाच्या ह्या दोन्ही स्थितींची सामान्य तुलना करणें बरेंच मनोरंजक होणार आहे. इंग्रजांच्या राज्याला दोनशें वर्षें व्हावयाला आलीं आहेत. त्या अवधींत इतर जगाबरोबर हिंदुस्थाननें सुधारणेच्या बाबतींत आपलें पाऊल किती पुढें टाकलें व ब्रिटिश पूर्वकालीन स्थितीपेक्षां भारतवर्षाची प्रगती अगर अधोगती किती व कोणत्या प्रकारची झाली व त्याचें कारण काय तें पाहूं. वस्तुतः हा मुद्दा बराच वादग्रस्त आहे. आतांपर्यंत बहुतेक शिष्ट लोकांनीं, इंग्रजीराज्यामुळें हिंदुस्थान दिवसेंदिवस सुधारत चाललें आहे, तेथें आतां पूर्वींची अंदाधुंदी व जीविताची अशाश्वती राहिली नाहीं. आतां काठीस सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत डोळे लावून खुशाल प्रवास करावा व शांततेनें जीवित कंठावें; अशीं मतें प्रतिपादन केलीं आहेत. सकृद्दर्शनीं अशी स्थिती दिसते खरी. परंतु खोल विचार करतांना अशीच केवळ स्थिती आहे असें वाटत नाहीं.

सद्यःस्थितींत दुसऱ्या कोणत्याही सुधारलेल्या व स्वतंत्र समजल्या जाणाऱ्या देशांत आढळणाऱ्या सुधारणामूलक गोष्टी सामान्यतः हिंदुस्थानांतही आढळून येतात. आगगाड्या, तारायंत्रें,

पोष्ट आफिसें, जहाजें, विजेचे दिवे, मोटारी, न्यायालयें, सडका, वर्तमानपत्रें, पोलिस, पाण्याचे नळ इत्यादि सर्व गोष्टी येथें आहेत. परंतु त्या सर्वांपासून स्वतंत्र देशांत जो फायदा होतो तो मात्र येथें मुळींच होत नाहीं म्हटलें तरी चालेल. सदरहू प्रकारच्या प्रत्येक गोष्टीवर स्वतंत्र देशांतून तेथील लोकांचा खास ताबा असतो. परंतु हिंदुस्थानांत मात्र तसा प्रकार मुळींच नाहीं. त्यांना ह्या सर्व गोष्टीपासून फायदा होण्याऐवजीं तोटाच होत आहे. इंग्रजांनीं ह्या ज्या गोष्टी सुरू केल्या आहेत, त्या स्वतःचें राज्य व त्यापेक्षांही आपला व्यापार सुरळीत चालावा म्हणून होय. लोकांचा फायदा व्हावा म्हणून नव्हे ! निदान प्रारंभीं तरी ह्यांचा हाच उपयोग असे. आतां लोकांची त्यापासून अनायासें थोडीशी सोय होते ही गोष्ट निराळी. वरील गोष्टी स्थापन करण्याकरितां हिंदुस्थानला आपल्या खिशांतून लाखो रुपये खर्च करावे लागले पण त्याबद्दल परत एक पैही त्यांच्या खिशांत आली नाहीं उलट त्यायोगें कित्येक उतावळ्या लोकांच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नांत नसते अडथळे बरीक उद्भवतात ! ह्या सर्व सुधारणा इंग्रजांनीं केल्या ही गोष्ट खरी आहे. परंतु इंग्रजांचें राज्य येथें न रहातां हिंदूंचेंच पूर्ववत् चालू रहातें, तर ह्या गोष्टी आजच्या घटकेस हिंदुस्थानांत आल्याच नसत्या, असें ह्मणावयास काय पुरावा आहे ? आज जेथें इंग्रजांचें राज्य नाहीं त्या देशांतूनही ह्या गोष्टी आहेतच ना ? मग तशाच त्या हिंदुस्थानांतही आल्या असत्या. काळाचा फायदा कांहीं झालें तरी प्रत्येकाला मिळालाच पाहिजे. एखादा नवीन शोध लागल्यानंतर त्याचा उपयोग करणें ही जगाच्या मालकीची गोष्ट असते. त्या गोष्टी अमुक देशांत

अमुक लक्षणाच्या लोकांनीं सुरू केल्या ह्मणजेच फलद्रूप होतात. नाहीं तर होत नाहींत असा कांहीं प्रकार नाहीं.

ब्रिटिशांच्या राज्यापूर्वी मराठी राज्यांत व तत्पूर्वी मुसलमानी राज्यांत आतांहून बरीच अंदाधुंदी होती हें मान्य केलें तरी त्या वेळेस लोक आतांपेक्षां अत्यंत सुखी होते हा खरी गोष्ट आहे. त्यावेळीं देशांतला पैसान् पैसा देशांत रहात असे. लोकांचीं अंतःकरणें नैतिक दृष्ट्या अत्यंत उन्नतीस पोंचलेलीं अतएव सुधारलेलीं अशीं होतीं. त्यांना पोटभर खावयास मिळत असे. लढाया असल्या तरी मनस्वास्थ्य लाभत असे आणि अनेक उद्योगधंद्यांची भरभराट होऊन लोकांच्या कलाकौशल्याचें चीज होत असें. त्या वेळच्या स्थितींत एक प्रकारचा आपलेपणाचा जिव्हाळा होता. तशी आज स्थिती नाहीं. आजच्या 'इंडियां' त देशी उद्योगधंदे बुडाले; लोकांना खावयास पुरेसें मिळत नसल्यामुळें त्यांचीं शरीरें रोडावलीं. निर-निराळे रोग बोकाळले, पोटाची चिंता रात्रंदिवस वहावी लागत असल्यामुळें इतर महत्वाच्या गोष्टीकडे लक्ष देण्यास त्यांना अवसर नसतो. आजच्या सुधारलेल्या स्वरूपाच्या न्यायालयांतून निः-पक्षपातीपणानें न्याय मिळतोच असेंही नाहीं. अशा रितीनें कोण-त्याही दृष्टीनें पाहिलें तरी आजची स्थिती त्या वेळेपेक्षां फारशी स्पृहणीय ठरत नाहीं. मोंगलांच्या कालांत व तत्पूर्वी चंद्रगुप्त, अशोकांच्या वेळची येथील राज्यपद्धती जगांतील तत्कालीन कोणत्याही देशांतल्या राज्यव्यवस्थेपेक्षां सुंदर होती. हिंदुस्थानला अत्यंत अव्यवस्थित काळांतही जगाला आश्चर्य वाटणाऱ्या इमारती व इतर

आश्चर्यकारक कामें करतां आलीं; परंतु आजच्या सुधारलेल्या इंडियाला त्या तऱ्हेचें एकही काम करतां येऊं नये हें आश्चर्य नव्हे काय ?

हिंदुस्थानला पूर्वींचें मुसलमानाचें किंवा आजचें इंग्रजांचें दोन्हीं राज्यें सारखींच परकीं आहेत. परंतु त्या दोन्ही प्रकारच्या पारतंत्र्यामध्यें एक मोठा भेद आहे. मुसलमानांनीं हिंदुस्थान जिंकलें, व लुटलें तरी त्यांनीं येथेंच घर समजून वास्तव्य केलें. त्यामुळें हिंदुस्थानला देशदृष्टीनें मुळींच गरीबी आली नाहीं. उलट इंग्रजांनीं मात्र येथील लक्ष्मीचा सतत प्रवाह आपल्या घराकडे वळविला आहे. त्यामुळें हळुहळू त्या मार्गानेंच हिंदुस्थानचें रक्तही कमी होत जाऊन त्याला शारीरिक, मानसिक व राष्ट्रीय क्षय लागलेला आहे ! आज हिंदुस्थानांतून दारुपायीं शंभर कोटी, कापडाकरितां साठ कोटी, आणि इतर आवश्यक व संसारोपयोगी जिनसाकरितां हजारो कोटी रुपये दरवर्षीं परदेशांत—मुख्यतः विलायतेंत–जात आहेत. हें देशोन्नतीचें लक्षण खास नव्हे ! त्यापेक्षां जुने मोंगली राज्य बरें असेंच म्हणावयास काय हरकत आहे ? त्यावेळीं धडपडीचें सामर्थ्य तरी होतें. आज तेंही उरलें नाहीं ! हा मुसलमानी व इंग्रजी राज्यांतील फरक १७८३ मध्यें वारन-हेस्टिंग्सच्या खटल्याचे वेळीं बर्कसाहेबांनीं आपल्या भाषणांत मोठ्या सुंदर तऱ्हेनें दाखविला होता. तीच स्थिती आजही कायम असल्यामुळें तो लांब उतारा जसाच्या तसा खालीं देत आहे :—

" The Asiatic conquerors very soon abated their ferocity, because they made the con-

quered country their own. They rose or fell with the rise and fall of the territory they lived in. Fathers there deposited the hopes of their posterity; the children there beheld the monuments of their fathers. Here their lot was finally cast; and it is the normal wish of all that their lot should not be cast in bad land. Poverty, sterility, and desolation are not a recreating prospect to the eye of man, and there are very few who can bear to grow old among the curses of a whole people. If their passion or avarice drove the Tartar hordes to acts of rapacity or tyranny, there was time enough, even in the short life of man, to bring round the ill effects of the abuse of power upon the power itself. If hoards were made by violence and tyranny, they were still domestic hoards, and domestic profusion, or the rapine of a more powerful and prodigal hand, restored them to the people. With many disorders and with few political checks upon power, nature had still fair play, the sources of acquisition were not dried up, and therefore the trade, the manufactures, and the commerce of the country flourished. Even avarice and usury itself operated both for the preservation and the employment of national wealth. The husbandman and manufacturer paid heavy interest, but then they augmented the fund from whence they were again to borrow.

Their resources were dearly bought, but they were sure, and the general stock of the community grew by the general effect.

" But under the English Government all this order is reversed The Tartar invasion was mischievous, *but it is our protection that destroys India* It was their enmity, but *it is our friendship*. Our conquest there, after twenty years, is as crude as it was the first day. The natives scracely know what it is to see the grey head of an Englishman; young men, boys almost, govern there, without society, and without sympathy with the natives. They have no more social habits with the people than if they still resided in England; nor, indeed, any species of intercourse but that which is necessary to making a sudden fortune, with a view to a remote settlement. Animated with all the avarice of age, and all the impetuosity of youth, they roll in one after another, wave after wave, and there is nothing before the eyes of the natives but an endless, hopeless prospect of new flights of birds of prey and passage, with appetites continually renewing for a food that is continuously wasting. *Every rupee of profit made by and Englishman is lost for ever to India.* "

ब्रिटिश पूर्वकालीन हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिती आणि सध्याची सांपत्तिक स्थिती यांत महदंतर आहे. तेव्हांचे कर व

इतर खात्यापासून सरकारला होणारें उत्पन्न हें देशाच्या श्रीमंतीचें लक्षण असे, पण आजच्या स्थितींत तेंच उत्पन्न देशाच्या दुर्दैवाचें आणि उत्तरोत्तर येत जाणाऱ्या निर्धनतेचें द्योतक होऊन बसलें आहे. सध्या कर, शेतसारा, पोष्टआफिसें आणि इतर बाबी ह्या सर्वांपासून पूर्वींपेक्षां उत्पन्न जास्त होत असेल, पण त्याचा हिंदुस्थानच्या फायद्याकरितां कितीसा विनियोग होतो ? सध्या आयात आणि निर्यात मालाचें——व्यापाराचें——प्रमाणही पूर्वींहून जास्त असले म्हणून तें देशाच्या प्रगतीचें लक्षण मात्र खास नव्हे. पूर्वीं देशांतील कच्चा माल देशांतच खपत असे पण आज येथील कच्चा माल बाहेर देशीं जाऊन त्याचा पक्का माल तयार होऊन इकडे येतो. हा व्यापार दिसावयाला केवढाही अवाढव्य दिसत असला तरी तो उघड उघड आंतबट्ट्याचा आहे. हिंदुस्थानांत गहूं पुष्कळ पिकतो पण त्यापैकीं कितवा हिस्सा येथील गरीब लोकांच्या पोटाकरितां रहातो ? आणि जर येथें उत्पन्न होणाऱ्या धान्यानें मुख्यत: परक्यांचींच पोटें भरावयाचीं असतील तर ते व्यर्थ श्रम तरी कशाला करावयाचे ? देशांतील कामकरी व अधिकारी वर्गाला मिळणाऱ्या पगाराच्या मानावरून सामान्यत: तेथील श्रीमंतीची कल्पना करीत असतात. आणि हिंदुस्थानांतील बड्या अधिकाऱ्याचे पगार हे जगांतील इतर कोणत्याही देशांत नाहींत इतके मोठे असल्यामुळें आमचा देश हा जगातील धनवानाग्रणी देश आहे असा कोणाचाही ग्रह सहज होईल. परंतु हे अधिकाऱ्याच्या पगाराचे पैसे येथें रहात नसल्यामुळें तीही एक हिंदुस्थानला कीडच लागली आहे. असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. इंग्रज येण्यापूर्वीं हिंदुस्थानांत

पुष्कळ उद्योगधंदे होते पण ते येतांच थोड्या दिवसांत ते लुप्त झाले. ह्यावरून प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणें इंग्रजच ह्यास कारणीभूत झाले नसावे काय ?

' हिंदुस्थानां ' तील आणि ' इंडियां ' तील सामान्य नोकर वर्गातही अतिशय अंतर आहे. त्या वेळच्या नोकरांना राज्य-कारभारांत बढती व कर्तबगारी दाखविण्यास वाव असे. पण आतांच्या नोकरांना कायदे व परिस्थिती ह्यापुढें कांहींही करतां येत नाहीं. त्यांची प्रगती मारल्या जाते. त्यांच्या पोटांनाही भरपूर मिळत नसल्यामुळें सध्या मध्यम स्थितींतील कारकुनी पेशाच्या कुटुंबवत्सल गृहस्थाला सुखासमाधानानें रहाणें मुष्कील झालें आहे.

कोणताही स्वतंत्र वा अस्वतंत्र देश सैन्यावांचून असूं शकत नाहीं. त्याप्रमाणें पूर्वीप्रमाणें आतांही हिंदुस्थानांत सैन्य आहेच. हें सैन्य मुख्यतः हिंदी लोकांचेंच बनलेलें आहे. ह्यावर श्रेष्ठ दर्जाच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या गोऱ्या पलटणीही आहेत. परंतु त्यांची संख्या मात्र फार कमी आहे. सैनिक अधिकाऱ्यांमध्यें हिंदी लोक नाहींतच म्हटलें तरी चालेल. फौजांतून सुशिक्षित हिंदी माणसांना फारसा वाव नाहीं. सारा भरणा अशिक्षित शिपायांचा आहे. ह्या सर्व पलटणीचा सालीना साठ कोटींचा खर्च खास हिंदी तिजोरींतून चालतो पण त्याचा फायदा मात्र हिंदु-स्थानास मुळींच मिळत नाहीं. काळ्या व गोऱ्या शिपायांच्या पगाराचें आणि कामाचें प्रमाण मात्र व्यस्त आहे. ह्या फौजेनेंच इंग्रज आपल्या देशांतही निश्चिंत आहेत. सध्याच्या शांततेच्या

काळांत शिपायांना लढाईचें काम बहुधा पडत नसल्यामुळें कोठे निःशस्त्र, निरपराध लोकांची कत्तल करावयाची झाली तर मात्र त्यांना आमंत्रण स्वीकारणें भाग पडतें! सारांश सध्याचें लष्कर हें उपायकारक होण्याऐवजीं स्वातंत्र्याचे शत्रू मात्र बनलेलें आहे.

लष्कर किंवा पोलिस हे शांतता रक्षणाकरितां असतात. परंतु ह्या दोन्हींचें हिंदुस्थानांतील सध्याचें कार्य मात्र उलट दिसत आहे. सध्याच्या पारतंत्र्याच्या कारुण्यमय स्थितींतून सुटण्याची धडपड करणारे कित्येक शूर तरुण केंव्हां केंव्हां अत्याचाराच्या मार्गानें जातात. त्यांचें अंतःकरण स्वदेशासाठीं तिळतीळ तुटत असतें. अत्याचार करतांना स्वतःच्या बलिदानाचें चित्र समोर दिसत असतांही तें कचरत नाहींत! स्वतःच्या समजुतीप्रमाणें परिस्थितीप्राप्त असा वैयक्तिक अत्याचार केवळ राष्ट्रीय बुद्धीनें करणाऱ्या अशा सर्वस्वी वंद्य विभूतींना फांसावर लटकविण्याकरितां, त्यांचे कट उघडकीस आणण्याकरितां, वा त्यांना यावज्जीव कठोर दंड देण्याकरितां ह्या पोलिस खात्याचा उपयोग होतो! व त्या प्रमाणें हे शूर लोक हसतमुखानें फासावर चढूनही जातात! कोणत्याही सरकारला आपली सुस्थिरता कायम ठेवण्याकरितां असें वागावें लागतें खरें! परंतु जुन्या काळांतील गुप्त अगर उघड पोलिसाचे प्रजेला इतकें भय बाळगण्याचें कारण नसे. स्वत्वरक्षण करणें तेंव्हां आतांइतकें कठीण मुळींच नव्हतें.

जुन्या आणि नव्या हिंदुस्थानांतील एक मोठा फरक म्हणजे सध्याचीं संस्थानें होत. सध्याचीं जुनीं संस्थानें हीं त्या त्या भूत-

पूर्व बलाढ्य सत्तेचे अवशेष होत. आतांपर्यंत इंग्रजांनीं देशी राज्यें घशांत टाकल्यानंतरही जे थोडे भाग उरले त्यांना मोठ्या दयेनें मांडलिकत्व प्रदान करण्यांत आलें आहे! संस्थानिकांशीं वेळोवेळीं जे तह होत आलेले आहेत तेही मोठ्या लटपटंपचीचे आहेत. संस्थानिक लोकांना त्यांचीं संस्थानें पुरतीं खालसा न करून इंग्रजांनीं कदाचित् उपकृत करून ठेवेंल असेल तरी त्याचा देशीय दृष्टीनें मुळींच फायदा नाहीं. जुलूम व प्रतिबंध ह्या बाबतींत संस्थानिक म्हणजे सवाई इंग्रज असतात. संस्थानची प्रजा दुहेऱ्या पारतंत्र्यामुळें अगदीं अज्ञान व गबाळी असते. तेथील वेळोवेळींच्या अंदाधुंदीमुळें तर केंव्हां केंव्हां असेंही वाटावयास लागतें कीं, सर्व संस्थानें खालसा होतील तर बरें. संस्थानें हीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मार्गांत मोठे अडथळे आहेत. संस्थानामुळें हिंदुस्थान मध्यें उगाच दोन प्रकारचे भाग पडून तुटकपणा वाढला आहे. शिवाय त्यायोगें इंग्रजांचें राज्यकारभाराचें काम परभारें निभून दयेचा टेंभाही मिरवावयास मिळतो! युद्धें व इतर संकटें ह्यांत संस्थानांकडून साम्राज्य सरकारला फार मदत होते. व नजराणेही भरपूर मिळतात. तेंव्हां अशा वेड्या पीरांना दूर करावें असें इंग्रजांना कां म्हणून वाटावें?

आम्हीं पूर्वींहून जास्त विचारवान व चिकित्सक झालों असूं. पण हा कालगुण आहे. सध्याच्या इंडियाची बाह्य आणि आंतर स्थिती ह्यांतील पराकाष्ठेची विभिन्नता लक्षांत घेतली, व ह्या आधि-भौतिक व अध्यात्मिक अधोगतीचा विचार केला तर सध्याची 'सुधारणा' ही खरी सुधारणा नव्हे असें कबूल करणें भाग पडतें.

येथील उत्पन्न, व्यापार, जन्ममृत्यूचें प्रमाण इत्यादिकांची तुलनात्मक आंकड्यांचीं प्रमाणें हवीं असल्यास हिंदी अर्थशास्त्राच्या ( Indian Economics ) सन्माननीय पुस्तकांतून मिळूं शकतात. सध्याच्या पोषाखी सुधारणेनें आमची समाज व्यवस्थाही मोठी विस्कळीत झाली आहे. ज्या स्थितीमुळें परावलंबित्व व निर्धनता वाढते असल्या सुधारणांचे आम्हीं काय करणार ? कौन्सिलें, लोकलबोर्डे या सारख्या लोकनियुक्त संस्थांतून सामुदायिक पद्धतीनें स्वमतप्रतिपादनाची संवय लोकांस लागत चालली आहे. पण तीं केवळ गादी तक्क्याचीं कामें होत ! पूर्वीच्या हिंदुस्थानांत पुस्तकें निघत नसत तर प्रेस अॅक्टही नव्हता. आज त्या निर्बंधामुळें लिहिणें व बोलणें देखील नियमित होऊन बसलें आहे. जी देशभक्ती स्वतंत्र देशांतून गुण म्हणून मानल्या जाते तीच येथें अपराध ठरत आहे ! सारांश, वरील संक्षिप्त विवेचनावरून कोणती स्थिती तुलनात्मक दृष्टीनें श्रेयस्कर आहे हें सहज समजून येईल.

---

# * उपसंहार *

आंतापर्यंत घटोत्कचाच्या मायेप्रमाणें असणाऱ्या हिंदुस्थनच्या पारतंत्र्याचा सत्य इतिहास जो संक्षिप्तपणें लिहिला तो कोणावरही वैयक्तिक टीका करण्याच्या उद्देशानें नव्हें. इंग्रज लोक स्वदेशांत वैयक्तिक व सामुदायिक दोन्ही दृष्टींनीं फार उमदे असून हिंदुस्थानला त्यांच्यापासून अनेक गुण शिकण्यासारखे आहेत. त्यांचा स्वदेशाभिमान, कर्तृत्व, धडाडी, शोधक बुद्धी आणि स्वदेशा-स्तव निःस्वार्थ बुद्धीनें काम करण्याची तत्परता इत्यादि सद्गुण निःसंशय अनुकरणीय आहेत. राष्ट्रीय शील उत्तम बनावयास अशा लोकांचा आदर्श आपणांस हवाच आहे. परंतु असल्या संभावित व ज्ञानी लोकांकडूनही हिंदुस्थानला भूतकाळीं उपद्रव व्हावा हा केवळ त्यांचा अपराध नसून येथें स्वाभाविक असणाऱ्या स्वार्थी मनुष्य-स्वभावासच दोषी धरलें पाहिजे. तसेंच सध्याचें सरकारही हें केवळ परंपरेचेच दासानुदास असल्यानें बऱ्हंशीं परंपरा न सोड-ल्याबद्दल त्यांनाही दोष देण्याची आमची बिलकूल इच्छा नाहीं. स्वराष्ट्राच्या फायद्याकरितां वैयक्तिक नीतिअनीतीच्या बंधनांची मुळींच दरकार न बाळगण्याचा इंग्रजांचा जो सद्गुण आहे त्याचें आपद्धर्म म्हणून आपणही अल्प प्रमाणांत अनुकरण केलें तर वावगें होईल असें नाहीं.

सुदैवानें अगर दुर्दैवानें आमची व इंग्रज राज्यकर्त्यांची गांठ पडली आहे. तेव्हां व्यवहारांत त्यांचा संबंध येणें अपरिहार्य होय.

आज हिंदुस्थान ज्याअर्थी पारतंत्र्यांत आहे त्याअर्थी त्यांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करणें हा त्याचा धर्म होय ही निर्विवाद गोष्ट आहे. परंतु ह्या स्वातंत्र्याचा निश्चित मार्ग कोणता हें सांगण्याचें काम आमचें नाहीं. तरी पण उतावळेपणाच्या नसत्या तडफडीपासून मात्र फारशी फलप्राप्ती होण्यासारखी नाहीं येवढें खास म्हणतां येईल. आज देशांतील थोर पुढारी लोक खुषीनें वा नाखुषीनें न्याय्य आणि शांतताप्रधान मार्गांनीं जाण्याचा उपदेश करीत आहेत तो ठीक आहे. सध्या राष्ट्रोन्नतीचीं अनेक दालनें ओस पडलीं आहेत. त्यांत शिरून आमच्या तरुणांनीं शांततेनें आपली आणि आपल्या देशबांधवांची प्रगती करून घेतल्यास राष्ट्राचा भावी भाग्योदय लांब राहणार नाहीं. शतकाशतकाच्या पारतंत्र्यानें आलेली क्षीणता काढून टाकून सरकारी सहकार्यानें वा असहकारानें सुचेल त्या मार्गानें प्रयत्न करीत राहिलें पाहिजे. आमचे मतें देशांतील भावी पिढीला संस्कृतीप्रधान शिक्षण देण्याची संघटित चळवळ झाल्यास येत्या २५-३० वर्षांत पुष्कळच कार्य होईल. नागपुरांत असे उद्योग सुरू झाले आहेत. आपली राष्ट्रीय तपश्चर्या खरोखरच उग्र असली तर तीस फळ आल्यावांचून कधींही रहाणार नाहीं. ता दयाघन प्रभू ती सफळ करो व आमचें भारतवर्ष पुनरपि वैभव संपन्न झालेलें दिसो एवढीच प्रार्थना आहे.

समाप्त

REFBK-0005526